करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग : ८

संपादक :
मा. वि. गुजर, बी. ए.

किंमत ५ रुपये ५० पैसे

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार
यांना
प्रेमादरपूर्वक भेट
मा. वि. गुर्जर
ता. ८।७।१९५५

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग आठवा)

गोवा पुराभिलेख संग्रहालयांतून निवडलेले कागद

इ. स. १७१३ ते इ. स. १८३०

संपादक :

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८६ इ. स. १९६५

प्रकाशक :

मा. वि. गुजर

१३२१ कसबा पेठ, पुणें ११.

*

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :

हिस्ट्री ऑफिस, न्यू पॅलेस, कोल्हापूर

किंवा प्रकाशक यांच्याकडे.

*

किंमत

५ रुपये ५० पैसे

*

मुद्रक :

मा. प. तळेकर

श्रीदत्त मुद्रणालय,

३३५ शनवार पेठ, पुणें २.

प्रस्तावना : भाग ८

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा आठवा भाग आहे. यांत गोवा पुराभिलेख संग्रहालय, पणजी (गोवा) येथें असलेल्या ऐतिहासिक मोडी अस्सल कागदपत्रसंग्रहांतून निवडलेल्या कागदांचा समावेश केला आहे. मोडी लिपींत लिहिलेले सुमारें सहा हजार कागद माझ्या अवलोकनांत आले. हीं सर्व पत्रें छत्रपति शाहूमहाराज (इ. स. १७०७–१७४९) व महाराजांच्या नंतरच्या कारकीर्दींतील आहेत. जंजिरे गोवा येथील पोर्तुगीज विजरई अगर गोबर्णदोर अगर सकडतार अगर जनराल अगर कपितान आणि त्या प्रांतांतील मनसुबेबाज शेणवी यांच्याशीं हा पत्रव्यवहार झालेला आढळतो. या पत्रांतील ऐतिहासिक मजकूर सारांशरूपानें दिला तर अभ्यासकांना तेथील मोडी अस्सल कागदपत्रसंग्रहाची साधारण कल्पना येण्यास उपयोग होईल, अशी आशा वाटते. सबब त्या मजकुराचें दिग्दर्शन पुढें केलें आहे.

आंगरे बंधू व पेशवे हें प्रकरण मराठ्यांच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं संस्मरणीय आहे. तुळाजी आंगऱ्याचा नाश करण्याचे कामीं फिरंग्यांचें मन बळविण्यासाठीं नानासाहेब पेशव्यांनीं आपल्या अंमलदाराकडून फिरंगी विजरई बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार, तसेंच पेशव्यांपासून बचाव व्हावा म्हणून खुद्द तुळाजी आंगऱ्यांनीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांच्याकडे कुमक मागितली त्यासंबंधीं केलेला पत्रव्यवहार हे अभ्यसनीय आहेत. जंजिऱ्याचे सिद्दींचा फिरंगी विजरई बंदर गोवा यांच्याशीं झालेला पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं अभ्यासकांस महत्त्वाचा वाटेल.

पंतप्रधानांचा व मोंगल बादशहाचा घरोबा झाला; शिंदे, होळकर या सरदारांनीं उत्तर हिंदुस्थानांत जाऊन कोटीचा मुलूख व मानमरातबा प्राप्त करून घेतला या महत्त्वाच्या घटनेबाबत पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना बातमीपत्रें मिळालीं आहेत. या पत्रांचा काळ सन १७५१ व सन १७५२ हा आहे. महाराणी ताराबाईच्या व नानासाहेब पेशव्यांच्या बिघाडाची शाहूमहाराजानंतरचीं अनेक पत्रें आहेत. मर्दनगड व सदाशिवगड हे किल्ले मराठ्यांच्या अंमलाखालीं असावेत त्याबाबत नानासाहेब पेशवे व थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींतील पत्रव्यवहार येथें आढळतो.

पोर्तुगीज विजरई बंदर गोवा हें मराठी राज्याच्या मर्जीनुरूप चालतात, तेव्हां मराठ्यांच्या आरमारानें फिरंग्यांना लटका बसवास पाडणें उत्तम नव्हे, ही ताकीद थोरले माधवराव पेशवे यांनीं आपल्या आरमारास केली. पुढें मराठे हैदर नाईकांचे पारिपत्यास कर्नाटकांत गेले, त्या प्रसंगीं पोर्तुगीजांनीं आरमाराची मदत करून हैदरास तंबी करावी आणि मराठ्यांचे गड, कोट, किल्ले वगैरे ठाणीं बसवून द्यावीं, यासंबंधीं पेशव्यांनीं केलेला पत्रव्यवहार येथें उपलब्ध आहे. राक्षसभुवनच्या लढाईची बातमी देणारीं पत्रें, इ. स. १७६७ मध्यें म्हैसूरच्या हैदरअल्लीवर जी स्वारी केली त्याची माहिती देणारीं पत्रें आणि सोंधे, पंचमहाल या भागांतील मुलुखगिरीसंबंधीं पत्रें अभ्यासकांस महत्त्वाचीं वाटतील.

'माझी पेशवाई कायम राहावी, आणि बारभाई हा जबर शत्रु आहे त्याचा नाश करण्यास कुमक करावी,' हें राघोबादादांचें राजकारण उघडकीस आणणारीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांस लिहिलेलीं पत्रें अनेक आढळतात. पोर्तुगीज सरकारची दोस्ती मराठ्यांशीं येकरंग चालत असतांना टिपूच्या मोहिमेंत मराठ्यांना आरमाराची व फौजेची हालचाल करण्यास फिरंग्यांनीं दिक्कत आणूं नये याबाबत नाना फडणिसानें गोवर्णदोर बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार येथें वाचण्यास मिळतो.

हुबळी, कित्तूर, खानापूर येथील नाडगौडा, देसाई व सरदेसाई, तसेंच कर्नाटकांतील नवाब या सर्वांच्या हालचालींची माहिती शेणवी राजकारणी वकिलांनीं विजरई बंदर गोवा यांस वेळोवेळीं कळविली आहे. राणे सरदेसाई सांखळी सावंतवाडीकर आणि सोंधेकर यांचा गोव्यांतील पोर्तुगीज सरकारशीं विविध घटनांवर प्रकाश पाडणारा जो पत्रव्यवहार झाला तो येथें भरपूर आहे.

दुतर्फा दोस्ती चालत असतांना सावकारी तरांडी धरणें वगैरे गोष्टी बंद व्हाव्या, त्याबाबत केलेला पत्रव्यवहार पुष्कळ आहे. शत्रूचा प्रतिकार करण्यासाठीं पोर्तुगीजांनीं दारूगोळा, फौज व आरमार यांची कुमक त्वरेनें करावी म्हणून मराठ्यांनीं विजरई बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे. त्यांत राजकारणाचे धागेदोरे मिळतात. रहदारीचें दस्तक मिळविण्याबाबत पत्रव्यवहार, अन्यायानें अटक करून ठेविलेला मनुष्य सोडण्याबाबत पत्रव्यवहार, आजारी इसमास औषधोपचार करण्याकरितां फिरंगी किंवा विलायती तबीब पाठविण्याबाबत पत्रव्यवहार, मराठ्यांच्या राज्यांतील गरती बायका व पोरें व कुणबिनीं फिरंगणांत जागजागा कोणी

आणून विकल्या त्याबाबत शोध घेण्यासाठीं केलेला पत्रव्यवहार, तसाच चोरट्यांचा शोध व बंदोबस्त वगैरे बाबींसंबंधीं पत्रव्यवहार येथें अभ्यासकांस मिळेल.

गोमंतकांतील देवस्थानें जशीं पुरातन तशीं त्यांची खर्चावेचाची व्यवस्था देखील पुरातन होती. परंतु जेव्हां जेव्हां त्या प्रदेस खंड पडला तेव्हां तेव्हां त्या देवस्थानची पुरातनप्रमाणें व्यवस्था चालवावी म्हणून पेशव्यांनीं पोर्तुगीज विजरईशीं पत्र-व्यवहार केला आहे. तसेच वसई प्रांतांतील खिश्चन लोकांस धर्माप्रमाणें धर्मकृत्यें वगैरे करण्यास अडथळा येतो असें समजलें, म्हणून त्या प्रांतांतील मराठ्यांच्या कमाविस-दाराकडून नीट चौकशी करून अडथळे होत असल्यास ते दूर करण्याबाबत गोवा बंदरच्या विजरईनें पेशव्यांशीं पत्रव्यवहार केला आहे. श्रीशांतादुर्गा संस्थान कवले येथील व्यवस्था पूर्वीप्रमाणें चालू ठेवण्याबद्दल महादजी शिंदे यांनीं देखील पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यांस पत्रें लिहिलीं आहेत. अशा प्रकारें राजकीय, सामाजिक व धार्मिक व राज्यकारभारविषयक बाबींसंबंधीं भरपूर माहिती देणारीं पत्रें या संग्रहांत आढळतात.

अशी विविध प्रकारची माहिती पुरविणारा हा मोडी लिपींत असलेला उच्च दर्जाचा अस्सल पत्रव्यवहार नीट संग्रह करून सुस्थितींत जतन करून ठेविला आहे. माझा उद्देश केवळ करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासास उपयुक्त असणारीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा असल्यामुळें त्यांतून मीं आरंभीं निर्देश केलेल्या विषयाबाबत माहिती पुरविणारीं अशीं १६१ पत्रें निवडलीं. हीं पत्रें कालक्रमानुसार जुळवून प्रस्तुत पुस्तकांत छापलीं आहेत. या पत्रांतील ऐतिहासिक मजकुराचें वर्णन पुढें केलें आहे.

सिदोजी घोरपड्यांनीं सांबराणी गांव लुटून सोंधे शहराचे बाहेर फौजेचा तळ देऊन तेथील राजास दोन लक्ष धारवाडी होन खंडणी भरण्याबद्दल मागणी केली. ह्याच वृत्ताबरोबर नवाब दिलेरखान कर्नाटकावर चाल करून गेले तेव्हां त्यांच्या झालेल्या फजितीचें वर्णन ले. १ मध्यें दिलें आहे. करवीरचे छत्रपति संभाजीमहाराज यांचा गोव्यावर स्वारी करण्याचा इरादा असल्याबद्दल माहिती ले. २ मध्यें आहे. सुभानराव शिंदे, सेनाखासखेल आणि सुबराव शिंदे साहेबसुभा यांनीं संभाजी नाईक प्रतापराऊ सर-देसाई यांना सामील करून घेऊन छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांनीं योजिलेली मसलत पार पाडण्याचा उद्योग हातीं घेतला. त्याप्रमाणें व्यंकटराव नारायणराव घोरपडे इचल-करंजीकर यांना गोवें प्रांतांत मुलुखगिरी करण्यास प्रतिबंध करणें आणि त्यांस त्या प्रांतां-

तील करार केलेल्या खंडणीच्या ऐवजांतून येक कवडी न देणें असें ठरविलें. ही माहिती ले. ४, ५, १७, २५, २८, ३७, ४१, व ४९ या लेखांत आहे. पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यानें करार केल्याप्रमाणें खंडणीचा ऐवज प्रथम द्यावा; नंतर मराठ्यांची फौज गोवा प्रांताचे सरहद्दीबाहेर जाईल ही हकीकत आणि वसईच्या तह व करारमदाराबाबत सुरू असलेल्या वाटाघाटीचें वृत्त छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांचे सरदार दादाजीराव भावे नरगुंदकर यांनीं पोर्तुगीजांना लिहिलेल्या पत्रांत आढळते. (ले. ६, ७, ८) संभाजीमहाराजांनीं आपला एक पुतण्या गुप्तपणें बंदींत ठेविला होता, त्याबाबत हकीकत ले. ९ मध्यें आहे.

छत्रपति संभाजीमहाराजांनीं योजिलेल्या मनसुब्यासंबंधीं माहिती ले. १०, ११ व ३१ हे लेख पुढीलप्रमाणे देतात. 'तुम्ही फिरंगी संस्थानचे (गोव्यांतील पोर्तुगीज राज्याचे) कित्येक कल्याण योजून छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांना विनंतिपत्रें पाठविलीं तो सकल अर्थ आम्हांस महाराजांनीं सांगून पाठविला तेव्हां तो धंदा करणें आम्हांसहि अगत्य आहे. या मनसब्यास आतां दिरंग लागत नाहीं. इतःपर त्या प्रांतांत बाजीराव पेशवे यांची स्वारी होणार नाहीं. याबाबत छत्रपति शाहूमहाराजांकडून सिद्धता करून घेतली आहे. फोंडे प्रांतांतील ठाणीं गतवर्षी हस्तगत केली होतीं त्यांचा हिशोब येथें तोडण्यांत आला. '[1] या माहितीस दुजोरा देणारी पत्रें हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यांनीं बाबूल शेणवी व वेंकटी कामती सावकार यांना पाठविली आहेत, (ले. १२, १३) वर उल्लेखिलेला मनसुबा पार पाडण्यासाठीं झटावें म्हणून नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालनिहाय यांना उभयतां छत्रपति महाराजांनीं या समयीं आज्ञा केली. त्याप्रमाणे नाग सावंत फौजेची तयारी करून सिद्ध झाले. सदर प्रकरणाबाबत नाग सावंतांनीं सकटतार, जंजिरे गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. मराठे सरदारांच्या अंतरंगाची ओळख होण्यास हा पत्रव्यवहार उपयुक्त ठरेल. पाहा (ले. १४, १७, २३, ३९, ४२, ४३, ५०, ५१ व ६३).

हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार, व्यासराजरूपीदेव सेनापति जफ्तनमुलुक फतेजंगबहादर यांनीं विठल शेणवी यांस असें कळविलें कीं, 'हल्लीं पोर्तुगीज विजरई व सकडतार व वेंकटी कामती यांना पत्रें लिहिलेलीं आहेत. तरी तुम्ही या प्रसंगीं मातबर आहां. सबब कळेल त्या रीतीनें पोर्तुगीजांस सांगून फौज, तोफा, दारूगोली वगैरे सामानासह सामील होणे. त्यांत पोर्तुगीजांचें व रयत लोकांचें हित आहे. पुढे वाणी, उदीम व

सावकार लोकांस स्वराज्य झाल्यावर दळणवळण चालू ठेवण्यास काडीमात्र चिंता वाटणार नाहीं.' (ले. ३५ व ३६) त्यापूर्वीं हिंदुराव घोरपडे यांनीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना लिहिलेल्या एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आढळतो : 'आमचे दिलांतील बात कीं, कर्नाटक प्रांतांत आम्ही मसलतसीर होतो ते वख्ती व्यंकटराव नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर व दादाजीराव भावे नरगुंदकर हे फौजेसहित येऊन त्यांनीं गोवे प्रांतांतील मडगांव, कुकली वगैरे जागा नासाडी करून रायचुरास (रायतुरास) वेढा देऊन राहिले. त्या समयीं त्यांनीं आम्हांकडील फोंडे, पंचमहाल, जांबोली, सुपा हे जिल्हे काबीज केले. ही खबर कळल्यावर आम्ही कर्नाटक प्रांताहून मजल दरमजल कूच करून छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांच्या भेटीस गेलो. भेट झाली; त्या वेळीं महाराजांनीं हुकूम केला कीं, आपल्या जिल्ह्याचीं ठाणीं आपल्या येख्तयारींत घेणें.' [पाहा ले. १५.] शिवाय याच संबंधाचे ले. ४५, ६७, ६८ हे लेख पाहावे. वर उल्लेखिलेला मनसुबा पार पाडण्यासाठीं दौलतराव घोरपडे यांना देखील छत्रपति संभाजीमहाराजांनीं आज्ञा केलेली आहे, हें ले. ३९, ४२, ४३, ४४ व ५१ या लेखांवरून निदर्शनास येतें.

छत्रपति संभाजीमहाराज यांनीं पोर्तुगीज सरकार बंदर गोवा यांच्याबाबत जें धोरण स्वीकारलें त्याची माहिती ले. १६ मध्यें आहे. पुढें संभाजीमहाराजांनीं विठल सेणवी धुमें यांस जें आज्ञापत्र पाठविलें त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर आढळतो : 'व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यांनीं गोवे प्रांतांत नासाडी केली; तेव्हां तो प्रांत स्ववश करून हुजरून रामचंद्र बाबा यांस संपूर्ण अधिकार, सर्व साहित्य व फौज देऊन पाठविले आहेत.' (ले. ३३, ३४)

रंगो नारायण या वकिलाचा मुक्काम कोल्हापूर येथें असतांना त्यांनीं बाबूल सेणवी यांस लिहिलें कीं, 'आम्हीं सर्व वृत्तांत सांगितल्यावरून छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांनीं सर्व सरदार अष्टप्रधानांस बोलावून विचार केला कीं, कृष्णा नदी अलीकडे जिल्हा आमचा व कृष्णा नदीपलीकडे जिल्हा छत्रपति शाहूमहाराजांचा याप्रमाणे आणभाषा होऊन आज दहा बारा वर्षें झालीं. आमच्या जिल्ह्यामध्यें त्यांस संबंध नसतांना आमचे जिल्ह्यांतील ठाणें घ्यावयास संबंध काय ? छत्रपति संभाजीमहाराजांनीं थोरले महाराज (छत्रपति शाहूमहाराज सातारा) यांना लिहून पाठविले कीं, तुम्ही होऊन मर्यादा करून चालले; आतां आमच्या जिल्ह्यामध्यें तुमचे सरदार जाऊन आमची ठाणीं घेण्यास संबंध काय ? तुमच्या आज्ञेनें राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांनीं आमचीं

स्थळें घेतलीं किंवा पंडित प्रधानांनीं आधींच आपल्या विचारानें केले ? पुढें तुमचा आमचा तह कसा चालवा ? ही गोष्ट खुलासा करून लिहून पाठवावी. तेव्हां थोरले महाराजांनीं लिहून पाठविलें कीं, तुमच्या जिल्ह्यामध्यें आम्हांस अगत्य नाहीं; सहसा तो संदेह तुम्हीं मानूं नये; तुमची आमची भेट व्हावी; तुम्हांपेक्षां आम्हांस काय थोर आहे ? म्हणून कित्येक ममतेच्या गोष्टी सांगून व लिहून पाठविल्या. ' (पाहा ले. २० ; शिवाय याच संबंधाचे ले. १९, २२, ४९, ६० व ६५ हे लेख पाहावे.)

या मनसुब्याबाबत रामचंद्र बावाजीनें बाबुल सेगवी यांस कळविलें कीं, ' इकडील वृत्त तर थोरले स्वामी यांनीं बाजीराव पंडित प्रधान यांना बोलावून घेतलें आहे. ते येतांच करवीरकर महाराजांचीं ठाणीं महाराजांना देवितात. तेव्हां बाजीराव पंडित प्रधान यांनीं हें वृत्त ऐकून आपणाकडील कारकून थोरले महाराजांकडे पाठवून विनंति केली कीं, आपण चाकर राजश्री स्वामीचेच आहों. तेवढे जिल्हे आपल्या लेकाचे नांवें करून द्यावें; राजश्री स्वामी जी आज्ञा करतील त्यास आपणापासून सहसा अंतर पडणार नाहीं. परंतु थोरले महाराज बाजीराव पंडित प्रधानांच्या या गोष्टीस अनुमोदन देत नाहींत. '

या प्रसंगीं रामचंद्र बावांनीं पोर्तुगीज सरकडतार बंदर गोवा यांस इकडे लिहिलें कीं, ' पादशहा पुर्तकेश आणि उभयता महाराज यांचा स्नेह चालत असतांना महाराजांचीं स्थळें जोराबारीनें घेऊन कानड्याचे स्वाधीन करावीं आणि मराठ्यांशीं वैर करून रयत गोरगरीब सर्व खराब करावें हे उचित नव्हे. तुम्ही थोर एकवचनी असतांना समय पडल्यास तुमची कुमक करावी या विचारें या उभयतां महाराजांस व शिंदे, सेनाखासखेल यांस व मराठी राज्यांतील बरकड सरदारांस लिहिणें तसें लिहून तुमचें साहित्य करण्यास अंतर केले नाहीं; हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार थोर मोहरे यांना हें राजकारण सांगून तुम्हांस कागद लिहून पाठविले. तुम्ही पातशाही कारभारी आहां; तेव्हां तुम्ही कानड्याकडील अभिमान धरून नाहक पोर्तुगीज सोल्जरांना झुंजण्यास भाग पाडावे, मुलूख खराब करावा, रयत मोडावी हें काम योग्य नव्हे; आम्ही सर्व प्रकारें तुमचे आहों; जेव्हां आम्ही तुमचे, तेव्हां दोन्ही महाराजांच्या राज्यांतील दोन लाख फौजहि तुमची आहे; कांहीं पातशाही चाकरी करून दाखवूं ; तरी आमचीं स्थळें आम्हांस देऊन उभयतां महाराजांचा स्नेह संपादणें. विचारें पाहतां कानडा दगाबाज आहे; त्यानें युक्तीनें समजावून तुमचें साहाय्य करून घेतलें; ज्यांच्या पदरीं लाख फौज होती त्यांच्या पदरीचीं स्थळें घेतली; तेव्हां

आम्हांस कानड्याच्या पदरींचीं ठाणीं घ्यावयाचें काय अगाध आहे? ' (पाहा ले. २१, ५३, ४१, ५४, व ५८) पुढें रामचंद्र बाबा यांनीं पोर्तुगीज गोवर्नदोर बंदर गोवा यांस देखील कळविलें कीं, ' हल्लीं पोर्तुगीज पातशाही सदरेस सारी हकीगत लिहिली आहे. फिरंगाणामध्यें सत्य आहे, फिरंगी लोक विश्वासघात करीत नाहींत असें ऐकिलें होतें; त्याकरितां पातशाही कौल व फिरंगी यांचें बोलणें खरें मानून भेटीस आलों असें असतांना आमचें सर्व घेऊन आठ मास श्रमी केले. महाराजांचीं ठाणीं घेऊन सोंवेकरांच्या हवालीं केलीं; महाराजांचा पैका बुडविला; त्यामुळें पातशाही कौल लटका झाला; फिरंगी यांच्या बांट्यास विश्वासघात व दगाबाजी आली; फिरंग्यांचे धर्मशास्त्रांत असेंच असलें तर असो; नसलें तर आमचें सर्व वारून द्यावें. महाराजांचीं ठाणीं महराजांच्याकडे द्यावीं म्हणजे भांडण मिटेल; दुतर्फा मुलूख नांदेल; मराठी फौजेचा उपसर्ग फिरंगाणास लागणार नाहीं. ' पाहा ले. ५५. याच पत्रलेखकाचे या विषयाबाबत पुढील लेख आढळतात. ले. २९, ३०, ३८, ४६, ४८, ४९, ५२, ५६, ५७, ५९, ६१, ६६, ६७ व ६८.

अशा प्रकारें पोर्तुगीजांना मराठी राज्याचा दरारा दाखवून मराठ्यांचीं ठाणीं परत मिळविण्याचा डाव रामचंद्र बावांनीं योजिला. त्याचप्रमाणें पोर्तुगीजांनीं धर्मशास्त्र व नीति यांचा विचार करून मराठ्यांचें समाधान प्रथम करावें या गोष्टीचा देखील त्यांनीं आग्रह धरिला.

शिवाजीपंत या नांवाचे एक वकील साताऱ्यास गेले. तेथें शाहूमहाराजांच्या दरबारांत प्रसिद्ध असलेले थोर पुरुष नारो राम मंत्री यांना ते भेटले. पुढें त्यांनीं पोर्तुगीजांकडील सविस्तर वर्तमान निवेदन केलें. तें ऐकून शाहूमहाराज बोलले की, ' गोवे बंदर फार उत्तम; नासूं नये; बंदर नासल्यामुळें साहेबास (शाहूमहाराजांस) फायदा आहे असें नाहीं; फिरंगियासच बंदर असल्यामुळें फायदाच आहे; बंदरी चीजवस्तु मिळते. ' सातारा महाराजांच्या दरबारांतील हें वृत्त नंतर शिवाजीपंतांनीं पोर्तुगीज सरूडतार बंदर गोवा यांस कळविलें. पाहा ले. ६२; शिवाय ले. २७, ३२ व ४६ हे लेख या विषयाबाबत आहेत.

कै. डॉ. गो. स. सरदेसाई, बी. ए., यांनीं आपल्या मराठी रियासतींत —५ पुण्यश्लोक शाहू, ३ पेशवा बाळाजीराव भाग पहिला [१७४०–१७४९]— ' सौजन्याचें सामर्थ्य ' या मथळ्याखालीं छत्रपति शाहूमहाराजांसंबंधीं छापलेलें विवेचन वाचकांनीं जरूर वाचावे. प्रस्तुत साधनग्रंथांतील लेखांक ६२ व ले. २० या

मूळ कागदांतील माहितीवरून या विवेचनास संपूर्ण दुजोरा मिळतो. तथापि वाचकांना कल्पना यावी या उद्देशानें त्यांतील केवळ एक परिच्छेद येथें उद्धृत करीत आहें :

" मराठी राज्याचें ध्येय व तें साधण्याचे मार्ग शाहूनेंच आपल्या दीर्घ कारकीर्दींत ठरविले. त्यांची छाप अखेरपावेतों महाराष्ट्रावर बसली. हें ध्येय त्यानें स्वयंस्फूर्तीनें व अंतःकरणप्रवृत्तीनें ठरवून एकंदर राष्ट्रास सौजन्याचा धडा घालून दिला. त्याचें हें ध्येय स्वार्थाचें नसून केवळ चित्तशुद्धीचें होतें. विशिष्ट धर्मबंधनांनीं त्याच्या भावना बनलेल्या नसून त्याची वृत्ति सर्व धर्मांना समान आदर दाखविण्याकडे होती. ' महाजनो येन गतः स पन्थाः ' या न्यायानें सर्व राष्ट्राला त्यानें विशिष्ट वळण लावून दुष्ट प्रवृत्तींपासून बहुधा अलिप्त ठेविलें. कांहीं थोडेबहुत युद्धप्रसंग झाले, तरी त्यांना तत्कालीन किंवा आधुनिक युरोपांतील क्रूर हिंसावृत्तीचें स्वरूप कधींच प्राप्त झालें नाहीं. शाहूच्या या अहिंसावृत्तीचीं उदाहरणें वर ठिकठिकाणीं देण्यांत आलीं आहेत. सूड व प्रतिकार या भावना शाहूनें कशा दाबून टाकिल्या त्यांचीं हीं उदाहरणें शाहूच्या वागणुकींत भरपूर व्यक्त झालेलीं आहेत. म्हणूनच राष्ट्रपिता ही पदवी शाहूला कोणीं दिली तर ती योग्यच ठरेल. " [पृ. १९१]

तुळाजी आंगरे हे छत्रपतीचे चाकर आहेत. तेव्हां त्यांनीं मालवणचें आरमार धरून नेलें ही गोष्ट बेइमानीची केली. सबब सर्वांनीं एकत्र होऊन तुळाजीचें पारिपत्य करणें जरूर आहे. ही हकीकत पांडुरंग विश्राम यानें पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यास कळविली (ले. ७१) अर्जोजी यादव या सरदारास कोणी जहर घातलें. हें जहर काढणारा तबीब या प्रांतांत कोणी नाहीं. तेव्हां विलायती किंवा पुर्तुकाली तबीब पाठवून देण्याबद्दल पोर्तुगीज सकटतार बंदर गोवा यांस छत्रपति संभाजीमहाराजांनीं कळविलें. (ले. ७२) ' नानासाहेब पेशवे यांचे चुलत बंधु सदाशिवरावभाऊ यांनीं स्वतःचे नांवें छत्रपति संभाजीमहाराज यांच्याकडून कृष्णा नदीअलीकडील जिल्हे करून घेतले. नानासाहेब पेशवे व सदाशिवरावभाऊ उभयतां येक लक्ष फौज घेऊन मोहिमेस गेले होते. त्यांनीं दोन कोटी रुपये मिळविले. महाराणी ताराबाई व पेशवे यांच्यामध्यें विपर्यास आला. दसरा झाल्यानंतर पेशवे संभाजीमहाराजांची भेट घेऊन सोंधे, बिदनूर, सावणूर या प्रांतांत मोहिमेस येणार आहेत. ' हें वृत्त भास्करराऊ दादाजी भावे नरगुंदकर यांनीं पोर्तुगीज सकडतार बंदर गोवा यांस कळविलें. (ले. ७४) पोर्तुगीजांनीं कुमक करावी व नेहमीं खबर समाचार घ्यावा, हा मजकूर जिवाजी विश्राम यांनीं सकडतार बंदर गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत आढळतो. (ले. ७८)

जंजिरे सिंधुदुर्ग हा महाराज छत्रपतींचा जागा असून आजपर्यंत टोपीकर व इतर यांनीं कोणीं त्या स्थलाची अमर्यादा केली नाहीं, असें असतांना फिरंगी यांनीं बदराह बर्तणूक करून जंजिरे सिंधुदुर्गावर तोफा मारल्या व पेठ जाळली. त्या प्रसंगीं फिरंगीयांच्या पारिपत्यास अंतर केल्याबद्दल थोरले माधवराव पेशवे यांनीं आनंदराव धुळप, जे आरमाराचे मुख्य त्यांना दोष दिला; आणि यापुढें फिरंग्यांच्या पारपत्याबाबत कोताई केली तर कार्याबर पडणार नाहीं, अशी ताकीद धुळप यांना दिली. (ले. ७९) सिंधुदुर्गावर फिरंग्यांनीं हल्ला केला तेव्हां करवीरच्या महाराणी जिजाबाई यांनीं येशवंतराव सिंदे सुभेदार यांना तेथें रक्षणासाठीं फौजेसुद्धा रवाना केले. (ले. ८०) थोरल्या माधवराव पेशव्यांचे सरदार भिवराव पानसी, तोफखान्याचे मुख्य व रामचंद्र नाईक यांनीं करवीरच्या महाराणी जिजाबाई यांचा अम्मल चिक्कोडी तालुक्यांत बसवून दिला. (ले. ८१) पेशव्यांची मसलत तळकोकणांत होणार हें वृत्त पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना भागीरथीबाई भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांनीं कळविलें. (ले. ८२) इंग्रजानीं जंजिरे सिंधुदुर्ग घेतला तो परत मिळावा म्हणून पोर्तुगीज सरकार मध्यस्थी करीत आहे, त्याविषयीं येशवंतराव सिंदे सुभेदार यांनीं सकडतार जंजिरे गोवा यांस एक पत्र लिहून समाधान व्यक्त केलें (ले. ८३). ले. ८५ याच विषयासंबंधीं आहे.

महाराणी जिजाबाई यांनीं सकडतार बंदर गोवा यांना संक्रमणप्रयुक्त तीलशर्करा पाठविली. (ले. ८४) जंजिरे सिंधुदुर्ग इंग्रजांचे कबजांत गेला होता तो सरकारांत दाखल झाला; ही खुषखबर महाराणीनें सकडतार बंदर गोवा यांस कळविली. जंजिऱ्याचा पक्का बंदोबस्त राखण्यासाठीं पोर्तुगीज विजरईनें तोफा, दारूगोळा, गलबतें वगैरेंचा भरपूर पुरवठा करावा, हाहि भाव महाराणीनें सदर पत्रांत प्रकट केला आहे. (ले. ८६) याच विषयाबाबत माहिती ले. ८७, ९५, ९७ मध्यें आहे. ले. ९४ व ९६ हे महाराणी जिजाबाईनें पोर्तुगीज सकडतार बंदर गोवा यांस लिहिलेलीं पत्रें आहेत. जिवाजी विश्राम सबनीस यांनीं बेइमानी करून महाराणी जिजाबाईचा रांगणा किल्ला फितुरीनें घेतला, हा मजकूर खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांनीं फिरंगी सकडतार जंजिरा गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत आहे. (ले. ८९) ले. ८८, ९२, ९३ हे लेख याच विषयासंबंधीं माहिती पुरवितात. रांगणा किल्ला कबजांत ठेवून त्याचे आधारावर पेशवे सरकार अथवा पोर्तुगीज सरकार यांच्याशीं कोणतें राजकारण खेळावें या बाबीची माहिती जिवाजी विश्राम यांनीं गोवर्णदोर बंदर गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत दिली आहे. (ले. ९०) रांगणा किल्ला हे करवीरकरांचे महास्थळ; तें दगा करून

जिवाजी विश्राम यांनीं घेतलें. पुढें किल्ल्यांतील बेइमानांचें पारिपत्य करून हें स्थळ करवीरकरांनीं हस्तगत केलें. तेव्हां त्या बेइमानांना ज्या क्रूर शिक्षा झाल्या त्याची हकीगत यशवंतराव शिंदे सुभेदार यांनीं सक्कडतार बंदर गोवा यांना कळविली आहे. (ले. ९१).

गोवर्गदोर बंदर गोवा यांस पुण्याची जी खबर पाठविली त्यांत सदाशिवराव-भाऊंचा तोतया खोटा ठरला आणि त्यास मेखसूखालीं ठार मारिला हें वृत्त आहे. (ले. ९९) बारभाईच्या पारिपत्यास्तव मदत जलदीनें पाठवावी. त्यासाठीं रघुनाथराव दादासाहेब यांचीं पत्रें वारंवार येतात, हें वृत्त महाराणी दुर्गाबाई, करवीर यांनीं विजरई बंदर गोवा यांना कळविलें. जंजिरे सिंधुदुर्गाचा कौल घेऊन आमदरफ्ती करावी म्हणजे तुमच्या राज्यांतील साहुकारी तरांड्यास मालवणच्या आरमाराकडून तसदी व हरज पोंहच-णार नाहीं ही माहिती आणि हैदरअल्ली व करवीरकर यांच्या परस्पर दोस्तीचें वर्णन या दोन्ही गोष्टी महाराणी दुर्गाबाई यांच्या वर निर्देश केलेल्या पत्रांत आढळतात. (ले. १०१). याच विषयासंबंधीं ले. १०० हा लेख आहे-

महादजी शिंदे यांनीं कोल्हापुरावर स्वारी केली त्याबाबत हकीकत ले. १०२, १०३ मध्यें आढळते. तसेच राघोबादादांच्या हालचालीबाबत बातमी ले. १०३, १०४ हे लेख देतात. कोल्हापूरकरांचें ठाणें शिरोळ घुमट हें परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मोर्चे लावून घेतलें हें वृत्त गोवर्गदोर बंदर गोवा यांस कळविले आहे (ले. १०५) सावंतवाडीकरांनीं करवीरकरांच्या रांगणा किल्ल्यास वेढा घातला; सबब वाडीकरांचे पारिपत्य करण्यासाठीं कुमक सत्वर करावी म्हणून फिरंगी सक्कडतार बंदर गोवा यांस पत्रें पाठविलीं आहेत. (ले. १०६, १०७, १०९) कोल्हापूर सरकारनें पोर्तुगीज सरकार-कडून दारूगोळा मागविला त्याबाबत एक यादी उपलब्ध आहे. (ले. १०८).

यशवंतराव शिंदे सुभेदार जंजिरे सिंधुदुर्ग यांनीं विजरई बंदर गोवा व सक्कडतार बंदर गोवा यांना जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत पोर्तुगीज अमलाखालील सावकारी तरांड्यांनीं जंजिरे मजकूरचा आमदरफ्तीचा कौल घेतला नाहीं म्हणून त्यांची तरांडी करवीरकरांच्या आरमारांनीं दस्त केली हें नमूद केलें आहे. (ले.११०,१११,११२). ले. ११३, ११४, ११५ व ११६ हे लेख याच विषयासंबंधीं आहेत. सुभेदार नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग यांच्याशीं करावयाच्या करारांचीं कलमें ले. ११७ मध्यें आहेत.

पारगड किल्ल्याचे खर्चासाठीं व्यवस्था तालुके डिचोली व पेडणें यांच्या उत्पन्नां-तून पुरातनपासून आहे. त्याप्रमाणें आतांहि चालवावे म्हणून धोंडो कृष्ण नामजाद

व कारकून किल्ले पारगड यानीं गोवर्णदोर जंजिरे गोवा यांस पत्र पाठविलें. सदर पत्रांत कोल्हापूरमध्यें फौज तयार होत आहे; परंतु मसलत कोणीकडे आहे तें कळत नाहीं हें देखील वृत्त आहे (ले. १२४).

वाडीचे तिसरे खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांचा विवाह जयाजीराव शिंद्यांची मुलगी लक्ष्मीबाई हिच्याशीं झाला. पुढें लक्ष्मीबाईनें महादजी शिंदे यांच्या विद्यमानें दिल्लीच्या मोंगल पातशहाकडून 'राजेबहाद्दर' हा किताब व मोर्चेल धरण्याचा हक्क नवऱ्याकरितां मिळविला. परंतु छत्रपतीशिवाय इतरास मोर्चेल धारण करण्याचा हक्क नाहीं, यास्तव ही गोष्ट करवीरच्या छत्रपति महाराजांना रुचली नाहीं. पुढें करवीरच्या महाराजांनीं वाडीकर सावंत याचा मुलूख काबीज करण्याचे योजिलें आणि दोघांचें युद्ध जुंपलें. या प्रसंगीं खेम सावंत भोसले यांनीं पोतुर्गीजांकडे सहाय्य मागितलें, त्याप्रमाणें पोतुर्गीजानीं सावंतवाडीकरांची कुमक केली. तथापि खेम सावंत भोसले यांचें या युद्धांत भयंकर नुकसान झालें. त्यांचा मुलूख देखील करवीरकर छत्रपति महाराजांनीं हुजूरच्या अमलाखालीं कित्येक वर्षें ठेविला. शेवटीं तहासाठीं वाटाघाटी अनेक वर्षें चालून हा तह ठरला. या सर्व घटनांची हकीगत पुढें निर्देश केलेल्या लेखांत आलेली आहे. (ले. ११८ ते १२३ आणि ले. १२५ ते १२९).

खेम सावंत भोसले यांनीं करवीरकर महाराजांची फौज मदतीस आणून गोवे प्रांतांत मोहीम केली ही हकीकत ले. १३१, १३२, १३३ या लेखांत आहे. श्रीमन्महाराज करवीर यांची फौज गोमंतक प्रांतांत रवाना होणार असून या मोहिमेवर छत्रपति महाराजांकडून पंत अमात्य व प्रीतीराव चव्हाण हिंमतबहाद्दर या दोन सरदारांची नेमणूक झाली आहे, हें वृत्त ले. १३० मध्यें आढळतें. सुभेदार किल्ले कलानिधीगड व ठाणें चांदगड यांनीं गोवर्णदोर व सकडतार बंदर गोवा यांना छत्रपति महाराज करवीर यांच्या फौजेच्या हालचाली कळविल्या आहेत. (ले. १३५). पेशजी गोवेकर फिरंगी हे खंडणीबाबत करवीर छत्रपति महाराजांना सवा खंडी सोनें देत होते. अंत्रूजमहाल, फोंडे, मर्दनगड हा पोर्तुगीजांकडे असलेला मुलूख हुजूर चालत होता. तसेंच मुळीक व सोंधेकर पाळेगार हे देखील हुजूर चालत होते. ही माहिती ले. १३६ या लेखांत आहे. करवीरकर महाराजांची व इंग्रजांची दोस्ती करार व्हावी ही गोष्ट देखील सदर पत्रांत दिली आहे.

' आम्ही पेशवे सरकारच्या आज्ञेप्रमाणें कोल्हापूरच्या मोहिमेंवर आहों. तेव्हां कुमकेस मागविलेली इंग्रजांचीं पलटणें गोवा बंदरांत उतरलीं आहेत त्यांना इकडे कुमकेस जलद दाखल होत ते करणें; ' असें रामचंद्र परशुराम पटवर्धन यांनीं पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यांस कळविलें. (ले. १३७)-

खेम सावंत भोसले यांचे डिचोली, सांखळी व पेडणे हे महाल पोर्तुगीज सरकाराकडे मागें दिले होते. आतां पोर्तुगीजांनीं ते महाल सावंतवाडीकरास परत करावे ही मागणी खेम सावंतांनीं गोवर्गदोर बंदर गोवा यांस केली. (ले. १३८). खेम सावंताच्या मृत्यूनंतर सावंतवाडी संस्थानांत वारसासाठीं भांडणें सुरू झालीं. त्या यादवींत करवीर छत्रपति महाराजांकडे फोंड सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांचें राजकारण आलें. महाराजांनीं तें राजकारण स्वीकारून लक्ष्मीबाई व त्यांचे साथीदार यांच्याबरोबर युद्ध सुरू केलें या प्रसंगीं लक्ष्मीबाईंनीं पोर्तुगीज सरकार बंदर गोंवा यांची मदत मिळविली, या संपूर्ण प्रकरणाची हकीकत ले. १३९ ते ले. १६० या लेखांत आढळते.

चीनचे दोन असामी सांपडले होते त्यांना आणण्यासाठीं केलेल्या बंदोबस्ताची माहिती ले. १६१ मध्यें आहे.

हें संशोधनाचें कार्य मीं पणजी मुक्कामीं बरेच दिवस करीत होतों. त्या अवधींत या कामीं डॉक्टर व्ही. टी. गुणे, डायरेक्टर ऑफ आर्काइव्हज्, गोवा पुराभिलेख संग्रहालय, पणजीं (गोवा) यांनीं नानाप्रकारचें सहाय्य मला केलें हें नमूद करण्यांत मला संतोष वाटतो. त्यांनीं केलेल्या ह्या सहाय्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपति, बी. ए., जी. सी. एस्. आय., हिंदुपदपातशहा, महाराज सरकार करवीर यांच्या प्रोत्साहनानें मी ही साहित्यसेवा करीत आहें. याबद्दल मी महाराजांचे मनःपूर्वक आभार मानतों.

वर निर्देश केल्याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकांत छापलेले १६१ कागद मी वाचकांस सादर करीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणें नं. ११
मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८८६
ता. २६-३-१९६५

मा. वि. गुजर

मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपति, बी. ए.,
हिंदुपद्पातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपति,

बी. ए., जी. सी. एस. आय.

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ८

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

[भा ग आ ठ वा]

गोवा पुराभिलेख संग्रहालयांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख २५-१२-१७१३

नं. २८ हू

ये शेलेतीर मोसी न्योर विजरई
देईदी साहेब सलामत

अर्जदास्त नागोजी नाईक कपिता व मुकाम कुकली येथील हवाल साहेबाचे नेक नजरे करून खैरसला येत असे हकीकत सिधोजी घोरपडा सांबराणी लुटून येथील कांही खंडणेचे पैके घेऊन सोंदे शाराभाहीर फौजेनसी जाऊन उतरला आहे आणि दोन लक्ष धाा (धारवाडी) राजे सोंदे याकडे मागत आहे नाहीतर सोंदेच घेतो म्हणोन सांगून पाठवीत आहे आणि आसपास सारे मुलुक देखील येलापूर शार लुटली त्या बयास्तब (भयास्तव) सोंदेचे शारामधील लोक खलक पलोन आंकले कडवाड प्रांती आले व राजे सोंदे याचा खासा कबिला कोकीगड राजामधे आहे तेथे पलविला येणेकरून राजे सोंदे याचे बहुत फजीत जाहाली आहे आणि जांबोलीस सोंदेकारी याचे घोड व जमाव आला होता तो कुली सोंदेस गेला त्याकरिता बसबया बहुत घाबरा जाहला आहे निमित्य की साहेब या दिवसात आपले फौजेसी हुकूम करतील तर जांबोलीस सागेचे कोट यावयास दिवग लागणार नाही येसे बसबयाचे वर्तमान जाहाले आहे आणि नवाब दिलेरखान करणाटकावर गेला होता त्यास मागा येक लडाई जाहाली तेव्हा नवाब याची ही फौज मोड होऊन दोनसे अडछसे घोडी बिदनूरकार याणी नेली तो मागारे मुरडून दुसरे ठिकाणी राहिला होता त्यास राजे म्हैसूर याची व करणाटक याची फौज येकमत होऊन नवाबास वेढा दिला आहे तेणेकरून नवाब बहुत जेर होऊन सिधोजी

घोरपडे यासी आपले कुमकेस पैके देऊन बोलावीत आहे घोरपडा अद्यापि सोंदे सोडून पुढा गेला नाही ते प्रांतीचा मनुश आला होता त्याणे हे हकीकत बयानवाके सांगितले हे ज्याहीर केले आहे तारीख पंचवीसा माहे दीजेंबरू सन १७१३ हे अर्ज.

लेखांक २ तारीख २६-१२-१७३८

नं. ३८२७ हू

रफाअत पन्हा बिसमते . ब शौकत दस्तगाहा
दोनोर अजम लुबीख आफोसदात सकडतार
दे इस्ताद दाम महबत हू

अज दिल येखलास नरसिंग राऊ सर सबनीवीस सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर जाणून मोहिबी आपली कारनेकी कलमे मरकुम + + + + + महल मकसूद ऊंकी बहुता दिवसा किताबत पाठविली ती खुषबक्स्त पोहूचून लिहिला मजमून मालूम + + + + जाहाला यैसेच हरघडी किताबत पाठवून असना (मजकूर फाटला आहे)

किताबती मधे इशारत केली जे कासिदास किताबती देऊन + + + रवाना केला असे त्यास मेटास अटकाव ना होता जात यैसे चिठी देऊन रवाना करावा म्हणून + + + तो येथ येऊन पावतेच क्षीगीं मेटकरी यास ताकीद + + + रवाना करोन दिला असे मालूम जाहले पाहिजे दिगर समाचार उमतीक यैकिला जातो जे वेंकटराऊ कांही फौजेनसी खाली उतरणार आहे व संभाजी राजे + + + + तजविजेवर सेणगावी आले होते तेथ रामचंद्र सावताची व याची बोलीचाली होऊन सला होत आहे सला होताच दोनी मराठेचे फौज येकत्र होऊन कोकणात उतरावे आणि तुमचे मुलकावर उपद्रव करावा यैसे बहुतेक तजवीज जाहाली आहे म्हणे त्यास रामचंद्र सावंतहि सामील जाहाला आहे वर्तमान यैकले जाते सत्यमिथ्य कलत नाही मोहिबास मालूम होणेबदल कलविला असे तर काय असेल तर आपले जागेची मजबुदी करावी तैसी करोन बहुत खबरदारीने असने उतम आहे. + + + + + रामचंद्र सांवत याजकडे राजकारण करोन संभाजी राजे याकडे बोलीचाली केली आहे म्हणजे फौजा खाली येताच नदीमधून गोवे प्रांतास उतरोन आपण देतो म्हणून

कबुलत केली आहे म्हणे + + + थोडकेच दिवसात संभाजी राजे याची-व रामचंद्र सांवताची भेट होणार आहे + + बहुत खबरदारीने असून आपले राज्यामधे येऊ ना दिलेने उतम दिसत आहे.

तेरीख कालयुक्त संवद मार्गसीर बा ११ असा.

लेखांक ३ तारीख २६-३-१७३९

नं- १५

साहेबाचा निरोप घेऊन आलो आणि राजश्री वेंकटराऊ व राजेश्री गोविंदपंत यास भेटून बहुत प्रकारे सांगितले जे इस्तादाचा येकलास सेरते रीतीने व्हावा म्हणोन आणि रफाआततपनाः वेदोर ज्याराल फेनद व अजम शेतोर जुजे पेद्र ल्हाऊस हे फौजमधे आले आहेत यांचे मुदेमाफीक मजकूर व्हावा ये गोष्टी विशे इजानेबानी बहुत कस्त मेहनत केली आहे ते सविस्तर आजम वेदोर ज्याराल-व अजम दोनो साहेबास ज्याहीर करितील त्यावरून मालूम होईल इस्तादातर्फेचे सेवेस टाकेल ते रीतीने मेहनत करायास इजानेबाकडून अंतर होणार नाही जे पुरातन येचरीतीने वडिलापासून वर्तत येकनिष्ठेने आलो असू

खुदायेताला साहेबास बिशीयार बारख
खुशाल राखो रा तारीख फालगूण
बहुल १३ दस मोराब
देसाई मलहाराऊ

लेखांक ४ तारीख २५-४-१७३९

नं. २९ हू

अजम फ्रासिस्क दमेल आमदोर जेनरा
ल दे बारदेश दाम मोहबत हू

मोहिबानपना मखलीसान दस्तगाहा अजी दिल येखलास सुभानराऊ सिंदे

सेनाखासखेल* सलाम महवल मकसूद येथील खैरसला जाणून मोहिबी आपली खैर रफ्तियेत कलमी करून दिल आराम होये ते बात केली पाहिजे दिगर मोहिबां-कडून किताबतनामा येऊन मजमून मालूम होत नाही हे बात मुनासीब नव्हे हरवख्त खत किताबतनामा पाठऊन दिल आराम होई ते बात केली पाहिजे बाजे हकीकत राव अजम संभाजी नाईक प्रतापराऊ सरदेसाई यांस लिहिले आहे व सेणवी अजम त्रिवर्ग यास सांगोन पाठविले आहे ते मोहिबास जाहीर करिता मालुम होईल खातिरेस आणून मारनिलेस पाठऊन देणे मजमून मालूम होऊन जियादा यखलासी होये ते बात केली जाईल जियादा लिहिणे बजीद नाही हे किताबत.

---

* टीप १ : सेनाखासखेल यांचा अष्टकोनी शिक्का सदर पत्रावर आहे; त्यांत ' श्री राजा शंभू छत्रपति चरणी ' हीं अक्षरें वाचता येतात.

लेखांक ५ तारीख २५-४-१७३९

नं. ३० हू

अजम फ्रासिस्क दमेल आमदोर जेनरा
ल दे बारदेश दाम मोहबत हू

मोहिबानपना मखलीखान दस्तगाहा अंजी दिल येखलास गुणाबाई व सुबराव सिंदे साहेबसुभा सलाम महवल मकसूद येथील खैरसला जाणोन मोहिबी आपली खैर रफ्तियत कलमी करून दिल आराम होये ते बात केली पाहिजे दिगर मोहिबाकडून किताबतनामा येऊन मजमून मालूम होत नाही हे बात मुन-सीब नव्हे हरवख्त खत किताबतनामा पाठऊन दिल आराम होये ते बात केली पाहिजे बाजे हकीकत राव अजम संभाजी नाईक प्रतापराऊ सरदेसाई यांस लिहिले आहे व सेणवी अजम त्रीवर्ग यास सांगोन पाठविले आहेत मोहिबास जाहीर करिता मालूम होईल खातिरेस आणून मारनिलेस पाठऊन देणे मजमून मालूम होऊन जियादा येखलासी होई ते बात केली जाईल जियादा लिहिणे बजीद नाही हे किताबत.

लेखांक ६ माहे में इ. स. १७३९

नं. ९४५

भाई अजम अंतोन करनेल दे आलकास
वे दोर जेराल राजेंद व जुजे पेद्र माऊस दोस्त
दाम मोहबत हू

मोहिबानपन्हाही मखलीसान दस्तगाहा आंजी दादाजीराव सलाम बादज सलाम माहवल मकसूद आंकी येथील नेकी जाणऊन मोहिबी कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दिगर मोहिबी इज्यानेबास कलमें केले जे सास्टीची फौज उटऊन फिरंगणचे सरदेबाहीर न्यावी म्हणऊन त्यावरून इजानेबाही ताकीद करऊन सारी फौज उटऊन मुलगुडीस आणली येथून राजश्री धोंडबा राव समागमें मानाजी पाईगुडे व सयाजी गुजर लस्कर देऊन रवाना केले बारदेसीची फौज उटवेबदल इजतअसार नारो जिवाजी शणवी यास हलीप्रा सरंजाम करून देऊन बाडीस रवाना केले आहे राजश्री रामचंद्र सांवत व जईराम सांवत भोसुले सरदेसाई प्रा कुडाल यास सांगोन बारदेसीची फौज उठऊन नेहतील तेविसी कांहीं फिकीर नाही आम्ही व राजश्री वेंकटराव येथें आहू आठ दिवसात उरले पैके पावावे दिवस तेहत आले पावसाला जवल आला याउपर विलंब करावयाचा प्रसंग नहवे बाकी फौज घाटावर छावणीस पावली असावी सास्टीचे ठाणेतील मेंट काडावयास राजश्री वेंकटी कामती व उपे कामती याणी उदंड रदबदल केली तेप्रा आम्ही येथे करार केला आहे दुसरे खिस्तीचे पैके झाडेनसी रायेचुसस ग्यालीवर (गेलीयावर) पावेस केले पाहिजे ग्यालीवर रुपये पावताच इजानेबास मोहिबाचे पत्र यावे म्हणजे ठाणेहि उठऊ व पैकाही आणऊन घेऊ मोहिबाचा खातीरजमा असो द्यावा सदरहु तपसील ल्याहावयाचे काम नहवत जे होणे ते भाईचारच्या इतबाराबरीच होते आहे तेथे ज्यादा ल्याहावे तर भाई आकिल आहेत माहाड गावीच्या बंदीवाना कुलाचा कतबा येक लाखाचा होता तो मोहिबाकडे पाठविला आहे ते पैके बाकीचे आम्ही फारीक करून लस्कर उठऊन आणले आहे ते रुपये तूर्त आम्हास पाठऊन देविले पाहिजे ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दिली पाहिजे हे किताबत.

लेखांक ७ माहे में इ. स. १७३९

नं. १४७५ हू

भाई अजम आंतोन कारने

दाम मोहबत हू

मोहिबानपन्हाहि मखलीसान दस्तगाहा अंजी दादाजीराव सलाम बादज सलाम मोहबल मकसूद आंकी येथील नेकी जाणवून कारनेकी कलमें करीत असिले पाहिजे दिगर मोहिबी किताबत पाठविली पोहचोन मजकूर मालूम जाहाला तेथे कलमें केले जे दुतर्फा करार जाहाला त्यास सास्टी मुलकास ताकीद जाहाली की काही खराबी होऊ नये तेणेप्रमाणे चालत नाही म्हणऊन कलमें केले त्यास लस्कर मातबर ताकीद तंब जोराबार केली होती परंतु रायेचुरास लस्कर मुकाम होत ताकीद चालोन तहास विरोध नसावा याकरिता लस्कर कूच करून मुलगुडीस आलो याउपर सास्टी मुलकात छणंछलू होणार नाही व बारदेसात भौसुले याणी तमाम मूर पाडता आहेत म्हणऊन कलमें केले त्यास तह जाहाला हे बर्तमान बाडीस देसाई अजम यास लिहिले न्हवते याकरिता तसी गोस्ट जाहाली असेल हाली आज दोन तीन रोज + + मा नारो जिवाजी याबराबर त्याचे तहनामेंप्रमाणे सरंजाम करून रा करून दिले आहेत ते बाडीस पोहचताच बारदेसास तोसीस लागणार नाही व फौजहि उठऊन आणतील व देसाई अजम डिचोलीस येणार आहेत आमची त्याची मुलाखतही होणार आहे मोहिबी बोलीप्रोा खरजुवे व पनालेही त्याचे त्यास दिले व: हजार असरिफीचा कागदहि त्यास पाठविला तोहि त्याकडे पाठऊन देऊ त्याचेहि चिती मोहिबासी विरोध नसावा असेंच आहे न कलत गोस्ट घडली असेल तर त्यावर ना जावे मोहिबाचा व इजानेबाचे भाईचारेवर ह्या गोस्टी घडल्या आहेत याउपर बिलंब न करता पैकेचा सरंजाम करून पाठविला पाहिजे याउपर विलंब करावयाचे कार्ण न्हवे मा वेंकटी कामत व उपे कामत मोहिबाकड कागद देऊन रा केले तेहि पावले असतील वसईकडील बर्तमान वसईचा तट घेतला बुरूज घेतले आतील मेंढेयात फिरंगी आहेत कोणी कौलास पेद्र दुरेग बाररेत दे गाम येकास्त व अंतोन कइतान बेअदाद फरेर व मनवेल मार्क पादरी येसे तिघे मातबर येऊन श्रीमंत राजश्री चिमाजी आपास भेटोन साहा रोजाचा करार केला की सिलेभाले सहित मोंबईस पावून द्यावे कबिलेही पाऊन द्यावे यैसा करार करून गेले हे बर्तमान

मोहिबास नोडतीहून आले असेल हाली आम्हास श्रीमंत चिमाजी + + च्या लिहून पाठविले त्यास आज बारावे रोजी मुलगुडीस येऊन पोहचले + + वर्तमान कलल असल ते + + लिहून पाठविले पाहिजे मोहिबाच्या व इजानेबाच्या भाईचारा आहे करिता लिहिले आहे जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दिली पाहिजे हे किताबत.

लेखांक ८ माहे मे इ. स. १७३९

नं. २०९१ अ हू

भाई अजम अंतोन कारनेर आलकास व
जुजेपेद्र ये माऊस दो वर दाम मोहबत हू

मोहिबानपन्हाह मखलीसान दस्तगाह अजी दादाजीराव सलाम बादज सलाम मोहबल मकसूद आंकी येथील नेकी जाणून मोहिबी कारनेकी कलमे करीत असिले पाहिजे दिगर मोहिबी किताबतनामा पाठविली पोहचोन लिहिला मजकूर मालूम जाहला तेथे कितेक मजकूर लिहिला व तहनामे करून पाठविले ते पेसजी बोली येक जिनसी व हली पाठविले तहनामे त्यामधे उदंड तफावत बोली खेरीज जाजती मजकूर लिहिले तेव्हा येथील राजश्री वेंकटराव यांचा व राजश्री गोविंद पंत याच्या विचार तेव तुम्हास समजलाच होता परंतु मागती तहनामे फिरावून पाठवावे तर दिवस याच खाले गेले मुलुक व घरे व प्रांते कुली खराब होऊन गेली व दिवसेदिवस विरोधहि चडत जातो येणेकरून रयत लोक कुली बुडतात व छावणीबदल घरे बांधावयास लस्कर लागले तेव्हा तहरहच्या गोस्टी दुर्घट होते याकरिता मोहिबाचे भाईचारेवर इजानेबाही नजर देऊन तहनामे इजानेबी आपले नजीक ठेऊन घेऊन त्याची समजाविसी मूजबानी केली तेव्हा मा बाबुल शणवी नजीक होते हे जबानी मोहिबास सखून जाहीर करतील ते इजानेबाचे यैसे समजोन बोली दुतर्फा इजानेबाची व मोहिबाची जाहाली आहे त्याप्रमाणे तहनामें बरहुकूम पैका व बोली व वसईस पाठविणेस फिरंगी मातबर व वसईच्या जेरालास विजुरई अजम याच्या कागद मसुदेप्रमाणें जलदीने पाठविले पाहिजे सदरहु लिहिलेप्रमाणे येथे पोहचताच लस्कर कूच करून लाऊन देऊ याउपर विलंब येक घडीचा

न होई ते करावे बाजे मजकूर मारनिले सांगता मालूम होईल ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत अर्जा निरोपिली पाहिजे हे किताबत.

लेखांक ९ माहे आगस्ट इ. स. १७३९

नं. ४०७

पुरवणी

यादी सियोर सकडतार यास

परवाचे सायंकाली रो नारो राम याचा कारकून सातारेहोऊन आला आहे तो बर्तमान सांगतो म्हणे जे संभाजी राजे याणे आपला पुतेणा येक बंदीस गुप्तपणी ठेविला होता त्यास शाहू राजेची चिंती त्यास न्हेऊन आपण पालणे करावे येसे होते म्हणे सांप्रत संभाजीने त्यास जीवे मारिला ते बर्तमान शाहू राजे यास कलोन परम तप्त होऊन कोलापूर खणून टाकणार म्हणऊन येक मजल पुढे आला होता म्हणे ते उपरी ते उपरी नारो राम याणे उमजाविशी करून कोणई विचार आजी करावा तो दसरेनंतर करू येईल यैसे सांगोन मागे फिराऊन न्हेला म्हणे कविले गांव मागती देवीस दिला नारोपंतास व ते गावास संमध नाही यैसे करून चिंमाजीराऊ याणी आपला हुजूरचा कमाविसदार पाठविला असे गावचे बेरीजपैकी दोनी तक्षीमा देवीस व येक तक्षीम रा चिमाजीराऊ याणी हुजूर व्हावे नारोपंतास व गावास संमध नाही यैसे करून सनदपत्र आणिले आहे म्हणे.

लेखांक १० तारीख २४-१०-१७३९

नं. २१८ श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६६ सिदर्थीनाम संवत्सरे कार्तिक शुध त्रितिया गुरूवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री वेंकटी कामत व उपे कामत यासी आज्ञा केली येसीजे स्वामीसेवा करावी यविषईचा

विस्तार पहिलेच तुम्ची विनंतीपत्रे आली आहेत व राजश्री रंगो नारायण याचे विनंतीवरून विदित जालाच्र आहे त्याच्र अन्वये राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार याची रवानगी फौजेसहित ते प्रांते जाली आहे स्वामीची स्वारी प्रस्तुत मिरजेस होत आहे त्याउपरी खासा स्वारी मागाहून होईल याउपरी योजिले कार्यास विलंब आहे यैसे नाही येविषई विजरई अजम यासीही कलमी केले आहे तरी तुम्ही त्यास सांगोन कोण्हेविषी मनात संशय न धरिता इकडील प्रयोजनी सादर असेत ते करणे यविषीच्या विस्तार राजश्री रामचंद्र बावाजी यासी आज्ञापिला आहे हे व राजश्री रंगो नारायण लिहून पाठवितील तो बरा चितात आणून याउपरी त्वरा करणे जाणीजे बहुत काय लिहिणे.

लेखांक ११ तारीख २४-१०-१७३९

नं. ७५०

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६६ सिधार्थीनाम संवत्सरे कार्तिक शुधत्रितिया गुरूवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री बाबाजी विश्वनाथ सुकटाणे यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीसेवा करावी याविषईच्या विस्तार पहिलेच तुम्ची विनंती आली आहेत व राजश्री रंगो नारायण याचे विनंतीवरून विदित जालाच आहे त्याच अन्वये राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार याची रवानगी फौजेसहित ते प्रांते जाली आहे स्वामीची स्वारी प्रस्तुत मिरजेस होत आहे त्याउपरी खासा स्वारी मागाहून होईल याउपरी योजिले कार्यास विलंब आहे यैसे नाही यविषई सविस्तर राजश्री रामचंद्र बावाजी व राजश्री रंगो नारायण तुम्हास लिहितील व विजरई अजम यासीहि हुजूरचे पत्र लिहिले आहे तुम्ही तो अर्थ बरा चितात आणून विजरई अजम यासी जे सांगणे ते सांगोन याउपरी ते कोणविषई दुसरा विचार मनात नाणिता संतोषरूपे इकडील प्रयोजनी सादर असेत ते करणे जाणीजे बहुत काय लिहिणे.

लेखांक १२ तारीख २७-१०-१७३९

नं. १३७

श्रीसुबराज

राजश्री बाबुल सेणवी सु
कटाणेकर गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्यो हिंदुराब घोरपडे ममलकतमदार रामराम उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणे यानंतर तुम्ही कितेक आंगेजणी धरोन फिरंगी याच्या सवस्छानचे इष्ट व्हाब याकरिता श्रीमंत माहाराज राजश्री स्वामीस पत्रे पाठविली तो सकल भावार्थ अवगत जाहाला आणि त्या कार्येभागाच्या प्रसंगास अवलंब करावा हे आम्हा अगत्य व माहाराजाची आज्ञा आहे इतके दिवस लागते ना मिरजेच्या प्रसंगानिमित्य च्यार दिवस गुंता होता प्रस्तुत मिरजही फते जाहाली इतःपर तुम्ही लिहिल्या मनसब्यास सहसा दिरंग लागत नाही माहाराजाचे दर्शनही दोनीच्यार दिवसात होते त्याविशी तुम्ही काही विचार न करणे आणि इतःपर त्या प्रांते राजश्री बाजीरायाची स्वारी होईनासे माहाराजाकडून सिधांत केला आहे फोंडेची ठाणी गतवरशी हस्तगत केली त्याचा हिशाब तोडिला बरकड तुम्हाकडील जितका कार्येभाग बोली आहे ते दफ्तर सिधांत करून ठेवणे तुम्हीहि कदीम लोक आहा या सेवेमुले सर्वाविसी तुमचे ऊर्जित केले जाईल या गोष्टीची मनःपूर्वक निशा असो देणे कोणेविसी फिकीर न करणे छ ५ माहे शाबान पा खुद

सुरू सुद बार

लेखांक १३ तारीख २७-१०-१७३९

नं. २८९३

श्रीसुबराज

राजश्री वेंकटी कामती
साऊकार गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार रामराम उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिणे यानंतर तुम्ही फिरंगी संवस्छानचे कितेक कल्याण योजून श्रीमंत माहाराज राजश्री स्वामीस विनंती पत्रे पाठविली तो सकल अर्थ आम्हास माहाराजानी सांगोन पाठविला अस्यास तो धंदा करणे आम्हासहि अगत्य आहे इतके दिवस त्या मनसब्यास लागणार नव्हते परंतु कांही प्रयोजनानिमित्य च्यार दिवस लागले याउपरी दिवसगत होणार नाही सर्वहि मनोभिष्ट सिधीते पावतील तुम्ही ज्याप्रमाणे दृढोतर केला आहे तो निस्चये बलकट करून ठेवणे सर्वाविसी कल्याणच होईल येविसी माहाराजानी आम्हास आज्ञा केली आहे हे कार्यभाग करून तुमचे मनोदय सिधीस न्यावे हे अवशेक आहे छ ५ माहे शाबान पा हुजूर.

लेखांक १४ तारीख ३१-१०-१७३९

नं. १६१३ हू

अजम अकरम संकटतार दे ई
स्ताद जंजिरे गोवा दाम महबत हू

मोहिबानपन्हाही मुखलिसान दस्तागाहा अंजी नाग सावत भोसले सरदेसाई पां कुडाल व माहालानिहाये सलाम बाअदज सलाम महबल मकसूद आंकी येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमी केली पाहिजे दिगर इज्याने-बाकडील वर्तमान तरी आम्ही फौज तयार करून सिध जाहालो पाचसे स्वार व तीन हजार पाईचे हशम तयार केले आज उद्या येऊन पोहचावे तो आज छ ९.

शाबानी कोलापुराहून राजेश्री संभाजी राजे छत्रपतीकडून पत्र आले ते बजिनस मोहिबाकडे पाठविले आहे त्यावरून मजकूर कलेल आमचा फौजेचा गाहा जाहाला खाले उतरतो हे त्यास कळोन त्याणी टाकोटाक आम्हाकडे जोडा रवाना केला हे बर्तमान मोहिबास कलबावे याकरिता गणोजीस तातडीने मोहिबाकडे रवाना केला आहे यास तेथ पावताच उतर देऊन माघारा पाठबावे घडीचा उजूर न करावा आम्हास येक दोन दिवस अधिक उणे लागले काये निमित्य म्हणाल तर स्वारांचा जमाव केला तो येक पेंडके येकाचेच करावे तरी आजचे प्रसंगी कोणाचा विश्वास धरिता येत नाही काल परम फटकल आहे याकरिता फुटे राऊत निवड आण इतबारी असेच शोध शोधून केले त्याहीमधे त्या लोकांचा दंडक दिवालीचा सण पुढा असता महद कार्य पडिले तरी घर सोडून निघत नाही यास्तव येकदोन रोज लागले आता आमची सर्व तयारी जाहाली आण हे पत्र लिहिले आहे बरघाटचा धरबंद करावा त्यामुले आपणाकडील तहरह होऊन दुसरेची हालचाल आपल्या प्रांतास होऊ नये याविसी अजम हिंदुराव व अजम नारो राम पंडित याकडे राजश्री शाहू राजेच्या लस्करात आपण सांगितलेवरून त्याकार्यास मातबर कारकून मिरजेस रवाना केलाच होता ते बर्तमान आपणास लिहिलेच होते तसाच कोला-पुरास राजश्री संभाजीराजेकडे याच मजकुराचा भावार्थ कळावा यास्तव आमचा मित्र तेथ आणाजी मुलिक आहे त्यास लिहून तेथही कारकून माणसे पाठविली होती त्याणी राजेश्री राजेस साकल्य विदित केले तेव्हा राजेश्री छत्रपतीनीच हे पत्र आम्हास लिहिले ते पाठविले आहे याचा जाब आम्ही राजेश्री छत्रपतीस लिहून जोडा आज रवाना केला जे अगोदर आमचे फौजेचे साहित्य होऊन सिध जाहालो आम्हास आता राहाता पुरवत नाही पुढा हरोल होऊन मार्ग सुरलीत करून आमचाही कार्यभाग थोडाबहुत तौपर्यंत करून घेतो मागून आपल्या फौजा येताच त्याही साहित्यास आपल्या निरोपाने जाऊ असे त्यास लिहिले हेहि बर्तमान मोहि-बास कळावे याकरिता मुदाम हे माणूस पाठविले आहेत याखेरीज आपणास काय सुचल ते लिहाव आम्ही तो आपल्या निरोपाप्रमाणे फौजेचे साहित्य करून येत आहो त्याचा सर्व प्रकारे सेवट लावणार आपणच आहेत सर्व भेटी अंती कलेल सारांश गोष्ट जे आपले वचन तेच आम्हास प्रमाण असे जाणून त्याप्रमाणे बर्तणे हेच जरूर याउपर आम्ही येथ राहू तरी आम्हास शपथ आहे बरकड बरघाटची बातमी म्हणावी तरी तेच खबरीमधे आम्ही असो पुनेपावेतो माणसे रवाना केली आहेत परस्पर खबरहि घेतली परंतु पुनेकडील फौजेची हालचाल प्रस्तुत नाही

इतुकीमधे आमचीहि माणसे येतील तेहि बर्तमान कलेल मिरजेचा किला घेतला अजम हिंदुराऊ याची व राजश्री संभाजी राजेची भेट व्हावी अगर जाहाली असेल तेहि बर्तमान मागून कलेल जे क्षणी आम्ही सारे येऊन पोहचतो ते समई आपणाकडून जे तयारी करणे ते अगोदर करून आपले सिधतेवर असावे जे उतरतों तेच क्षणी आपणाकड येऊन पोहचतो इशारतीस आमचा माणूस समई पावेल न पावे याकरिता हे लिहिले आहे आमची हालचाल सहजेच कलेल उतरलेनंतर चौकडे गर्गशा होईल तेव्हा सहजेच कलेल येकदोन रोज बिलंब लागला असे आपणास दिसेल तर आम्ही कार्याविरहीत राहिलो असे नाही ते पत्री लिहावे तर बिस्तार होतो तोहि निशा भेटीअंती होईल गणोजीस पाठविला आहे याकड मूजबानी कितेक बर्तमान सांगितले आहे ते येकांती सांगता कळो येईल बरकड आणखी कितेक लिहिणे ते मशरूल मले प्रभू व रघ सेणी यासी लिहिले आहे तेही दखल करतील ते समजोन जवाब पाठवावा हा सविस्तर मजकूर येकबालपन्हा अजम अकरम विजेरे यासी आपण विदित केला पाहिजे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५ माहे आक्टोबर इ. स. १७३९.

नं. ३१५

पेद्र मस्करेज कोंद दे शांदुमील विजरेइ इ
स्ताद दे ईंद खुशबख्त बाशंद

मोहिबानपन्हा मखलीसान दस्तगाहा अंजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार सलाम मकसूद आंकी येथील खुसी जाणून आपली शादमानी नेकी कलमी करीत जाणे दिगर बाबला सेणवी + + महद राजकारणाची बोली केली + + मोहिबाचा व इजानेबाचा घरोबा येखलासी व्हावी व मोहिबाकडील मतलब हासील करून द्यावा हे इजनिबानी खातिरेस आणून खत पाठविले त्याचा मजमून जवाब पाठविला मालूम जाहाला मनसबेबास्ते इजनिबास मोहेबी निबिस्तान केले तर या मजकुराची बोली आणिका मातबर अदमीचे मारफातीने केली असती तरी बेहतर होते म्हणऊन कलमी केले तर इजानेबाचे दिलातील बात जे कर्नाटक प्रांती मसलतसीर होते ते बख्ती वेंकटराव व दादाजीराव फौजेसहित येऊन मडगाव व

कुकुली वगैरे जागा नाखाडी करून रायेचुरास महसरा देऊन राहिले त्यामुळे आम्हाकडील जिल्हे फोंडे पंचमहाल व जांबोळी व सुपा काबीज केले हे खबर मालूम होताच इजानेबा कर्नाटक प्रांताहून मजल दरमजल कूच करून माहाराज राजेसाहेबाचे मुलाजमतेस गेले रूकसत होऊन माहाराज संभाजी राजेसाहेब याची मुलाजमत जाहाली ते बख्ती हुकूम केला की आपले जिल्हेची ठाणी आपल्या येख्तयारात घेणे याबास्ते कितेक मतालब कलमी करून मा सोन सेणवी यास मोहिबाकडे खत देऊन पाठविले जे इजानेबा व मोहिबी येक दिल होऊन कितेक मनसब्यास कलमी केल्यास मोहिबी बाबुल सेणवी यानेच अपखुदीने हे बात केली म्हणोन दिलात वसवसा आणिला तर हे बात दिलात न आणिता हरदो मारनिलेबर सकून न ठेवणे मोहिबाचे दिलात मनसबा करणे असल तर मोहिबी मातबराबराबरी बयाबार मतालब कलमी करून पाठवणे जियादा काय लिहिणे बाजे मार (मजकूर) मादौलत महिपाजी राम कलमी करिता अया होईल हे +

लेखांक १६ माहे आक्टोबर इ. स. १७३९

नं. ५१८ श्री

उज्यारत व अवालीपनाह रफअत व अवालीदस्तगाह अजम लुबीस आपोस दांत सकटतार महफुज बाशंद गोवे प्रांते बाजीराऊ याकडील तसदीया लागला आणिखी ते तर्फेस फौज पाठवाबी गोवे ठिकाणावरी यालगार करावा हे त्याचे दिलात त्या मवाफिक त्याणी इकडेहि यबाबे कलमी केले आहे त्यास बाजीरायाचा उपसर्ग न लागावा विजरई अजम या राज्यासी यखलास धरितात त्या मवाफिक माबेन जुदाई नसावी हे उमेद विजरइ अजम बहुत धरितात म्हणोन राजश्री रंगो नारायण याणी जाहीर केले तर हा विचार अगोधर मालुम जाला असता तर त्याची पैरवी तसीच केली जाती हाली हे गोष्टी जाहीर जाली तरी गोवे ठिकाण बहुता दिवसाचे आणि ते या तर्फेस रुजुवात चालणार हे गोष्टी दिलात आणून त्याचे कुमकेस राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार त्यातर्फेस पाठविले आहेत लोवकरी त्यातर्फेस येतात याबाबेचा तफसील राजश्री रामचंद्र बावाजी व राजश्री रंगो नारायण कलमी करितील त्यावरून मालूम होईल याउपरी कोणे बाबे दिरंग नाही आपला निशा असो देणे जियादाच निगास्त आयंद '*

* पत्रावर शिका ' शंभू राजे छत्रपतींचा आहे. '

लेखांक १७ माहे आक्टोबर इ. स. १७३९

नं. २१९ श्री

राजश्री नाग सावत भोसले सरदे
साई पा कुडाल गो यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रती राजश्री उपरी उत्तरेकडील फौज या प्रांते गोव्यावरी येऊन मुलकाची खराबी केली फोंडे मर्दनगडासारखी स्थले घेतली संवस्छानास उपद्रव जाला त्यामुले कितेक स्वामीकडील अभये जाला याकरिता गोवेकराचे साह्य करून ठाणी हस्तगत करावी त्याकडील आमदानी होऊन द्यावी हे गोष्ट स्वामीस परम अवशेक जाली आहे सिंदे नरगुंदे आदीकरून ते प्रांतीची फौज कोकणात उतरावयास आणविली आहे तेहि सत्वरीच येतात राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यासीही दर्शन देऊन त्याचीही फौजेनिसी खाले रवानगी करावी येसा दृढतर निश्चये होऊन दर्शनास मुहूर्त योजिला आहे चौ दिवसात त्यासही दर्शन होऊन रवानगी होईल तुम्ही आपणाकडील वर्तमान राजश्री आणाजी मुलुक यास लिहिले ते सविस्तर वृत मारनिलेनी विदित केले त्यावरून खाले उतरावयाची तुमची त्वराच दिसोन येते तरी तुम्ही थोडके सामाने उतरलियानी काम होऊन स्थले येतात येसे नाही उत्तरेकडील बल पोहचेल याकरिता राव ममलकमतदार व सिंदे नरगुंदे हे तुम्ही येकत्र होऊन मनसबा सिधीस न्यावा उत्तरेकडीलहि बल पोहचो नये यविसी स्वामीनी घरबंद करणे तो केलाच आहे या उपरी या मनसबीयाचे येस तुम्हास द्यावे हेच स्वामीस अगत्य आहे तरी तुम्ही त्वरा न करणे स्वामीकडील फौज या आठा दिवसात येऊन पोहचते तुम्ही सिधतेनसी तयार असणे फौज येताच भारीपणे कार्य सिधीते पाऊन येस संपादणे आणि स्वामीस संतोष पावणे बहुत काय लिहिणे.

बार बार

लेखांक १८ माहे आक्टोबर इ. स. १७३९

नं. २१३ हू

छत्रपति

अजी मुशान दोंपेंद्र मीगेल दालमेंद कोदू
मारकेज विजरई गोवे शादकाम मकजी अलम
राज बाशंद

अमारत व अयालतपन्हाह शौकत व हशमत दस्तगाह अजी दिल येखलास धनाजी नाईक कदम बादज द + बात मशहूद आंकी येथील खैरीयत जाणून मोहिबी खुष खबर कलमी केली पाहिजे दिगर आमोहिबाकडून पेशजी किताबत येऊन बहुत रोज गुदरले त्या आलाकडे किताबतनामा मरसूल होऊन खुषवख्त जाला नाही हे गोष्ट येखलासीचे जागा वाजीब नसे आमोहिबाचा स्नेह रोजबरोज चालावा याबाबे दुसरे मतलुब नाही त्या + मवाफिक दोस्ती चाले इज्यनिबाचा दिल आराम होये ते बात केली पाहिजे आमोहिबाचा मतलब कीं दर्म्यान ममता चालावी येखलास दिनबदिन जियाद व्हावी हेच इज्यानीबा चाहात असो त्यामवाफिक हुजूर माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी कितेक प्रकारे लिहून पाठविले धणीयासही आमोहिबाचे दोस्तीचे परम अगत्य त्यावरून आमोहिबास पत्रे व वस्त्रे हुजूरून रवाना करून पाठविली ते व इजतअसार अंताजी विठल यास रवाना करून पाठविले असेत कितेक मजकूर जो सांगणे तो जबानी जाहीर करितील त्याप्रमाणे दिलात आणून त्यामवाफिक उतर पाठविले पाहिजे दोस्ती जियाद चालावी यापरते दुसरे अवश्य नाही जियादाच निगास्त आयद अयाम बकाम बाद.

लेखांक १९ तारीख ९-११-१७३९

नं. ५२१

श्रीशांता

संभाजी राजे

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य राजश्री
वेंकटी कामती तथा राजेश्री उपेंद्र कामती
सावकार जंजिरे गोवा गोसावी यासी

सेवक रंगाजी नारायण कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल आजी कार्तिक बहुल ५ मी मो करवीरी जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे तुमी पत्रे श्रीमंत माहाराज राजश्री छेत्रपति स्वामीस पाठविली तेवरून बहुत येक प्रकारे इस्तादाचे स्वस्थान रक्षावे बहुत अभिमान धरला आहे तो सकल अभिप्राये लिहावे तर बाटेतिटेस कागद न्हेता हे उगा कष्ट याकरिता येकीन्चकड राजश्री बाबुल सेणवी सुकटाणे यास लिहिले आहे त्यावरून साकल्य तुमास कलो येईल तेप्रमाणे येकबालपन्हा साहेबास विदित करावे तुमास शवंशये निमाण्य होईल करिता माहाराज स्वामीनीहि पत्रे पाठविली आहेत व राजश्री सिदोजी घोरपडे याही तुमास लिहिले आहे खामखा दुष्टाचा नास होऊन इस्तादाचे स्वस्थानास आजार लागत नाही तुमी येशश्व आहे हाली येथील माहाराज स्वामीचा विस्वासु सिवाजी माना गेला आहे त्याचा बहुतेक रीती गौर करविला पाहिजे येवढाही तुमचे पत्रावरून मोठा विचार जाहाला आहे बिसेस लिहाणे सुज्ञाप्रती लागत नाही कृपा असो दिली पाहिजे हे विनंती.

को. घ. इ. ८–२

लेखांक २०

तारीख ९-११-१७३९

नं. ५२२

श्रीशांता

संभाजी राजे

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाबूल
सेणवी सुकटाणे स्वामी गोसावी यास

सेवक रंगाजी नारायण कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल आजी कार्तिक बा ५ मी मोा कोलापूरी जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विसेस तुमची भेट दिचोलीस जाहाली जेप्रमाणे तुम्ही सांगितले तेप्रमाणे करवीरी येऊन साध्यात वर्तमान तुमी बोलिलेप्रमाणे श्रीमंत माहाराज राजेश्री छेत्रपती स्वामीस विनंती करून घेतली त्याप्रमाणे तुमासही पत्रे पाठविली तेथून उतर तुमी लिहोन पाठविले ती स्वामीची स्वामीस दिली त्यावरून बहुत संतोश पावले तुमी लिहिले जे तोलबाजीने फौज यावी नांवाचा सरदार असावा म्हणोन त्याकरिता आमी सारा वृतांत सांगितलेवरून माहाराज स्वामीने सारे सरदार अष्टप्रधानास बोलाऊन विचार केला जे कृष्णेअलीकडे जिले आमची पलीकड त्याची येणेप्रमाणे आणभाषा होऊन आज १०॥१२ वरूसे जाहाली आमचे जिलेमधे त्यास समद नाही असे असता आमचे जिलेतील ठाणे घ्यावयास समद काय + परिछिन मनास आणावे म्हणोन राजश्री येशवंतराऊ गायेकवाड यास रवाना करून दिल्हे व परिनिष्ट कागदही लिहोन पाठविले जे तुमी होऊन मरयादा करून चालले आता आमचे जिलेमधे तुमचे सरदार जाऊन आमची ठाणी घ्यावे यास समद काये तुमचे आज्ञेने राजश्री बाजीराऊ याही घेतली किंव्हा अदीच आपले विचारे केले फुड तुमचा आमचा तह कैसा हे परिनिष्ट लिहोन पाठविणे म्हणोन त्यानंतर थोरले माहाराज स्वामीनी लिहोन पाठविले जे तुमचे जिलेमधे आमास अगत्य नाही सहसा तो सहदेह न मानावा तुमची आमची भेट व्हावी तुमापेक्षा आमास काये थोर आहे म्हणोन कितेक ममतेचा गोष्टी सांगोन पाठविले व लिहोनही आले त्यावरी याही मागुती जाब लिहिला जे ठाणी सोडून दिल्हेविना तुमची आमची भेटी येकार होत नाही असे निश्चयेपूर्वक जाब गेली त्यामुले मोटा कलह निर्माण होऊन अनर्थ उटला आहे सद्या मिरजेहोऊन लिहोन पाठविले आहे जे आता काही बाजीराऊ याची फौज खाली

उतरत नाही वसईच्या शा तोडावा याकरिता गेले साले तुमचेच चिटीने फौज गेली होती याउपर येकंदर फौज खाली जात नाही ठाणी सोडून द्यावी म्हणोन तर हाली टाकोटाक बाजीराव यास आणवावेयास त्याचेच लेक राजश्री नानास पाठविले आहे येताच चिठी ठाणेची घेऊन देवितो असे निश्चये लिहोन पाठविले आहे पण हे चिठी आलेविना येकार जात नाहीत सध्या बाजीराऊ याची फौज आणावी म्हणून गोविंद राम गेला होता + + मुले तैकुब जाले आहे गोविंद राम पुणेस जाता करवीरी आला होता जे गतबरूसा-खारखे यास कांही देऊन याचे समाधान करून जिलेच रा वेंकटराऊ याकडे करून घ्यावी म्हणोन आला होता त्यास माहाराज स्वामीस भेटून बोलीचाली करावी म्हणोन उपक्रम करवा त्यास माहाराज राजश्री स्वामी रागावले जाहाले जे आमची ठाणी जिलेतील घ्यावेयास समद काये सारा निकाल तूर्त करून घेऊन अखेर असे बोलिले ते याणे आइकताच रातोरात पालखी येकी वाटेने आपण येकी वाटीने रात्रीचा उठोन गेला असे पाहून राजश्री त्रिंबक हरी म्हणोन माकूल माणूस पाठविला होता जे तेवडी जिले आपणास करून द्यावी पेश-वीच नानाचे नांवी करून द्यावी पाच हजार स्वारानसी माहाराज स्वामीकडे वेंकटराऊ यास ठेवितो सवदेकराचा मुलूक सोडून घेतो गोवे घेतो आंगरायास सहजा पोचवितो व स्वामीसेवाहि अमुक असी करितो म्हणोन कागदपत्रे बाजीराऊ याकडील घेऊन आले होते त्यास हा विचार फिरंगी याकडील येक वेळ रक्षावे असे दुरस करून त्यास निष्ठूरस्व जाब देऊन रवाना केला पण अजोनहि अनुसंधान लावीतच आहेत पण हे कानीमनी धरीत नाहीत असे जाहाले आहे सद्या उभयेता माहाराज स्वामीची बोली येजिनसी पडली आहे याही आपले सरदारास तमाम कागद पाठवून तयारी जाली आहे मोठा फास पडला असे जाहाले आहे.

तुम्ही म्हणाल की आजीचे प्रसंगी सबल विचार तिकड आदी हा विचार कैसा होईल म्हणोन तर हा विचार मागा ऐसाच होऊन राज्यामधे + + धुंदी होऊन तमाम मुलुक नासाड होत होता ते उभयताचे सख्यामुले स्वस्त जाहाले होते कितेक जणाचे पोट भरावेयाचे फितवा राहून गलितपत्र होऊन असे दुवी कदी होईल म्हणोन वाट पाहत होते त्यास हा प्रसंग बोडिला आहे त्यामुले त्याचेही फौजेमधील कितेक जणास कलह जाहाला पाहिजे व यांचेहि सरदारास अगत्य पाहिजेच हा संदर्प थोरले माहाराज स्वामीस विदीत होऊन सद्या सातारेस जावयाचे तैकूब जाहाले आहेत. बाजीराव याची वाट पाहाती ते आलेवर यांचे समाधान होत आहे बाजीराऊ यासी मिरजेहोऊन परनिष्ठं लिहोन पाठविले आहे सद्या फोंडकडी धंद्या उरकोन त्यासही फौजा + + जावे असे निश्चये करून त्याणीही तुमास पत्रे व अजम सकडतार यास लिहिली आहेत खामखा येतात राजश्री

ममलकतमदार यांसही जरूर ते कार्य करावेयाचे आहे राजश्री नाग सांवत भोसले याचेहि अगत्य आहे त्यामुळे ते यावेयाची सिधता जाली आहे सद्या मिरजहोऊन तेथील गुंता बारून यावे याकरिता च्यार दिवस अदिकउणे जाहाले हाली तेथील गुती बारून + घेऊन मिरजेअलीकड अर्जूनबाडेस आले आहेत येका दो रोजात करवीरी माहाराज स्वामीचे भेट होत आहे + + + भेट होऊन येतात असे निश्चये बोली होऊन तुमास पत्रे पाठविली आहेत नाग सावत भोसले यास फौज बरोबरी आणावे म्हणोन तुमी लिहिले तरी तोहि विचार हुजूर विदित केला त्यावरून ते गोस्टीचे अगत्य + आहे त्याणी तर माहाराज स्वामीस लिहोन पाठविले होते जे आसले व + याची बोली होऊन आपली काही वेचाखर्चाची अनकुलता केली आहे आपण जमाव करून खाली उतरत आहू म्हणोन रा आणाजी मुलीक या विद्यमान हुजूर कितेक श्रुत केले होते त्यास येथून माहाराज स्वामीनी जाब पाठविला जे येकंदर तुमी खाली जावेयाचे अगत्य नाही श्वलपे करून काये होणार नाही जे वख्ती येथून आमी फौजा रवाना करीत आहू तेच वख्ती तुमी जावे त्या आलीकड उतारावयास अगत्य नाही येकादे विपरित होऊन कार्ये नासेल तुमी काही चिंता ना करावी तुमचे मनोधर्म सिधीस पावऊन + + ममलकतमदार यासहि नाग सावत याणी लिहिले होते + + येणेप्रमाणे येथील विचार होऊन हा पुर्ता अभिमान माहाराज स्वामीनी धरिला आहे आजपरियेत आरंभिले नवते तुमचे अंगजणीवरून केले आहे तुमास विलंब लागला म्हणोन येकबजा दिसोन येईल करिता कागदे व माहाराज स्वामीचा विस्वासु रा सिवाजी माना यास पाठविले आहेत जे मख्ता सांगावेया सर्व तेथील तुमचा विचार पाहावे म्हणोन माहाराज स्वामीनी पुर्ते अभय दिल्हे आहे व सिवाजी मानाही तुमास सांगता कळू येईल इस्तादाचे स्वस्थानाचे कल्याण व्हावे हा तुमचा हेतु तेप्रमाणे सर्व मनकामना सिधीस पावेल आमाकडील सर्व बर्तमान तुमास ठाऊक आहे तुमचे वचनावरून तुमचे + + विचार केला आहे त्यास न्यूनता काडीप्रमाण होता नये + दिवसी फौज खाली उतरत आहे तुमी सर्व सिधी धरोन तयारीमधे आहेत यैसे करविले पाहिजे येथील काडीप्रमाण संशये ना धरावे मागा लिहिलेप्रो विलंब जाहाला म्हणोन तुमास संशये होईल करिता माहाराज स्वामीनी आपले विस्वासु पाठविले आहेत सर्व सांगता कलो येईल आदीक काही नाही त्यास बहुतेक गौराचा तुमी येक पत्र पाठविले पाहिजे राजेश्री रामचंद्र बावाजी प्रभू हे तुमी भेटले आहेत सर्व प्रकारे तेथील कारभाराचे अधिकारी तुमास दुसरे असे नाही हाली तुमास पत्रे राजेश्री हिंदुराऊ घोरपडे याही पाठविली आहेत विसेस काये कृपा असू दिली पाहिजे आणि अजम काडादिन

जेनराल यास पत्रे लिहिली आहेत जे त्या मार्गी माणूस जाणार त्याणी गोमांतकीयाच्च भाव आसे करिता त्यासहि उतम आहे कृपा सदैव असू दिली पाहिजे हे विनंती अमाकडील कबिलेचे वर्तमान बरचेवर लिहोन समाचार घेत असिले पाहिजे हे विनंती.

लेखांक २१ तारीख २१-११-१७३९

नं· ३५३

श्रीरामोजयती

राजश्रिया विराजित राजमान्य राज
श्री बाबुल सेणवी सुकटाणे स्वा
मी गोसावी यासी

पोष्य रामचंद्र बावाजी कृतानेक विनंती उपरी यथील कुशल मार्गशीर्ष शुध द्वितीया पर्यंत यथास्थित जाणोन निरंतर आपणाकडील संतोषवृत लिहित जाणे विशेष सिवाजी बराबरी जे लिहिणे ते लिहिले आहे कलेल प्रस्तुत इकडील वृत श्रीमंत माहाराज थोरले स्वामी याणी बाजीराव प्रधान यासी आणावयाकारणे त्याचे लेक राजश्री नाना यासच्च पाठविले आहे त्याउपरी आणिखीही हुजुरे बरिचेबरी त्याकडे रवाना जाले ते यताच्च दिवाणची ठाणी याविसी त्यास परिछिन्न आज्ञा करून इकडे देवितात म्हणोन हुजुरून राजश्री यशवंतराव गायकवाड थोरले राजश्री स्वामीकडे गेले आहेत त्याणी तेथून लेहून पाठविले आहे थोरले राजश्री स्वामीची या राजश्री स्वामीस बाजीराव प्रधान हुजूर येताच्च ठाणी सोडून देवितो म्हणोन जे पत्र पाठविले पाठविले आहे तो अर्थ तो तुम्हास कलावा यास्तव हे सविस्तर वृत ल्याहावे लागले तसेच्च राजश्री बाजीराव प्रधान याणी हे वृत यैकोन आपणाकडील कारकून धोंडोपंत पाठविले आहेत जे आपण च्याकर स्वामीचेच्च आहो तेवढी जिल्हे आपले लेकाचे नांवें करून द्यावी स्वामी जे आज्ञा करितील त्यास आपल्यापासून सहसा अंतर पडणार नाही या रीतीने बहुत प्रकारे लिहिले व सांगोन पाठविले आहे तथापि आम्ही या कार्यात आहो राजश्री रंग सेणवी यासी निश्चयपूर्वक जे बोलणे ते बोलोन गेलो त्याप्रमाणे राजश्री स्वामीकडून निश्चयपूर्वक त्याचा निशा कराविला

आहे त्याप्रमाणे माहाराज राजश्री स्वामी परिछिन्न बाजीराव प्रधान याकडील गोष्टीस अनुमोदन देत नाहीत राजश्री बाजीराव हे तुम्हाकडे राबिता लावितात म्हणोन यैकीजेते यैसीयासी हे गोष्टी परिछिन्न कार्याची नव्हे परस्परे राबता तुम्हाकडील आहे हे येथे कलता नये तुम्ही आपले यजमानास सांगोन याउपरी त्याकडील राबता न लागे ते करणे राजश्री नाग सांवत भोसले याकडे तुम्हाकडील पत्रे आली ते त्या मनसब्यास लागले हेहि गोष्ट उतमच्च आहे नाग सांवत याकडील कारकूनही हुजूर आले होते त्याणी तुमचे येजमानास पत्र देणे म्हणोन विनंती लिहिली त्यावरून त्याकडेहि पत्र दिल्हे आहे राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार हेहि फौजेनसी रवाना जाले इकडील सिधतेस याउपरी उजूर नाही थोरले राजश्री स्वामी कूच्च करून माघारे जाणार त्यास या माहाराजाचे समाधान जाले नाही या अर्थे बाजीराव त्याजवल यत तोपर्यंत त्याच्चाहि गुंता पडिला मिरजेबरीच्च मुकाम आहे थोरले माहाराज यांचे समाधान करणार त्याच्चसाठी त्याच्चा गुंता पडिला असता यकायकी ठाण्यासाठी फौजा पाठवाव्या तुटातूट यात त्यात पाडावा दोन्हीकडील कलह वाढऊन तलघाटे बरघाटे संपूर्ण देशात यकच्च धुंद व्हावी हे उचित नव्हे याअर्थें थोडक्यासाठी उतावली केली नाही राजश्री नारो राम मंत्री कोकणात आपले देवाचे उत्छवे फोंड्यास जाणार आहेत या मुलुकातून जावे लागते यास्तव त्याची पत्रे हुजूर आली आहेत यथून निरोप जाला म्हणजे ते कोकणात उतरतील आपले देवाचे दर्शन घेऊन यतील येसीयासी कदाचित तुमचे मुख्याच्चा राबिता या बोलीबिसी त्याकडे लागेल तरी हे गोष्टी कार्याची नव्हे हे धंदे ज्या धण्याचे त्या धण्याचे यैकीतेचे आहेत यात च्चाकर लोकाची निसबत परिछिन्न कार्याची नव्हे हे सविस्तर वृत तुम्हास कलावे यास्तव राजश्री रामाजी कासी व बिठल रवलनाथ रवाना केले आहेत ते आद्यंत यथील पाहिला व समजला अर्थ तुम्हास सांगतील व राजश्री रंगो नारायण लिहितील याउपरी दुसरा अर्थ च्चितात न आणिता रंगो नारायण जे येथे बोलिले आहेत त्याच्चा प्रत्यय यई ते करणे अतःपर इकडील उजूर कांही नाही बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे बिनंती

लेखांक २२ माहे नोव्हेंबर इ. स. १७३९

नं. ६

श्रीशांतादुर्गा

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजे
श्री वेंकटी कामती तथा राजश्री उपे
कामती सावकार मो जंजिरे गोवे गोसावी

सेवक रंगाजी नारायण कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीये कुसल लेखन केले पाहिजे विसेस सर्व वर्तमान लिहोन सिवाजी माना यास पाठविला होता त्यास आज किती दिवस जाहाले अद्यापि तो आला नाही त्या-वरून फार अवकास जाहाला हाली रा विठल खलनाथ आला त्याणी सर्व वर्तमान सांगितलेवरून माहाराज छेत्रपति स्वामी याचे चेरणास विनंती करून घेतले त्यावरून टाकोटाक फौजास ताकीदी गेल्या लवकर येऊन पोहचतील आगोदर तुम्हास सूचना कलावेबदल लिहिले असे आजम सकडतार मोहिबास ज्याहीर करणे फौज पुढे येक मजल पोन्चताच विठल खलनाथ यास पुढेस रवाना करून देवितो इस्तादाचे सेवेसी फार उदीत आहेत त्यासारिखे सर्व प्रकारे हात माहाराज छेत्रपति स्वामी लावितील हा खातीरनिशा आसावे श्रीमंत राजेश्री रामचंद्र बावा यासी लिहिले आहे त्यावरून कलो येईल बहुत काये लिहावे राजेश्री बाबुल सेणवी याचे पत्रावरून कलेल कृपा असू दिली पाहिजे हे विनंती

लेखांक २३ तारीख २६-१२-१७३९

नं. २९८६ हू

गोवर्नदोर अजम दो लुईस कैतान दे
आलमेद गोवर्नदोर जंजिरे गोवा हमेश
खुशवख्त बाशंद

अयालत व अमारतपनाह हुकुमत व शौकत दस्तगाहा अंजी नाग सांवत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाअदज सलाम महूबल मकसूद

आंकी येथील खैरयेत ता छ ६ सोबाल ब्रहस्पतवारी जाणून आपणाकडील कारनेकी कलमी करावया रजा फर्माविली पाहिजे दिगर इजानेबाकडून येकदोन किताबती गेल्या त्याचे जबाब आजलग येऊन पोहचले नाही व इजानेबाकडील आपण खबर घेतली नाही यावरून अपूर्व वाढते यास्तव आणखी आदमी रवाना केले आहेत जे इकडील बरघाटचे वर्तमान आपणास कळावे म्हणून तरी राऊ अजम हिंदुराऊ घोरपडे धारवाडास गोविंदपंतास चौक्या देऊन बसले होते तें वर्तमान पहिले इजानेबी लिहिलेंच होते त्याउपर कोलापुराहून माहाराज छेत्रपति याचे आपले भेटीबदल बोलावणे गेले त्याकरिता धारवाडहून कूच करून बेलगाऊ प्रांतास आले राजहंसगड पहिला राऊ अजम याचेतर्फेने होता तो पेले वर्षी गोविंदपंतानी घेऊन आपले ठाणे घातले होते यास्तव राजहंसगडास चौक्या देऊन फौजसहवर्तमान राऊ अजम बसले आहेत आज आठदहा रोज जाहाले गडाखाले गाऊ येळूर म्हणून मातबर होता तो घेऊन राऊ अजमानी आपले ठाणे घातले आण गडास भांडत आहेत आटोकाट आणखी जमाव करीत आहेत गड घेतल्याविना तेथून कूच होत नाही असे वर्तमान आहे तेथून आजरेचे ठाणे होहि राऊ अजमाचेच तर्फेचे तेहि आपले आपण घ्यावे ऐसीही बदंत आहे सध्या आजरेचे ठाणे आजम वैंकटराऊ याचे तर्फेन आहे कोलापुराहून राजे समानगडास पुढा येणार तेथ राऊ अजमाच्या त्यांच्या भेटी होऊन पुढे राऊ आजम राजेस समागमे घेऊन माघारे येणार ऐसी बोली जाहाली आहे याउपर होईल ते वर्तमान बरचेवर कलविले जाईल गोविंदपंत जमावसहवर्तमान अद्याप धारवाडासच आहे नवाबराये हुबलीवरच मुकाम आहे हे बयाबार वर्तमान आपणास दखल व्हावे म्हणून कलमी केले आहे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक २४ तारीख २६-१२-१७३९

नं. १९७०

हू

अजम लुईस आफोसदात सकड
तार दे इस्ताद दाम मोहबत हू

मोहिबानपन्हाः मखलीशान दस्तगाहा अज दिल येखलास नारो चिमणाजी सरसुभेदार मामले फोंडा सलाम येथील नेकी बनजर जागोन मोहिबी आपणाकडील खैर अफीयेत हरवख्त लिहून दिल ताजा केला पाहिजे महबल मकसद आंकी कितेके मजकूर मा रामाजी पंडित यांबरोबर सांगोन पाठविले त्यावरून ज्याहीर जाहाले हुजूर-हून राजश्री व्यंकटराव याची रवानगी होऊन ते कराडामानी येऊन वर्तमान आम्हास लिहिले व कितेक मजकूर मोहिबाकडील मनास आणावे म्हणऊन लिहिले त्यास इज्यानेबाचे दिलात जे येखलासी होऊन तहरह आमचा शत्रू तो मोहिबाचा तैसाच चालोन तरकी येखलासीच होऊन दुतर्फा दिनबदीन ज्यादा व्हावी त्यास ज्याणी या प्रसंगी शोधी केली त्यास नतीजा पोहोचाबितात यास तुम्ही सलूख केलासारिखे साद्य होऊन आधिकोत्तर स्नेह संपादावा हे च्याहातो ये गोस्टीचा बिचार मोहिबाच्या दिलात येत असेल तर कराब विचार करून मशारनुलेबराबर लिहून पाठवणे लस्करास आम्हासहि जाणे लागते तेव्हा येथील तुमचा आमचा स्नेह निकट असलिया तुमचे आनिस्ट इछणार असतील ते हालखुद राहतील येविसी मशारनुले सांगतील तो मजकूर खातिरेस आणून जे कर्तव्य ते करणे इतुके लिहिणे निमित्य कीं समई फावोन येणार नाही तेव्हा तफावत येईल याजकरिता तुमची शुगुरगुज्यारी च्याहातोवास्ते कलमी केले आहे जाणिजे ज्यादा कासे लिहिणे खुदायेताला सलामत रखों तारीख छ ६ माहे सवाल हे किताबती.

लेखांक २५ तारीख १४-२-१७४०

नं. ३१

दोतोर आजम अंतोन पिरेर अंद्रा
द येंरिक सकडतार इस्ताद दे ई
द हमेशा खुशबख्त बाशंद

रफाअतपन्हासी समत व शौकत दस्तगाहा अजी दिल येखलास गुणाबाई सुबराव सिंदे सलाम बाजद सलाम महवल मकसूद आंकी येथील खैरसला जाणून मोहिबी आपणाकडील शादमानी कलमी करून दिल ताजा होये ते बात केली पाहिजे दरीअयाम बहुत रोज गुदरले परंतु किताबत कलमी करून हकीकत मालूम होऊन दिल आराम होत नाही असी बात मुनासीब नव्हे हमेशा किताबतनामा कलमी करून इफ्तीदाये खुलासा तरकी होये ते बात करणे दिगर मोहिबाच्या संस्छानास दरद जाहाला आहे तो दूर होऊन चंगा व्हावयाची बात पेसजी मोहिबास कलमी करून माकूल अदमी पाठविले होते त्यावख्ती मोहिबाच्या खातीरेस ते गोष्ट न येता उतरेकडील फौजाचा सलूक करून घेतला म्हणून मातबर अदमी याणी येऊन जाहीर केले तरी मोहिबाचे आसनाई म्हणविण्यास इंजानेबाकडून साहित्य होऊन बल पडावे ते बात करणे ते करीतच गेलो तो मजकूर बयाबार कलमें करणे दरकार नाही परभारे मोहिबास मालुम होत असेल परंतु संस्छानाचा कसाला दूर जाहाला नाही तो दूर होऊन मुबारक व्हावयाची बात बयाबार कामती अजम वेंकटी कामती यास कलमी केले आहे व सेणवी अजम भिकाजी सेणवी व बालकृष्ण सेणवी यास नवीस्तन केले आहे सर्व हकीकत मालूम करितील खातिरेस आणून इस्ताद यास माकूल करून सांगोन संस्छानाचा बचाव होऊन दुसऱ्याचा दरज न पोहचे ते बात करणेस मोहीब मोरबी आहा यें बातेस इजानेबाकडून साहित्य करणेस दुसरी बात हरगीस होणार नाही + + ज्यानोहोन जुदाई न समजता इफ्तीदाये आसनाई तरकी होये ते बात केली पाहिजे जियादा लिहिणे नलगे प्यार मोहबत असो देणे हे किताबत.

लेखांक २६ माहे फेब्रुवारी इ. स. १७४०

नं. १८०१ श्री

राजेश्री सक्रटतार इस्ताद
गोसावी यासी

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्ये श्री धारराऊ यादव हावलदार रामराम बिनंती उपरी येथील कुशले जाणून स्वकीय कुशेल लिहीत गेले पाहिजे विशेष माहाराज राजेश्री छेत्रपति स्वामीनी आज्ञा देऊन लस्करात पाठविले त्यास तुम्हाकडील सात सेणवी यानी सविस्तर अर्थ सांगितलो त्यावरून तुमच्या साहिताचा विचार जे कर्णे तो केला होतो ईवडमधे तुमचा सला मामला जाहाला आम्हाकडील फौजेस खर्च बहाकार्ण जाहाला तो तपसीले राजेश्री बिजर याचे पत्री सविस्तर वर्त लिहिले आहे त्यावरून बिदित होईल तुम्हाकडून दुवा त नु व परेदुनरेरे हेही लिहितील व सांगोन पाठवितील त्यावरून कलो येईल काही द्रव्याची अनुकूलता करून तुम्हाकडून भला माणूस आम्हाकडे सोंध्यास पाठऊन देणे तुमच्या मनोदयानरूप कार्य जाहाले म्हणजे द्रव्याची बोलीचाली होईल त्याप्रा निकाल कर्णे याचे उतर त्वरेन निकाल करून पाठवणे बहुत काय लिहिणे हे बिनंती.

लेखांक २७ तारीख ३१-३-१७४०

नं. १०३६ हू

मोहिबानपन्हा मखलीसान दस्तगाहा अज
म आकरम आंतोन प्रेरदे आदराद येरी
कीस सकडतार दे इस्ताद दाम मोहबत हू

अंजी सिवाजीपंत निा माहाराज राजेश्री छत्रपति सलाम बादज सलाम येथील नेकी जाणून मोहिबी आपणाकडील कारनेकी कलमी मरकूम केली पाहिजे दिगर मोहिबी किताबत पाठविली पोहचोन हकीकत मालूम जाहाली परवाचे रोजी राजेश्री कृस्णाजी सेणवी सूर्येराऊ याच्या कारकुनाजवल हजीब मुस्तैद केला आहे म्हणोन सांगोन पाठविले तेणेप्रमाणे लोकास ताकीद करून मुस्तैद राहाविले व परतीरीहि

लिहिले सारे लोकास जाहीर जाहाले हाली किताबतीमधे लिहिले जे लुवीस दमेल पिरेर हेजीब जाणार होता त्यास समाधान नाही व पेद्र गेद मगलथाऊ यास पहिले नेमिले होते त्यासहि समाधान नाही व दूर प्रांत जावत नाही व प्रज्यनांहे समीप आला म्हणून लिहिले तर दिवसास येक तजवीज होती हे माहाराज राजेश्री छेत्रपतिसाहेबास कलत नाही फिरंगी म्हणजे येकवचनी पादशाही लोक कागद खरा म्हणोन आम्हास रवाना केले होते त्यास आज महिना जाहाला आण आज ये जिनसी तजवीज करून प्रज्यन समीप आला दूर प्रांत म्हणोन लिहिले तर दूर प्रांत अथवा प्रज्यन समीप आला हे तुम्हास पहिलेच कलत होते की नव्हते हेजीब न पाठवावा यैसी तजवीज असलेया मागाच सांगावे होते आम्ही तैसेच निघोन गेलो असतो आण इतके दिवस ठिकाणीहि पोहचतो आज महिनाभर ठेऊन घेऊन हाली ये जिनस तजवीज करून तुम्ही कदी जावेयाचे करिता म्हणून आम्हास लेहून पाठविले तर आम्ही तयारच आहो परंतु तुमचा विचार येजिनसी करावेयाचा नव्हता इतुके दिवस ठेऊन घेऊन जनामधे लौकिक करून यैसे करावे हे काये बरे तुम्हास युक्त ते करणे आम्ही तो तयारच आहो जे दिवसी हुकूम कराल ते दिवसी निघोन जाऊ प्यार मोहबत असो देणे तेरीख १३ मोहरम हे किताबत.

लेखांक २८

तारीख ९-४-१७४०

नं. ३३७३

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राज
मान्ये राजश्री संबाजी नाईक प्रता
पराऊ सरदेसाई मा फोंडा स्वामी गोसावी

सेवक त्रिवर्ग कृतानेक नमस्कार विनंती उपरीयेथील कुशल चैत्र बहुल नऊमी बुधवार सकाल प्रा नारवे जाणून स्वकीये लिहिणे यानंतर आजी प्रातःकाली मनोलीहून मातोश्री गुणाबाईसाहेबी व राजश्री रामचंद्र सेणवी यागी कागद लिहून मुजरत जासूद पाठविले आहेत त्यामधे आन्वये कीं रा येसाजी भो व रा घनशाम बामा यास मनोलीस न्हेऊन बोलीचाली होऊन तमाम फौज व पयादेची तयारी करून आमचा मार्ग पाहात आहेत माहाराज शाहू राजे व माहाराज शंभू राजे याकडे कागदपत्र पाठवून तेथील बोलभास घेऊन सर्व आपले हाती वोडले आहे आमचा मार्ग पाहतात फौज तयार आहे यैशास काल सियारे सकडतार

बोलिले कीं पोब्र मरते यास्तव च्यार टके त्यास देऊन रवाना करितो म्हणून . तर आठ दिवसात पोब्र मरत नाही आणि आमची फौज येऊन इस्तादाची इरे सिधीस न्हेईल आणि नामोश बराच होतो हाली दोनही कागद लीहिलेले पाठविले आहेत तर तुम्ही त्यास हे दाखऊन आम्हा त्रिवर्गास उटाउटी बोलाऊन न्हेणे च्यार दिवस इस्ताद तकवा धरिलेया आमची फौज तयार आहे गनीमास तंबी पोन्चती फुढा जैसे कागदपत्र दोनी राज्याचे पाहिजेत तसे करून देतात उटाउटी आम्हास बोला-ऊन न्हेणे आजीच आमची भेटी होई ते करावे आमचे बोलणेस अनमान करून यास पैका दिलेया येधाजी भो॥ व तमाम फौजा इस्तादाचे मदतीस येयास सीध जाहाल्या आहेत त्याचे छेत्रू होऊन खाली उतरतील आणि दुबार पैका पडेल दोन दिवस सबूरी केली म्हणजे तुम्हास मदत येती आणि फौज उठोन घालितात याउपरी त्यास पैका द्याल तर ही फौज उठेल परंतु ती फौज येऊन तुम्हास शाह देतील आणि पैका घेतील राजश्री फतेसिंग भोसले व रा॥ रघोजी भोसले व आलेमोदीखान यास वीस हजार फौजेनसी माहाराजानी रवाना केले ते सिरहदीवरी येऊन उतरले तेही नजीक आहेत सोंदेकडील हेजीब त्याकडे गेला आहे अदिक जबरदस्ती पाहिजे तर त्यासही मिलोन घेणार मुख्य गोष्ट वेंकटरायास येक कवडी न देणे त्रिवाच लिहिले आहे याउपरी आमची तुमची भेट आजी होई ते करणे त्वरेस मोल आहे उद्या प्रातःकाली जासूद मनोलीस रवाना करणार त्वरेने + + पाठवणे आमच्या फौजा व प्यादे देखील बेलगावास येऊन आमचा मार्ग पाहतात अलक्ष्य न करणे आमची दोनही पत्रे जतन करून ठेवणे मग आम्हाकडे देणे हे विनंती.

लेखांक २९ तारीख २८-४-१७४०

नं. २८२९

श्रीरामोजयेती

राजश्रीया विराजीत राजमान्ये राजश्री
चिमणाजी स्वामी गोसावी यासी

पो॥ रामचंद्र बाबाजी कृतानेक दंडवत प्रा॥ विनंती उपर येथील कुशल ता॥ वैशाख शुध त्रयोदसी मो॥ सांबराणी जाणून स्वानंद कुशल लेखन करीत गेले पाहिजे.

विशेष तुम्ही पत्रे पाठविली पावोन अक्षरशा श्रवण जाले फौज सांबराणीवरुन उठऊन लाऊन दिली याउपरी मनसुबा कर्तव्य संपादावा हाच निश्चये परंतु फौज मारी बिदरूरकर याचे मुलकात सनीध आहे संवस्छानकर म्हणतात जे फौज मुलकातून निघोन माघारी फिरे तोपावेतो आपण च्यार रोज आम्हावरी नजर देऊन तकुबी करावी यास्तव मात्र अवकाशावरी पडिले सर्व जमाव फौज तयार आहे फौजहि माघारी जावयास फिरली याउपरी उजूर आहे यैसे नाही सवस्छानकर भेटीस येणार सोंदेहून पुडे सिवया यावयास निघाले भेटी होताच सर्व ठीक करून ठाणी हस्तगत करावयाचा उद्योग दुसरा अर्थ नाही याउपरी तुम्हाकडील साहित्यानसी सिधता असावी काल सत्तरूसीहून हुजूरचा जोडा आला उभयेता माहाराजाची आज्ञापत्रे आली सर्व राज्यभार व सरकार कुल देखील आमचे माहाराजास वोपिले मिरज साणक जाली तेथील बंदोबस्ती करावया उभयेता सद्या मिरजेस आले आहेत तेथून करवीरास येतात ठाण्याच्या चिट्या मागाहून येत आहेत उभयेता धणीयाची निष्ठुरता परिश्चिनपणे जाली याउपरी ठाणी घेतल्याविना दुसरा अर्थ नाही आम्हास परिश्चिन्नवादे आज्ञा आली तुम्हास कलावे यास्तव लिहिले असे संवस्छान सोंदे गोवे याचे आगत्यापरते आम्हास आणीखी कांही आहे यैसे नाही याउपरी त्याणी मागेपुढे पाहावे यैसे नाही त्याचे मनोदये जे जे असतील ते ते धण्याचे पुण्यप्रतापे सिधीस पाऊन देणे हेच अगत्य याप्रमाणे तुम्ही त्यास सांगोन दारूगोला बरकड साहित्य बरचेवरी होऊन येऊन पोहचे ते गोष्ट करणे तुम्ही आपला खासगत मजकूर राजश्री जानराव याचे पत्री लिहिला तो अवींत कलो आला त्याप्रमाणे संसारिक सरंजाम सत्वरीच करून देतो बेफिकीर असावे कसालेमुले श्रम जाले तर च्यार रोज सोसावे काहिले न होणे सावणुराहून नबाबजी याने पालखी वस्त्रे पाठविली त्याचे आर्त जे गोविंद पंत फौजेनसी येऊन सवस्छानची खराबी केली यास्तव त्यास तंबी पोचवावी आमची भेट घ्यावी राजश्री हिंदुराव नबाब भेटले सर्व प्रकारे या मनसुबेस सामील होऊन ठाणी घेऊन द्यावी त्याकडे भले मनुश गेले आहेत सर्व पैगम राजकारे भारीपणे होऊन कर्तव्यता होत आहे उभयता माहाराज करवीरास आले आहेचा हगाम यास्तव हाली राजश्री बिठल बावाजी यास रवाना केले आहेत आवींत सांगतील त्याप्रमाणे हुजूर व सावणुरास नबाबजीकडे दोन रवानग्या आंबेच्या करावया लागतात याप्रमाणे उतम हे साल आहे हजार हुजूर व पाचसे सावणुरास येणेप्रमाणे तयार करऊन पाठवणे बिठल रवलनाथ यास रवाना करून पाठविणे प्रस्तुत हल्यालचे किल्लेदाराचा आमचा श्नेह जाला त्याणी अमल अख्तियार दिल्ही मुलकाची लावणीसंचणी होत आहे करवीराहून माणसे आली हल्यालचे किल्यात कबिला सुधा आहे बहुत काय लिहिणे लोभ असो देणे हे विनंती.

लेखांक ३० माहे एप्रील इ. स. १७४०

नं. १७४५ हू

अजम लुवीस आपोंस दांत सकड
तार जंजिरे गोवा शाद काम बाशंद

शाहमत व बिसालतपनाह रफअत व माहाली दस्तगाह रामचंद्र बावाजी बाअदज सलाम मशहूद आंकी येथील खैरियत जाणून आमोहिबी आपली खैरीयत कलमी करीत जाणे दिगर मोहिबाकडून माहाल + + घेऊन फोंडेचे मुक्कामी आले ते समई जाहीर जाले कीं नारो चिमणाजी याचा व मोहिबाचा यखलास होऊन कुकुरलीचे ठाणे त्याणी मोहिबास दिल्हे म्हणोन जाहीर जालीयावरी मोहिबाचे दोस्तीत अजब हे गोष्ट वाटोन त्या हमराह जवाब देऊन इजतअसार चिमणाजी मुकुंद व हरी लक्षुमण याची राहा तीनच्यार रोज पाहिली ते येऊन पोहचले नाही आणि सोंधेकराचे लिहिने आले जे फौज वरघाटे येऊन सुपे घेऊन मग खाले उतरावे त्यावरून कूच करून घाट चढोन खानापुरास मुकाम केला आहे सांबराणीस मतबर पाठविले आहेत राजश्री हिंदुराव व सेनाखासखेल दौलतराव राणोजी घोरपडे सेनापती देवजी मोहिते हे तयार सरदारास हुजूरून माहाराज साहेबाचे हुकूम खाले उतरायाबाबे आले ते तमाम फौजानसी तयार होऊन + + या फौजा घेऊन सुपेचा कोट घेऊन खाले येतो चिमणाजी मुकुंद यासी तेथे आपणाजवली असो देणे ते सांगतील त्यामवाफिक तयारी करणे हरी लक्षुमण याणी अंतस्ताची गोष्ट सांगितली ते जाहीर होऊन खुशखस्ती हासील जाली इज्यानीबास मोहिबाच दोस्तीच जरूर आहे + + खातीरजमा राहोन तयारी असो देणे जरूरीचे काम चिमणाजी मुकुंद यासी कलमी केले आहे ते जाहीर करितील इज्यानीबाची जहां जाणोन त्यामवाफिक सरंजाम करणे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ३१ माहे आक्टोबर इ. स. १७३९

नं. ४१०

(आरंभीचा भाग त्रुटित आहे)

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाह बादज इस्तियाक फिरावा

मशहूद आंकी येथील खैरयत जाणोन खैरयत खुद कलमी करून दिल ताजगी केली पाहिजे उपरी बसई प्रांतास राजश्री बाजीराव याणी आजी च्यार वर्षे आअमारतपनाहासी कथला करून बसई घेऊन तो मुलुक काबिज केला गतवर्षी गोवे प्रांतास फौज रवाना करून आजार दिल्हा इतके जाले असोन तुम्ही काही इज्यानेबास लेहून पाठविले नाही यामुले तुम्हाकडीलच नासाडी जाली आणि फोंडे तर्फेस त्याची ठाणी बसली हाली बाजीराव याणी फोंडे प्रांताची जिले आपले ताबीन करावी म्हणजे आपण बहुत प्रकारे चाकरी दाखऊ म्हणोन किंताबती पाठविल्या आहेत त्यास तुम्हाकडील मजकूर राजश्री रंगो नारायण याणी जाहीर केला जे तुम्ही या राज्यासी दुसरा विचार धरीत नाही मावेन येखलासी चालावी हे उमेद बहुत धरिता त्यावरून खुशाली होऊन फोंडे प्रांत तमाम खासगीकडे ठेवावा यैसा निश्चय जाला आणि तुम्हास बाजीरायाचा आजार लागो नये याबदल या तर्फेच्या फौजासहित राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यासी या तर्फेस रवाना केले आहेत लोवकरी येऊन पावतात ते ठिकाण बहुता दिवसाचे आहे ते जगवावे हाच आमचा निश्चय आहे हाली मिरजेस जात आहो तेथून यबाबेची सारी कामे सिधीस पावऊन त्यातर्फेस थोडकेच दिवसात स्वारी होते हे हकीकत तपसीलवार रंगो नारायण कलमी करितील जियादाच निगास्त अयद अयाम बकाम बाद.

लेखांक ३२ तारीख ४-७-१७४०

नं. २२५ हू

अजम अंतोन फ्रेरआदराद येरी
कीस सकटतार देइस्ताद दवा
म मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलिसान दस्तगाहा अजी सिवाजीपंत निा माहाराज राजेश्री छत्रपति सलाम बाअदज सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपणाकडील कारनेकी मरकुम केली पाहिजे दिगर आपला निरोप घेऊन मोहिबी राजश्री सात सेणवी यास रवाना केले त्यास घेऊन गेलो ते माहाराज राजेश्री साहेबाची व राजश्री बाबा मंत्री याची भेट जाहाली कितेक इस्तादाच्या कार्याच्या गोस्टी विदित केल्या त्या खातरेस

आणून आम्हास कितेक विचार सांगोन इस्तादाकडेस पाठविले आहे हुजूरची पत्रेही इस्तादास व आपणास आहेत भेटीनंतर सविस्तर जाहीर होईल आम्ही डिचोलीस आहो पत्राची जाब सत्वर पाठविणे त्यासारिखे भेटीस येऊ ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असू दिली पाहिजे खुदायेताला आपले पन्हामधे मोहिबास खुशाल राखो छ २० रबिलाकर हे किताबत.

लेखांक ३३ तारीख १५-७-१७४०

नं. २२० श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६७ रौद्रनाम संवत्सरे श्रावण शुध त्रितीया भौमवरे क्षेत्रिये कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री विठल सेणवी धुमे यासी आज्ञा केली येसीजे गतवर्षी वेंकटराव नारायेण याणी ते प्रांते जाऊन पोंडे मर्दनगड तमाम ठाणी घेतली व गोवे प्रांते उपसर्ग केला तो प्रांत आपला स्वबश करून ठाणी मुलुक सोडऊन तुम्हासारिखे अंगजाचे येकनिष्ठ लोक तुमचे ऊर्जित करून पुढे स्थलिकाचा व स्वामीचा स्नेह सारोधार चालावा ते निरोपद्रव करावे हा मनोदयेतनरूप ते प्रांतीचा कुली येख्ती यार देऊन हुजरून सर्व साहित्यानसी हशम फौजाचे साहित्यानसी राजश्री रामचंद्र बाबाजी यास आज्ञा देऊन पाठविले आहेत पुढे खासा स्वामीची स्वारीही होत आहे तुम्ही स्थलिकास सांगोन सर्व प्रकारे मारनिलेसी रुजुवादपणे बर्तोन साहित्यानसी अनकुल होऊन स्वामीचे मनोदये सिधीस जात ते गोष्ट करणे तेणेकरून स्थलिकास-कार्यास कल्याणप्रद असे तुम्ही आपले ऊर्जित व येकनिष्ठा जे असेल ते प्रगटतेस आणून साहित्य ज्या समई जे पाहिजे ब मारनिले तुम्हास सांगोन व लेहून पाठवितील ते करणे तेणेकरून तुमचे ऊर्जित असे मारनिलेचे लिहिलेप्रो अंतर होऊ न देणे जाणीजे बहुत काय लिहिणे.

लेखांक ३४ तारीख १५-७-१७४०

नं. ३०४ हू

शाहामत व आवालीपनाह रफअत व अवाली दस्तगाह अजम लुबिस आंपोसदांत सकडतार जंजिरे गोवा शादकाम बाशंद बाअदज इस्तियाक मशहूद आंकी + जे कल्मी करणे ते केलेच आहे या तर्फेचा तमाम बंदेज करणे तो करून देऊन राजश्री रामचंद्र बाबाजी यासी त्या प्रांतीचा कुल यख्तियार देऊन रवाना केले आहेत मागाहून खासा स्वारीही फर्माविली आहे यैशास तुम्ही तमाम साहित्यानसी मोमीइलेस सामील होऊन दिलख्वाह मनसुबा होये ते गोष्टी करणे तुमची अकीदतमंदी पैदरपै जाहीर जाली आहे त्यामबाफिक त्या ठिकाणी याची नेकीमंद नजूर आहे जरी मोमिइलेसी रूजू होऊन हरबाबे इमदाद सामील केली तरी तुमचे खातीरख्वाह तुमची नेकी जाहिरीस येईल व इलाहा-कुदरत इलाही जे होणे ते होईल मुफसी मोमिइले हुमा कल्मी कारितील जियादाचा निगास्त आयंद *

* पत्रावर संभाजी महाराज छत्रपति यांचा शिक्का आहे.

लेखांक ३५ तारीख १६-७-१७४०

नं. २६४५

श्रीसुबराज

राजश्री विठल सेणवी

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार व्यासराज-रूपीदेव सेनापति जफ्तनमुलुक फतेजंगबहादर रामराम सुहूर सन इहिदे आर्बैन मया अलफ आम्हास श्रीमंत माहाराज राजश्री स्वामीनी आम्हास आज्ञा केली कीं आमच्या राज्यात राजश्री वेंकटराव नारायेण याणी वसईचे निमित्य करून गोमांतकास पायेबंद देऊन फोंडे व जांबोली पंचमाहाल व सुपे या जिल्हेतील ठाणी घातली ती पूर्ववत घ्यावयाविसी आज्ञा केली आहे आम्हासहि या गोष्टीचे अवशेक असे हली विजरई अजम व सकडतार

अजम व राजश्री वेंकटी कामती यास लिहिले आहे त्यावरून कलेल तर तुम्ही या प्रसंगी मातबर आहा कलेल त्या प्रकारे गोमांतकवासी यास सांगोन फौज तोफा दारूगोली सामानानसी सामील होत ते करणे तेणेकरून त्यांचे स्वहित आहे व रयत लोकाचे व वाणीउदीम व सावकार लोकास आमदरफ्तीस स्वराज्य जाहलिया चिंता नाही येविसीचा कितेक अर्थ रा सोनो बापोजी यास सांगितला आहे सांगता कलेल जाणीजे छ २ जमादिलोवल येविसीचा अर्थ राजश्री महिपाजी राम लिहितील त्यावरून कलेल छमार

सुरू सुद बार

लेखांक ३६ तारीख १६-७-१७४०

नं. ७५१

श्रीसुबराज

राजश्री सातो शामजी
गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार व्यासरूजरूपीदेव सेनापति जफ्तनमुलुक फतेजंगबहादर रामराम सुहूर सन इहिदे आर्बैन मया अलफ तुम्हाकडोन रा सोनो बापोजी आले यानी कितेक अर्थ सांगितला त्यावरून श्रुत जाहाले त्यावरून विजरई व सकडतार व राजेश्री वेंकटी कामती यासी लिहिले आहे त्यावरून कलेल बरकड अर्थ राजश्री महिपाजी राम लिहितील व मारनिले सांगता कलेल तदनुसार फिरंगी सामानयुक्त साहित्य होत आणि तुम्ही अनकुलतेनसी हुजूर येणे जाणिजे तुमच्या मनोगतानरूप ऊर्जित केले जाईल छ ५ जमादिलावल

सुरू सुद बार.

लेखांक ३७ माहे जुलै इ. स. १७४०

नं. ३७० हू

अजम लुवीस आपोसदांत
सकडतार जंजिरे गोवा शादकाम बाशंद

शाहामत व बिसालत दस्तगाहा यखलास आगाह अंजी मिनाजी सिंदे बाअदब सलाम मशहूद आंकी येथील खैरीयत जाणोन मोहिबी आपली खैरियत कलमी करीत जाणे दिगर + माहाराज साईबाचे हुकुमा बमोजिब फोंडे प्रांत काबिज करावा तुमची इमदाद करून व्यंकटराव यानी मोहिबाची ठाणी घेतली आहेत ते सोडवून द्यावी + बिनाबरा फौजेनसी येऊन फोंडियास मुकाम केला आहे मोहिबी तमाम रवेसीन सामील होऊन तमाम साहित्य पुरवावे तरफैन यरवलास चालावा हे गोष्टी करार जाहाली आहे म्हणून मुफसील अर्थ माअतमिददौलत रामचंद्र बावाजी याणी जाहीर केले त्यावरून बहुत खुशवख्ती हासील जाली फिलहाल फोंडेस मुकाम जाला आहे तरी सिताबीने दारूगोली भांडी सर्व तयारीनसी मतबर सिताब पाठवणे इजानीबास मोहिबाचे दोस्तीचे अजहद जरूर आहे मुफसील मारनिले कलमी करतील जियादा काये लिहिणे हे किताबत.

लेखांक ३८ माहे जुलै इ. स. १७४०

नं. १८६७ श्रीरामोजयती

पुरवणी राजश्री विठ सेणवी धुमे
मो। गोमांतक स्वामी गोसावी यासी

पो। रामचंद्र बावाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये स्वानंद लेखन करीत गेले पाहिजे विशेष सविस्तर आलाहिदा पत्रावरून कलेल प्रस्तुत येथे कांहीं दारूगोल्याचे जरूर प्रयोजन आहे तरी हर इलाजे येक बारल दारू व येक पेटी गोला हरयेल्ने किरीस्ताबाजवल देऊन सीघ्रवतर आम्हाजवल येऊन पोंचेत ते गोष्ट करणे वरकड सविस्तर राजश्री विठल रवलनाथ सांगता कलेल बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ३९ माहे जुलै इ. स. १७४०

नं. ३९०१ श्री

राजश्री नाग सांवत भोसले
सरदेसाई पा कुडाल व
माहालानिहाये गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो दौलतराव हिंदु-राव घोरपडे रामराम येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे बिशेष पत्र पाठविले ते पावून वर्तमान कलले व राजश्री सिवराम सोनो याणीही मुखे सांगितलेवरून संतोष जाहाला इकडील अर्थ तो आपणास पहिला लिहिलाच आहे सांप्रत आम्ही व राजश्री सुभानराव सिंदे सेनाखासखेल व राजश्री दादाजीराव सहवर्तमान का काकती ये जागा मुकाम केला आहे पुढे जो मनसबा होईल तो लिहिला जाईल तीर्थरूप वडीलही मागाहून लवकरी येत आहेत प्रस्तुत जालेहाल प्रांती आहेत गोमांतककरास आम्ही पत्रे पहिली पाठविली त्याची उतरे पाठविली नाहीत यास्तव हली आणखी पत्रे पाठविली आहेत ती रवाना करून अविलंबे त्याकडोन अनकुलतेनसी मातबरानी यावे ही गोष्ट जाहालीया उतम; न होये ते पक्षी त्याच्या आमच्या स्नेहास विपर्यास येईल समग्र ये प्रांती महिनाभर मुकाम केले परंतु अद्याप गोमांतकाकडील प्रतिउतरे आली नाहीत बरे अगाध काये आणखी तुम्ही येक दोन प्रसंग सांगोन पाठविलेस इमारत त्याबर आहे फौज तोलदार याचा प्रसंग आपणास ठाऊक आहे बरे होणार होईल राजश्री महिपाजी राम यासही पत्रे पाठविली आहेत तेहि येतील सर्व प्रकारे आपणाहून अधिकोतर काये उभयेपक्षी भेटी होऊन कर्तव्यार्थ व्हावा हा मनोदये घडून येईल तो सुदीन वरकड राजश्री माहादाजी राम याणी लिहिले असे त्यावरून कलो येईल बहुत काये लिहिणे.

लेखांक ४० माहे जुलै इ. स. १७४०

नं. ३९ हू

अजम दो लुवीस कैतान दालमेद
गोवरनदोर विजरई बंदर गोवे शादकाम बाशंद

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाह बाआदज इष्तियाक फिराबा मशहूद आंकी सरकारचे हुजुरे लिंगोजी यादव व बालोजी खाड्या या हमराह खत खैरीयत नमत इसहार केले ते बसाअत नेक पोहचोन बिसयार शादमानी रूयदाद जाली लायकुल मरहमत रामचंद्र बावाजी याणी तुमचे येखलासीचा व दूरंदेशी व बानीशमंदीचा तफसील कलमी केला तो व तुम्ही लिहिला मजकूर मुफसील जाहीर जाला तुम्ही बफौज ईलाही मकान गोवे येथील मसनदनिशीन जाला हे खुशखबर मालूम होऊन जियादा खुषवख्ती हासील जाली मारनिले मारफतीनेच इज्यानीबाची व आंअमारतपनाहाचे यखलासाची पैरवी जाली हे गोष्टी पैदरपै चालावी हेच इज्यानीब अजहमा जरूर आहे कानड्याकडील खुलासा व्हावा दरी बाब बहुत रवेशीने कलमी केले तरी ते कानडे लोक बेइमान करार मवाफिक त्यापासून निभावणी होत नाही दिलात येक जबानी येक हा त्याचा रवाज बरा जाहीर आहे अमा तुम्ही कलमी केल्यावरून टकापैका व बाजे कलमे याची याददास्त रामचंद्र बावाजी याकडे पाठविली आहे त्या मवाफिक निकाल जाला व पेशतर सुरलीतपणे वर्ततील तरी त्याच्या हातून अमल घेतला जाईल याद बाष्तीत यक कलम कमी होता कामास नये त्यास हे कानड्याचे खातिरेस न येई तरी रामचंद्र बावानी यास निरोप देऊन हुजूर पाठवणे तुम्हाकडील यखलासबाबे बोली करून येतील त्यास इज्यानीबापासून हरगीज तफावत होणार नाही कानड्याकडून मर्दनगड घ्यावा हे थोरले माहाराजास जरूर यास्तव तो किला त्याणी दिल्हाखेरीज बोलीस बनाव बसत नाही यखलासाच्या जागा तफावत न दिसावी याबदल कलमी केले असे जियादाच निगाष्त आयद शादकाम बाद.

लेखांक ४१ माहे जुलै इ. स. १७४० नंतर

नं. १६

दोतोर अजम लुवीस अफोंस दात
सकडतार इस्ताद दे ईद दाम श
हामत हू

रफअतपन्हा हिसमत व शौकत दस्तगाहा अजी दिल येखलास रामचंद्र सेणवी सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमी करून दिल ताजा केला पाहिजे दिगर उतरेकडील फौजानी तुमचा प्रांत नाश करून राचूरास परीघ घातला तेव्हा मातुश्री गुणाबाई यास सांगोन तुम्हास संभाजी नाईक यास पत्रे लिहून पाठविली तेव्हा तुम्ही सांगोन पाठविले जे जरी आमचा उपराला कराल तर आम्ही तुमचे आहो म्हणोन त्यावरून उभयता माहाराजास लिहोन राजश्री येशवंतराऊ भोसले व राजश्री घनशाम बावा राजश्री सेनापतीची फौज चिकुडीकर यैसी भारी फौज बेलगाव प्रांती आणोन मुख्यास येथ आणोन दर्शन घेऊन तुमचा उपराला करावा हा निश्चये करून चिरंजीव फौजेसहीत त्याजकडे पाठऊन कितूर प्रांते त्यास आणोन तुम्हाकडे पत्रे देऊन राजश्री त्रिवर्ग पाठविले तेव्हा तुम्ही उतरवासी याकडे राजकारण करोन यास फिराऊन पाठविले येऊन वर्तमान सांगितले आम्ही उतमच मानिले हरकसे तुमचे कल्याण व्हावे ते जाहाले म्हणोन समाधानेच होतो तेव्हा पुनरूक्त यैकू लागले जे तुमचा बारदेश साष्ट तुमच्या हातास आली नाही सांवंताचे तुमचे येक दोन वेला युद्धहि जाहाले बहुत फिदालक माणिले गेले त्यासमई भिकाजी सेणवी यासमागमेहि मागुती पत्रे लेहून पाठविली जे तुमची राजकारणे दुसरेकडून होऊन बारदेश साष्ट सुटोन क्षेम होत असलिया उतम नहोन आमचे मते राजकारण करावे असे सर्वांचे चितास येत असलेया लेहून पाठवणे त्यासारिखी पैरवी केली जाईल म्हणोन त्यावरून तुम्ही पत्रे लेहून त्यास येथ पाठविले पत्रे पावली नाहीत परंतु त्याही सांगितले जे भला माणूस पाठवा म्हणोन तेव्हा त्यास सांगणे सांगोन पाठविले उपरांतीक कांहीं प्रसंग कलला नाहीं परंतु राजश्री हरीपंत येऊन पुनरूक्त तुम्हापासोन पैका घेतला तेव्हा तुमचा निर्वेद जाहाला नाही यास्तव राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार थोर मोहरे त्यासी राजकारणे सांगोन तुम्हास कागद लेहून पाठविले तुमचा जाब येताच त्याही यावे फोंडे व मर्दनगड वकेंड ठाणी घ्यावी

तुम्हासी विवेकानी राहावे असा सिधांत करून कागद देऊन राजश्री सोन सेणवी यास पाठविल्यास तुम्हास मानलेया त्यासारिखा विचार करून रवाना करावे होते अथवा न माने असे असलेया उतर प्रतीउतर करून रवाना करावे होते दोन्ही गोष्टी न करिता राजश्री वेंकटी कामती यास व बर्कडास व राजश्री सोनबा सेणवी यास अदबखानी ठेविले म्हणोन यैकोन परम आश्चिर्ये वाटले जे तुम्ही थोर येक वचनी असता समये पडल्यास कांही टाकेल तो उपराला करावा या विचारे उभयेता माहाराजास व सांवतास सोंदेकरी यास सेनाखासकील यास व बरकड राज्यातील सरदारास लिहिणे तसे लेहून तुमचे साहित्य करीत असता काडीमात्र अंतर नसता पुरता विचार न करता यास नजरबंद करणे हा विवेक की काये हे गोष्ट थोर लोकास विहित नव्हे तस्मात तुम्हाकडोन अशी गोष्ट घड ते हेतव नाहीं परंतु छुलक लोक याही सांगितली गोष्ट यैकोन असा प्रसंग केला असेल अतःपर तरी पुरता विचार करून कामती अजम राजश्री वेंकटी कामती आदीकरून सर्वास व राजश्री सोनबा सेणवी यास मुक्त करून रवाना करून देणे थोरपणास उचित आहे नहून छुलक लोकाच्या गोष्टीवर जाऊन न सोडूच म्हणाल तर तेहि तुम्हास भूषणच आहे परंतु इतकाहि अर्थ लिहिला यास ईश्वर साक्षी आहे आपण न लिहिता न सांगता इतकी धावत का केली असे तुमचे चित कल्पील काही दिवस तुमच्या प्रांतामधे राहूण कर्मणूक केली होती तेव्हा तुमचे प्रमाणीकपणे पाहिले होते म्हणोन धावत केली त्यात तुमचे अनिष्ट येछीले असेल तर त्यास श्री साक्ष आहे तोच तुमच्याही ह्रदई बास करीत आहे नीतीकडे चित देऊन सर्वास सोडून देऊन भूषण घेणे तुमच्या बाप्पावर श्री असता बर्कडही अनिष्ट इछिलीने काये होणार तसाही प्रसंग नाही तुमचे कल्याणप्रद चिंतीत असता अशी गोस्ट व्हावी हे देवास मानत नाही असे असोन प्रस्तुत माहाराज राजश्री स्वामीकडोन राजश्री रामचंद्र बावाजी तुमच्या साहित्यास येत्न करितात त्यास आमच्या येजमानाची फौज ते येक होऊन तुमचे साहित्य करावे असाहि प्रसंग केला आहे येवंच कोणत्याही प्रकारे तुमचा प्रसंग निर्वेद होऊन पूर्ववत तुम्ही कल्याण असलेस म्हणजें अमास थोर लाभ हाच असे चिंती आम्ही आणोन तुमच्या कार्यास सादर असता चाकरी बरबाद गुन्हा लाजीम करणे तुम्ही नीतीवंतास विवेक नव्हे असे तुमच्या येजमानास श्रुत करून कामती अजम वेंकटी कामती व राजश्री सोनबा सेणवी आदीकरून सर्वास सोडून उभयेपक्षीचा स्नेह वृधी होऊन पुढी यापेक्षा आमच्याने होईल ते कार्य अधिकोतर घडे ते गोष्ट करणेस तुम्ही विवेकी आहा थोर विवेकी लोकास इतका विस्तार लेहावयास कारण नाही

परंतु असा प्रसंग जाला यास्तव यास्तव सविस्तर अर्थ तुमास कलावा यास्तव लेख केला आहे बरा ध्यानी आणोन लिहिलें प्रो सर्वास मुक्त करून रा सोनबा सेणवी आमाकड येऊन पोहचत ते बात करणेस तुम्ही अकम आहा मोहबत असो देणे हे किताबत.

लेखांक ४२ माहे जुलै इ. स. १७४० नंतर

नं- ३११५

दोतोर अजम लुवीस अफोंस
दात सकडतार इस्ताद दें इं
द दाम शहामत हू

रफाअतपनाहा हशमत व शौकेत दस्तगाहा अजी दिल येखलास दौलतराऊ हिंदुराव घोरपडे सलाम येथील खुसी जाणून मोहिबी आपली शादमानी कलमी करून दिल ताजा करीत गेले पाहिजे दरिबिला राव अजम बडेराव याही पेशजी मा सोनो बापू या हमराह मोहिबास खत कलमी करून कामत अजम वेंकटी कामत व बाबूल सेणवी व सात सेणवी यास खत करारनामा पाठविला त्याबमोजीब सरंजाम व मोहिबी बमेये फौज तोफा दारूगोली सामानसहित सामील व्हावे ते बात छोटे अदमीचे बातेवरून तहकूब करून दुसरेकडे राजकारण केले सिदे* फोंडेस गेले ते मात्वारे नामोहरम आले बडेराव याचे मारूफातीने केले असते तरी फोंड्याचा माहाल सुटोन मोहिबाकडील ठाणी सुटून + खुलासा होऊन रयत लोक उदीमवे व सावकारती व मशरूलदौलत नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये याची बाब लिहोऊन मोहिबी याची इरे धरिलेस जस मोहिबास येते ते बात न जाहाली बडेराव हरदो माहराजाचे येक्तयारी याणी जो मनसबा करतील तो हरदो माहाराजास खूश होईल फिलहाल वेंकटी कामत व बाबुल सेणवी यास सोडून सोना बापू यास रजा देऊन बडेराव याचे करारबमोजिब सरंजामानसी सामील होऊन मनसबा होये ते केले पाहिजे इजानेबा बमेय फौज कितुर प्रांती दाखल जाहालो बाजे मजमून मालदौलत नाग सावंत भोसले निविस्तन करितील व मालदौलतहू दादाजी राम लिहितील व मा सिवराम सोनो जाहीर करतील त्यावरून अंया होईल जियादा काय लिहिणे हे किताबत

* सिदे = सरळ

लेखांक ४३ माहे जुलै इ. स. १७४०

नं. ३११७

पेद्र मस्करेन कोदं दे सादुमी
ल विजरेइस्ताद दे इंद हमेशा
खुशबख्त बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हशमत दस्तगाहा अंजी दिल यखलास दौलतराव हिंदुराव घोरपडे सलाम येथील खुसी बनजर जाणून आपली शादमानी हमेशा कलमी करून दिल ताजा करीत गेले पाहिजे दरीआयाम पेशजी कितेक मनसुबा राव अजम बडेराव याणी मोहिबास कलमी करून मा वेंकटी कामती व बाबुल सेणवी यास लेहून मा सोनो बापू यास पाठविले तो मनसबा छोटे अदमीचे बातेने तहकूब करून फिलहाल मनसबा जाहाला तो मोहिबास मालूम जाहाला बेहतर कितेक मजमून मा सकडतार यास कलमी केला आहे व मादौलत नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल माहालानिहाये यास सांगोन पाठविले आहे ते कलमी करतील त्याबमोजीब वेंकटी कामती व बाबुल सेणवी यास सोडून पेशजी करारदादप्रमाणे सोनो बापू या हमराह मोहिबाकडील मातबर अदमी व बाबुल सेणवी व सात सेणवी यास पाठवून देणे बाज मुलाजमत मनसुबा केला जाईल इजानेबा बमय फौजनसी कितुर जिल्हेत। मुकाम करून आहोत जलदीने जवाब पाठविणे जियादा काये लिहिणे हे किताबत.

लेखांक ४४ माहे जुलै इ. स. १७४०

नं. ३११४

अजम लुईस अफोंस दात सक
टतार इस्ताद दे इंद्य दाम मोह
बत हू

मोहिबानपन्हा मखालिसान दस्तगाह अंजी दौलतराव हिंदुराव घोरपडे सलाम

येथील खुसी जाणोन मोहिबी आपली शादमानी कलमी करून दिल ताजा करीत गेले पाहिजे दिगर आमोहिबाकडील कितेक येखलासीचा मजमून मा अंताजी पंडित वैद्य याणी जाहीर केलेवरून खुशवख्ती हासील जाहाली जानुहोन जुदाई न समजता इजानेबा भाईचाराच्या हातात बिलफैल सोंधाची मसलत सुरू जाहाली तेवख्ती बडे हजरत छत्रपती राजे याणी घाटाखालील मनसबा फर्माविला हुकुमाबमोजीब मनसबा करावा हे जरूर जाहालेवख्ती पंडित मारनिलेनी कितेक बजा मालूम केलेवरून जानुहोन येखलासीवर नजर देऊन मनसबा मौकुफ केला मोहिबाहून इजानेबास दुसरी बात ज्यादा नाही हे येकीन समजोन मोहिबी मातबरास पाठऊन देणे बाद मुलाजमत इस्तादाची खुषी ज्या बातेने होये ते केले जाईल बाजे मजकूर पंडित मारनिलेनी पाहिला आहे व जुबानी सांगितला आहे मोहिबास जाहीर करितील त्यावरून अंया होईल जियादा काये लिहिणे हे किताबत.

लेखांक ४५ माहे जुलै इ. स. १७४०.

नं. ४३२ हू

विजरै अजम अकरम विजरै जंजिरे
गोवा बमै शा खुशवख्त बाशंद

अयालत व अमारतपन्हा हुकमत व शौकत दस्तगाहा अजी दिल येखलास महिपाजी राम सलाम बाआदज सलांम महुबल मकसूद आंकी येथील नेकी जाणून आपणाकडील कारनेकी कलमी करावया रजा फर्माविली पाहिजे दिगर राजश्री बाजीराऊ प्रधान याकडून रा वेंकटराऊ नारायेण येऊ गोव्रेस परीव घातला फोंडे जांबोली पंचमाहाल काबीज केले वाडीकर सांवत हे सामील होऊन तुमचा बारदेश मारिला ते गोष्टीचे पारपत्य करणे आणि अगदी कोकणपटी स्वराज्य असोन मोहिबाची व आपली येकलासी चालावी या निमित्ये कर्नाटकीहोऊन ये जिल्हेस येत असता थोरले माहाराज शाहू छेत्रपति स्वामी याणी राजश्री हिंदुराब घोरपडे ममलकतमदार यास आदरपूर्वक बोलाऊन न्हेऊन मिरजेची मसलत सांगितली सिरज फते करून बागडकोटे प्रांती येऊन मा सोन सेणवी यास कितेक मजकूर सांगून पाठविला ते बमोजिब कार्यार्थ होऊन आला असता तर गोष्टी होऊन गेली असती

हाली सक्रुद्तार अजम यास लिहिले आहे तेंगेवरून कार्यार्थ होऊन आलिया राजश्री ममलकतमदार ते प्रांते येऊन स्वराज्य करून मोहिबाची व आपली येकलाखी चालावी हे इच्छितात जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ४६ तारीख १-८-१७४०

नं. २९८

श्रीरामोजयती

राजश्रिया विराजित राजेमान्ये राजेश्री

विठ सेणवी धुमे मोा गोमांतक स्वामी गो

पोष्य रामचंद्र बाबाजी कृतानेक विनंती नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा श्रावण बद्य पंचमी जाणून मोकाम भीमगड आयामकडील कुशललेखने चितानंद करीत असिले पाहिजे विशेष राज्येभारी मनसुबा होऊन कितेक कर्तव्यता करावी हे गोष्टीची सर्व साधने आदीकरून सतरूसीकडील माहाराजाची समतेसहित हशम फौजाचे साहित्यानसी माहाराज राजश्री स्वामीचे आज्ञेनुरूप किले भीमगडास येऊन पोहोचलो पूर्वी राजश्री खिवजी देवाजी बराबरी पत्रे व स्वमुखे कितेक सांगोन पाठविलेवरून अभिप्राये तुम्हास समजोंन कितेक साधनी प्रसंगास आपण येजमानसहित लागला असाल याउपरी सर्व गोष्टीने कर्तव्य कार्योमुख आहा न आहा हा सर्व अर्थ कलाबा लागतो तदनरूप पष्टोतरे लेहून अतिसत्वर पाठवणे विलंब सर्वथा न करणे वरकड विस्तार जो लिहिणे तो राजश्री रंगाजी सेणवी याणे लिहिले आहे साद्यंत भावगर्भ समजोन कर्तव्यर्थ सीघ्रवतर घडोन येई ते गोष्ट करावी आम्ही जे आलो आहो ते काही इदमित्यया अर्थे आलो आहो यैसे नाही जो पाया घातला आहे तो बरा सद्दढ आहे श्रीकृपे प्रत्येय येईल मुख्य गोष्ट तुम्हाकडून निदर्शनास सत्वर येई ते करणे बहुत काय लिहिणे लोभ असो देणे हे विनंती

लेखांक ४७ तारीख २७-९-१७४०

नं. १६७७ हू

अजम लुवीस आंफोसदात
सकटतार दवाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलीसान दस्तगाह अंजी नारो पंडित मंत्री सलाम महबल मकसूद आंकी येथील खुसी जाणून खुद खुसी दुकलम मरकुम करीत जाणे दिगर माहाराज छत्रपति स्वामीचे जागा मोहिबी बहुत वजेने येखलासी च्याहत आहेत म्हणून अजम रामचंद्र बावाजी याणी कलमी केले ते गोशगुजार होऊन दिल आराम जाहाला दुतरफा येखलासी च्यालोन तरकी व्हावी बाजीब आहे फिलहाल माहराज स्वामीनी मोहिबाचे भलाईबदल फौजानसी रामचंद्र बावाजी यास रवाना केले आहेत कितेक मजकूर मूजबानी फर्माविला तो मुलाजमतेबादज जाहीर करिता आया होईल कलमी करितील त्यामवाफिक कारसाजी होऊन माहाराज स्वामी खूष होऊन येखलासीचा इरादा जवाद होये ते बात केली पाहिजे दराज लिहिणे ये इतियाज नाही हे किताबती.

लेखांक ४८ तारीख २८-९-१७४०

नं. २१ हू

अजम लुईस आपोंसदात सकड
तार जंजिरे गोवा शादकाम बाशंद

शाहामत व अवालीपनाह रफअत व मआली दस्तगाह अंजी रामचंद्र बावाजी बाअदज सलाम मशहूद आंकी येथील खैरीयत जाणोन आपली खैरियत कलमी करीत जाणे बाल सेणवी या हमराह नविस्ता पाठविला तो पोहचला मुजबानी सांगोन पाठविले ते जाहीर जाले त्याचा जबाब बाल सेणवी याहमराह सांगोन पाठविला आहे जाहीर करितील मुफसील कलमी करणे व सांगणे ते विजयादशमी होताच जाहिरीस येईल जियादा काय लिहिणे आण कितेक प्रबल जी मवाफिक ठिकाणी याचे ठिकाणी कायम मुकाम करून मोंहिबाचे दिलख्वाह

तमाम खलकुलाह याची भलाई करावी हे ख्वाहीश आहे तो मुफसील अर्थ मातमीप रंगाजी नारायण कलमी करिता ज्याहीर होईल जियादा काय लिहिणे हे किताबत

लेखांक ४९ तारीख ३१-१०-१७४०

नं. २०६५अ हू

मेहरबा य अतिजाद दोस्ता अज
म लुबीस आपोसदांत सकडतार जंजिरे
गोवा सलामत बाशंद

अजी रंगाजी नारायण बादज सलाम आंकी येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमी मरकुम केले पाहिजे दिगर आज कार्तिक बा ष्ठमी सुक्रवारी हलसीहोऊन राजश्री रामचंद्र बाबा याणी लिहिले जे राजश्री मिनाजी सिंदे सारे फौजेनसी कितुरास आले उद्यापरबा ठिकाणास येतील कितुरकराची बोली लागली आहे त्यास समागमे घ्यावा असे जाहाले आहे फौज लवकर येऊन पोहचती जे सांगणे ते सर्व राजश्री हरी लक्ष्मण यास सांगोन राजश्री रामचंद्र बावानी पाठविले आहे असेयास हे समई मोहिबिया मनसबेस मन देऊन योजिले रीतीने सिधीस पावावे आज करवीराहोऊन माणुसे आली आहेत श्रीमंत माहाराज छत्रपति स्वामी सातारेस थोरले श्रीमंत माहाराज छत्रपति स्वामीचे दर्शनास जातात राजश्री व्यंकटराऊ याकडील कितेक पैगाम परभारी आले आहेत यात चालत नाही मोहिबास मालूम जाहले पाहिजे मोहिबी हे समई सर्वर्थी साहाय्य करवावे हलसीहून मोहिबास लिहावे म्हणोन लिहिले करिता लिहिले आहे प्यार मोबत असो दिली पाहिजे खुदायेताला मोहिबास आपलेपन्हामध्यें खुशाल राखो हे सलाम.

लेखांक ५० माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. ९६१ हू

विजैर अजम अकरम विजैर जंजिरे
गोवा बमेशा खुशबख्त बाशंद

अयालत व अमारतपन्हा हुकुमत व शौकत दस्तगाहा अंजी दिल येखलास नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाआदज सलाम महुबल मकसूद आंकी येथील नेकी जाणून आपणाकडील कारनेकी कलमी कराबया रजा फर्माविली पाहिजे दिगर आलीकडे येकबालपन्हा याकडील किताबत येऊन खबर घेतली नाही हे येखलासीचे जागा मुनासिब न्हवे याजउपरी हरघडी खत किताबत पाठऊन दिल दिल ताजा केला पाहिजे मकसूद आंकी अजम हिंदुराव घोरपडे ममलकतमदार याजकडून कारकून पत्रे येकबालपन्हा यासी व इजानेबास घेऊनु आला आहे तीं टाकोटाक गोवेस रवाना करऊन उतरे आणऊन सिताबीने आपणाकडे पाठऊन द्यावी व आणखी कितेक मजकूर मूजबानी कारकुनाकडे सांगोन पाठविला तो बयाबार अजम सकडतार याचे पत्री कलमी केला आहे व इजानेबाकडील कितेक हकीकत लिहिली आहे ते सविस्तर येकबालपन्हा यास जाहीर करितील ते ध्यानास आणून जबाब बहुत जलदीने पाठविले पाहिजे जबाब येई तों कारकून ठेऊन घेतला आहे येकबालपन्हा याचा व इजानेबाचा जिवाला जाणून अजम राव याही लिहून व सांगोन पाठविले आहे त्यासारिखे त्यास सांगणे ते करार सांगोन पाठवावे लागते बेलगाव कितुरच्या अजमाने ते लौकरच येतात तेव्हा इजानेबाची याची भेटीचा योग व्हावा हेही त्याही सांगोन पाठविले आहे परंतु येकबालपन्हाचा दुदाव असिलिया खुद आम्हीच त्यापावेतो जाऊन पोख्ते साहित्यानसी घेऊन येऊ इरेचा थोर मोहरा राव अजम आहेत जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे.

लेखांक ५१ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. १३६२ ह्र

अजम सकडतार दे इस्ताद

दाम मोहबत ह्र

मोहिबानपन्हाही मखलीसान दस्तगाहा अजी नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालनिहाय सलाम बादज सलाम महबल मकसूद आंकी येथील खैरयत जाणून मोहिबी आपणाकडील कारनेकी कलमी करावया इशारत फर्मावेली पाहिजे दिगर क्रिस्तावाबराबर अजम राऊ ममलकतमदार याचे व इजानेबाचे जवाब पाठविले ते पावले त्याउपर गणोजी व भिकाजी पाठविले त्या बराबर अजम दौलतराऊ घोरपडे याची व इजानेबाची पत्रे पाठविली त्याचे जवाब आले नाही भिकाजीस तेथ ठेऊन घेऊन गणोजी बराबर पैल्याच पत्राच्या नकला पाठविल्या त्यावरून सर्व मजकूर मालूम जाहाला मोहिबीही त्यावर कलमी केले ते बात आजचे प्रसंगी येथार्थच आहे इजानेबाचेहि चितास आली परंतु पैहिला त्याचा तुमचा संदर्भ कोणे रीतीची चालना जाहाली म्हणून ते सांगतात हे काही इजानेबास दखल नाही त्याच मनसबेवर राऊ अजम दौलतराऊ घोरपडे फौजसहवर्तमान आले कितुरचे मुकामीहून पत्रे मोहिबास व इजानेबास लिहिली ती मोहिबाकडे पावीत जाहाली त्याउपर हाली बेलगाबानजीक काकतीस मारून गडीस वेडा देऊन बसले आहेत तेथील शह आजउद्यामध्यें उरकतो त्याच मुकामाहून पत्रे मागती तुम्हास आली आहेत ती बजिनस पाठविली आहेत त्या पत्रामध्ये मजकूर त्याही काये लिहिला आहे तो आम्हास मालूम नाही दुतर्फा येखलासी जाणून ते आम्हास कलमी करतात व पेषजीपासून आमच्या मनसबेविसी लिहितच आहो फौज प्रस्तुत आली ते तुमचे पूर्वचालणेवरून आली आण आम्हासही तुमच्याहि साहित्यास आलो म्हणतात येविसीचा तपसील बारंवार तुम्हास लिहावा तर किरिस्ताबाबराबरच्या पत्रावरून आमचा निशा होऊन गेलाच आहे ये गोस्टीची पैरवी सर्व मोहिबाचीच आहे आम्ही लिहावे असा अर्थ राहिला नाही विचारे पाहाता अशी फौज पुन्हा समयास अनकूल व्हावी हे मुस्कील आहे याउपर आपण सर्व विवेकी आहेत आम्हास इस्तादाचे सर्व प्रकारे कल्याण ते पाहिजे आमचे कार्य म्हणावे तर इस्तादाचे योगेकरून जे समई होणे ते होईल हा निर्धार इजानेबी केलाच आहे अजम

व्यंकटराऊ इचलकरंजीस आले त्याबराबर हजार फौज आहे त्याची व अजम दौलतराऊ याची भेट होणार याकरिता व्यंकटराव याचा कारकून अजम दौलतराऊ याकडे आला आहे सर्व येकत्र होऊन घाटाखाले प्रांताबरून जावे अशी तजवीज होत आहे बरकड कितेक वर्तमान लिंगिस्ताद याचे पत्री लिहिलेबरून कलो येईल मागील जवाब व हाली जबाब जलदीने पाठविले पाहिजे ज्यादा काय लिहिणे.

लेखांक ५२ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. २७ हू

अजम अंतोन काडदीन फ्रोंइस कपितान
जनराल तोा साष्टी शादकाम बाशंद

शाहामत व आवालीपनाह रफअत व मुआली दस्तगाहा अंजी रामचंद्र बाबाजी बाअदज मुअबात मशहूद आंकी येथील खैरीयत जाणून आपली खैरीयत कलमी करीत असिले पाहिजे की धाकले माहाराज याणी सातारियास मतबर मनुष्यें पाठऊन लिहून थोरले माहाराजास फोंडे वगैरे ठाणेविषई निकड लाविली हे देखोन व्यंकटरायानी हुजूर मतबर पत्रे वस्त्रे देऊन पाठविले सोंध्याचा तह दिढीने व गोव्याचा तहचे यैसे रुपये प्रतिवर्षी साहुकारी निशा करून देतो म्हणोन बहुत रदबदल आरंभिली तेव्हा राजश्री रंगाजी नारायेण याणी आम्हास बहुत प्रमाणे सांगितले कीं आआमारतपनाहासी बचन गुंतले आहे ते काये आणि हे होते काय त्याबरी तुम्हाकडील सर्व अर्थ चितात आणून तुम्ही येकबचनी आहा बचनास अंतर न करा हे जाणून माहाराजांचे खिजमतीस अर्ज करणे तो करून व्यंकटरायाकडील संदर्भ मोडून त्याकडील माणसे वस्त्रे पत्रे देखील बाहेर घातली आणि मनसबा करून जबरदस्तीने ठाणी घ्यावी हा निश्चय करून खासा माहाराजानी स्वारीस यावयाचा करार दाद करून तमाम फौजा व हशम यासी सामील करून देऊन आम्हास या प्रांते रवाना केले आम्ही भीवगडास आलो आठा रोजात तमाम फौजा जमा होतात हशम जमा होत चालिले याउपर तुम्हाकडील

को. घ. इ. ८–४

पैरवी कैसी आहे साहित्याची तयारी काय कैसी जाहाली येथे साहित्य पोहचणीयाचा विचार काय फौजा कोणीकडे कशा उतराव्या आधी उद्योग कोणता करावा तुमचा आमचा येक हात कोणे जागा होतो हे समग्र प्रत्ययानसी कलले पाहिजे याकरिता मुदाम राजश्री विठल रवलनाथ पाठविले आहेत हे सांगतील व रंगाजी नारायेण लिहितील तो समग्र अर्थ चित्तास आणून प्रत्ययानसी उतर सत्वर पाठविले पाहिजे याउपरी येक घटिका कार्यावाचून खाली जाऊ द्यावयाची नव्हे तुम्ही बुधीमंत आहा जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ५३ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. १५०० हू

अजम लुविस आपोसदात सकड
तार जंजिरे गोवा शादकाम बाशंद

शाहामत व बिसालत दस्तगाह रफाअत व अवाली दस्तगाह अंजी रामचंद्र बाबाजी बादज सलाम मशहूद आंकी येथील खेरियत जाणोन मोहिबी आपली खेरीयत कलमी केली पाहिजे आम्ही डिचोलीहून आपणास पत्र लिहिले होते त्याचे उतर आले नाही येसे न करावे आम्ही जंजिरे सिंधुदुर्गास जाऊन माहाराज राजेश्री साहेब + + उभयता माहाराजांचे शेवेसी पत्रे लिहिली होती तेथून हुकूम आले कीं मर्दनगड सुपे ही ठाणी घेऊन मग भेटीस येणे येसा हुकूम आला त्यावरून आम्ही फिरोन डिचोलीस आलो आता फोंडे प्रांते जमावानसी जावे किंवा फौजा खाले उतराव्या लागतात मर्दनगड सुपे हरयत्ने घ्यावी लागतात कानड्याकडे सरकारची बाकी सात लक्ष रूपये व आमचे कर्ज व खिंदी तीन लक्ष रूपये येकूण दाहा लक्ष रूपये देणे असता सोंधेकरी माहाराजाचा + त्याणी जबरदस्ती करून मऱ्हाटे + बुडाले येसे चितात आणून चढाई करून फोंडे मर्दनगड सुपे + तले आमची हत्यारे बाडबिसाद घेऊन फिरंगाणात नेऊन बंदी ठेविले इतके केले याउपरी त्याचे पारपत्य करून ठाणी घ्यावी हे न होय तेव्हा मराठे सरदार व लोकानी तमाम दाली सोडावी येसे निदान प्राप्त जाहाले आहे येशास उभयता माहाराजाचा व अलमपन्हा पादशाह पुर्तकेश याचा स्नेह चालत आला

असे असता माहाराजाची स्थले जोरावारीने घेऊन सोंधेकरा स्वाधिन करावी हे उचित नव्हे आम्ही आठ महिने पादशाही अन्न भक्षिले आहे फिरंगणचे बाईट च्याहू तरी आम्हास माहाराजाचे कदमाची सौगंद आहे याकरिता हे पत्र लिहिले आहे तरी आपण माहाराजाची स्थले माहाराजाचे लोक आले आहेत याचे स्वाधिन करावी म्हणिजे आम्ही उभयेता माहाराजाची पत्रे करारी करून देतो जे गोविंदपंत वगैरे कोण्ही मऱ्हाटी फौजेने फिरंगाणास उपसर्ग न करावा येसे करितो कदाचित आमचा इतबार न होय तरी येक आम्ही आपला आप्त कुटुंबासहित फिरंगाणात ठेवितो आणि स्नेह चालवितो दुतर्फा मुलुक नांदेल मार्ग चालतील मोहिबाची कीर्ति होईल हे न होय तरी + होय तरी मऱ्हाठ्या फौजा येऊन खामखा मर्दनगड सुषे घेतात तुम्हावरी ठाणी घेतल्याची बदनामी राहाते देश मोडतो रयेत खराब होते मार्ग पडतात नाहक सारी खराबी होते तरी आपण दानादिल आहोत येसे होऊ देऊन येक मऱ्हाठ्याचे राज्यातील स्थले घेऊन कानड्यास द्यावी आणि मऱ्हाठ्यासी वैर करून रयेत गोरगरिब सर्व खराबी करावी हे उचित नव्हे हे पत्र लिहिले आहे तरी आपण सर्वत्र मिलोन विचार करून अगत्यारी गोष्ट यैकोन माहाराजाची स्थले माहाराजास दिली तरी सर्व विवेक होतो. तुम्ही पादशाही वचन बोलाल ते खरे होते + + निरोपद्रव होऊन दुतर्फा नांदणूक होते पुढे पादशाहीकास आम्ही हाजीर होतो जरी हे न माने तरी उतर पाठवावे म्हणजे ठाणी घ्यावयाचा जसा इलाज असेल तसा माहाराज करितील जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ५४

माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. १४६९

हू

पादशाह पुरूतकाल

अजम लुबीस आपोसदात सकड

तार शादकाम बाशंद

शाहामत व बिसालतपनाह रफअत व मआली दस्तगाहा अंजी रामचंद्र बावाजी सलाम मशहूद आंकी येणील खेरीयत जाणोन मोहिबी आपली नेकी कलमी केली पाहिजे हल्याल किला उरला होता त्यासहि अपाय होऊ लागला

त्याकरिता निघोन आलो तेथील बंदिस्ती करवितो पांचा साता दिवसात तेथून उतर येताच पुन्हा आपले आपणाजवळी येतो यके बस्त्रानसी आलो आहो आमची हत्यारे पढयारे सर्व दौलत कानड्याने घेविली ते आपणाकडे आहे आम्हीहि तेथे आहो दुसरा बिचार नाही माहाराज साहेबाची ठाणी त्याची त्यास देऊन श्नेह संपादावा हे गोष्टी उतम कानड्याकरिता मन्हाटे याचा दावा वाढवावा यैसे नाही अलमपनाह याचा मुलुक कानड्याकरिता रयत लोक हैराण करू नयेत आपण म्हणतील कीं गोविंदपंत बुडविला तसे मन्हाटे यास मारू म्हणतील तरी पुरूतकालाहून सोलदाज लोक आले आहेत ते आपले कामावरी दुरूस्त आहेत पादशाही अन्न खातात ते झुंझतीलच परंतु तुम्ही पादशाही कारभारी तुम्ही लोकी कानड्याकडील अभिमान धरून नाहक पुरूतकालचे सोलदाज लोक यावरी झुंझ पाडावे मुलुक खराब करावा रयत मोडावी हे काम योग्य नव्हे आम्ही सर्व प्रकारे तुमचे आहो जेव्हा आम्ही तुमचे तेव्हा दोनही माहाराजांचे राज्यातील दोन लाख फौज हे तुमची आहे आणि काही पादशाही चाकरी करून दाखऊ तरी मेंहरबानी करून आमचे आम्हास देऊन माहाराजाचा श्नेह संपादणे आम्हास पादशाही कौल दिला असता आमची खराबी जाहाली हा बदनकशा बहुत जाला आहे ते दूर करणे प्यार मोहबत असो देणे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ५५ माहे आक्टोबर इ. स. १७४०.

नं. १५०५

अजम दो लुविस कैतान दालमेंद गोवर
नदोर जंजिरे गोवा शादकाम बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हशमत दस्तगाह अंजी रामचंद्र बावाजी बाअदज सलाम मशहूद आंकी येथील खैरियत जाणोन मोहिबी आपली खैरियत कलमी केली पाहिजे हलीहि पातशाही सदरेस सारी हकीकत लिहिली आहे फिरंगाणामध्ये सत्य आहे विश्वासघात फिरंगी लोक करीत नाहीत यैसे यैकिले होते याकरिता पादशाही कौल व फिरंगी याचे बोलणे खरे मानून भेटीस आलो यैसे असता आमचे सर्वश्व घेऊन आठ मास श्रमी केले माहाराजाची ठाणी घेऊन सोंधे-

कराचे हवाला केली माहाराजाच्या टकापैका बुडविला पादशाही कौल लटिका जाला फिरंगी याचे वास्यास विश्वासघात व दगाबाजी आली येसेच आपल्या धर्मशास्त्री असले तर असो नसिले तर आमचे सर्व वारून देववावे माहाराजाची ठाणी माहाराजाकडे द्यावी म्हणजे कजिया वारेल दुतर्फा मुलूक नांदेल मराठी फौजेच्या येकंदर उमसर्ग फिरंगाणास न लागे ते करतो परंतु उभयेता माहाराजाची ठाणी देऊन विवेक करावा. पुढे पादशाही कामास आम्ही हाजीर आहो हे गोष्ट न जाली तर उभयता माहाराज ठाणी फौजेच्या जोराने खामखा घेतील‌च सिबंदीचे लोक गोव्यातील रहदारी व साहुकार जेथे आढलेल तेथून सिबंदी उरकून घेतील रयेतीची खराबी होईल तरी सोंधेकराकरिता येसे होऊ न द्यावे आम्ही बहुत प्रयासे राजश्री बाजीराऊ प्रधान तुमचे सेजारातून काढिले होते फिरोन ते सेजारास येतील येसे होऊ न द्यावे हे गोस्टीचा पुर्ता विचार करून उतर सत्वर पाठवावे आम्ही फिरंगाणचे खेर च्याहणारे आहो यास्तव हे पत्र लिहिले आहे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ५६ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. ३१४७ हू

नं. ५

पादशाह पुरूतकाल

अजम दो लुवीस कइतान गोवरनदोर

जंजिरे गोवा हमेशा शादकाम बाशंद

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाह अंजी रामचंद्र बावाजी सलाम मशहूद आंकी येथील खेरीयत जाणोन आपली खेरीयत कलमी केली पाहिजे हल्यालचे किल्यातून लोक पोटाकरिता उठोन आले सर्वस्व गेले तश तोहिं किला जाईल याकरिता तेथून निघोन आलो तेथील बंदीस्ती करून फिरोन येतो निरापाखेरी आलो म्हणोन मोहिबा म्हणतील तरी आलोसे न समजावे मोहिबाजवली आहो मोहिबी आलमपनाह याची सुरत आम्हास दाखऊन त्या हुजूर वचन दिल्हे आहे कीं तमाम सिबंदी व कर्ज व माहाराज स्वामी यांचा येवज सर्वही कानड्याकडून निर्वाह करून देतो हे न होय तरी तुमची ठाणी तुम्हास देतो हे तुमचे वचन पादशाही

करार आहे त्याचा भरोसा धरून आहो कर्ज व सिबंदी व माहाराजाचे रुपये हिसेब बहुत होतो कानड्याच्याने देवत नाही तरी याउपरी मर्दनगड व सुपे ही माहाराजाची ठाणी सत्वर आमचे स्वाधीन करून पादशाही बचन खरे करणे मऱ्हाटेयाकडून आपले देशास उपसर्ग होईल म्हणून चितात संदेह येईल तरी आम्ही आठ महिने तेथे होतो पादशाही अन्न खादले आहे आम्ही बिलकुल तुमचे आहो पादशाही मुलकास उपसर्ग यकंदर मऱ्हाटी याचा होऊ देत नाही येविषई जसा पाहिजे तसा निशा करून देऊ तरी मोहिबी आम्हास हातीचे सोडू नये उभयता माहाराजाची ठाणी त्याची त्या देऊन आपला मुलुक निरोपद्रव राहे श्नेह चाले ते करावे हा श्नेह आमचे विचारे कराल तरी पुढे कितेक पादशाही कामे करून देऊ हा निशा असा फिरंगाणचा श्नेह संपादावा हे षहिलेहि च्याहत होतो आताहि च्याहतो तरी आमची ठाणी आम्हा स्वाधीन करविणे मुफसील + चिमणाजी मुकुंद यास कलमी केले आहे जाहीर करतील जियादा काये लिहिणे प्यार मोहबत असो देणे हे किताबत.

लेखांक ५७ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. २५५७ हू

अजम मन्वेल स्वार वेल जिनराल तोा
बारदेस शादकाम बाशंद

महवत व मुखबतपनाह रफाअत व माआली दस्ता गाह अजी रामचंद्र बावाजी सलाम मशहूद आंकी येथील खैर जागून आपली शादमानी कलमी करणे दिगर तुम्ही येस सेणवी या हमराह कितेक सांगोन पाठविले ते येक बयेक जाहीर जाले इजानीबास तुमचे महबती सिवाये कांही जियादा नव्हते परंतु कानड्यानी दगाबाजी केली सरकारचे निशाणास खंती आणिली ते खबर परभारे हुजूर गेली हुजुरून दोनही दरबार कानड्याबरी फिरले तो मजकूर हुजूरचे पत्रावरून व रवानगी पत्रावरून कलेल आता हुकूम आला तसे चालावे लागते तुम्ही लिहिले आणि इज्यानेबाकडून त्याचा पर्याये कांही निघाला नाही तरी येखलासीस वाजीब नव्हे याकरितां येक पर्याये काढून येस सेणवी यासमागमे सांगोन पाठविले आहे

हे सांगतील ते खातिरास आणून जरी कानडे तुमचे यैकतील तरी त्याप्रमाणे करून तुम्चे मारफतीने येश सेवटास लाऊ हे न होये तरी आमचा इलाज नाही कानड्याबरी चौतर्फा मोहिम जाली आहे बिलकूल जाणावे मुफसत इजतअखार रंगाजी सेणवी लिहितील त्यावरून कलेल जियादा काय लिहिणे हे कितावत.

लेखांक ५८ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. २१०५ श्रीरामोजयती

राजेश्रीया विराजित राजमान्ये राजेश्री
विट सेणवी बावा धुमे स्वामी गोसावी यासी

पोष्य रामचंद्र बाबाजी कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिले पाहिजे विशेष डिचोलीहून पत्र लिहिले होते परंतु उतर आले नाही हे उचित नव्हे आम्ही सिंधेदुर्गास जाऊन सातारा कोलापूर येथे उभयेता माहाराजास पत्रे लिहिली होती त्याणी लिहिले कीं तुम्ही डिचोलीस जाऊन फिरंगीयाचा साफ जाब घेणे ठाणी दिल्ही तरी उतम नाहीतरी जे उतर देतील ते हुजूर पाठविणे त्यासारिखा जो हुकूम करणे तो केला जाईल म्हणून आज्ञा जाली त्यावरून आम्ही डिचोली आलो सविस्तर पत्रे लिहून आपणाकडे पाठविली आहेत तरी ज्याची त्यास प्रविष्ट करून जे उतर होईल ते पाठवून द्यावे मग श्री समर्थ आहे ज्याचे पदरी लाख फौज होती त्याचे पदरीची ठाणी घेतली यैसे असता कानड्याचे पदरीची ठाणी घ्यावयाचे अगाध काय आहे आम्ही कोणेका प्रकारे तऱ्ही फिरंगाणांत पोहचलो होतो अमारतपनाह गोवर्नदोर व सकडतार आदीकरून यांच्या भेटी जाल्या बोल्याहि सौख्याच्यान्न जाल्या होत्या आणि विचारे पाहाता कानडा दगाबाज त्याणी युक्तीने समजाऊन फिरंगीयाकडून आपले साह्य करून घेतले माहाराजाचा टका व कर्ज सिबंदी वारून देतो म्हणून बोलोन फिरंगी यास टकविले फिरंगी याणी माहाराजास पत्रे लिहिली कीं तुमचा टका पैका सर्व वारून देतो सेवटी फिरंगी याचे पदरी लटीकबाद आला व ठाणी घेतली याची बदनामी कानड्यानी फिरंगी यावरीच घातली ती पत्रे मुदाम हुजरून आणविली अहेत आली म्हणजे पाठवून देतो कानड्यानी बहुतासी दगाबाजी केली त्याचे पारपत्य हिंदूमात्र असेल तितक्याने करावे किंवा संपूर्ण दोन्ही राज्यातील मऱ्हाटे सरदार लोक आदि करून सर्वत्रानी दाली सोडावी यैसा प्रसंग प्राप्त जाला आहे याउपरी

तो प्रत्यय यतयत येईल यैशास आम्ही गोमांतकात पावोन सर्वाच्या देखी बोळखी जाल्या आहेत आणि आम्ही आठ महिने तेथील पादशाही अन्न भक्षिले आहे जरी तेथील अकल्याण काडीमात्र चिती असेल तरी आम्हास श्रीचा शफत असे श्नेह संपादावा सर्व देश रयत नांदवावी तेथोर संस्थान उभयता माहाराजाचा व त्या संस्थानाचा श्नेह चालावा येकंदर पुढेमागे फिरंगाणास मन्हाटे फौजाचा उपसर्ग कधीही न लागावा गोविंदपंत वगैरे यास तिकडे पाहावयासी गरज नाही यैसे करावे हे मानस आहे याकरिता हे पत्र लिहिले आहे सहस्र पत्राचे जागा मानून आपण बरे न्यायनिष्ठूरवादे सांगोन माहाराजांची ठाणी माहाराजास देववावी इतकेने उभयेता माहाराजाचा श्नेह चालतो फिरंगाण निरोपद्रव होते कदाचित आमचा इतबार न ये तरी यक मतबर आस कुटुंबसहीत तुम्हाजवली ठेवितो उभयपक्षी श्नेह सारोधार चालवितो पुढे पादशाही कामाची पैरवी करून पुरूतकालपर्यंत कीर्ति करून घ्यावी हे मनामधे बहुत आहे तरी खामखा हा प्रसंग आपण करावा क्लिमेश चिती न धरावा हे गोष्टी न होये तरी काज हे आम्ही पाहून घेऊ फिरंगी याणी कानड्याचा उपराला न करावा माहाराजाची स्थले देश कानड्यास देऊन त्याचा उपराला फिरंगी याणी करावा आणि उभयता माहाराजासी वैर करावे हे गोष्टी परिछिन योग्य नव्हे पादशाह पुरूतकाल यासहि मानणार नाही इंग्रेज वगैरे टोपीकर यासही मानणार नाही टोपीकराकरवी पुरूतकालासहि सविस्तर वर्तमान लिहविले आहे. हाली ही पादशाही सदरेस सर्व हकीकत लिहिली आहे व समस्तास पत्रे आहेत तरी कुशल करून सर्व समते मन्हाट्याशी श्नेह करणे तरी श्नेह करावा आम्ही निभावतो ते नाही विरूध करणे तरी सुखरूप तैसेच उतर पाठवावे म्हणीजे आम्ही घाटावरी जाऊ जे होईल ते हो परंतु लिहून उतराई व्हावे पुढेमागे आम्हावरी शब्द न यावा याकरितां लिहिले असे तुम्हीहि साफ लिहिलेप्रमाणे अक्षराचे अक्षर श्रत करणे मग त्याचा यखतियार उभयता माहाराजास इरे असली तरी ठाणी घेतील आम्हाकडे लोक होते त्यात पराक्रम असिला तरी आपली सिबंदी जेथे उगवेल तेथून घेतील रायचूर साष्टी प्रांतातील अगर बारदेशातील उदमी अगर बैल कोण्हीहि तरी अलीकडे अथवा घाटावरी फिरो देणार नाहीत तमाम रयत मोडेल मार्ग सारे बंद होतील संपूर्ण रयतेचा क्षोभ होईल इतकाही फिरंगीयावरी आपण सर्व प्रकारे दूरदेखीने पाहावे राजश्री बाजीराव याचा पाया यथून बहुता प्रयासे आम्ही उखलिला होता तो तुम्हास न माने बसईचा पायबंद गोव्यास-सन्निध बसावा हेच सर्वाच्या चिती असिले तरी तेच करितो हे निश्चयात्मक जाणावे सविस्तर राजश्री नार सावंत पाठविले आहेत सांगता कलेल लोभ असावा हे विनंती आम्ही डिचोलीस आहो तुमची भेट व्हावी लागते तरी विचारून अगत्य भेटीस आले पाहिजे स्वमुखे बोलो आमचा विचार विवेक यापरता दुसरा नाही हे विनंती.

लेखांक ५९ माहे आक्टोबर इ. स. १७४०

नं. ३७३५

श्रीरामोजयती

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री
चिमणोबा स्वामी गोसावी यासी

पोष्य रामचंद्र बाबाजी कृतानेक दंडवत प्रणाम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिले पाहिजे हल्यालचे लोक उठोन आले किल्यास अपाय होतो त्याचा उपाय तेथून करावा तरी कागदपत्रास परवानगी नाही कोणी निरोप सांगेना बोलावयासी जागा नाही घात होऊ लागला तेव्हा तेथून निघोन आलो लोक समजावून लाऊन देबतो तेथील सुरलीत उतर येताच तुम्हास लिहितो अजम गोवर्नदोर याचे उतर येताच भेटीस येतो आम्ही त्याजवली आहो येसा निशा करून सांगणे आमचे हत्यार पद्यार दौलत सर्व त्याजवली आहे आम्ही त्याजवली आहो दुसरा विचार नाही पत्रे पाठविली आहेत ती ज्याची त्यास प्रविष्ट करणे मुख्य गोष्ट माहाराजाचे किल्ले माहाराजास द्यावे आणि स्नेह संपादून कीर्ति वाढवावी हे गोष्टी बहुत उतम आहे बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती.

लेखांक ६० माहे नोव्हेंबर इ. स. १७४०

नं. १४४२ हू

मलाज मेहरबा ये अतिजाद दोस्ता अजम
लुवीस आपोंस दात सकडतार जंजिरे गो
वा सलामत बाशंद

अंजी रंगाजी नारायेण सलाम बादज सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी लिहावेया कलमे मरकूम केली पाहिजे दिगर पेसजी मोहिबाकडोन किताबत विठल रखलनाथ याबराबर पाठविली व कितेक मुजबानीहि मालूम जाहाले ऐसेयास गेले वरूसापासोन कागदीपत्री लिहोन पाठविले परंत मोहिबाचे प्रत्येयास येकहि अर्थ आला

नाही म्हणाल तर पुर्ता निर्णये पत्री आला असता तर ते विशई अगाद कांहीच न्हवते हा दरभार येक रीतीचा आहे लटिक काडीइतका अंतर पडल तर मग कोणी गोष्टी आटोपणार नाही दुसरे उतरेकडील कितेक बोली व्हावी तोहि निर्बंद पुर्ता जाहाला न्हवता याच्च विचारे दिरंगाबर पडोन काहीच्च कर्तुत्व प्रत्येयास आले नाही परंत मोहिबा + केला आपले पत्रार्थ पाहिला जे प्रयोजिला कार्य जाहालेया सहसा अमान्य नाही भहुत खुशवख्त म्हणोन त्याच्च आधारे श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी यासी कितेक येकनिष्ठेचा अर्थ सांगोन मोहिबाचे मतलबास सर्वहि गोष्टीस अनकूल जाहाले आहेत उतरेकडील प्रतिबंद करावा तेव्हा जसा म्हणाल ते रीतीने व्याप होईल याविशई राजश्री नारो राम बाबा मंत्री याकड दुल्छाव करोन सर्व विशई त्याणी हा पुर्ता अभिमान धरिला आहे पैलेही हे दों राज्याच्चा तह करिता मध्यस्त तेच्च त्याच्चप्रमाणे हाली निष्ठुरवादे बोली करोन यांच्चा यामधे तिकडील काही उपसर्ग लागो नये राजश्री चिमाजी आपा मारफातीने व हरकोणा-च्याहि फौजा बारूणे आलीकडे यावयास कारण नाही येविशई थोरले श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीसी दढाव होऊन चिमाजी आपासहि साप सांगोन करवीरी पत्रेहि तेच्च रीती आली तो हटनिग्रह पाहोन रो व्यंकटराऊ नारायेण याणी आपला कारकून करवीरी हुजूर पाठविला जे सवदे संवस्थान व गोमांतक आपले श्वाधीन करून द्यावे + सर्वदेकर जो टकापैका देतात त्याहीपेक्षा आपण जाफा देवितो गोमांतक काबीज करोन हिंदुधर्म चालवितो जो आयुर्दाव होईल तो श्वामीचा यास सावकारी निशा हुंड्या करून देवितो प्रांत आपणा स्वाधिन करावा हा विचार मोठा येऊन पडला त्याविशई हुजूर भेट व कारकुनासहि खर्चवेच्च करोन संपादोन घ्यावे म्हणोन त्यास बेइलाज बोडवला मग राजश्री रामचंद्र बाबा तुमाठाई फार हेतु धरितात तसेच्च सवदेकराकडहि पूर्वारभ्य स्नेह आहे त्या अर्थी नाना येत्न प्रयेत्न करोन हुजूर समजाविसी करायाची करोन आले कारकुनास बेदिल निष्ठुवादे मागारे लाऊन दिला व परनिष्ट लिहावे तोंहे लिहोन पाठविले हाली ये प्रांतीचा कुल येख्तीयारी सर्व साहित्यानसी राजश्री रामचंद्र बाबा यासी पाठविले आहेत तसेच्च साताराहोऊनहि लिहोन आले की गडास जावोन सर्व तयारी करवावी म्हणोन असेयास आजचे प्रसंगी मोहिबियापासोन काये मतलब असेल तो साधोन सर्वांचे कल्याण करावे कितेकास मोहिबी विश्वास दिला आहे व श्वराज्यहि उपद्रवी पडिले आहे तो निर्बेद होऊन शत्रूचा निःपात व्हावा हे सर्वाविशई मनावर धरोन केल्याविना पूर्व स्तितीवर येत नाही हा सर्व अर्थ मोहिबास मालूम आहे ज्यादा लिहावे असे नाही विठल रवलनाथ यास मोहिबाकडे पाठविले आहेत ज्याहीर करिता निवेदन होईल मोहिबास आपले पन्हामधे खुदायेताला खुशाल रखो हे सलाम.

लेखांक ६१ माहे डिसेंबर इ. स. १७४०

नं. १४९३ हू

अजम दो लुविस कैतान दालमेद गोवर
नदोर जंजिरे गोवा शादकाम बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हशमत दस्तगाह अंजी रामचंद्र बावाजी बाअदज सलाम मशहूद आंकी येथील खैरियत जाणोन मोहिबी आपली खैरियत कलमी केली पाहिजे पत्र पाठविले होते त्याचा जबाब आला नाही हे गोष्ट श्नेहास उचित नव्हे आम्ही आपणास लिहिले होते त्या मवाफिक हुजूर अगर लस्करास न जाता येथे डिचोलीस आलो आहो आपण आम्हास पादशाही कौल वचन दिल्हे आहे जे माहाराजसाहेबाचा टका व तुमचे कर्ज व सिबंदी हे कानड्याकडून फारीक करून देऊ ते होत नाही तरी तुमची ठाणी तुमचे हवाला करू त्यास दाहा महिने जाले कानड्याकडून बोली निभावली नाही तरी याउपरी मऱ्हाटयाची फौज येकंदर घाटाखाले उतरो देऊ नये हे आमचे चिती आहे याकरिता आपणास लिहिले आहे तरी कानडीयास ताकीद करून मर्दनगड व सुपे ही ठाणी माहाराजाची माहाराजाचे लोक आले आहेत त्या स्वाधिन करावी म्हणजे आम्ही धरबंद करून मऱ्हाटी फौजा दोन्ही राज्यातील येकंदर घाटाखाले उतरो देत नाही तुमचा व उभयता माहाराजाचा श्नेह सारोधार चालविते पुढे आणिखी काही पादशाही कामकाज करून दाखऊन पुर्तेकालपर्यंत नांव करून घ्यावे हेहि उमेद आहे तरी मेहेरबानी करून आमची स्थले आमचे स्वाधीन करविली पाहिजेत आमचा इतबार येत नसला तरी आम्ही येक आपला आपत कबिलासहित तुम्हाजवली ठेऊन श्नेह चालऊ येणेकडून तुम्ही पादशाही वचन दिल्हे ते खरे होते उभयता माहाराजासी श्नेह होतो गोबिंदपंत अगर गैर कोण्हीहि मऱ्हाटेचे फौजेचा उपसर्ग खाली लागत नाही रयत आबादान होते मार्ग चालतात हे न होय तरी कानड्याकडे हुजूरची बाकी बहुत आहे व आमचे कर्ज सिबंदी तीन लाख रूपये या निराले बाडबिसाद हत्यारे + + सर्वहि कानड्यास सुटत नाहीत ठाणी कानड्यापासून + + उभयता माहाराज घेतात यास संदेह नाही तुम्हावरी शब्द राहातो बेइमानी व लटिकबाद मात्र पदरी येतो येसे होऊ देऊ नये आमची तुमची भेटी जाहाली असता मुलकाची खराबी दूर न होय रयतेची नांदणूक नाही तरी भेटी जाहालियाचे सार्थक काय माहाराजाची ठाणी तुम्ही घेऊन कानड्यास द्यावी आणि आलिकडील पलीकडील रयत मोडावी हे उचित नव्हे आम्ही तुमचे काडीइतके

बाईट केले नाही पुढेहि फिरंगाणचे बाईट च्याहू तरी आम्हास माहाराजांचे कदमाची सौगंद आहे यास्तव हे पत्र लिहिले आहे व अलमपन्हा पादशाही सदरेस पत्र लिहिले आहे आपणहि सारे मेलऊन बरा विचार करून उतर द्यावे जर उभयेता माहाराजाशी स्नेह धरणे असेल तरी ठाणी आमची आमचे हवाला करणे हे नाही तरी इमान बुडऊन स्नेह तोडणे तरी साफ उतर पाठवावे हे किताबत.

लेखांक ६२ ता. १५-६-१७४१

नं. २९३ हू

अजम लुईस आफोसु दांत सक
टतार दे इरताद बवाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलीसान दस्तगाह अजी सिवाजीयंत सलाम बाअदज सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपणाकडील कारनेकी मरकूम केली पाहिजे दिगर मोहिबांचा निरोप घेऊन निघालो ते तेरावे रोजी सातारेस दाखल जाहालो राजश्री बाबा मंत्री याची भेट जाहालो कितेक मोहिबाकडील मजकूर जाहीर केला त्यावरून बहुतच खुशाल जाहाले आण मोहिबाचे गुणापवाद कितेक बोलले आण सविस्तर वर्तमान माहाराज राजेश्री साबासही इस्तादाकडील ममतेच्याच गोस्टी सांगितल्या त्याबरून माहाराज साहेब बोलले जे गोवे बंदर फार उतम. नासू नये बंदर नासलेमुले साहेबास फाइदा आहे ऐसे नाही फिरंगीयासच असलेमुले फाइदाच आहे आण बंदरी चीचवस्त मिलती म्हणोन बोऊले कागदपत्र कैसे पाठविले नाही म्हणो लागले त्यावर राजश्री बाबा मंत्री याणी सांगितले कीं सिवाजी देवजीस पाठविला आहे पत्रे सविस्तर वर्तमान लेहून याजवळ दिली होती मार्गी प्रजन्य फार लागला तनमुले रात्रीचे कोठे राहिले तेथ हारपली म्हणोन सांगितले मोहिबाचे करतुत्व शाहाणपण फारसे राजश्री बावाजीसाहेबास सांगितले आण साहेबाठाई बहुत ममता धरितात म्हणोन सांगितले त्यावरून साहेबही बहुत खुशाल जाहाले बरकड राजकी वर्तमान तर फतेसिंग व रघोजी भोसले दक्षणप्रांती गेले होते त्याणी त्रिच्यनापलीचे राज्य घेतले तेथ पावणेसे हती व सात आठ हजार घोडे सापडले बरकड लूट व द्रव्य आपरमित सापडले तीन लाख प्यादा व दीड

लाख स्वार बरोबर होता फौज इकडील याकरिता राजश्री मुरारजी हिंदुराऊ घोरपडे यास तेथ ठाणेमधे ठेऊन माहाराज साहेबाच्या दर्शनास येतात बालापुराबर आले बारा रोजी सा ारा दाखल होतील राजश्री रघूजी भोसुले याची फौज बराड प्रांते गेली होती त्याणी बराडचा सुभा तीन हजार मोगल बुडविला राजश्री बालाजी बाजीराऊ मालवेमधे आहे मालवेतून तोही फिरला आहे महिनेभरे येतील राजेश्री संभाजी राजे याजकडून धारराऊ येऊन बैसले आहेत परंतु अद्याप काही बोली नाही. उमाबाई दाभाडे सातारेस आहे घरी जावेयास निरोप नाही त्यास सिदीकडील मनसुबा कबूल करू सांगतात हाली गोवलकोटास दाभाडेकडील दोन हजार स्वार व चार हजार जमाव रवाना केला आहे पुढा काये करतील ते पाहावे मोगलाकडील वर्तमान तर किलीजखान भागानगर प्रांते होता तो हाली अवरंगाबादेस येणार नासरजंग पिराच्या रोजेमधे आहे वरकड साविस्तर वर्तमान मागून लेहून पाठवितो. आम्ही येथ इस्तादादे सेवेचे ठाई तत्पर आहो सेवा घडोन मजरा होईल ते खरे सर्व वर्तमान राजश्री विठल सेणवी धुमे याचे पत्री लिहिले आहे ती जाहीर करितील त्यावरून मालूम होईल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ६३ तारीख ६-७-१७४१

नं. २२४० हू

अजम सकडतार दे इस्ताद
दाम मोहबत हू

मोहिबानपन्हाही मखलिसान दस्तगाह अंजी नाग सावत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम महबल मकसूद उंकी येथील नेकी जाणून आपणाकडील कारनेकी कलमी केली पाहिजे दिगर मोहिबाच्या किताबती पैली भिकाजीने रवाना केली ते व अलीकडे गणोजीबराबर पाठविली अैशा दोनही किताबती पोंहचोन कलमी केला मजकूर मालूम होऊन दिल आराम पावलो तेथ सारांश कलमी केल जे इज्यानेबाकडील कुल हकीकत मागील व पुढील येकबालपन्हा अजम विजुरै यास मोहिबी दखल केली म्हणोन कलमी केले तरी कोणही इजानेबाकडील मजकूर दखल करणे हे मोहिबास वाजीबच आहे आण इजानेबाचा हेत व ममसा कोणे रीतीची आहे हे आद्यंत मोहिबासच ठाऊके आहे हे हरघडी

इज्यानेबी कलमी करावे असा अर्थ नाही बहुतेका अर्थी इज्यानेबास येश यावे आणि शत्रूस सिक्षा प्राप्त व्हावी हे इच्छित आहो तो प्रसंग जेव्हा ओढवेल ते क्षणी येकबालपन्हा इज्यानेबाचा आठव करतील हा पूर्ण निशा आहे म्हणौन कलमी केले तरी ममतेचा व पुढील कर्तव्यतेचा सर्व मजकूर येकबालपन्हा अजम विजुरै यांच्या पत्रावरून इज्यानेबाच्या ध्यानास येऊन पुर्ता निशा जाहाला सध्या प्रजेनकाल सरे तव मनसबेचे दिवस नव्हेत हे तंव येथार्थच आहे येकबाल पन्हा यांच्या व मोहिबाच्या चितानरूप जो प्रसंग होईल तो लक्षून आम्ही बैसलो आहो बरकड सर्व पक्षपात येकीकडे ठेऊन येक इस्ताद थोर असे जाणौन तोम्र संनिध करून राहिलो हा लौकीक विख्यात होऊन गेला आहे याची इरे अभिमान इस्तादास असल म्हणजे जाहाले येचविशी शत्रूस असाध्य होऊन अनेक प्रकारे मायावी रूपे चालणेस चुकणार नाहीत तरी ते गोष्टीस तुमची दृढता इज्यनिबाविशी असावी सूचनार्थ लिहिला असे इज्यानेबाकडील सभ्य कारकून पाठवणार म्हणौन पूर्वपत्री लिहिले होते त्यास मोहिबी लिहिले जे प्रस्तुत प्रजेनकाल आहे प्रस्तुत हरकोणहि मनसबेचे हंगाम नव्हे तो हंगाम होई तो दृढनिश्चये असावे म्हणोन लिहिले तरी त्वरित मनसबा व्हावा याच अर्थे कारकून पाठवावे ऐशा अर्थे लिहिली नव्हते मनसबा हंगामशीर तुमच्या चितानरूप होईल तेव्हा होऊ परंतु कारकून पाठवणेचे जरूर जे इस्तादाकडील कितेक कार्याचे मजकूर व राजकी व स्वकी हे कलवावे लागते पत्री लिहिता न ये अशा कितेक गोष्टी आहेत त्या कलऊन त्यासारिखी आगोदर पैरवी व्हावी लागते याकरिता कारकून पाठवणे जरूर असे तरी येकबालपन्हा यास दखल करून जबाब येईल त्यासारिखा रवाना करून देवऊ. बरघाटचे वर्तमान तर उभयता राजे आपापुल्या ठिकाणी आहेत अजम फतेसिंग व अजम रघोजी भोसले चंदीचे मसलतीस गेले होते ते आगोटीस येऊस आले त्यास थोरले माहाराजानी परभारे आज्ञा केली जे कासेगाव व सांगोले ही मोगलाई ठिकाणे आहेत ही स्थले हस्तगत करून मग भेटीस येणे म्हणौन ते मसलतीवर नेमले आहेत असे वर्तमान आहे अजम बाजीराऊ याचे पुत्र दिल्ली प्रांते गेले होते तिकडील मसलत सुरू करून माघारे आपले ठिकाणास येत आहेत येक दिवसांत पोंहचतील इज्यानेबाकडील माणसे बातमीस गेली आहेत आल्यानंतर तहकीक सविस्तर लिहिले जाईल हरयेक बातमी अढल जाहाली आपणास कलावी हे इज्यानेबास जरूर आहे अजम हिंदुराऊ घोरपडे जालेहाल प्रांते छावणीस आहेत बरकड प्रस्तुत काली आपापुले जागा स्वस्त आहेत गणोजी पाठविला आहे

यास उतरे देऊन सत्वर रवाना करवीजे जियादा काय लिहिणे प्यार असो दीजे हे किताबत.

ताजा कलम किताबत लिहून तयार केली रवाना करावी तंव आज सोमवारी बर्तमान परस्पर येकतो जे बाडीकराचे व इस्तादाचे सख्य होते बोली लागली आहे म्हणौन तर हे गोष्ट इज्यानेबास येकंदर करार दिसत नाही कां म्हणाल तर येकबालपन्हा अजमखारिखे साभिमानी थोर मोहरे इरीस येऊन शत्रूनी केल्या कर्माचा विसर पडोन त्यासी सख्य करितील हे गोष्ट अजब आहे शत्रूनी केले कर्म तुमच्या मुखांतरे येकीबोलपन्हा यांहीं आयकिले व तुम्हास तंव त्याचा स्वत सिध अनुभव आलाच आहे इज्यानेबा आपल्या मतलबाकरिता लिहितात असे वाटेल तर पेसजी अनुभव येऊन गेलाच आहे व पेस्तरहि कलो येईल येखलासीचे जागा सुचले बर्तमान पूर्वपत्री लिहीत गेलो व हलीहि लिहिले आहे याबर आपण विवेकी आहा जवाब लवकर पाठवीजे.

लेखांक ६४ तारीख २६-११-१७४१

नं. ३७६ श्री

राजश्रिया विराजित राजमांन्य
राजश्री बिट सेणवी धुमें गोसावी यास

सेवक बालाजी देवजी कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल कार्तिक बहुल चवदा मुा सातारा जाणऊन स्वानंद लिहिले पाहिजे यानंतर गोसावी यांची आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते आश्विन सुध पुर्णीमेस येथे पावलो सुमुहुर्ते येज्यमानांची व श्रीमंत बाबाच्या भेटी घेतल्या बरकड राजकी वर्तमान तरी करवीरवासी माहाराज याचे आगमन येथे होणार आहे निमित्य जे कागलकर व राणोजी घोरपडा व इत्यादिक याणी आपले जिलेत बहुत उपद्रव दिला सोंधेकर व इत्यादि संस्थानकरी मवास जाले याचे पारपत्य व्हावे याकरिता फौज मागोन घ्यावी म्हणऊन येणार आहेत पुढा काये होईल पाहावे आढळ जाले बर्तमान लिहिले आहे याउपरी जे बर्तमान द्रिस्टीस पडेल ते मागून लिहून पाठवितो लोभ आसो दीजे हे विनंती

लेखांक ६५

माहे आक्टोबर इ. स. १७४२
नंतर

नं. ४३१

हू

जनेराल तो

अजम

बारदेश दाम मोहबत हू

मोहिबानपनाहि मखलिसान दस्तगाः अजी रंगाजी नारायण सलाम येथील नेकी जाणऊन मोहिबी आपली कारनेकी कलमे केले पाहिजे दिगर मोहिबी किताबत पाठविली व इजतअसार ये साहेबियाकडे सांगोन बहुत बजा पाठविलेवरून बहुत खुशाल जाहालो कलमे केले जे अजम याणी मर्दानगड घेतला तो आपले धणियाचे हुकुमा-प्रमाणे आणि अजम आणाजी बाबाजीस माहाराज स्वामीची आज्ञा ठाणी घेऊन आहे हरदू तरफा तफावत आली तर आरफाइने हर कोणही विशाद दूर होय ते करावे भोसुले अगर पोख्ती फौज आणावयास पाहिजे म्हणतात असे गैरविस्वास मानावयाचे बाजीब नव्हे अजम आणाजी बाबाजी व संस्थानमधे कजिया असेल तर येकबालपन्हा सियोर मार्केज विजुरै दरम्याने होऊन बाराबा असे मोहिबी इजानेबाजबली करार केले प्रांत मर्दानगड संस्थाना ताबीन असला तर त्याचे फारसे नाही येकबालपन्हा सियोर विजुरै याचे रास्ती नीति निकालाने माहाराज स्वामीस संतोष होऊन व अजम आणाजी बाबाजीस व मोहिबास मान्य होऊन आमचाहि मुलुक निचिंत होईल याकरिता दुतर्फा स्नेह बनाव करावा आणि कारकून दूतर्फेचे येथे आलेनंतर इछिले येशप्राप्ती पाऊन सरे तो अमल चालवितील व इजानेबा बाजीब सांगतील म्हणोन कलमे केले तर माहाराज स्वामीनी आंकोले ता फोंड माहाल इजारा दिला आलीकड इजारेप्रमाणे पैकाही पावत नाही आणि अजम व्यंकटराव हादीस आले तेव्हा राज्याची बेपरबा करून ठाणीहि गमाविली त्यामुले इस्तादाचे संस्था-नासही किती उपद्रव जाहाला नी त्याणी सिवेश्वर सांबराण ता मुलुकाची नासाड आजी तीन बरूसे होत होती यास कोणता उपाय करून पुन्हा घेतली गुंल्यात होता त्यास काये बंद केला होता बरे तेहि असो ठाणी मुलूक माहाराजाचा इजारेस दिला हे जगज्याहीर आहे समाधानी जे होईल ते आपखुदीने होईल ते नसता आजी तीन बरूसे श्रमसायास केवडा दर जागाचा प्रतिबंद कैसा सबल म्हणायास आजचे प्रसंगी बाजीराव हे सर्वास दखल आहे त्याकडील ठाणी घ्यावयास सज्य कोण आहे हे मोहिबास समजलेच आहे असा प्रयास केवडी मेहनत अगर कोण आटाश जाहाला किती जणाचा वेद लागला होता दरभरास किती-येक रीतीने पैगाम होता सर्व संभाळून वेचखर्चाचे साहित्य जेसे टाकले तेणेप्रमाणे करून

जमाव रजावंद राखून ठाणी सोडवीत आले मर्दानगड मात्र राहिला साहित्य नाही तेव्हा मोहिबाची भेट जाहाली मोहिबीही युक्ती प्रयुक्ती बुधीवाद सांगितले व पुढे भरवशाही दृढ दिला त्या अंगेजावरून चौकोनी मोर्चेबंदी करून पाणी धरावयास लाविले राज्यातील लोक बेइमानीस सापडले गड फते व्हावा दोनी लक्षाचा माहाल बरता माहाराजाचा आहे गड कौलास यावा त्यास मधे फितवा करून माहाराज स्वामीची मुद्रा हलसडी करून मधेच गडचे नाइकवाडी यास पैका देऊन गडावर लोक चडविले माहाराज स्वामीची निशाण न होता आपले निशाण चडवून आपणच किलेमधे जाऊन तोफा मारिले काडीमात्र कलो दिले नाही तेव्हा दो राज्याहीपेक्षा आजचे समयास हे सबल जाहाले असे दर्शविले तेव्हा इरे कैसी जाहाली हे वर्तमान हुजूर कलताच अनर्थ होत आहे हेहि मोहिबास कलू येईल व मोहिबाचे खातिरेस तर कैसे आले येके इरेसाठी जीवजंतु मात्र प्रयास करीत आहे नीति सोडून अविचारे वर्तलेया आपापुले सामर्थानुरूप करतीलच हे गोस्टीचे दीर्घसे नाही लाख स्वार ज्याचे पदरी दावा तर दिलीचे पादशाईसी खजीना तर गणणाच नाही सामर्थ तर सर्व दाखलच आहे अशाकडील श्रीमंत राजेनी आणाजी बाबाजी पांचानसी येऊन नाही खर्च नाही दारूगोला फौज नसता ठाणी सोडविली आता मर्दानगडाचा विचार ये जिनसी घडून आला हे आमस्ताचे खातिरेस आले येसे जाहालेया बोली जबरदस्ती करून किंवा श्रीमंतावर हाला कोण करणार ते करूत आण आपला परिणाम लाऊन घेऊत तुमचे अगत्यच धरून साहित्य करणार तेहि करूत आता बहुजिनसी सांगणार मिलाले आहेत व राजकारणे करतात परंतु येवडहि धराबंद व कर्तुत्वास कोण निघाला नाही बैसले जागा ईश्वरे समस्तास येश दिले अमित्राचा उछेद जाहाला रामराज्य होऊन गोरगरीब आपापुले ठाई सुखरूप आसोन पुडील कितेक महद कार्याचे प्रसंग होते तेही येकीकडे राहून फिरून पुन्हा हर्षामर्ष बाडला यामुले उदंड नासाड होत आहे इजानेबाकडील मजकूर म्हणाल तर जे सांगणे ते सविस्तर मोहिबास सांगितलेच होते आज च्यार बरूसे श्रमसाहास करून येथवर आले याउपर इजानेबाने सांगावे व करावे तर जिकडून द्वेशच बाहातात प्रस्तुत इजानेबा काही कोणाचे आर्जव्यास जात नाही अजम अंतोन कार्नेल व अजम अंतोन काडदीन याही कितेक जिनस बोलून हे कार्य केले होते तेप्रमाणे होऊन सर्व निबंद जाहाले केलेप्रो हा काल पर्यंत कोणी गोस्टीचा उपद्रव इस्तादाचे मारफातीज लागो दिला नाही व पुढेहि काडीमात्र लागणार नाही दरम्याने मोहिबास कितेक मजकूर मालूम करावा त्यास इस्तादास सांगता सांगितले व लिहिलेहि आहे म्हणे जे आंकोला ता ध्यावे साष्टी माराबी गोवेचा खंड घ्यावा येसे इजानेबा करीत आहे म्हणोन तेव्हा आपले कार्यासाठी मनस्वी

बोलिलेया मोहिबाखारिखे परिक्षा करणार करतीलच आधी पश्चातर कोण कोणाकडून काये जाहाले हेहि सर्व ज्याहीर आहे यैसीयास मोहिबाचा खातरनिशा जर असिला तर येथील फोंड प्रांताचा बंद करून कानड्याही हुजूरचे आज्ञेने वर्तावे तेही मोहिबाचे विद्यमाने करू येईल परंत मर्दनगडापासोन सारा बखेडा होऊन पुन्हा होणार ते होत आहे आजचे प्रसंगी हा मनसुबा मोहिब मनावर घेऊन मर्दनगड माहाराज स्वामी खाली करवून चिंताखारिखे केलेने माहाराज सर्व प्रकारे मोहिबाचे लगामी लागतात आणि मोठे येश मोहिबास येऊन येकबालपन्हा मार्केज विजुरै याचा मनोधर्म सिधीस जात आहे हे पूर्ण खातिरेस आणावे हे इजानीबानी कलमी केले म्हणऊनच न जावे मोहिबी आपले तजविजेस आणून करार करावा यांमधे संदेह जो असेल तो विस्वास करून देऊस दरम्याने देऊन निशा करून देऊ जर यापासून पुडेमागा इस्तादाचे जागा बेइमानकी होईल तर जे मोहिब फर्मावतील त्याप्रमाणे खातिरेस आणून देऊ दरम्याने आपले मतलबाखारिखे सांगतील त्यावर न जावे येणेकरून सर्व कल्याण होत आहे असे निधान कसून लिहिले आहे सविस्तर इजतइखार येस सेणवी सांगता मालूम होईल आणि ठाणी घेतली त्याची बंदस्ती व्हावी याबदल दारूगोले पाहिजे करिता मोहिबास श्रुत केले होते देतो म्हणऊन सांगितले परंत अजोन पोहचली नाहीत त्याची बेगमी करून इजतइखार येस सेणवी याकडे देविले पाहिजे त्याचे पैके व पैले पैकेचा कतबा करून देवितो बरकड किरकोल मकसूद ज्याहीर केले त्याची पिछावे करून देणार त्यावर टंक घेऊन दिले पाहिजे येणे करून इजानेबाचा अभिमान आहे यैसे होते येणेकरून बहुत काम दुतर्फा आहे इजानेबा मोहिबाखेरीज नाही मोहिबाची जाब येई तव स्वस्त आहू हातीचा बाण जाई तव कोणी तजवीज बाण सुटलेनंतर इलाज नाही लौकीक विचार जे पैका नाही अडचणार मग चिंताखारिखे होणार म्हणऊन तर आज तीन वरूखे पैका कोणी काये दिला कानड याही आज ता पनरा हजार रूा तोफेचे यैवजी दिले आणिक काही नाही याकरिता सर्व मोहिबाचे उभारावर येऊन जाणेची वाट पाहात आहू याविखी हरघडी मोहिबी लिहावे यैसे नाही याची जाब देविली पाहिजे प्यार मोहबती असो दिले पाहिजे हे किताबत.

लेखांक ६६ इ. स. १७४२

नं. २५७२ हू

अजम लुवीस आपोसदा व सकूडतार
जंजिरे गोवा शादकाम बाशंद

महबत व मुबदतपनाह रफअत व अवाली दस्तगाह अंजी रामचंद्र बाबाजी बाआदज सलाम मशहूद आंकी येथील खैरीयत जाणोन मोहिबी आपली खैरीयत कलमी केली पाहिजे इजअसार मा सेणवी यासमागमे खत पाठविले ते पोहचले लिहिला मजकूर जाहीर जाला व जबानीही बयाबार कलो आले मोहिबी अजी दोन वरषे पर्यंत दोस्ती राबिता इजानीबासी धरिला परंतु कांही साहयता दिलामबाफिक केली नाही हली कितेक मजकूर सांगोन पाठविला तरी इजानीबा मोहिबाखिबाय नाही मोहिबी माहाराज साहेबांची मर्जी राहे मुकदमान फैसल होऊन मोहिबाची इजानेबाची दोस्ती चाले ते करणे सोंधे संस्थानकर याणी च्यार पाच साला हुजूरचा टका दिल्हा नाही दोन वर्षे मसलत होते याचा खर्चवेच दिल्हा नाही सांबराणीचे प्रसंगी लस्करची बोलीचाली केली ते बाकी दिल्ही नाही सर्व दगाबाजीने वर्तले ते इजतअसार यांसही दखल आहे ते व आम्ही लिहितो त्या जाब यत नाही माणूस फिरोन यत नाही येशा त्याचा मजकूर नारो चिमणाजीने तो भोसलेच्या पाचसे जमाव माचीस घेतला आपले खावंदाच्या चिस्या मानीत नाही तुम्ही इजानेबाचीहि हुकूम करीत नाही इजानीबास तो मोहिबाची दोस्ती जरूर आहे तरी मोहिबी दूरंदेशींने जे करावयाचे ते केले पाहिजे त्यांत इजानेबा रजाबंद असो मुफसील मा सेणवी सांगता जाहीर होईल जियादा काय लिहिणे हे किताबेत.

लेखांक ६७ तारीख १-२-१७४३

नं. २३

अजम कोंदी दे सांदोमील वि
जरे गोमा दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मखलीसान दस्तगाहा अंजी हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार सलाम महबल मकसूद आंकी येथील खुसी जाणोन आपली नेकी कलमी करून दिल ताजा करीत गेले पाहिजे दरिविला मादौल्त रामचंद्र बाबाजी यास मोहिबी नेऊन ठेविले आहेत त्यास रजा देऊन पाठवणे म्हणोन पेशजी दोन च्यार भर्तबे माहाराजानी कलमी केल्या समजोन रजा देऊन पाठविल नाही आशास हाली माहाराजाची खासा स्वारी या प्रांते जाली आहे हमराह पंचवीस हजार स्वारानसी सोंधेकराचे सरहदेबरी मुकाम जाहला आहे तरी खत देखताच मारनिलेस साहित्यानसी रवानगी करणे सोंधेकराचे पारवत्य समर्पक करावे लागते त्यास तुम्हीही साहित्यानसी सामील होऊन तुमचा मातबर मा। रामचंद्र बाबाजी हमराह देऊन पाठवणे हे बात न होये तर सोंधेकराच्या पारपत्याबद्दल घाटाखाली उतरावे लागेल त्याच्या मुलकात आमदनी जाल्यावर तुमच्या मुलकास दरज लागेल असे येकीन समजोन मारनिलेस जलदीने रवाना करणे ते येथे आल्याबर मोहिबाकडील बोलाचालीचा मजकूर सुदामद बमोजीब करून देविला जाईल मारनिलेस मातबर सुधा आलबता रवानगी करणे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ६८ माहे फेब्रुवारी इ. स. १७४३

नं. २०९४ अ

लुबीस अफोंसदात सकटतार
दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मखलीसान दस्तगाहा अंजी हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार सलाम महबल मकसूद आकी येथील खुसी जाणोन आपली नेकी कलमी करणे दिगर मादौलत रामचंद्र बाबाजी यास अटकाविले त्याची सुटका करवणे म्हणोन

माहाराजानी इजानेबास हुकूम केला आंहे तरी मोहिबी विजरई यास सांगोन मारनिलेस सोडोन पाठविणे मारनिलेची सुटका करणे जरूर याबास्ते भारी फौजेनिसी त्या जिल्हेस येत आहो तरी मारनिलेस खामखा सोडोन पाठवून देणे जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ६९ तारीख २४-१-१७४५

नं. ३०८ श्री

राजश्रिया विराजीत राजमान्य राज
श्री विट सेणवी धुमे स्वामी गोा यास

सेवक भास्करराऊ दादाजी कृतानेक नमस्कार विनंती उपर येथील कुशल ताा छ १ मोहरम पर्यंत ईश्वरकृपे येथास्तित जाणोन स्वकीये लेखन संतोषविले पाहिजे यानंतर तुम्हाकडील वृत आलीकड न कलता चित सापेक्षित समई राजश्री केसोपंत यासमागमे पत्राची प्रतिउतरे पाठविली पावोन अक्षरशा भावार्थ कलोन बहुत हर्ष जाहला याचा अन्वय सदैव पत्रद्वारे दर्शनाचा लाभ दिल्हा पाहिजे विसेश अमारतमाहा मारकेज विजुरै व आजम सकटतार याची पत्रे सामोचारे आली ती प्रविष्ट होऊन बहुत हर्ष जाहाला कैलासवासी बडिलानी सर्वाच्या स्नेहापेक्षा इंदीचा स्नेह विशेशात्कारे जोडिला आहे फिरंगी लोक सजन बचनाचे खरे क्रियेचे पुरे स्नेहास बरे मर्दुमीस धुरंधर त्याचे उपमेस पृथ्वीवर कोण आहे असे कैलासवासी बडील आम्हास पदोपदी सांगत होते ती गोष्ट आमच्या निदर्शनास आली स्नेहास घरोबेस फिरंगी लोकासारिखे अन्यत्र कोण्ही नाही बडील दादांचे जागा उभयेता असता काये फिकीर आहे बडिलानी आपल्या मागे आम्हास ईदीच्या स्नेहाची जोडी करून व आपणासारख मित्रवर्य साहकारी करून गेले आहेत त्याचे जागा तुम्हीच आहा ईदीच्या स्नेहास तुम्ही तेथ असता पहिल्यापेक्षा किंबहुना अधिकच करून दाखवाल हा चिताचा निशा आहे इकडील राजकी प्रसंग अमारतमाहा निजामनमुलुक पनास हजार फौजेनसी कलबुर्गेवर आहेत विजापुरास यावेसे बदंता आहे यास्तव माहाराजानी श्रीमंत नानास आपणासनिध ठेऊन घेतले आहे मुलुक-

गिरीस जावयास निरोप दिला नाही राजेश्री बापोजी नाईक यासही कालपर्यंत निरोप जाहाला नव्हता सांप्रत दक्षणप्रांते जावयास पंचवीस तीस हजार फौजेनसी मिरजेस आले फौजेचा जथ पडायास आणखी आठ च्यार रोज लागतील सत्वरच या प्रांते येणार आम्हासही पत्रावर पत्रे आम्हास आली आम्ही जावयाची सिधता केली होती इतकियात करवीरवासी माहाराज तोरगलेच्या मनसबेकरिता राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यासह येऊन मनोलीकरास नतीजा देऊन तोरगल मनोलीकराचा पूर्ववतप्रो विवेक करून दिल्हा आम्हास दर्शनानिमित्य बोलाऊ पाठविले होते माहाराजाच्या दर्शनानिमित्य च्यार दिवस अवकाश जाहाला याउपरी अविलंबेच नाईकाकडे जावयास गेलो याउपरी नाईकाच्या आगमनास अवकाश नाही सत्वरेच येत आहेत तुम्हा कलावे यास्तव लिहिले असे येताच मनसबेचा डोल पाहून तुम्हास व मोहिंबास लिहून पाठवितो सूचना करायाची आगोदरच केली आहे तुम्ही लोक युक्तीस चुकतासे नाही अजम अबदूल मजीदखान नवाब या प्रांताचा मनसबा करून नदीपार होऊन हरपनहलीकडे गेले होते रा नाईकाची आवाई आईकोन तेथील खंडणी स्वल्पावरच उरकून मजल दरमजल लक्ष्मेश्वर प्रांते कोन्चीगरेवर येऊन मोकाम केला आहे लौकरच ठिकाणास येणार राजश्री मुराराव व आरकाट कडपे कर्नोलचे सुभे येकत्र होऊन राजश्री नाईक नदीपार होताच सन्मुख यावे या येचनेत आहेत नाईकानी येखादी भारी फौज नामेदार ठेविली आहे दक्षणप्रांतचा तह पलीकडले सालाप्रो सात लाख रूावर उरकून देतो म्हणोन निजामनमुलुक याणी मातबर पाठविले होते परंतु नाइकानी मान्य केले नाही याची धमक विशेषावर आहे घडेल ते प्रमाण करवीरस्त माहाराज तोरगली राहिले हिंदुराव मुधोल प्रांते गेले कलावे सोंधेकराचा हेजीब माहाराजाकड तोरगलेस आला असे वरकड नवल विशेष जाहलेले मागाहून लिहून पाठवितो अमारतमाहा यास व अजम सकटतार यास पत्रे देऊन मार्गाहून राजश्री केसोपंतास रवाना करितो कलले पाहिजे सदैव तुम्हाकडील लिहित जाणे बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक ७० माहे डिसेंबर इ. स. १७४६

नं. १५१ हू

अजम मार्केश द केर्ण विजरई वे
इंदी दवाम मोहबत हू

येकबाल वैजलालपनाह शौकत हिसमत दस्तगाह अंजी घनश्याम पंडित मंत्री सलाम महबल मकसूद आंकी येथील खुशी जाणून खुद खुसी कलमी मरकूम करीत जाणे दिगर चंद रोज गुदरले खत किताबत रसीद होऊन दिल ताजगी होत नाही दुतर्फा येगानगीस बाजीब नाही हमेशा खुद खुसी मरकुम करून शादमानी हासील करीत गेले पाहिजे येथील कितेक मजकूर अजम दोंतोन फिरंगी यास सांगितला त्याणी मोहिबास कितीबात मरकुम करून जाहीर केलाच्च असेल इजानेबास मोहिबा-कडील खुशबख्तीची तर्की व्हावी याबादज दुसरे च्याहत नाही त्यामवाफिक साहि-त्यासही तफावत होत नाही हा मजकूर हरघडी कलमी करून जाहीर करावा तरी तरफेन जुदाई नाही हाली माहाराज राजश्री संभाजी राजे याणी तिकडील प्रांतीचा जिल्हा राजश्री बालाजी पंडित प्रधान याजकडे देऊन बंदोबस्त करावा हे तर मुदे-मधें आहेत याच्याही चिती तिकडील अमल आपण करावा हे अगत्य याबदल बोली करारबाके देणे त्याची मुशकस जाहाली बाजद बरसात फौज येऊन अमल करावा ऐसा करार जाहाला हे खबर मोहिबास जाहीर व्हावी येबाबे कितेक मजकूर सांगणे तो दोंतोन फिरंगी यास सांगितला आहे ते कलमी करितील तो मजकूर खातेरस आणून जबाब मुफसल कलमी करून पाठविला पाहिजे इजानेबास मोहिबाचे खातर दास्तेचे जरूर त्या मवाफिक मोहिबास जे उतम ते करावे हमेशा खत मरकुम करून दिल आराम करीत गेले पाहिजे हे किताबत

नं. ७ हू

इलाही

अजम अकरम दों लुवीस कैतान
दे आलमेद गोर्वर्नदोर दा इंदी
बार मसनद हुकुमत मुतालाकी वा
शंद

अमारत व अयालतपन्हा हिसमत ब शौकत दस्तगाहा अंजी दिल येखलास पांडुरंग विश्राम सलाम बादज सलाम बनजर जाणोन अमारतपन्हाही खैरखुसी कलमे करावया रजा फर्माविली पाहिजे महबल मकसूद ऊंकी सध्या मालवणकरी याचे आरमार तुळाजी आंगरे याच्या आरमाराने धरून नेहले याकरिता सिवाजीपंत याही राजश्रीस लिहिले जे माहाराज राजश्री छत्रपति याचे आरमार तुळाजी आंगराही चाकरच असोन त्याणे बेइमानी केली याकरिता तुम्ही व आम्ही सर्व साहित्यानसी मिलोन आंगरे यास खामखा नतीजा द्यावा म्हणोन आग्रहे करोन सांगोन पाठविलेवरून राजश्रीनी श्वार व जमाऊ कुली मालवणास रवाना केला आहे मालवणचेहि साहित्य होतच आहे पुढा आंगरे याच्या मुलुक व ठाणी घेऊन नतीजा पोहचवावा तर हा मनसबा मागापासून इस्तादासही अवशक होते त्यास हाली त्याचा प्रसंग आला आहे मागापासून राजश्रीचे चिती हा मनसबा करावा होता परंतु निमित्य नहवते त्यास हाली माहाराजाचे साहित्य होऊन आपलेहि कार्ये होते याकरिता अविलंबावे लागले तर राजश्री तर्फेने या मनसबेस अगाध आहे असे नाही आण इस्तादातर्फेने आंगरे यास नतीजा द्यावा राजश्री कडेस आपले साहित्य करावे येसे इस्तादाकडून होऊन येते किंवा नाही हे समजोन हुजूर येणेविसी आज्ञा आली आहे याकरिता राजश्री नारायणभट पेटकर यास रवाना केले आहेत याचे उतर येईल त्यासारिखा विचार करावा लागेल इजानेबाही हे समजोन सत्वर वाडीस जाणार आहेत ज्यादा काये लिहावे मेहरबानी असावी हे किताबत.

लेखांक ७२ तारीख ४-४-१७४८ सुमारे

नं. १७५ + + +

तार बंदर गोवा दाम मो हू

शाहमत व जलादतपन्हा बादज शौक मशहूद आंकी बंदगान संभाजी माहाराज याजकडील तहबरपन्हा अर्जोजी यादव यास कोणी जहर चालविले आहे त्या अजाराने मारनिले बहुतच बेमार असेत जहर काढी ऐसा तबीब या प्रांते कोणी नाही आशाहामतपन्हा नजीक बिलायेती व पुर्तकाली तबीब फामिदे बहुत असतील व जहर काढावयाची हिकमतही जाणत असतीलच तरी आशाहामतपन्हानी अलबता येक तबीब पाठविला पाहिजे मारनिले दानाव व मातबर माणोस आहेत इजानेबास याचे जरूर असे अर्जीने खत कलमी केले असे तरी खामखा तबीब पाठविला पाहिजे रा छ १६ रबिलोखर जियादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ७३ तारीख १३-११-१७४८

नं. ३८९९ श्री

श्रीमतु सकलगुणसंपन्न राज्य

राजश्री लक्षुमण सेणवी रीगे कृष्णरायेर आसीर्वाद विमते संवछर मार्गसीर सुा ४ थीं जाणोन स्वकुशल लेखन करणे यानंतर बेलगावाहून तामुल सा सेणवी आज आला हरीपंत व राणोजी घोरपडे ऐसे हजार स्वारानसी येऊन गंधर्वगड घेतला मागूऊन तीन हजार स्वार राणोजी घोरपडेचे येणार व जयराम सांवत हेऱ्यास येऊन पावला सवनूर नवाब बेलगावाहून तीन गावांवर येऊन मुकाम जाहाला आहे म्हणोन सांगितले हरीपंत आला नाही म्हणोन अजम सकडतार याणी लिहिले होते ऐसीयासी निध + + आला आणि गंधर्वगड घेतला हे तहकीक वर्तमान म्हणोन अजम सकडतार यासी सांगावे हरीपंत आला म्हणावयाचे तहकीक परत गंधर्वगड घेतला हे तहकीक म्हणोन अजमास सांगावे व येक राहुटी क्रयास मिळेल तर मनास आणावी मागा रेडी मोहिमेंत गोवेमध्ये केल्या होत्या मनास आणून क्रयास मिळेल तर मनास आणून येणे जाणीजे.

लेखांक ७४ तारीख २-७-१७५१

नं. ५३

अजम लुईस अफांसदात सकड
तार दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मखलीशान दस्तगाहा अजी दिल येखलास भास्करराऊ सलाम खेर अज्याम सलाह बनजर जाणून कारनेकी कलमी करीत गेले पाहिजे दरिअयाम महबल मकसूद आंकी दिगर बहुत रोज मोहिबाकडून किताबत येऊन खबर मालूम होत नाही हे बात अश्नाई जागा वाजीब नसे हरघडीघडी किताबत पाठऊन अश्नाइची वृधी केली पाहिजे इकडील राजकी वृत माहाराज संभू छत्रपति याकडून कृष्णे आलीकडील जिल्हे शाहामतपन्हा सदासिवपंत याणी करून घेतले हे प्रांते सदासिब पंडत याची मोहिम होणार होती त्यास नासरजंग निजामनमुल्क हक पावले याकरिता अवरंगाबादे बुराणपूर भागानगर हे प्रांत मोहीम करून मुलकाची बंदोबस्त करून पोक्ता टका मेलवावा याकारिता पंतप्रधान व सदासिब पंडत उभयेता लक्ष फौजेनसी मोहिमेस गेले ताराबाहेबामध्ये व पंतप्रधान यामध्ये विपरयास आला त्यास सातारेस फौजा ठेवावयाच्या ठेऊन पंतप्रधान उभयेता मोहिमेस जावयासी अदवानी प्रांते गेले तब पंतप्रधानास बातमी गेली तेव्हा पंतप्रधान फौजसुधा सातारेस आले सातारेस ताराबाहेबाचे कुमकेस दाभाडी व दमाजी गायेकवाड दाहा पंधरा हजार फौजेनसी आले होते त्यात व पंतप्रधान यात लडाई जाहाली दाभाडीस व दमाजी गायेकवाड यास कैद करून पुरंधराबर ठेविले पंतप्रधान उभयेता पुणेस जावयास गेले शामतपन्हा मुराराव घोरपडे बजारतमाब याची व पंतप्रधान याची मुलाजमत जाहाली पंतप्रधान याणी दोन कोडी रूपय मिलविल हे मुलुकगिरी सुरू करून मकानेस दाखल जाहाले इजानेबा बरोबर होतो रजा घेऊन नरगुंदास दाखल जाहालो हे कुली हकीकत यकबालपन्हा + विजुरे यास व मोहिबास मालुम होणेबदल कलमी केले असे दसरा करून पंतप्रधान संभाजी माहाराजाची मुलाजमत घेऊन सोंधे बिदनूर सवणूरप्रांते मोहिमेस येणार अशी आवई आहे ताराबाहेबाचा व पंतप्रधान याचा विवेक होणार आहे मातबर येत जात असतात मालूम होब छ १९ माहे शाबान ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत राखणे हे किताबत.

लेखांक ७५ पैवस्ती तारीख ७-१-१७५४

नं. ६४२ श्री

पैवस्ता पौश सुा १३ दसी रविवार

राजश्रिया विराजित राजमान्ये

राजश्री गोपाल बाबा व धुमे स्वामी

गोसावी यासी

सेवक रामाजी रवलनाथ आजिरेकर कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असावे यानंतर दोन तीन पत्रे पाठविली परंतु त्याचे उतर एकहि न पाठविल की निमित्य न कले तर यैसे न करिता सर्वदा पत्री परामृश घेत असावे चिरंजीव तेथे आहे त्याचा तो परामृश घेतच आहा त्यावे येसे नाही इकडील वर्तमान म्हणावे तर श्रीमंत पेसवे इचलकरंजीनजीक फोऊजसुदा आले आहेत करवीरास येणार श्रीमंताची व म्हाराजाची भेटी होणार येसे बदंता आहे काये घडेल ते वर्तमान मागाहून लिहून पाठवितो पंचम्हालात जाणार येसी बदंता आहे कलावे करिता लिहिले बहुत काय लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विनंती

ह्या समस्त मंडलीस नमस्कार लिखितार्थ प्रसोन लोभ करीत असावे कृपा कीजे हे विनंती.

लेखांक ७६ माहे जानेवारी इ. स. १७५४

नं. १६१४

अजम सकटतार जंजिरे गोवा

दाम मोहबत हू

दोस्तां मुखलीसान अंजी मुलमं-

जीलत अंजी दिल येखलास हरी राम

सलाम सलामत अजाम येथील नेकी जाणून मोहिबी आपली कारनेकी कलमी केली पाहिजे दरी आयाम बहुत रोज मोहिबातर्फेने खत किताबत येऊन दिल ताजा होत

नाही हे येखलाशी जागा मुनाशीब न्हवे हरघडी आपलेतर्फेची खुशवख्ती निविस्तन कराबी-दरीविला इजानेबाकडील बगैरे हकीकत तर साहेब की हक दौलती येकबाल पेशवे साहेब याणी खुब दिन पाहून डेरे बाहीर दिले आहेत चंद रोजात फौज या जिलेस येत आहे फोंडे पंचमाहाल व डिचोली बगैरे येथील सुभेच्या सनदा देऊन सुभेदार पाठविले असेत इंदी गोवेंचे विजरैशी इफ्तीदायेपासून घरोबा कइयेक मनसबेचा मजकूर मोहिबाचे माने होणे लागतात यावर ते मा सोइरो कृष्ण यास मजकूर तफसिले सांगणे ते सांगोन पाठविले असेत मारनिले मुफसल जाहीर करिता आया होईल बादाज विजरैची मुलाकात करवून मनसबा सर होऊन यखलाशी दुचंद होई ते बात करावया आकील असा कार्यें भाग हरखबीक होईल अया मोहिबाचे मारफातीने येक दिल होऊन सार जाहालिया बहुत करून च्याहत आहो खातिरेस आणून आरफाई समाजोन मनसबेस सुस्ती न होई ते कीजे ज्यादा लिहिणे बाजीत नाही जमीदार याकडेस बतनी बाबपैकी ताकीद करऊन खर्चास देविले प्रो पावीत करवणे ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ७७ माहे जानेवारी इ. स. १७५७

(पहिला बंद गहाळ)

नं. ६८६ (अ) २

राजश्री रावजी बोलिले जे संशये असलिया डिचोली हलरणावरून त्याच मार्गे जायाचे काये प्रयोजन आहे म्हणून खानापुरचे मार्गे आले आम्ही व राजश्री दादाजीपंत याणी याच मोकामीहून निरोप घेतला दोचौ रोजी फोंडेस येतो श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेब श्रीरंगपटणास गेले बरोबर राजेश्री मुरारराब घोरपडे आहेत चिकोडीकर येमाणा व बेलगावचा किलेदार श्रीमंताचे भेटीस गेले होते चिकोडीकर याचे विद्यमाने किला श्रीमंतास द्यावयाचा केला किलेदार यासी कबलात रूा पंचावन हजार व पंधरा हजार रूाचा सरंजाम व हती येक वस्त्रे बहुमान दिला बार तीनसे स्वार घेऊन आले किला खाली करावयास लागले आहेत येकादो रोजी श्रीमंताचे निशान चडेल रा येसाजी पंत धारवाडीहून येथे आले होते राजश्री रावजी समागमे जावयास गेले वरकड मजकूर जबानी रा गणबा मडकईकर

सांगता मालुम होईल जाजती वर्तमान असिल्यास मोहिबास कळो येईल ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ७८ तारीख २३-२-१७६२

नं. २४ हू

अजम अकरम बेलचियोर जुजे
बास करवाल दे सक्तार्य दा इस्ता
द दाम मोहबत हू

मोहिबानपनहा मुखलिसान दस्तगाहा अंजी जिवाजी विश्राम सलाम बादज सलाम येथील नेकी जाणून मोहिबी आपणाकडील कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दिगर इजानेबी मोहिबाकडस कितेक मजकूर बोलून वाडीस आलो श्रीमंत राजश्री सरदेसाई साहेबांची भेट घेऊन सर्व मजकूर ज्याहीर केला तदनंतर श्रीमंत पेशवे कोलापुरास आले होते जिजाबाईचा मुलुक नागऊन ठाणी घेतली मग जिजाबाईन तहचा बोली करून सात लक्ष रूपये देऊन मुलुकातील फौज जावी येसे केले म्हणून बातमी आली आहे परंतु फौज अद्यापि गेली नाही चिरंजीव राजश्री बिठोबा इजानेबाचे बंधू सांप्रत श्रीमंताकडस जाऊन दाखल जाहाले आण तेथील लस्कराचा मजकूर व श्रीमंत रघुनाथपंत यांच्या चिताचा मजकूर सर्व समजोन त्वरेने पत्रे पाठविली त्यात लिहून पाठविले कीं फौज आम्हावर कुडाल प्रांतात अवघी येत आहे व अरमारहि रेडीस जात आहे तर कुडाल प्रांताचे घाट व मारग फौजन येऊन राखावे व कोटकिलेची मजबुदी करावी याउपर फौज उतरायास विलंब नाही कोलापुराहून दोन मजली आलीकडस आली आहे येसे लिहून पाठविले हे वर्तमान मोहिबास व यकबालपनाहास ज्याहीर होऊन इस्तादातफैने इजानेबाकडस साहित्य त्वरेने होऊन यावे त्याचा तपसील आलाहिदा याद लिहिली आहे ते मोहिबी खातीरेख आणून त्यासारिखे साहित्य रवाना करावे इजानेबा वाडीस येताच श्रीमंत राजश्री सरदेसाईसाहेबाचा निरोप घेऊन कुली सरदार व वरकड जमाव येकत्र करून घाट धरायास आज जायास गेलो फौज पेशवेची येताच इजानेबाचा व त्याचा युध्यप्रसंग घडोन यावयाचा समई नजीक वोढाऊन आला आहे. यास्तव मोहिबी वरच्यावर इजानेबाकडील खबर समाचार व साहित्य करावे तेणेकरून इजानेबास इजानेबाकडील

फौजेस बहुत धीर होऊन गनीमासी जुजतील इस्तादाच्या साहित्याच्या भरवसेबर इजानेबी कमरबंदी करून पुढा जायास निघोन जात आहू व इस्तादाच्या मुलुकाची सराद व दर्याकिनाराचे किले बहुत खबरदार करून राखावे व इस्तादाचे अरमार मालबगच्या नस्तावर येऊन चारआठ रोज राहावे तेणेकरून बहुत उपराला आहे ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे छ २८ रजबू मुकाम आकेरी हे किताबत.

लेखांक ७९

तारीख १९-११-१७६३

नं. २६८१

श्री

राजश्री आनंदराव धुलप गो

सावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो माधबराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे विशेष फिरंगी याणी बदराह बर्तणूक करून जंजिरे सिंधेदुर्ग हा जागा माहाराज छत्रपतीचा खासगी आजपर्य टोपीकर व इतर याणी त्या स्थलाची अमर्यादा कोणी केली नाही असे असता जंजिरे मजकुरावर अतिशये केला पेट जाली किल्याबर तोफा मारल्या हे हुजूर विदीत जाहाले तुम्ही येकनिष्ठ राज्यातील लोक समीप असता त्याचे पारपत्यास अंतर जाहाले येणेकरून स्वरूपास योग्य कीं काय जिवाजी बिश्राम त्यास सामील होऊन मर्दनगड सरकारचा जागा यासी अपाय केला तोच अन्वय तुम्हाकडून भासतो याउपरी त्याच्या पारपत्याबिसी कोताई केलीत तर कार्यावर पडणार नाही जो सरंजाम लागेल तो सरकारातून दिला जाईल फिरंगी यास पत्रे सरकारची व माहाराज मातुश्री बाईसाहेब याची गेली आहेत तुम्हास कलावे म्हणून लिा आहे खासास्वारी दक्षणप्रांती मुा मिरज येथे अविलंबेच होणार आहे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद रा छ १३ जमादिलोवल.

लेखांक ८० तारीख १७-१-१७६४

नं. २५ हू

अजम अकरम बेलचोर जुजे वास दे कर
वाल दे सकडतार इस्ताद दाम दौलत हू

मकन मोहिबान उम दे मर्ख लिखान

अंजी येशवंतराऊ सुभेदार निा माहाराज राजे खिवाजी छत्रपति सलाम मकसूद उंकी येथील नेकी जाणोन मोहिबाकडील कारनेकी करीत असले पाहिजे दिगर किले सिंधुदुर्ग याख आपणाकडोन अपाय आणूख प्रवर्त केलेची बखेर हुजूर विदीत जाहालेवरून माहाराज स्वामीनी येथ फौजसुधा रवाना केऊ तदोपर बिना-कार्य सरकाराख खर्च कायेयास करावा विवेक पुसायास कारकून सरदार नाईकवाडी यास मोहिबाकडस रवाना करून दिले त्याख जामीन आहे जामीनाचे मारीफते बोली उरकली जाईल म्हणोन जाबसाल केला तेव्हा जामीनाकडे गुंता जाहाला इकडस मोहिबानतर्फेकडून किलेस अपाये होत नाही म्हणोन आहुजूर लिहून पाठ विलेच्च असे माहाराजाकडील व श्रीमंताकडील पत्रे आपणास आली ती पोहचलीच असतील मोहिबाच्या उताराची बाट लक्षीत आहू फौजसुधा हुजूर जावे लागते दोस्तीची पैरवी कराया आपण दाने आहेत सांबत व केदारजी पोवार मुक्ता सांगता सर्वार्थ कलो येईल दराज काय लिहिणे प्यार मोहबत असूं दिली पाहिजे हे किताबत-

लेखांक ८१ माहे एप्रील इ. स. १७६४

नं. ७ श्री

राजश्रिया बिराजित राजमान्य राजश्री
पांडुरंग सेणवी व तथा गोपाल सेणवी धुमे
स्वामी गोखावी यासी

पोष्य माहादाजी बलाल बापट कृतानेक नमस्कार बिनंती येथील कुशल ता छ १५ साबान जाणोन स्वानंदलेखन करावया निरोपिले पाहिजे विशेष राजकी

वर्तमान तरी राजश्री भिवराव पानसी तोफखाना व राजश्री रामचंद्र नाईक असे च्यार हजार फौजनसी येऊन श्रीमंताचे आज्ञेप्रमाणे चिकोडी तालुक्यात ठाणी चिकोडीसुधा बसविली कागल कापसी वगैरे बोली उरकली करवीरवासी मातुश्री-कडील बोलीचाली हुजूर जाहाली हाली उभयेता मारनिले मनोलीस आले आहेत मनोलीस ठाणे लवकरच बसेल श्रीमंताचा मुकाम बाय देशात फार दिवस होता कारण जे राजश्री नाना फडणीस लस्करात आले होते त्यास मामलतीचा बंदोबस्त व हिंदुस्थानात फौजा रवाना करावयाचे कार्य यामुले इतके दिवस लागले याउपरी पुढे येणार राजश्री जानोजी भोसले याची फौज आली आठच्यार दिवसात भेटी होतील तदनंतर कृष्णापार होऊन दर मजल श्रीमंताची स्वारी बिदरूरच्या रोखे जाणार ऐकिले वर्तमान लिहिले असे तुमचे स्थलिकाकडील वरचेवर बातमी येतच असेल ते प्रमाण सदैव पत्री हारामर्षास अनालक्ष्य असावा बहुत काय लिहिणे कृपा लोभ असावा ही विनंती.

लेखांक ८२ तारीख १६-९-१७६४

नं. १६०४

अजम विजुरई जंजिरे गोवा

हमेशा खुषवख्त बाशंद

मोहबतपन्हा शौकत दस्तगाहा अजम अकरम अज ज्याहनबा भागिरथीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय दुवा आंकी येथील नेकी तागायत छ १९ रबिलावल मुा लस्कर नजीक धारवाड जाणोन मोहिबी कारनेकी कलमी करून दिल आराम केले पाहिजे दिगर चंद रोज गुदरले परंतु इजानेबान मोहिबाकडून खतनामा येऊन खुशवख्ती न जाहाली हे दोस्तदारीस युक्त नव्हे ज्यानाबेन इफ्तिदाये तागायत इजानेबाची व मोहिबाची जुदाई नाही तेव्हा मोहिबाची सदैव इछित आहो इजानेबा तूर्त लस्करास अजम राऊ मुरारराऊ घोरपड याचे भेटीस आलो असो पुढा मादौलत अजम पंतप्रधान याजकडूनही इजानेबाचे काम आहे आठ-पनरा रोजी होईल मुख्य गोष्ट पुढा पेशवे याची मसलत हैदरआलीची बोली होताच तलकोकण प्रांती होणार आहे तेव्हा आमचे संस्थानाचा विवेक असावा व तुमच्याही

व्हावा येविसीचे कितेंक मजकूर राऊ घोरपडे याकडे बोलोन हाली मोहिबाकडे मा अंताजी भास्कर यास पाठविले आहेत व मा रघूस लिहिला आहे सांगता जाहीर होईल त्याप्रकारे करून मोहिबाकडील पत्रे व कारकून पाठऊन दिलेया बहुत सरफराजीचे काज-काम पेशवे याजकडून होईल इजानेबा प्रसंगी असोन मोहिबाचे साहित्य होईल त्यास कमी होऊ नये यावास्ते कलमी केली आहे बरकड सर्व मजकूर जबानी सांगता जाहीर होईल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ८३ माहे जानेवारी इ. स. १७६६ पूर्वी

नं. ३५१० श्री

अजम बिलचियोर जुजे वास दे क
रवल सकरतार देइस्ताद दां मो
बत हू

रफावत आवेलीपनाहा शामत आयाली दस्तगाहा आजी दिल येखलास येशवंतराव सिंदे सुभेदार सलाम बाजद सलाम मोहबल मकसुद आंकी येथील खैरआफीयत जाणून आमोहबतपन्हानी आपली तनदुरुस्थी कलमी करून दील खूषबख्त होय ते करीत असावे विशेष आपण पत्र पाठविले व कपित बिलचयोर यानी जबानी सांगितलेवरून कलले त्यास सर्व टोपीकरात व याही राज्यात लौकीक जाहाला जे आमारतपन्हा सकरतार जंजिरेचे बोलीचे मध्यस्तीस पडिला आहे आणि धणीयाच्या जंजिरा धणीयास देविणार याप्रमाणे बहुत लौकीक जाहाला याचे इरे आपणास तो आहे लेहून कलवावेसे काये आमचे हातावर हात मारले आणि आम्ही आपणास वडील म्हणविले तेव्हाच आमचा खातीरनिशा जाहाला जंजिरा आला दाखल जाहाले परंतु आमचा खातरनिशा ज्याप्रमाणे जाहाला तैसेच स्थल हातास घेऊन धणीयाचा व सर्व जनाचा खातरनिशा व्हावयासी पाहिजे बरकड सर्व मजकूर कपित बिलचयोर जुजे करबल याजबली बोलिले आहे हे निवेदन करतील ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक ८४ तारीख ११-१-१७६६

नं. २० हू

लिज्यारत व आवालीपनाह रफअत व मआली दस्तगाह अजम की मी दोतर सक्रटतार बंदर गोवा व आफियत बाशंद अर्जा तर्फ माहाराजगी रानी जिजाऊसाहेब अदज आंकी तुम्ही आपली खैरआफियत कळमी करून शादमानी रूयदाद होये ते करीत जाणे फिलहाल साहेबी आं उज्यारतपनाहाकारणे संक्रमणप्रयुक्त तीळशर्करा केदारजी पोवार बाडियातील मूल याहमराह रवाना केली आहे घेऊन रसीदगीचा जबाब महसूल करून पाठविणे बाअजे हकीकत जबानीबरून मालूम होईल जाणीजे. छ २९ माहे रजब.

लेखांक ८५ तारीख ७-३-१७६६

नं. २८६० श्री

आजम येरीक जुजे दे मेंदाज्य बेनेविद
सीर्न सक्रतार्ये दो इस्ताद बंदर गोवा दाम
मोहबत हू

रफावत अवलीपनाह शाहमत माअली दस्तगाहा अजदिल येखलास येसवंतराव शिंदे सुभेदार सलाम बादज सलाम महबल मकसूद आंकी येथील खैरखुसी जाणून शादमानी कलमे मरकूम करत असले पाहिजे दिगर मोहिबाकडील घरोबियाचा व बोलीचालीचा कितेक दोस्तीचा भाव राजश्री नारबा याणी सांगितलेवरून दिल आराम जाहाला मोहिबाची व इजानेबाची दोस्ती चालत आहे तेव्हा सर्वप्रकारे कार्यभागाचा भरवसा मोहिबाचाच आहे

मोहिबा प्रामाणिक येकवचनी हे महपुरष आहेत तदनुरूप योजगा तरतूद लक्ष धरून कार्यभाग संपादाल हा निशा जाणोन मारनुले याची रवानगी हुजूर

क्षणी माहाराज साहेब याजकड रवानगी केली आहे तेथून सत्वरीच आज्ञा घेऊन येतील ते क्षणी मोहिबाकड रवानगी होईल इंग्रजाचे बोलीचा ठराव जाहाला आहे त्यापौ तूर्द निमे यैवज मोहिबाचे पदरी घालावा आणि पेस्तर निभावणी बोलीप्रो निशा यैसे दोनी मोहिबाचे विचारे इंग्रजाची करून येशास पात्र मोहिबास करावे यैसे चितात आहे यास्तव सूचना लिहिली आहे तदनुरूप पैरवी करणार मोहबा आहेत राजश्री जिवाजी विश्राम व बिठल विश्राम या उभयेतानी मोघमात फौजेकरिता लिहिले होते याकरिता फौज दिल्ही होती त्यासी आपणाकडील प्रांतात उपद्रव करणार यैसे राजश्री नारबा याणी पत्र पाठविले त्यावरून फौजेस पत्र पाठवून माघारा आणविली मुख्य गोष्टी मोहिबाचे दोस्तीपेक्षा इतर जोड थोडकीच आहे फौज मोहिबाचीच आहे राजश्री जिऊबा व बिठल विश्राम प्रस्तुत इंग्रजाचे भेटीस्तव मालवणी आले आहेत पुन्हा फौजेविशी उभयेतानी बोली लाविली आहे परंतु त्याचे आमचे भेटी अंती मोहिबाकडील मसलतीचा भाव दिसोन आला यास्तव फौज द्यावयाचे आमान्य गोष्टी करावीसी जाहाली सदरहुत्याबाा फौज बोलोन चालोन निखालसपणे नेली तरीच देऊ तुम्हा लोकाचे स्नेहमैत्री राखिलीया उपयोगीच आहे यैसे समजोन सविस्तर राजश्री नारबास सांगितले आहे हे तुम्हाकड आलेउपरी सविस्तर सांगता कलेल दराज काय लिहिल प्यार मोहबत असो दीजे हे किताबत फालगुण बहुल यकादसी.

लेखांक ८६ तारीख १६-५-१७६६

नं. २०५ हू

रफअत व अवालीपनाह उज्यारत व मआलीदस्तगाह अजम क्रीमी + सकटतार बंदर गोवा + + बाशंद अजीत माहाराजगी रानी जिजाऊसाहेब बाअदज उवा आंकी अजगर्दीष जमानेना इजयार जंजिरे सिंधुदुर्ग इंगरेजाचे कबजस्तीत गेला होता तो छ ६ जिल्हेजी सरकारदाखल जाहाला हे खुषखबर तुम्हास जाहीर जाहालीच असेल पुढे तेथील उस्तवारी गला दाणा व दारूगोला व गलबते व तोफा वगैरे इस्ताद जकीरीयाचे सामान हमराय अजम बिजरई यास सांगोन कलमी केल्या मवाफिक सामान जंजिरा पोहचवणे लाजीम आहे हे जाणोन लायकुल मरहमत यशवंतराव सिंदे सुभेदार कलमी करितील तो मजकूर खातीरेत आणून जंजिरा जलदीने सामान पोहचे ते करणे जाणीजे जियादाच निगाष्त आयंद व दुवा

लेखांक ८७ तारीख १६-५-१७६६

नं. ६७ हू

अजम दो जुटाव जुजे द मेल गोवर्नदो
र बंदर गोवा शादकाम बाशंद

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाहा बाअदज इस्तियाद फिराबा मशहूद आंकी येथील आफीयत जाणोन मोहिबी खैरीयत कलमी करून शादमानी हासील होये ते करीत जाणे दरिंविला बफजल इलाही छ ६ जिल्हेजी जंजिरे सिंधुदुर्ग लायकुल मरहमत यशवंतराव सिंदे सुभेदार याचे मारफातीने सरकार दाखल जाहाला हे खुश खबर आअमारतपनाहास मालुम जाहलीच असेल तेथील उस्तबारी दारू व गोला व गलबते व भांडी व गला वगैरे इस्ताद जकीरीयाचे सामान तुम्हा कदीम यखलासमंदाकडून जंजिरा पोहचवावे हे लाजीम जाणोन कलमी केले आहे व राव मारनिले लेहून व सांगून पाठवितील त्यामवाफिक सर्व सामान जंजिरा पोहचऊन कदीम दोस्तीची तरकी जियादतर होये ते करणे जियादाच निगाष्त आयुदे व दुवा

लेखांक ८८ तारीख ११-१-१७६७

नं. ३८३५ हू

अजम अकरम दौफेदरीक्र गी
क्तवेर्म दे सोज गोवर्णदोर ये कपी
तां व जेनराल दा इस्ताद दे ई
दी बार मसनद हुकुमत मुतंकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा हिशमत व शौकत दस्तगाहा: आंजी जिवाजी विश्राम सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर जाणोन कारनेकी कलमे केले पाहिजे दिगर येकबालपन्हाही किताबत पाठविली पोहचोन दिल आराम जाहाला तेथ कलमे केल्याचा मजकूर लिहिला तोही इजानेबास मालूम जाहाला अशास राजश्रीं सरदेसाई साहेब यांचा

व इस्तादाचा श्नेह चालत आहे त्यात इकडील चाकरमाना लोकाचे हाते बगर हुकुमाने तफावत आली असेल त्याचाहि मजकूर मनास आणून त्याचा विचार होईल रांगणेचे मसलतीस इजानेबा गुंतले आहेत अशास इस्तादाकडून मदद उपराला व्हावा हे उचित आहे अशात किरकोल कलमामुले तट पाडावा यैंसे येकबालपन्हास विहीत नाही मसलत सुरू जाहाले उपर इजानेबा इस्तादाचे भेटीस येतील तेव्हा सर्व लडे फैसल होतील बाकी लिहिणे इजतअसार शाम पई यास लिहिले आहे तो येकबाल-पन्हास ज्याहीर करील त्यावरून मालूम होईल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे छ १० शाभान हे किताबत.

लेखांक ८९ तारीख २२-२-१७६७

नं. १२ हू

अजम येरिक जुजे दे मेदांज्य बेने
विद सीर्न सक्रतार्य दाइस्ताद दा
इंद मापुंज बाशंद

रफाअत माआलीपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा आंजी खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणून कारनेके कलमें केले पाहिजे दिगर किताबत पाठविली ते पोहचोन मजकूर मालूम जाहाला तेथे लिहिले जे राजश्री जिवाजी विश्राम सबनीस याणी बेइमानी करून राणीचा किला रांगणा फितुराने घेऊन मोहिबास आपली निष्ठा देर्शव्हावी येविषी कागद पाठविला यैसे यैकिले त्यास जिवाजी विश्राम याचा सर्व भावगर्भ सर्वास प्रसीध आहे यैसे असोन त्याच्या लिहिल्यावरून अंगीकार करणे उतम नाही म्हणोन येविषीचे कितेक विस्तारे लिहिले अशास इस्तादाचा व इजानेबाचा अक्रत्रीम स्नेह असे असता कोणेकविषी मारनिलेच्या लिहिल्यावर इस्ताद यास दखल न करता तन देतील की काये येवढा मोहिबास इजानेबाचा निशा नाही अपूर्व दिसोन आले जिवाजी विश्राम याने इज्यानेबास किताबत कितेक निष्टेच्या विचारे पाठविली होती प्रमाण त्यास इज्यानेबाही त्यास सांगोन पाठविले जे निष्टेचा अर्थ लिहिला व साहेब काम केले म्हणोन लिहिले उतम गोष्ट हेच प्रमाण असलेस किला आम्ही आमचे स्वाधीन करणे मग निष्ठा आहेनाही आपोआप समजेल निमित्य राणीचा

इज्यानेबाचा श्रेह तेव्हा अनायासे राणीचा किला राणीचे स्वाधीन होईल नाहीतर निष्टेचा अर्थ सहजेच्च समजला त्यास त्याणे उतर लिहिता आधी भेट व्हावी मग किला स्वाधीन करू म्हणून लिहिले त्याचे उतर पाठविले नाही जीव समजला त्याचा इतबार अगर कर्तव्य नवीन समजावे अशा तो अर्थ नाही किला हस्तगत व्हावा याचे साहित्याविशी राणीचा जमाव व इजानेबाचा जमाव किलेस चौक्या द्यावयास पाठविला त्याणी जाऊन चौकडून परीच घातला आहे मोहिबाकडून पोख्ते साहित्य दारूगोली व जमावाचे व्हावे येविशी पेसजी किताबत पाठाविली आहे उतर पाठविले पाहिजे ज्यादा काय लिहिणे मोहबत असो दीजे छ २२ रमजान हे किताबत.

लेखांक ९०

माहे मार्च इ. स. १७६७ पूर्वी

नं. २६३०

हू

अजम अकरम गोबर्नदोर दा इस्ताद
दा ईद जंजिरे गोवा बार मसनद हुकूम
त मुतलाकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा हिशमत व शौकत दस्तगाहः अंजी जिवाजी विश्राम सलाम बादज सलाम येथील नेकी जाणून येकबालपन्हाही आपणाकडील कारनेकी मरकूम केले पाहिजे दिगर इजानेबाबर खावंदानी व इस्तादाने निस्टुरता केली त्याजमुले आपला मुलूख सोडून बरघांटी आल्यास येक बरीस होत आले उभयता मेंहेरबानी करीतील म्हणून आजलग वाट पाहिली परंतु दिवसेदिवज गैर मेहेरबानीच दिसोन आली तेव्हा श्रीमंत राजश्री पंत प्रधान याचा आश्रय इछावा लागला त्याजकरिता राणीसाहेब याकडील मातबर किला प्रसीधगड रांगणा इजानेबी हिकमतीने घेतला आहे तेच्चसमई आपल्या खावंदास कलमे केले कीं हा किला जवपर्यंत आम्हा स्वाधीन आहे तों पर्यंत आम्हास आपण पदरी घ्यावे आण किल्याचा बंदोबस्त उतम प्रकारे करावा म्हणजे आपले राज्य स्वस्त राहिले हे चिंतास न ये तर प्रधान पंत याचे स्वाधीन करावे लागेल तेव्हा आपले राज्यास अपाई होऊन इस्तादास सेजार नजीक जाहालेमुले बरा नव्हे येसे लिहिले असता विवेक केला नाही आण किलेस चौकीया दिल्या होत्या चौकीयानी असा किला येतो येसे नाही परंतु लटका लौकीक करून घेतला आहे बरे ते थोर

समर्थ खावंद आहेत चितास येईल ते करितील आता मोहिबास लिहावेयास कारण जे इजानेबास आपले राज्य सुटले इस्तादाचाहि आश्रा नाही येक वरीस वाट पाहिली आण किला प्रसीधगड घेतला हा जागा श्रीमंतास हवाला करावा आण त्याची सेवा करावी हेच येक राहिले हे केल्यामुले आपले पोट भरेल परंतु आपले राज्य बहुत दिवसाचे जाते व इस्तादासहि बरे नव्हे याकरिता विवेक करून हे किताबत लिहिली आहे जर मोहिबी या गोस्टीचा विवेक करून इजानेबास याविधीचा बुधीवाद कोण तो सांगोन पाठवावा जेणेकरून आपल्या राज्याचे हित व इस्तादाचे हित तें अजून पर्यंत इजानेबा चिंतितात यास्तव किला आमचे स्वाधीन राहून सर्व प्रकारे इस्तादान अभिमान धरून हर येकविसी साहित्य पुरवितात तर इजानेबास याहून आणखी नको आण मोहिबाच्या विचारास हे न ये तर इजानेबी श्रीमंताचे म्हणविलेच आहे मग आणखी मजकूर नाही तेव्हा बहुता दिवसाची इस्तादाचे मेहेरबानीची जोड इजानेबाचे वडिलानी आजलग केली आहे त्यास अंतर येईल यास्तव कलमे केले आहे मोहिबास आधी कलऊन मग जे करणे ते करावे याकरिता कलमे करावे लागले मोहिबाच्या विवेकास आले तर शाहाणा माणूस इजानेबापर्येंत पाठवावा तूर्त प्रधानपंता-कडील फौजा बरघाटाहूनहि यावयाच्या जाहाल्या व वसईपासून कुली सरदार हशम व स्वार व अरमार घेऊन आमच्या राज्याचे सरदीवर आले आहेत त्याकडून कारकून आम्हापासी येऊन बसले आहेत त्याणी मनसबा भारीच योजिला आहे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ९१ माहे मार्च इ. स. १७६७ नंतर

नं. १३२१ श्री

अजम येरिक जुजे दे मेंदाज सिर्न स

कटतार बंदर गोचे दाम मोहबत हू

अवालीपन्हा मखलीसान दस्तगाहा अंजी दिल येकलास येसवंतराव सिंदे सुभेदार सलाम बाजद सलाम येथील उकी जाणोन आपणाकडील कारनेकी निविस्तान करून दिल ताजा केला पाहिजे दिगर जिवाजी विश्राम याणे धणीयाच्या राज्यातील शाहास्थलास अपाये करून दगेने किले प्रसिधगडचा काबू साधिला याजकरिता

बेइमानाचे पारपत्य करून माहास्थल हस्तगत करावे म्हणोन धणीयानी जमावसुधा इजानेबास रवाना केले किला चौगीद्र करून वेढा देऊन अडीच महिने पर्येत बैसलो गनीमास काईल करून जेरदस्तीने धणीसाहेबाच्या पुण्यप्रभावे माहास्थल हस्तगत जाहाले गनीमाकडील लोक पंचवीस पर्येत हत्यार धरोन ठार जाहाले पावणासे लोक कडेलोट करून धास्तीने मृत्य पावले पनास लोक सापडले त्यास दस्त करुन त्याचा सिरछेद जाहाला पंधरा वीसाचे कबिले किला दस्त केले आहेत मोहिबास कलावे म्हणोन लिहिले असे मोहिबी बरचेबर पत्र पाठऊन उभयेपक्षी दोस्ती चाले ते करावे बरकड राजश्री पांडबा सेगवी धुमे सांगता साद्यंत कलल त्या प्रमाणे कार्यभाग होऊन येई ते करावे ज़्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ९२

तारीख ४-४-१७६७

नं. १४ हू

अजम अकरम गोवर्णदोर दा इस्ताद
दा ईद बार मसनद हुकुमत मुतला
की बाशंद

अमारत व अयालतपन्हा हिशमत व शौकत दस्तगाहा अंजी खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बादज्य सलाम येथील नेकी जाणून मोहिबी कारनेकी कलमे केले पाहिजे दिगर तीर्थस्वरूप राजश्री कृष्ण सावंत बावा व राजश्री जिवाजी विश्राम याणी इजानेबाकडील माहादेवगड व नारायेणगड दोनही जागे पावसालेमधे घेतले होते आण तेथून प्रसीधगड हस्तगत केला त्यामुले श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाई याणी इजानबाकडील मजत उपराला घेऊन प्रसीधगडास वेढा दिला आहे माहादेवगड येथे ते राहून प्रसिधगडचा उपराला करितात इजानेबी जमाव पाठवून माहादेवगड घेतला हे खुषीचे वर्तमान मोहिबास मालुम व्हावे याकरिता लिहिले असे नारायेणगडास पाइबंद लाविला आहे तोहि जागा सत्वर येईल त्यामुले प्रसीधगडचा उपराला बंद जाहाला पुढा ते ज्या जागा जातील तेथ तेथ त्याचा पिछा पुरवावा हाहि मनसबा योजिला आहे म्हणजे प्रसीधगड सहजेच येईल प्रसीधगडी भांडी गर्नेल लाऊन जेर करावा त्यास मोहिबाकडून साहित्य

जाहाल्यास तेहि गोष्ट उरकेल येणेकडून मातुश्री जिजाबाई व इजानेबा व मोहिबा तीनही अनुमत येक होऊन चौथे पेशवे याच्या पाई सिरणार नाही याप्रकारे मनसबा योजिला आहे हे सर्व मजकूर मोहिबास मालूम व्हावे आण याविसी मोहिबाकडून साहित्य व्हावे याकरिता हे किताबत लिहिली आहे तर मोहिबी ध्यानी आणून या कर्तव्याचे साहित्य कोण कोणप्रकारे करितात ते जबाब लिहावी त्यासारिखी जलदीने तरतूद केली जाईल नारायेणगडहि आज घेतला ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे छ ४ जिलकाद हे किताबत.

लेखांक ९३ तारीख ४-४-१७६७

नं. १३४७ हू

अजम येरिक जुजे दे मेंदाज्य बे
नेविद सीर्न सक्रतार्ये दाइस्ताद
महफुज्य बाशंद

रफाअत माअलीपनहा शौकत व हिशमत दस्तगाहा अजी खेम सावत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बादज्य सलाम येथील नेकी जाणून मोहिबी कारनेकी कलमें केले पाहिजे दिगर तीर्थस्वरूप राजश्री कृष्ण सावंत बावा व राजश्री जिवाजी विश्राम याणी इजानेबाकडील माहादेवगड व नारायेणगड दोनही जागे पावसालेमधे घेतले होते आण तेथून प्रसीधगडच्या मनसबा करून प्रसीधगड हस्तगत केला त्यामुले श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाई याणी इजानबाकडील मजत उपराला घेऊन प्रसीधगडास वेढा दिला आहे माहादेवगड येथ ते राहून प्रसीधगडच्या उपराला करितात याकरिता इजानेबी जमाव पाठऊन माहादेवगड घेतला हे खुसीचे वर्तमान मोहिबास मालूम व्हावे याकरिता लिहिले असे नारायेणगडास पाईबंद लाऊन तोहि जागा हस्तगत केला त्यामुल प्रसीधगडच्या उपराला बंद जाहाला पुढा ते ज्या जागा जातील तेथ तेथ त्याच्या पिछा पुरवावा हाही मनसबा योजिला आहे म्हणजे प्रसीधगड सहजच येईल प्रसीधगडी भांडी गर्नेले लाऊन जेर करावे त्यास मोहिबाकडून साहित्य जाहाल्यास तेहि गोष्ट उरकेल येणेकडून मातुश्री जिजाबाई व इजानेबा व मोहिबा तीनही अनुमत येक होऊन चौथे पेशवे याचा पाई सिरणार नाही याप्रकारे मनसबा योजिला आहे हे सर्व

मजकूर मोहिबास मालुम व्हावे आण याविसी मोहिबाकडून साहित्य व्हावे याकरिता हे किताबत लिहिली आहे तर मोहिबी ध्यानी आणून या कर्तव्याचे साहित्य कोणकोण प्रकारे करितात हे जबाब लिहावी त्यासारिखी जलदीने तरतूद केली जाईल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे छ ४ जिलकाद हे किताबत.

लेखांक ९४

तारीख ११-८-१७६७

नं. १९ हू

रफअत व अवालीपनाह हिज्यारत व मआलीदस्तगाह अजम येरीक जुजेदे मेदाज्य बेनेविद येसीर्न सक्रतार्य दोइस्ताद बंदर गोवा दर बिराज बाशंद अंजी तर्फ माहाराजगी रानी जिजाऊसाहेब बाआदज उंबा आंकी आरफअतपनाहाकडील खैरीयत हमेशा जाहीर होऊन शादमानी रूयदाद व्हावी अजहमा जरूर असता खत फिरिस्ताद + + अकीदत नमत रोज बिसयार गुजरले हे रवेशयअतिकादमंदास वाजीब व लाजीम आहे येसे नाही

कदीम दोष्ते हमबारे हो तहकीक अखबार खैरीयत असार शादमें नमूद बाशंद बाअजे हकीकत मुफसील मताबीक हुकूम + कुल मरहमत यशवंतराव सिंदे सुभेदार कलमी करतील त्यामवाफिक कारसुरतपजीर होये ते करणे जाणीजे रा। छ १५ रबिलाबल जियादा काय लिहिणे.

लेखांक ९५

नं. ३७४० हू

शाहमत व अवालीपनाहत इफ्तवाक
मदत दस्तगाह अजम दो मनवेल
अलहऊकेर गोवर्नदोर विजरई बंदर गोवा

शादकामबाशंद अंजी तर्फे माहारानी जिजाआईसाहेब बाआदज मुवा आंकी दरीविला तुम्हाकडून इजतअसार कपत बेलचियोर जुजे दे करवाल खत घेऊन आले मुफसील मजमून रूबरू जाहीर केला ममतेचा मजकूर खातीर मुबारकेस मालूम होऊन

बिसियार मंजूर हवाला इरसीद पेशजी अजम दादाजी पांडुरंग व हुजूर या हमराह खुलासीयाचा मजकूर सांगितला तो जाहीर जाहाला आअमारतपनाहाकडून या राज्यासी यखलासमंदी कदीम दिवसापासून चालत आहे त्याची तरकी व्हावी हे जरूर + + + जंजिरे सिंधुदुर्ग यास हुकूम फर्मावणे तो फर्माविला आहे हरगीज तफावत करणार नाही + + + + राज्याचे तरकीची कामे होऊन यत ते करणे वाजीब आहे फिलहाल इजतअसार कपित बेलचियोर मजकूर यास रूबरू फर्मावणे ते फर्मावून साना केले आहेत व बालोजी मोरे व अंदोजी ताटे बा तुम्हा + + हा हुकूम जाहीर करितील व जंजिरकरी कलमी करितील त्यावरून मुफसील मजकूर मालूम होईल जियादाची निगाष्त आयंद अयाम बकाम बाद.

लेखांक ९६

नं. २०२७ अ

हू

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत
दस्तगाह अजम दो जुवाव जुजे दे गोवर्नदोर

बंदर गोवा शादकाम बाषद अजतर्फ माहाराजगी रानी जिजाऊसाहेब बाअदज दुवा आंकी आअमारतपनाहाकडील खैरआफीयत हमेषा जाहीर होऊन शादमानी रूयदाद व्हावी अजहमा जरूर असता ताईहाल इंतिजारी दरपेश आहे आअमारतपनाहाच्या बापदादयापासून राज्याचे येखलासी बाबे बहुत कोषीस करीत आले त्यामवाफिक अमलामधे आणून बोलल्लो त्यापेक्षा जियादातर यखलासीची ख्वाहीच करून हमेशा खतखतुताचा राबिता राखोन कदीम दोस्तीची तरकी मोहकम होये ते करणे वाजीब आहे येबाबीचा कितेक मजकूर मताबिक हुकूम लायकुल मरहमत यशवंतराव सिंदे सुभेदार कलमी करतील त्या मवाफिक कार्याची सरबराहि होऊन येई ते करणे जियादाच निगाष्त आयद अयाम बकाम बाद

लेखांक ९७

नं. १८७०   हू

गुज्यारत व अवलीपनाह रफअत व आवली
दस्तगाह अजम   जुजे वास दे करवाल सक्रटतार

महफूज बाशंद   अजी तर्फ माहारानी जिजाआईसाहेब बाआदज आंके दरीविला विजरईकडून व आंअवलीपनाहाकडून यअतिकादमंदीची खतपत्रे हुजूर पोहचली मुफसील मजकूर जाहीर होऊन मंजूर जाहाले इजतअसार कपितां जुजे दे करवाल याणी हुकुमामवाफीक रूबरू फर्माविल्याप्रो सांगितल्यावरून विजरई यास माकूल करून सांगोन कापितां मजकूर यास फिरोन जंजिरे सिंधुदुर्ग येथें पाठवून खुलासा होऊन तहरह जाहाला हे गोष्टी बहुत माकूल केली गोरगरिबाचा बचाव जाला तुम्ही लोक शनादिल कारपरदाज तसेच आहा जंजिरेकराचा व तुमचा खुलासा बेखिलाफ जालीयाचा मजकूर कलमी केला नव्हता त्यावरून कलमी केले जाते जे खुलासा बेखिलाफ जाहालियाचा मजकूर खतपत्री कलमी करून मरसूल करणे तुम्हाकारणे खिलअत किमखाप १ येक बालोजी मोरे व अंदोजी ताटे व देवजी भुता या अमराह पाठविले असे घेणे जाणिजे   जियादाच निगाप्त आयंद.

लेखांक ९८   तारीख १७-१०-१७७६

नं. ३३५

एकबालपन्हा गोवर्णदोर मुख्य प्रभुवर्येषु आश्विन शुध ५ क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष आमचे बंधूस कोलापुरास बोलाऊन न्हेले होते तेथ करवीरी दोन महिने होते त्यास पुण्यास जाणेविषई छत्रपति राजश्रीची आज्ञा जाहाली आहे तिकडेस जावयास दसरा जाहालेनंतर जाणार प्रस्तुत नवरात्राकरिता कालचे आमावास्येस पाटगावी आले त्याणी त्या प्रांतीचे वर्तमान लिहिले आहे जे हैदरनायकाचा वकील राजास हस्ती व जवाहीर व वस्त्रे घेऊन कोलापुरास आला आहे व भाऊचा वकील वस्त्रे घेऊन कोलापुरास आला आहे भाऊची व रघुनाथपंत दादाची भेट होणार

म्हणून तो वकील सांगे व पुणेकडील फौज हैदराबर येत आहे म्हणोन वर्तमान इंग्रजाचे संधान पुणेकराकडे आहे व भाऊकडेस आहे यैसे बोलतात व मिरजकर फौजसुधा धारवाड प्रांताकडेस जावयास बाहीर निघाले आहेत कोनेरराव + + + पहिलीकडे सककणवाडीवर आहे च्यार येक हजार फौज हिकड आहे हे आढलले वर्तमान हुजूर बिदित व्हावे यास्तव लिहिले असे.

लेखांक ९९

तारीख ३१-१२-१७७६

नं. ३२

हू

येकबालपना गोवर्णदोर मुख प्रभु व येशू

मार्गशीत्र वद्य ६ शेस्टी मुकाम पाटगाऊ क्षेम जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष पुनेचे वर्तमान वाडीहून लिहोन लाखोटा गोवेत पाठविला त्या आलीकडील वर्तमान आमच्या बंधूनी पुनेहून मार्गशीर सुद दसमीचे तेरखेचे पत्र मुदम गडी करून पाठविले ते पुणेतील वर्तमान भाऊ म्हणून तोतया जाहाला होता तो पुणेत च्वकसी करिता खोटा जाहाला त्याजवर त्यास मेखशूखाली मारिला व समागमीचा गोसावी व हरीपंत फडक्याचा भाऊ म्हणोन लबाडी केली होती तोही दाखलेनसी खोटा जाहालेवर त्यास व गोसाव्यास हतीच्या पायाखाली दिले बरकड सारे धराबंद करून सर्वास शाषन करीत आहेत व राघोबादादाची फौज खासगत होती त्यातील नव हती व दोनसे घोडी तारापुरच्या मुकामाहून धरून पुणेस आणली राघोबादादा मुंबईस आहे तेथून सलेची बोलीस कारकून पुणेस पाठविला जे काही जाहागीर द्यावी ती घेऊन घरी सन्यस्त बैसावे त्याजवर पुणेहून कारकूण दादाकडस गेला आहे फुडे घडेल ते प्रमाण व सिंहगडचे किलेबर तोतयाचे नि।।तीने रामचंद्र नाईक याचा पुतण्या होता तो किला झुंजवितो किलेस वेढा होलकराचा बसला आहे बरील झुंजणार कौल मागतो कौल जाहालेवर किला देणार व करबीरच्या प्रांतात परशरामभाऊची फौज दंगा करीत आहे आणखी पुणेहून हरीपंत फडके येणार यैसे आहे व इंग्रजाचे वकील पुणेत आहेत साष्टीचा फड हे व ते बोलत नाहीत परत इंग्रजाचे देखत तोतयाची शाषनें जाहाली यावरून इंग्रज भारीच संवशयात आहे व मिरजकार वगैरे फौज धारवाड प्रांतास आले होते त्याणी बेदगिरी वगैरे ठाणी घेतली यैसे वर्तमान आहे हे सिरी लिहिले वर्तमान आम्हास दखल

जाहाले प्रमाणे हुजूर लिहिले आहे बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे दुरमुखी संवत्सर.

लेखांक १०० माहे जानेवारी इ. स. १७७७

नं. २७०७ हू

निशान बुलंद मकान अजम दो जुजेपेद्र
इ बंदर गोवे रोज अफजू बाद

दौलत व यकबालपनाह इजलाल दस्तगाह ज्यानी बासदी कुल येखलास यशवंतराव सिंदे सरसुभेदार बाआदज इबराज मरातीब यखलास मशहूद जमीर लुफ्त खमीर गदोन दमे आयदके देश आंजी आयकबालपनाहाकडून हुजूरचे आदमी या हमराह खतपत्राचे जबाबसवाल इरसाल केले ते श्रीमंत धणीसाहेबाचे सेवेसी पोहचून कलमी केला मुफसील मजमून जाहीर होऊन धणीसाहेबास बिसयार खुषवख्ती रूयदाद जाहाली आयखबालपनाह अमलास दाखल होऊन दोन बरस होत आले असता धणीसाहेबास हकीकत कलमी करून पाठविली नाही हे कदीम यखलासीचे जागा वाजीब आहे असे नाही तरी पैदरपै खत मोहबत नमत मरसूल करून धणीसाहेबाचे दोस्तीची जियादती दीनबदिन बाषेतर होये ते करीत जावे बारभाईचे पारपत्यास्तव धणीसाहेबानी आयखलासमंदास कलमी केले होते जे मदद इमदाद व साहित्य सरंजाम जलदीने येऊन पोहचावे या अर्थे लिहिले असता त्याचा जबाब नवीत्सन केला जे जरूर ज्या प्रसंगी तेच वख्ती मदद इमदाद व साहित्य सरंजाम नेहले पाहिजे म्हणोन कलमी केले ते धणीसाहेबास जाहीर केले फिलहाल अजम रघुनाथराव पंडित याजकडून पैदरपै धणीसाहेबाचे सेवेसी व अतिकादनामा इरसाल करून कलमी करितात कीं अजम गोवेकर याणी इज्यानेबाचा अगत्यवाद धरून मददइमदाद व साहित्य सरंजाम करीत आहो म्हणोन मुफसील कलमी केल्यावरून धणीसाहेबास बाषेतर खुषवख्ती जाहाली बइसबाब आयकबालपनाहास धणीसाहेबानी कलमी केल्यामवाफिक पंडित मारनिले याचे साहित्य सरंजाम व मदद उपराला पंडित मारनिले हुजूर धणीसाहेबाचे दर्शनास जलदीने येऊन पोहचत असे करावे साल्गुदस्ता मालवणचे आरमारानी या मकानाचे साहुकारी तरांडी यास तसदी पोहचविली आहे

म्हणून आयकबालपनाहानी कलमी केल्याबमोजीब धणीसाहेबाचे सेवेसी अर्ज केला त्यावरून हुकूम फर्माविला जे त्या मकानाचे साहुकारी तरांडीयानी जंजिरे मजकूरचा कौल घेऊन आमदरफ्ती करीत गेल्यानी बहुत दिवस दोस्ती चालोन साहुकारी तरांडीयास तसदी व हरज पोहचणार नाही जंजिरे मजकूरचे अमलदारास धणीसाहेबाची आज्ञापत्रे सादर करविली आहेत पूर्वीपासून त्या बंदरचे तोहफ ज्यात व फडफर्मासी हुजूर धणीसाहेबास येत होत्या त्यामवाफिक आयकबालपनाहाकडून फडफर्मासी हुजूर येत असाव्या आणि धणीसाहेबाची व आयकबालपनाहाची कदीम दोस्तीची जियादती दिनबदिन बाजेतर (बाषेतर) होत असावी हेच अर्ज हमा जरूर तर असे फिलहाल धणीसाहेबास नवाब हैदरअली खाबाहादर याजकडील खतपत्रे बखेसहीत जवाहीर व हती घेऊन वकील हुजूर आले आहेत नवाबबाहादर या राज्याचे तरकी बाबे नियत बहुत धरितात प्रस्तुत आयखलासमंदाकारणे किनखाप थाने २ दोन बकाजी दलवी सेखोजी माने दिा + + अजम मल्हार रामचंद्र कारकून याहमराह देऊन धणीसाहेबानी पाठविले असेत बाजे रूबरू हुकूम फर्मावणे तो मांरनिलेव धणीसाहेबानी फर्माऊन पाठविले आहेत हुकुमाप्रमाणे सांगतील त्या मवाफिक कार्यभाग जाहीरीस पोहचे ते करणे जियाद अबजूज शौकच निगास्त आयद अयाम कामरानी मुदाम बाद.

लेखांक १०१ माहे जानेवारी इ. स. १७७७ नंतर

नं. १४५ हू

फयुजात इलाही व तब ज्यहात नामत जहाई
शामीहाल फरखुंद मआल अजम
दो जुजे पेंद्र विजरई बंदर गोवे रोज आजुबाद

अंजी सौब माहाराजगी रानी दुर्गाआऊसाहेब बाअदज उबा आंकी पेशजी दौलतमंदाकडून हुजूरचे आदमिया हमराह खतपत्राचे जवाबसवाल इरसाल केले ते पोहचून शादमानी रूयदाद जाहाली आदौलतमंद अमलास दाखल होऊन दोन बरस होत आले असता हकीकत कल्मी करून पाठविली नाही हे कदीम राज्याचे दोस्तीचे जागा बाजीबतर नसे तरी ऐसे न करिता पैदरपै खतपत्रे मरसूल करून राज्याचे दोस्तीची

जियादती होये करीत जाणे राज्याचे तरकीबाबे इज्यानेबा अगत्यवाद बिसयार धरितो म्हणोन कलमी केले हे राज्याचे दोस्तदारास वाजीब असे बारभाईचे पारपत्यास्तव आंदौलतमंदाकडून मदत इमदाद येऊन जलदीने पोहचावी या अर्थे कलमी केले असता त्याचा जवाब नविस्तन केला जे जरूर ज्या प्रसंगी तेच वख्ती मददईमदाद व साहित्य सरंजाम नेहले पाहिजे म्हणोन कलमी केले ते मालूम जाहाले फिलहाल अजम रघुनाथराव पंडित याजकडून पैदरपै हुजूर यअतिकादनामा इरसाल करून कलमी करितात कीं अजम गोवेकर याणी इज्यानीबाचा अगत्यवाद धरून मदद इमदाद व साहित्य सरंजाम बिसयार करीत आहेत म्हणोन मुफसील कलमी केल्यावरून साहेबास शादमानी रूयदाद जाहाली बइसबाब आदौलतमंदास कलमी केले जाते जे पंडित मारनिले याचे साहित्य सरंजाम व मदद उपराला करून पंडित मारनिले हुजूरसाहेबाचे सेंत्रेसी जुदतर येऊन पोहचे ते करणे सालगुदस्ता मालवणचे आरमारानी या मकानाचे साहुकारी तरांडियास तसदी पोहचवली आहे म्हणोन कलमी केले होते अशास त्या मकानाचे साहुकारी तरांडी यानी जंजिरे मजकूरचा कौल घेऊन आमदरफ्ती करीत गेल्यानी बहुत दिवस राज्यासी दोस्ती चालोन तसदी व हरज पोहचणार नाही फिलहाल नवाब हैदरअलीखा बाहादर याजकडून खत पत्रे व हती वस्त्रे व जवाहीर घेऊन बकील हुजूर आले आहेत नवाब बहादुर या राज्याचे तरकीबाबे नियत बहुत धरीत आहेत + मुफसील मजकूर + + यशवंतराव सिंदे सरसुभेदार कलमी करतील त्यावरून मालूम होईल त्यामवाफिक कारसुरतपजीर होऊन येई ते करणे प्रस्तुत आदौलतमंदाकारणें किनखाप थाने २ दोन बक्षाजी दलवी व सेखोजी माने दिमत आजम मल्हार रामचंद्र कारकून या हमराह देऊन पाठविले असेत रूबरू हुकूम फर्मावणे तो मारनिलेस फर्माविला आहे हुकूम + सांगतील त्या मवाफिक कार्यभाग जाहीरीस पोहचे ते करणे जियादियाचा निगाष्त आयंद + बकाम + बाद +

लेखांक १०२ तारीख ७-४-१७७८

नं. ३६७९ श्री

विनंती उपर चत्र सुध येकादसी जाणून

करवीरचे लस्करातून चिठी आली ती पाठविली आहे जबानी वर्तमान सिंदे (महादजी सिंदे, पाटीलबाबा) याणी सामानगड व बूदरगड हे दोनी किलेस पितबा केला होता अंताजीपंत म्हणोन येल्तयारी होता तो सिंदे यास मिलाला होता त्यास सिंदेकडून कागद जासूद घेऊन गडास जात होता त्यास करवीरचे जासूद गडावरून करवीर जात होते लस्करेचे जासुदाची गाठ मार्गी पडली गैरवलणी माणूस पाऊन तो कोठे जातो त्याबरोबर मागारी फिरोन त्याचा पता लाऊन गडकरी यास व नरसिंगराव यास सांगितले त्याणी चोवसीस करून अंताजी पंतास कैद करून दोनी किलेची बंदोबस्त केली सामानगडकर यानी आज च्यार दिवस कालानिधीकडे हलकर्णी म्हणोन खेड आहे तेथ स्वार आली होती ती बातमी कालानिधीस कलोन खबरदार होऊन स्वारी आली त्यास मारामार केली दोन घोडी ठार जाहाली सात आठ माणूस ठार होऊन सामानगडकर मोडून मागारी गेले.

श्रीमंतानी पुणेहून सिंदे यास मुतालकीची सिकेकटार पा। आहे कोलापूर जेर केले आहे बोलीचालीहि लागली आहे सिंदेचे चिती हरविचारे येसाजी सिंदेस हाताखाली घालावे हा मनोदये कोलापूरची निवडले तर पुढे मसलतीस फडकेचे जावे लागते तेव्हा मनोदयानरूप घडून यावे ते घडत नाही यास्तव दिनमेकावर घातले आहे याउपर सत्वर उरकेल येस सांगे नाटेकरहि लस्करात होते तेहि आले तेहि सांगेत ते निवडताच या प्रांतात येणे असे निछेये आहे पाहावे त्याणे लिहिलेप्रमाणे रूा देऊन करवीरास रवाना केला माणूस.

येका ग्रहस्त प्रमानीक याचे लिहिणे आले व बाजारी वर्तमान जे श्रीमंत दादासाहेब यास चत्र सुध पंचमीस पुणेत आणले असे वर्तमान आहे आमचा माणूस करवीराहून आलेवर सर्व कलेल. सिंदेकडील कारकून येऊन बेलगावी बेसले आहेत च्योइकडे कागद जासूद जातच आहेत मातबर माणूस आम्हाकडेहि ममता धरतात मागोन सविस्तर लिहितो सोध करून.

को. घ. इ. ८–७

लेखांक १०३ तारीख १६-४-१७७८

नं. ३६१ श्री

सां नमस्कार विनंती येथील कुशल चैत्र वद्य पंचमी गुरूवार जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष सिंदेचे लस्करात कोलापुरी माणूस गेला तो परबा दोन प्रहरी आला कोलापूर सोडून आज च्यार दिवस जाहाले वर्तमान जे कोलापुरची बोली वीस लक्ष रूा व कारकून येक लक्ष येकून येकवीस लक्षावर बोली निवडली त्यास सिंदे बोलीस येसाजी सिंदेस मागत आहे त्यास देत नाही सावकार निशा करून देता काही हती व जबार द्यावे येसे केले आहे निभावणी जालेवर निघतील असे आहे पुणेहून थोरली तोफ आणली ती जाया जाहाली येणेप्रमाणे वर्तमान कोलापुरचे पुणेचे वर्तमान राजश्री मोरोबादादा व होलकर व बचोबा पुरंधर वगैरे पंदरा हजार स्वार करून श्रीमंत दादासाईबास आणावे येसे केले पेलेहि मोरोबास कारबार करा यसे सांगत होते त्यास दादास आणावे यसे सांगत होते राजश्री नाना फडणीस मान्य करीत नाही जाहाले त्यावरून सर्व येक होऊन दादास आणावा येसे तजवीज करून + बोलावयास पाा इंग्रजानी दोन हजार आपणाकडील जमाव व दादाकडील दोन अडीच हजार येसे करून + वरून घाटाखाली यावे राजश्री मोरोबादादा सर्वानी जाऊन आणावे असा निछेये जाहला ते सर्व मजकूर नाना फडणीस व राा सखारामपंतास समजले तेवा सर्व मुछदी लाणथोर मोराबादादा व होलकर सर्व खास वाडेस मिलोन येकमत करून सर्व दिवानगिरीचा कारभार येख्तायारी सर्व कारभाराची मोरोबास दिली नाना फडणीस याणी फडणीसी करावी येणेप्रमाणे सर्वाचे मते होऊन मोराबास दिवाणगिरीची वस्त्रे दिली त्याणी पाहिजे तर दादासाईबास आणावे मोराबाचे चितास येईल ते करावे येणेप्रमाणे पुणेचे वर्तमान याचप्रमाणे सिंदेचे लस्करातून लिहून त्याकडील कारकुनास आले मिरजेहूनहि लिहून आले सिंदेचे कारकूनहि जावयास गेले शापुरी होते ते मोरोबास दादासाईबाचे अगत आहे त्यासही आणतील कागदपत्र सर्व धणीपण श्रीमंत राजश्री सवाये माधवराव याचे नांवी करावे येसे केले आहे म्हणोन सांगतात फडकेकडील बाजारी वर्तमान आणली जुंज जाहाले सर्व वर्तमान आहे + + कृपा असावी ही विनंती.

लेखांक १०४

तारीख ९-९-१७७८

नं. ३६

हू

येकबालपन्हा गोबर्णदोर मुख्य प्रभु
बर्य

भा बद्य ३ या क्षेम जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष आमचे चुलत बंधूनीं पुणेतील आढल बर्तमान जाहाले प्रमाणे आम्हास कलबिले ते लिहीत आहू जे श्रीमंत दादा इंगरजाची फौज घेऊन पुणेच मसलतीस निघोन येणेची तयारी करीत आहेत व प्रस्तुतास खानदेश प्रांती दादाचे लोक उपद्रव करीत आहेत व पुणेतील श्रीमंत सबाई माधवराव यांकडील बर्तमान सिंदे व होलकर पुणेंत येऊन पुढील मसलतीचा बंदोबस्त भारी करावा व पुणेतही साहित्य मसलतीचे होत आहे ब मुधोजी भोसुला याचा वकील देवाजीपंत पुणेत येऊन आपणाकडील योजेनीचा निशा करून पुणेचे साहित्यास मजत करावी येविषीचे साहित्यास करार होऊन गेला आहे यामधे सारांश दादास इंगरजाची मजत पूर्णाभिमानान आहे खरीच परंत भोसले व मोगल व पुणेतफेंचे सर्व सरदार यास बर्म जाहाले आहे की दादानी इंगरजास राज्यांतील चौथाई देणेचा करारमदार केला आहे तेव्हा दादाचा अमल राज्यात जाहाला तर मोगल व भोसुला याच्याही राज्यात होणार यामुले त्याचे अंतःकरण व पुणेचेही सरंजामी सरदार त्याचेहि अंतःकरण पुणेची मजत करावी यैसा प्रस्तुतास डोल आहे पुढील निभावणी होईल ती खरी व कोलापुराकडील संधान धरून पारगड ब भीवगड येथ फितवा कितुरकर या तरफेने गतवर्शा-पासून चालत असे ते बर्तमान पुरवील मुख्यास लिहोन कलबिले होते हाली पारगड-नजीक चंदीगडचे ठाणेवर येणेचे तयारीवर कितुरकर संधानानिसी आहे यैसे बर्तमान प्रस्तुतास आहे हे आम्हास बर्तमान आढल जाहालेप्रमाणे हूजूर विदित केले असे विकारी संवछर

श्रोत्री दीक्षित इा मौजे केरी

लेखांक १०५ तारीख १९-५-१७८७.

नं. ७५२ हू

येकबालपन्हा गोवर्णदोर मुख्य प्रभुवर्य वैशाख वद्य प्रतिपदा क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष कोलापुराकडील प्रांतास पुणेची फौज आली होती ती फौज शिरोल घुमटास मोरचे व तोफा लाऊन जुंझत होते कोटातील भारीच हाल होते परंत परशराम भाऊ याणी इरेमुले बहुत मेहनत करून खंदक पुरून मोरचेचे बलानें भारी युधान हला करून कोट घेतला हलेचा युत्धास लोक भारी नासाड भितरले व बहिरले जाहाले कोट सई जाहालेवर भितरल्या लोकास कौल देऊन लाऊ दिले आणि ठाणे झुंझवीत होता त्या सरदारास कैदेत ठेविला आणे ठाणेचा बंदोबस्त करून फौजसुधा परशराम भाऊ पुढा आले आहेत त्यातील फौज समानगडाकडेस शहास आली आहे व कितुर प्रांतासही शह आहे व फौज व पेंढार परशराम भाऊ समागमें भारीच आहे हे आढल जाहालेप्रमाणे वरतमान हुजूर विदित होणेबदल लिहिले असे बहुत काय लिहिणे लोभ कीजे शारबरी संवत्सर चिरंजीव अनंत दिक्षीत लग्नास आंकोलेस बाइकामाणुसे व दोन घोडीसुधा जातो व दोवे वेल त्यास दस्त कृपा करोन पा। पाहिजे.

प्रभाकर दीक्षित श्रोत्री इनामदार मौजे केरी.

लेखांक १०६ माहे नोव्हेंबर इ. स. १७८१.

नं. २५८५ हू

अजम फिलीसियान रामु नोब्र मोराव कौस
लयेंर दो कोसेल उत्रमार व शक्तार्यें
दोइस्ताद गोवे दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलीशाहान दस्तगाहा आजी बाबूराव मालप जंजिरें सिंधुदुर्ग सलाम बादज सलाम आंकी येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दिगीर हुजरून श्रीमंत धणीसाहेबानी सुलतानजी भोसले हुजरे यासमागमें लखोटे देऊन मोहीब तालुकेने येकबालपनाह जनराल यासी व कोशेलदार यासी रवाना केले आहेत ते पाहून खत प.माबिले अ.बये मोहिबाची स्वारी सांवतावर सत्वर होऊन

यावी आण उभयेपक्षी सरकार काम होऊन गनीमास तंबी पोहचवावी याअर्थे येथूनहि मुदाम लखोटे देऊन कानोजी नाईक यास रवाना केला कां जे रांगणेचा वेढा उठला आणि हुजूरची फौज राऊत व जमाव घाटाखाली उतरली हे वर्तमान मोहिबास परभारे दाखल जाहालेच असे आणि येथून लिहून पाठविलेयासमई मोहिबाची तयारी होऊन जलदीने सांवतावर चाल करावी यैसा प्रकार अस तो आजवर दिरंग दिसोन येतो याचा अर्थ काही कलत नाही तरी मोहिबाच्या दिलात कोणती बात असेल ती ज्याहीर करावी त्यासारिखे समजोन येईल तसाचा बिचार असलिया हुजूरे याचा जाबसाल देऊन रवानगी करावी मुख्य गोष्ट आमचे मानस कीं फिरंगी याची दोंस्ती चालावी यैसे आहे मोहिबाचे खुबीस येईल ते करावे बरकड जबानी हुजूरे सांगता कलो येईल आजवर इकडून मोहिबास बरचेवर कलमें करीत आलो आण मोहिबी आम्हास लिहित आले कीं फौजा उतरताच आपले तालुकेने जंगी सामान घेऊन सांबतावर चाल करितो म्हणौन कलमें करीत असता अद्यापवर घडोन न आले यास्तव हुजूरून धणीसाहेबाचा आम्हावर घुसा आहे हुजूरेबरोबर सांगोन पाठविले यैसीयास तुमच्या बचनाचे सचोटीवर भरोसा मानिला असे हे पत्र लिहिले आहे आम्ही हुजूरचे आज्ञेप्रमाणे सांवताचे आरमार जालून नाबूद केले बरकड जे करणे ते करीत असो मोहिबास ज्याहीर व्हावे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत

लेखांक १०७ तारीख ९-१२-१७८१

नं. १३२० हू

अजम फिलीसियान राम नोब्र मोरो

~~ब दस्तार्य दाम मोहबत हू~~

मोहिबानपन्हा मुखलीसान दस्तगाहा अजी बाबूराव मालप जंजिरे सिंधुदुर्ग सलाम बाजद सलाम ऊंकी येथील खरसला जाणून मोहिबी खैर अफियेत हमेशा कलमे करीत गेले पाहिजे दिगर हुजूरून धणीसाहेबानी हुजुरे याजसमागमे पत्रे मोहिबा तालुके पाठविली आहेत ती पाहून सर्व मजकूर दिलात घेऊन अयालतपन्हा विजरई यासी समजाऊन यासमई मसलत साबंतावर पकी करून तंबी पोचवणेचा अर्थ मोहिबाकडे आहे जेणेकरून दोस्तीचा प्रकार वाढून सर्व प्रकारे मोहिबाकडून निखालसता दिसोन आलेया परस्परे स्नेहाची वृधी जाली म्हणजे तुमचे मनोदयानरूप मुदे जे असतील त्यातील तुमच्या व

धणीसाहेबाच्या येक दिल हे प्रांत सावंताकडील सोडविल्यानंतर हुजुरून सनदाविसी अर्जी करून करून देवावयास येतील परंतु तुमच्या आमच्या बोलण्याचा भावगर्भ निश्चयेरूप व्हावा याजकरिता तुम्हाकडून तुमचा विश्वासु सर्व गोष्टी निभावणीचा प्रकार उभये पक्षी पडे असा येथवर सत्वर पाठऊन द्यावा म्हणजे आम्हाकडून कोणे येक गोष्टीचे साहित्यास अंतर नसे येविसी आम्हास धणीसाहेबाची आज्ञा कीं मोहिबास हा मजकूर लिहिणे त्यावरून दोस्तीचे जागा मोहिबासच लिहिले आहे बरकड जे सांगणे ते रा हुजुरे व कानोजी नाईक जबानी सांगता मालूम होयेल मुख्य गोष्ट मोहिबाची स्वारी रेडीवर तोफ जाहाली म्हणजे इकडून या प्रांतात तमाम स्वाऱ्या करून मुलुक खराबी करितो येक रांगणा खबरदार तरी सर्व सुरक्षित नाहीतर सकाल सावंत बारदेसावर उतरले यैसा विचार आहे मोहिबास ते गोष्टीचा अगाध नाही परंतु समयास चुकणार नाहीत याजकरिता पत्री दर्शविले रा छ २२ माहे जिल्हेज ज्यादा काये लिहिणे प्यार असो दीजे हे किताबत.

लेखांक १०८

तारीख ३०-१२-१७८१

नं. १३१९

याद सरकार कोलापूर हुजूरे याही जिनस पाहिजे त्याची याद लेहून देविली तपसील सेके १७०३ प्लवनाम संवत्सर पौष्य शुध पोर्णीमा तवारीख ३० माही जेब्रा सन १७८१ वे वर्सी

सिसे खंडी ———————————— १

गोले तोपीचे ———————————— ६००

तपसील वजन दर येक गोला रात २

रात १॥ रात १ रात ·॥· रात ·॥·

गर्बसाटाचे गोले असीले निमी व निमी

सदरहु लिहिलेप्रमाणे येकून डागिने ६००

याप्रमाणे जे रूपये सरकारचे दरने होतात ते रूपयेचा निशा करून देऊसी जामीन आहे निशाणा खाली आहेत

कानोजी नाईक

सुलतानजी भोसुले
हुजुरे कोलापूर

लेखांक १०९ तारीख १६-१-१७८२

नं. २६१४ अ हू

छत्रपति

अजम येरिक कार्ल येरिक ब्रिगादेर जनराल

तेरीय दो इस्ताद बंदर गोवा दाम मोहबत हू

मोहबत व मुबदतपनाह खुलत व मवाकत दस्तगाह अंजी ज्यानीब येशवंतराव सिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार बाआदज सलाम इस्तियाक फिरावा आंके येथील खैरखुषी जाणोन आयखलासमंदानी आपली कारनेकी कलमी करून दिल आराम होये ते करावे दिगर आमोहबातपनाहानी हुजूरचे खतपत्राचे व इज्यानीबाचे किताबतीचे जवाब सवाल मो सुलतानजी भोसले हुजूरे या हमराह फिरिस्ताद केले ते रसीद + ऊन कलमी केला मुफसील मजमून बयावार जाहीर होऊन न्याहायत खुरसदी हासील जाहाली या तर्फेचे मसलहत यकबालपनाह विजरई यास माकूल करून (दोन ओळी मजकूर फाटला आहे) स्तुर याणी जुबानी अर्ज केल्यावरून श्रीमन्माहाराजा माहाराजास खुषवख्ती हासील जाहाली त्यावरून अ + तनामा सादर जाहाला आहे त्यामवाफिक यातर्फेचे मसलहतलायक साहित्य सरंजाम व जंगी सामान यकबालपनाह विजरईकडून अनकरीब येऊन पोहचोन रांगणेचा शह फारीग होऊन आमचे कारपरदाजीचा नामोष जाहिरीस पोहचे तो अर्थ करणे येबाबे + मी करून आमोहिबास मालूम करावेसे काये आहे बाजे मुफसील + + अजम बाबूराव मालप बाा मूल जंजिरे सिंधुदुर्ग हे आपणास कलमी करतील त्याबमोजिब कारसुरतपजीर करावे जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे राा छ १ सफर हे किताबती.

लेखांक ११०

नं. १४५३ हू

अजम दो जुवाव जुजे दे + + विजर

इ बंदर गोवा हमवारै शादकाम हू

बसालत व शाहामतपनाह महबत व मुबदत दस्तगाह बज्यानीब येशवंतराव सिंदे

सुभेदार बाआदाज आदाय मरासीम दोस्ती व येकजहती मकसूद आंके येथील खैरखुसी जाणोन मोहिबी आपली खैरयत कलमी करीत जाबे खत मरसूल केले ते पोहचले जंजिरे सिंधुदुर्गच्या आरमारानी काफला दस्त करून नेला सबब तपसीलवार गरमागरम मजकूर निगारष केला तो अयां जाला अजांजाके जंजिरे मजकुरचे कौल घेऊन शाहूकारानी आमखास अमदरफ्ती करावी बेकौली असलिया कैद करून सरकारात खालिसा करावा हा कदीम दस्तुर काफला मार जंजिरा आणून चौकसी केली जंजिराचे कौल नाही म्हणून सरकारात जफ्त जाला आमहबतपनाहानी दरीबाब पुरसीश व देषदेसी न करिता हजरत साहेबाची व मोहिबाची कदीम बेकसूर दोस्ती चालते तो पाया सोडून बेपाया हजरत साहेबास बेमनासीब मजकूर मरकूम केला हे आदानीदिलास व दुतर्फा दोस्तीस लायक नम्हे महबतपनाह इंग्रज बंदर मुंबई याचा रूपया सरकाराकडून देणे तो फारीख व्हावा सबब जंजिरे मजकूरचे अरमार बज्या कोसीस करितात साहुकारानी वाजबी कौल घेऊन व्हदारी केलिया तुर्फैनच्या दोस्तीमध्ये लडा पडणार नाही नालायक खतपत्र कलमी केल्याने हजरत साहेब बेकौली साहुकारा काफला सोडावयाचा हुकूम फर्मावितील कीं काय दरीबाब मोहिबी दोस्तीमध्ये कसूर बाढवणे वाजीब नसे अगरच मोहिबाच्या दिलात नवदिगरं असलिया हजरत साहेबी बंदोबस्ताचा हुकूम फर्माऊन बंदोबस्त करणे तो केलाच आहे आखर वख्ती इलाहीचे दस्तदराज आहेत ज्यादा काय लिहिणे अया जाद काम बाशंद हे विनंती.

लेखांक १११

नं. १०८४ हू

अजम अकरम सकडतार बेलचेर जुजे द
करवाल इस्ताद ईद गोवे दाम दौल
त ज्यादा हू

मोहबतपन्हाई मुखलीषान दस्तगाह अंजी दिलयेखलास येशवंतराऊ सिंदे सुभेदार मुा जंजिरे सिंधुदुर्ग सलाम बाआदज सलाम ऊंकी येथील महवल मखसूद जाणोन आपणाकडील खुदखुषी कलमी निविस्तन करीत जाणे दरविला येथून सर्व मखसूद घेऊन कपित बेलचेर जुजे द करवाल बराबर हुजुरे घेऊन जाऊन आपणास जाहीर करून आपले खातरीज आणून आपली सहयेग्तयारी व तहनामेचे मसुदे घेऊन आला ते नजर

गुजारत होऊन जंजिरेकडून करारी करऊन सिके करून पाठविले आहेत श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब साहेबाचे आज्ञेचा अगत्यवादी आपण दरम्यान होऊन दोस्तीचा जडाब केला हा खातरजमा जाहाला हरदू तर्फेने दोस्ती होणेच्या मजकुरे धणीयाची आज्ञा आम्हास बरचेवर सादर होत आहे या सबब च्यार माहे जंजिरा राहाणे होत आले हाली कपित बेलचेर व मा गण प्रभु याजबराबर आपणाकडील मसुदे लिहून आले त्याप्रमाणे जंजिरेकरीयासी सांगोन हरदू जण मारानिलेकडेस निभावणी करून तहनामेचें कागद करून मोहिबाकडेस सिके निशाणानसी पाठविले आहेत त्याप्रमाणे इस्तादीच्या सिकेनसी व मोहिबाच्या दस्ता कलमी निविस्तन करून तहनामाचे किताबा दोन करून पाठवाव्या म्हणजे जंजिरा येक तहनामा ठेऊन येक हुजूर आम्ही जातेसमई न्हेऊन श्रीमन्माहाराज धणी यास विदित करू पेसजी हुजुरे व कपिता व मारनिले हमरीज श्रीमन्माहाराज धणीसाहेबांच्या थैल्या दोन व मोहिबास किताब दोन रवाना केल्या होत्या त्याचे सालजाब येणे त्यापैकी श्रीमन्मातुश्री साहेबाचे पत्राचे सालजबाब आले माहाराजाच्या पत्राचे जाबसाल आले नाहीत ते हुजूरेखमागमे पाठवावे मुसबी तरांडेचा कझ्या उठोन दोस्तीची करारी जाहाली यासबब धणीयासी पत्रे व तहनामे हुजूरेखमागमे जलद पाठवावे म्हणजे आमचेहि जाणे हुजूर जलदच होईल मोहिबाकडील किताबाचा राह चाहत आहे रा छ २६ मोहरम ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक ११२

नं. १०२६ हू

अजम बेलचियोर जुजे वास दे करवाल
सकटतारे दा मोहबत हू

मोहबत व मुबदतपनाह खुलत व मवाकत दस्तगाह अजी ज्यानीब यशवंतराव सिंदे सुभेदार बाअदज सलाम + आंकी येथील खैर आफियत जाणोन मोहिबी खैरीयत कलमी करून दिल आराम दजीर होये ते करणे वाजीब आहे ईयखलासमंद जंजिरे सिंधुदुर्ग येथे धण्यानी रवाना केले असता आमोहबतपनाह दरम्याने होऊन जंजेरेकराचे सलुखाबदल अजम कपितां बेलचियोर जुजे दे करवाल या हुजूर व जंजिरा

यकदोन मर्तबे पाठऊन तहरह होऊन तर्फैनचा + बेखिलाफ जाहालीयाचा मजकूर श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब व माहाराज राजश्री छत्रपती स्वामीचे खिदमतीमधे मुफसील अर्ज करावयाकरिता हुजूर आलो तहनामे व पत्रे निवेदन केली बयाबार मजकूर मारूज केल्यावरून धणी बहुत संतोषी जाहाले खिलअतसहित पत्रे सादर जाहाली आहेत त्यावरून तफसीलवार यखलासमंदी + मजकूर मालूम होईल बाईबजह राज्याचे तरकीची ख्वाहीष जियादत धरून मुतवातीर खत किताबत इरसाल करून यखलासमंदीची मोहकमी मु + होये ते करणे जंजिरेकराचा व आपला सलूक बेखिलाफ जाहालियाचा मजकूर खतपत्री लेहून हुजूर पाठवावा जियादेचे मोइबत व द अयाम बाद म बाद.

लेखांक ११३

नं. २२३

हू

अजम अकरम साहुकार सेकीन
बंदर गोवा दाममहबत हू

महदत व मुवदतपनाह खसुसियेत दस्तगाह अंजी दिलयेखलास बाहादरखान सरहवालदार व रामाजी संकपाल जंजिरे सिंधुदुर्ग सलाम बादज सलाम येथील खैरखुषी जाणून मोहिबी खुषखबर कलमी केली पाहिजे दिगर जंजिरे याचे अरमारानी पेशजी येक तरांडे धरिले होते त्यावरील उपरी लोक गलबताबरील घातले होते तरांडे घेऊन जंजिरेयास येता वाटेस दर्यामध्ये तीन सेरूकास व जंजिराचे अरमारास गाठ पडली ते वख्ती पाडाव तरांडियाबरील उपरी लोक पाणीयामध्ये उडिया घालोन गलबतावरी येत असता दोष दर्यावर्दी सेरूक तरांडे याणी जबल करून धरून नेले त्या जागा अद्यापि अटकेत ठेविले आहेत येसीयास तुम्हाकडील कागदी डोणी उपर जातयेत आहेत त्यास जंजिऱ्याचे आरमारास दाखल जालीयावरी रजा देऊन घालवीत आहेत तैसेच तरांडी पैदास्त जालीयावरी फिरंगी व पाद्र कितेक लोक सापडत आहेत जंजिरेयास आलियावरी त्यास खर्चवेच बेगमी वस्त्रे देऊन रजा देत आहेत हे गोष्टी तुम्हास सर्वास दखल आहेत सालगुदस्ता डोण उपरास जात होती ते आरमारानी धरून आणिली त्यावरील लोकास जंजिरा अटकेत ठेविले होते त्यास येथील साहुकार लोकी अर्ज केला कीं + + सोडून द्यावी हे गोव्यास गेलीयावरी साहुका + + सांगोन दर्यावर्दी लोक सोडून देतील त्यावरून डोणीस

रजा दिली परंतु दर्यावर्दी लोक सुटोन आले नाहीत त्याकरिता हाली डोण नोडतीस जात होती ते धरून आणून त्यावरील लोक अटकेत ठेविले आहेत आणि अजम अकरम विजरई यास किताबत पाठविली असे ते तुम्ही आपल्या मुख्यास जाहीर करून दर्यावर्दी लोक सुटोन येत ते गोष्टी करणे जंजिराचे दर्यावर्दी लोक सुटोन आलियावरी डोण व कागदपत्र लाखोटे अटक करून ठेविले आहेत त्यास सोडून देऊ ज्यादा काय लिहिणे मोहबत असो देणे हे किताबती.

लेखांक ११४

नं. १९८७ हू

अजम अकरम दों किस्तोब दमेल जाम मह
बत हू

महदत व मूवदतपन्हाह खसुसियेत व मवादत दास्तगाह अंजी दिल येखलास बाहादरखान सरहवालदार व रामाजी संकपाल जंजिरे सिंधुदुर्ग सलाम बादज सलाम मशहूद आंकी येथील खैरखुर्श जाणून मोहिबी खुश खबर कलमी केली पाहिजे दिगर जंजिराचे अरमाराने पेशजी येक तरांडे घेऊन जंजिरे यास अरमार येता बाटेस दर्यामधे मोहिबाकडील तीन सेरकास व अरमारास गाठ पडली ते बख्ती पाडाव तरांडीयावरील उपरी लोक गलबतावरील घातले होते तरांडे घेऊन जंजिरेयास अरमार येता बाटेस दर्यामध्ये मोहिबाकडील तीन सेरकास
लोक पाणीयामध्यें उडिया घालोन गलबतावरी येत असता दोघ दर्यावर्दी सेरूक तरांडे याणी जबल करून धरून नेले त्या जागा अद्यापि अटकेत आहेत मोहिबाची व जंजिराची गैरसला याबाबे तरांडी धरावी लागतात त्यास तरांडे सापडलियावरी मोहिबाकडील लोक व पाद्र फिरंगी सापडतात जंजिरे यास आणलियावरी त्याची खर्चवेच्र बेगमी वस्त्रे देऊन त्यास सोडून देत आहेत ये रवेसीने येथील अमल चालत असता मोहिबी दोघ दर्यावर्दी अटक करून ठेवावे हे बात वाजीब नसे मोहिबाकडील सालगुदस्त येक दोन डोणी कागदी उपरास जातायेता जंजिरेयास दाखल जालियावरी अटक करून ठेविले त्यावरी येथील साहुकार लोकी अर्ज केला कीं हे कागदी डोण आपल्या जाग्यास गेलियावरी मोहिबास हकीकत दाखल करतील जंजिरेयाचे

दर्याबर्दी सोडिती म्हणून अर्ज केला त्यावरून डोण व कागद रजा दिली परंतु जंजिराचे दर्याबर्दी लोक सोडिले नाही त्याकरिता हाली डोण कागद नोडतीस घेऊन जात होते ते अटक करून ठेविले असेत दर्याबर्दी यास सोडिले आणिं अजम अकरम विजरई यास किताबत पाठविली असे मोहिबास जाहीर होईल तरी जंजिराचे दर्याबर्दी लोक दोघ जण सुटून आलियावरी डोण व कागद मोहिबा कडील जात आहेत त्यास रजा दिली जाईल जियादा काये लिहिणे मोहबत असो देणे हे किताबत.

लेखांक ११५

नं. २०२२ हू

अजम मारकेज दे तांब्र नोकास्तेल विज
रइ बंदर गोवे शादकाम बाषंद

अमारत व अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाह बादज इस्तियाक फिरावा मशहूद आंकी जंजिरे सिंधुदुर्ग येथील गलबते स्वारीस रवाना जाहाली होती ती बादालामुले गोवेच मोहारावर नांगरली होती त्यासी आअमारतपनाह याच्या गलबतानी जंग अखीम करून नागीग गलबत पाडाव केले त्यावरील लोक कैदत ठेवल आहेत म्हणोन जाहीर जाहाले अज्यानाकडे इजानबाचा व आअमारतपनाह याचा दोस्तीचा खाबीत अज कदीम अलअयाम बेखिलाफ चालत आहे त्या इतबारावर जाऊन गलबते मोहारावर नांगरली असता अैसी नासजा गोष्ट करणे हे ही मावेनचे यखलासीस नुकसांपजीर आहे बअदजी अजगाह दोस्ती व येक जबती गलबत व मर्दुमे सोडून देऊन जंजिरे मजकुरास पोहचवणे बाअस इस्तिहकाम मबादमु व दरास्त मुफसल मजमून माहादाजीकड हुजूरे याचे जबानीवरून बाजब होईल जियादाच निगास्त अयंद अदम बकाम बाद.

लेखांक ११६

नं. ८ हू

अजम मारकेज दे तांब्र नोकास्तेल विजरई
बंदर गोवे शादकाम बाषंद

अमारत ब अयालतपनाह शौकत व हशमत दस्तगाह बादज इस्तियाक फिरावा मशहूद आंकी मोहबत नमब हमराह माहादाजी हुजूरे पाठविले ते पाहून सरूर व शादमानी हासील जाहाली जंजिरे सिंधुदुर्गकरीया साहुकारी गलबत गर्क केंले त्यामुले जंजिरेचे गलबत धरून नेले म्हणोन लिहिले अशास इहतीदायेपासून फिमाबाची यखलास चालत असता हे गोष्ट कधी घडणार नाहीत तथापि तुमच्या लिहिल्याबरून जंजिरकरी यास हुजूर आणून नसीहत करून बादपूस मनास आणिता त्याणी शफत आपणाकडून हे कर्म जाहाले नाही म्हणोन जाहीर केले दुसरेकडून जाहाले असेल न कले दोस्तीचे जागा अैसी नासजा गोष्ट होते कीं काय बअदंजी कदीम येक नहतीबर नजर देऊन गलबत लोकसुधा सोडून देणे तेणेकडून चालत आले यखलास + + इस्तीद कामी होईल सविस्तर मारनिलेचे जबानीवरून मालूम होईल जियादाचा निगास्त आयेद अयाम बकाम बाद.

लेखांक ११७

नं. ६० श्री

राजश्री सुभेदार नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग याकडे पत्र निवतीच्या मुकामी यकबालपनाह सियोर मारकेज इजरये याचे प्रत्योतर जे कोणी भला माणोस पाठवणे याचा मजकूर काये कोण गोष्ट. १

हाली आगमन जंजिरे सिंधुदुर्ग येथे जाहाले + आहे तरी आपले तर्फेने कोणी मातबर भला माणोस पाठऊन श्नेह वाढवावा. १

माहाराज राजश्री याचा अभिप्राय जो तुम्हा + + कर्तव्यता करणे हा मजकूर उभयेमक्षी समजोन करावा येणे करून युक्त आहे. १

जाबसाल करून जलदीने रवानगी करावी + १

भोसले याकडील ठाणी घेतली आहेत ती स्वाधीन करावी म्हणज पुढा रयतेचा नांदणुक सुप्रयुक्त व्हावी. १

माहाराज श्री स्वामी याचा मनोगत येसा जे फिरंगी व भोसुले याचा कजिया आपले इदमानेवरून रयत मुलुक सुधामत नांदावा याचा विचार काये. १
येणेप्रमाणे धणी याच्या आज्ञेने तुको शामजी + व मलोजी मालप याही येकबालपन्हा सियोर मारकेज इजरई यास सुत केले असे जलदीने जाबसाल करून रा। करणार हे ✕ आहेत हे विनंती.

लेखांक ११८ तारीख २७-२-१७८६

नं. १२८३ हु

अजम अकरम फ्रासिस्क
गोवर्णदोर य कपिता व जनराल
जंजिरे गोवा

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा आजी राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई पा कुडाल व माहाय सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत आसिले पाहिजे दिगर आंकडे आमोहिबाकडून किताबत येऊन दिल आराम होत नसे तरी हरवख्त आमोहिबी किताबत पाठऊन खुबवख्त हासील होय ते बात कराबया मोहिब + आसा यानंतर माहाराज करवीरवासी याची स्वारी करवीराहून निघोन छ २५ राखरी किले प्रसीधगडास दाखल जाहाली तेथून खाली उतरून मालवणास जाणार येसे बर्तमान आहे समागमें स्वार जमाव मिलोन तीन च्यार हजाराचा भरिणा आहे व स्त्रियाहि माहाराजांच्या बा। आहेत समुद्रस्नानाचा लौकीक आहे आणखी काय मतलब असेल तो कलत नाही समजल्यासारिख मागाहून आमोहिबास लिहिण्यात येईल स्वारी आल्याचे बर्तमान मोहिबास कलावे जाणोन कलमे केले आहे दुसरा मजकूर गोवेहून उडीद खरेदी करून आणविणार त्यास मोहिबातर्फेने आटकाव न पडावा यविसी चौकीयास व जकातीचे अमलदारास ताकीद आसावी म्हणजे जलमार्गी किंव्हा खुसगीने सोई पडेल त्याप्रो। आणिता येइल. चौकींदारास व जकातदारास ताकींद केलीं पांहिजे रा छ २७ राखर ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दींजे हे किताबत.

लेखांक ११९ तारीख १४-१-१७८८

नं. ७४१

सिंयोर ज्योकी विसेंत गुदींज्य

सलाम बादज सलाम येथील नेकी जाणोन साहेबाकडील कारनेकी फरमावित असावी दिगर हकीकत जे श्रीमंत राजे कोलापुरकर यास व भोसलेच्या जमाबास जुंज तलेगावी जाहाले भोसले याच्या जमावाचा मोड जाहाला त्यात भले माणूस सरदार कोलापूरकार याणी भोसले याचे न्हेले बीतबसील

(डावी बाजू)

१ राजेश्री कुसोबा सबनिवीस

१ राजश्री मायेगावस उसपकार

१ राजश्री दामे गावस उसपकार

१ बाबायामाना राजश्री खेम सावत सरदेसाई
याचा खवास

(उजवी बाजू)

१ राजश्री सोम सावंत माणगाऊकर व त्याचा
पुतेणा

१ रा खिदबा + नाईकवाडा

१ रा पांई सावंत

या प्रो सरदार लोक धरून न्हेले सिवाई जमाऊ दोनसे अडीचसे होईल पांचसे सातसे बंदुक होईल जमाव मालवणच्या किलेयावर बंदीस रवाना केले असी बातमी आहे याप्रा बातमी करार सद्या कोलापूरकार याचा मसुऱ्याच्या किलेयास जाऊन जुंज होते हे किताबत

गोपाल प्रभु देसाई

लेखांक १२० तारीख १४-१-१७८८

नं. ७४१–अ श्री

बातमी करवीरकार फौजसुधा घोटकेचे घाटे खाली उतरून नांदोसीस तल दिला सरकारचा जमाव राजश्री सिवराम जिवाजी सबनीस व राजश्री सोम सावंत भोसुले वगैरे येसे अगोदर तलगावास राहून नांदोसीचे रान धरून त्याचे गोटावर तोंड लावावे येसे करोन गेले होते त्यास हा जमाव नांदोसीस आहे येसी बातमी लागताच ते सावध जाहाले हिकडील जमाव निकट त्यावर करावा ते न करिता उज्याडलेनंतर काल मंगलवारी गनीमाचे फौजेवर तोंड लाविले गनीमाकडील राऊताचा भरणा याची पाईच्या लोकाचा काट त्यावर न चालिला तेव्हा ह्या लोकानी कच खाऊन चोसीकडेस च्यार जाहाले सिवराम जिवाजी व सोम सावंत भोसुले व आणखी येकदोन आसामी याचा पथा काही अजोन लागला नाही मागोन सविस्तर लिहून पाठऊ गनीम शेहर होत चालिला तेव्हा ह्या लोकाचा अवसाने व करतुत्व कललेच आहे तेव्हा परदेसी सिबबंदी ठेविलेवाचून परिणाम नाही सदरहू बातमी तुम्हास कलावी याकरिता लिहिले आहे उक्त नसावी छ ४ राखर

लेखांक १२१ तारीख ८-२-१७८८

नं. ९९१ हू

अजम आकरम सेबास्तिया व जुजे फ्रेरेर

बारोंक सक्तार्ये दो इस्ताद दाम सोहबत हू मोहिबानपन्हा मुखलिसान दस्तगाहा आंजी विसाजी माहादेव सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दिगर मोहिबी करारापेक्षा विशेष फौजेची व सरंजामाची तरतूद करून श्रीमंत राजश्री राजेबहादर सरदेसाई याचे कुमकेस रवानगी केली ते कुली लस्कर पेडणेपलीकडेस सातडे व पुढा मडुरे मलगावपर्यंत वाडीनजीक गेले आज मलगावास आगाडी पोहचताच वाडीचा जमाव तेथ येऊन सामील होणार अजम अजुदात जनराल हे मुकाम मजकुरी पोहचताच खासा राजेबहादर फौज कुली तूर्त असेल ती वाडीचा बंदोबस्त राखून बरकड जमाव व राऊत हती अंबारी निशाण नगारे अवघे

सलतनतसुधा येऊन सरदारास भेटणार नंतर गलीमावर जाणेची तजवीज उभयेपक्षीच्या विचारे करून स्वारी करितील माहाराजाचा मुकाम वेंगुर्लेस आहे वरकड त्याचा जमाव व स्वार रेडीकडेस गावगना लुटीस फिरतो काल आरमार त्याचे रेडीनजीक आले तेथ इस्तादाचे आरमाराची गाठ पडून चांगला मार देऊन पलविले येकादी गुराब त्याची दस्त केली असणार बातमी आहे पळून गेली तरांडी त्यावर आरमार गेले आहे गांठ पडताच जाळून टाकतील बचन दिलेप्रमाणे येकबाल व इजलालपन्हा गोबर्णदोर ये कपितां व जनराल दो इस्तादसाहेबी निदर्शनास जेनाच्या आणिले व सरदेसाई राजेबहादर याची पूरी खातरजमा केली तो संतोश कोठबरे लेहावा सर्वत्रात कर्तुत्व करून दाखविलेची शर्त जाहाली आज तागायेत बहुत प्रसंग सरदेसाई याजवर पडिले परंतु या अन्वये कोणीच साहित्य केले न्हवते इस्तादाचा लौकीक भारी जाहाला आता आंगिकारिले ते पुर्तेपणी सेबटास न्यावे ठाणी माघारि घेऊन गलीम राज्यातून काढून द्यावा स्वस्थानचा बचाव करून राजेबहादर निर्वेद हजरतीचे कल्याण इछून मोहिबाकडेस बिस्वास सर्व प्रकारे ठेऊन बर्तेत असे करणार मोहिबा आहेत इजानेबा तंव मोहिबाचे आशेसिवाई नाही बरीबाईट सेवा केली ती मान्य करून घेऊन इजानेबाचेही उर्जित यातच करावे हे मोहिबाचे दिल आहे पूर्ण भरवसा मानून स्वस्थ आहो गोबर्णदोर साहेब ब राजेबहादर उभयेता येकरूप तेव्हा इजानेबाचे सर्व मनोरथ सिधीस जातील राजेबहादर उभयेताच्या कर्तुत्वामुले फारच आभारी आहेत येक वेल मुलाखत व्हावी हेच इछितात अजम अकरम मार्च्याल दे कांप हे येतील आपण भेटीस जाणार तर तुम्ही यावे तसेच माघारे जावे म्हणोन धणीयाणी इजानेबास आज्ञा केली आहे निकडच असली तर याबराबर जाऊन येतो रा छ २९ राखर ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असावी हे कितावत.

लेखांक १२२ तारीख ११-३-१७८८

नं. ९ हू

अजम अकरम फ्रासिस्क दा नुमज ये मिनेज
गोवर्णदोर ये कपिता व जनराल व दाइस्ताद
देईद जंजिरे गोवा बार मसनद हुकुमत मु
तकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा अंजी राजे खेम सावंत भोसले बहादर सरदेसाई पाा कुडाल व माहालानिहाये सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमें करीत असिले पाहिजे दिगर राजे करवीरवासी याजकडील मनुत्र इस्ताद यासी बोलीचाली करूख आला त्याणे आपले धण्याची येख्तीयारी आणिली नाही म्हणोन याकरिता मागुती येख्तियारी आणा-बयाकारंता फिरोन गेला आहे म्हणोन इजानेबास राजश्री विसाजी माहादेव वकील याणे कलमें केलेवरून मालूम जाहाले मोहिबास पुणेचे पत्र आलेची बातमी कलली तोहि आशय मोहिबी कलवावा इजानेबाकडील मजकूर तर राजश्री पंत प्रधान याजकडील कारकून रा बालाजी गणेश म्हणोन आला आहे तो परभारे राजे करवीरवासी याजकडेस गेला आहे आण इजानेबाकडेस येक कारकून मातुश्री सकूबाई सिंदे मामीसाहेब याजकडील व येक इजानेबाचा यैसे दोवे आले आहेत त्याजकडील बोलणेचा आशये कीं नरसीगड व हेरे तालुका तूर्त राजेकडेस असावा बरकड किलेचा वगैरे जाबसाल इजानेबाचे उरकोन देऊन राजे करवीरवासी याणी फौजसुधा माघारे आपले स्थलास जावे उपरांत नरसीगड व हेरे तालुकेचा प्रकार पुणेमधे होणे तो होऊन नरसिगड व हेरे तो स्वाधीन होईल म्हणोन आहे बालाजी गणेश याचे लिंहिणे इजानेबाचे व सिंदेकडील कारकुनास येणेविसी आलेवरून आज मालवणास राजेकडेस गेले आहेत ते तेथून बोलोन आलेवर जे घडेल ते मोहिबास कलमें करून पाठऊ हालीचा मजकूर इजानेबाकडेस आलेला मोहिबास मालूम होणावास्ता कलमें केला असे सर्व प्रकारे मोहिबी इजानेबाचा अभिमान धरोन कुमक केली आहे त्यापेक्षा जे करणे ते मोहिबाचे विचारास आणोन इजानेबास करणे मोहिबासिवाई कांहीच करणे नाही येविसीचे वकील मारनिले मोहिबास जाहीर करतील त्याजवरून कलेल रा छ २ माहे जमादिलाखर ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १२३ तारीख १-९-१७८८

नं. २७०३ श्री

आजम फ्रांसिस्क नुमज ये मीने
ज गोवर्नदोर कपितान जनराल
बंदर गोवा दा मोहबत हू

शाहामत आवली मर्तबात व हशमत व मबाकत दस्तगाह यत जात दोस्तान अनज्यानीब माहादजी सिंदे सलाम फरहत अज्याम आंकी येथील खेरखुषी जाणोन आपली खेरखुषी हमेशा कलमी करीत जाबी दिगर राजश्री राजे खेम सांवत बहादर भोसले सरदेसाई प्रांत कुडाल व मानिहाय याची व आपली दोस्ती पहिलेपासून चालत आली आहे त्यास करवीकर याणी राजेबहादर याचे मुलकात फौज पाठऊन हंगामा केला त्यावरून आपण सरदेसाई याचा उपराला केला म्हणोन कलले त्यास दोस्त आहेत त्यास हेच लाजम आहे राजेबहादर याचा उपर आपण केला हे समजल्यावरून बहुत खुशी जाली त्यास पुढेहि स्नेह चालत आल्याप्रमाणे चालऊन पुढे हरयेकविसी कामकाज पडल्यास सरदेसाई याचा उपर करीत गेले पाहिजे रा छ २९ जिलकाद.

लेखांक १२४ तारीख १९-११-१७८८

नं. २६ हू

अजम आकरम येकबाल व इजलालपन्हा
फ्रासिस्क दा नुमज ये मीनेज गोवर्णदोर
कपिता व जनराल दा ईद जंजिरे गोवे
दाम दौलत हू

मोहिबानपन्हा मखलीसान दस्तगाहा आंजी धोंडो कृष्ण नामजाद व कारकून केले पारगड सलाम बाजत सलाम येथील नेकी जाणोन कारनेकी कलमे करून दिल ताजा करीत असिले पाहिजे दिगर आपण किताबत पाठविली ती पावली त्यावरून बहुत संतोष जाहाला इकडील मजकूर तर यथास्थित आहे राजकी वर्तमान तर आमची माणसे तासगावास गेली तिकडील बातमी तर कोलापुरी फौज तयार होत आहे मसलत कोणीकडे ही कलत नाही परंतु गुदस्ताप्रमाणे घडावे येसे दिसते कोणा ग्रहस्ताचे सांगणे

आले जे तिकडील सोई जाहल्यास तुमचे कार्य बहुतच होईल त्यास उतर सांगणे ते खचीत सांगोन पाठविले ज्याअर्थे श्नेहभाव तेव्हा वचनास गुंतलो नाही धारवाडात काही बार आले आहेत पुढे मनसबा समजत नाही म्हणोन बाजारी बातमी आहे किलाचा तनखा पुरातन ता डिचोली व ता पेडणे येथे येणे त्याविशी पेसजी लि॥ त्यास डिचोलीची बोडद जाहाली ता पेडणेची जाहाली नाही तीहि द्यावी खालाबाद यैवज गावकरी याणी येथील बरातदार याजवल द्यावा ही चाल. हाली आपले बरातदार वसूल करतात म्हणोन कलले तर आपला व किलाचा श्नेह; तेव्हा चालत आली गोष्ट त्यास विपर्यास नसावा व गावकरी याणी लबाडी करून कमी रुा लिहून दिल्हे याची चौकसी बरी करवावी आण नेमणुक पुरातन आहे त्याप्रो ताकीद करून देवावी वरकड मजकूर कितेक रा सखोबा सांगता कलेल मुख्य गोष्ट तुमचा आमचा श्नेह दिवसेदिवस अधिकोतर चालतेला करावे ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १२५

तारीख ८-३-१७८९

नं. १७३५

अजम सेबास्तिया व जुजे फेरर बा
रोक सक्रतार्य दाइस्ताद दे ईद
जंजिरे गोवा महफुज्य बाशंद

मोहिबा यखलास असार शहामत हिसार आंजी राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें केली पाहिजे दिगर राजश्री पंत प्रधान याजकडील कारकून राजश्री बालाजी गणेश याचे पत्र आलेवरून राजश्री सीताराम आनंत मातुश्री सखुबाई मामीसाहेब सिंदे या निसबत व इजानेबाकडील राजश्री कृष्णाजी माहादेव मालवणास बालावलीहून गेले आहेत राजश्री पंत प्रधान याजकडील बोलणेच्या ठरावा-नरूप करवीरवासी याजकडून जाबसाल उरकून आल्यास उतम कदाचित मोर्चेलाविसी आग्रह केल्यास कसे करावे म्हणोन अजम मार्च्याल दे कांद याजकडेस कलमे केले होते त्याणी अजम अकरम गोबर्णदोर यास कलम केलेच असेल आशास मातुश्रीकडील

व इजानेबातर्फेच्या कारकून माल्वणाहून आताच आले त्यास करवीरकराकडील बोलणेचा भाव पाहाता मोर्चेले स्वाधीन करावी हाच दुराग्रह आहे राजश्री पंत प्रधान याचे बोलणे करवीरवासी अमान करितात पुढा याची योजना मोहिबाचे विचारे कसी करावी ते मोहिबी कलमे करावी जाहालेला मजकूर बर्चेवर अजम मार्च्याल दे कांद यांस कलमे करीतच आहो व हाही मजकूर त्याजकडेसही लिहिला असे रा छ १० जाखर ज्यादा काय लिहिणे मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १२६ तारीख १३-७-१७८९

नं. १३

हू

अजम अकरम फ्राखिस्क दा नुमज्य ये मी
नेज गोवर्णदोर ये कपिता व जनराल जं
जिरे गोवा दाइस्ताद दे इंदै बार मस
नद हुकुमत मुतलाकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा अंजी राजे खेम सावंत भोसले बाहादर सरदेसाई पा कुडाल व माहालेनिहाये सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमे करीत असिले पाहिजे दिगर मोहिबी किताबत पाठविली ती पोहचलीन दील आराम जाहाले मोहिबा तर्फेचा कारकून पुणेस रसीद होतील पाहावे इजतमाब नारायेणराव विठल धुमा यास मोहिबातर्फेचे साहित्यास ते सरकारात टाकेल तेप्रमाणे करणेविसी निगारस केली अस म्हणोन मोहिबी कलमे केले त्याजवरून इजानेबास संतोष जाहाला कां जे सर्व प्रकारे इजानेबाचा व या संस्थानचा अभिमान धरून बर्चेवर स्मरणपूर्वक साहित्य होत आहे तेव्हा मोहिबाचे वचनाचा द्रुढोतर भरवसा आहे तेथ विस्तारे कलमे करावे असे नाही करवीरास कारकून राजश्री सीताराम अनंत दिा मातुश्री सकूबाई सिंदे मामीसाहेब याजकडील रवाना जाहाले त्याचे खत इजानेबास आले त्यात मजकूर कीं मोर्चेल आपणासंनिध द्रुष्टीगोचर करून मग आपण तुम्हास देऊ आण घेतली ठाणीहि स्वाधीन करू परंतु कांही दरबार खर्च व बहुमान माहाराजास इजानेबातर्फेने देणे पडेल अशा मतलब करवीरकरातर्फेने सांगत आहेत केवल खातरजमा निश्चयातील नाही हे बात मोहिबास मालूम व्हावे आण मोहिबाचे विचारास सदरहु

मतालब येतो न येतो ते इजानेबास कलवावे करवीरकराकडील निश्चयाचा जबाब समजोन घेऊन मारनिले कारकून पुण्यास जाणार मोहिबाकडील उतर जलद यावे रा छ १९ माहे सबाल जादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १२७ तारीख २५-९-१७९३

नं. २५७९

अजम आकरम फ्रासिस्क दा येकी
न जे गोवर्णदोर ये कपिता ब जनराल दा ई
स्ताद दे इंद जंजिरे गोवा बार मसनद हुकू
मत मुतलाकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा अंजी राजे खेम सांवत भोसले बहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमें केली पाहिजे दिगर इजानेबाकडील कितेक जाबसाल राजश्री विसाजी माहादेव वकील यास कलमें केला होता त्याणी मोहिबासी मालूम केला असेल त्याजवरून इजानेबाकडील जाबसाल मोहिबाचे दिलात आला असावा मुख्य गोष्ट मोहिबास इजानेबातर्फेचे काजकामाचे अगत्य त्यापेक्षी मोहिब जेणेकरून या संस्थानचे कल्याण तेच करतील हाच इजानेबाच्वा खातरजमा आहे इजानेबाचा व करवीरवासी माहाराज याचा बिघाड येविसीचा जाबसाल उभयेपक्षीचा पुणेच्या दरबारी पडून आम्हाकडील कारकून दरबारी जाबसालास आहेत तो मजकूर मोहिबास पेसजी कलमें केल्यावरून अवगत आहेच आलीकडील वर्तमान तर संस्थानाकडेस यैवज ठराविला होता त्याची सावकारी निशा दरबारी देऊन राजश्री रामजी पाटील जाधव दिा राजश्री माहादजी सिंदे याणी व मातुश्री सकुबाई मामी सिंदे याजकडील व इजानेबाकडील कारकून याणी दरबारी बोलणे करून करवीरकराकडे प्रांत ठाणी इजानेबाची गुंतलेली इजानेबास हस्तगत व्हावी व बादशाई बहुमान आल्याप्रमाणे चालावा याप्रो ठराव करून घेतला करवीरकराकडील वकील पुणेस होते त्यास ताकीदी जाहाल्या मागाहून ठाण्याच्या सोडचिठ्या घेऊन बरकड कागदपत्र उगऊन इजानेबाचे कारकुनाची रवानगी सत्वरच होणार या अन्वये प्रस्तुत पुणेहून लिहिणे इजानेबास आले ते वर्तमान मोहिबास कलावे

जाणोन कलमे केले असे तह बनावाचे वख्ती मोहिबी कितेक प्रकारे इजानेबास भरोसायुक्त खातरजमा केल्याअन्वये साहित्याची पैरवी हरयेक बाबे सेवटेवर होऊन आल्यास इजानेबाकडील कार्यभाग होऊन यावयास बिलंब न लागता. असो, अजोन हरयेकप्रकारे मोहिबा इजानेबाचे साहित्यास अंतर न कराल हाच इरादा इजानेबी मानिला आहे सर्व बकिलाचे मुखे जाहीर होईल रा छ १७ माहे मोहरम जादा काय लिहिणे प्यार मोहत असो दीजे हे किताबत.

लेखांक १२८ तारीख ३-१०-१७९३

नं. ४९

अजम अकरम जुजे कैतान
सक्तार दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलिसान दस्तगाहा येहती ज्याद दोस्ता अजी दिल येरबलास बहिरो रघुनाथ सलाम बादज सलाम महवल मकसूद आंकी येथील खैरसला जाणून मोहिबी आपली खुषवख्ती हमेशा कलमी फर्माबित अखिले पाहिजे दिगर मोहिबाकडून राजश्री कृष्णराव धुमे आले ते नेक वख्ती येऊन पोहचले मोहिबाचे खत इज्यानेबास होते ते दिल्हे व दोस्तीचे यखलासीचा मजकूर बयान केल्यावरून दिलास बिसयार खुशी व खुरमी जाली दोस्तास हेच लाजीम आहे कीं दिनबदीन दोस्तीची ज्यारी असावी इज्यानेबा हेच च्याहात आहेत बरकड धुमे याणी आमोहिबाचे मर्जीचा खुलस सावंतप्रकरणी व जिवबा केरकर यांचा मजकूर तपसीलवार सांगितल्यावरून कलला कृष्णराव धुमे याची भेट श्रीमंताची व मदारूलमाहामसाहेब यांची केली व मजकूर सावंत प्रकरणी व दोस्तीचे बयान केले आज्यानीबाचे सरकारचा व या सरकारचा कदीम घरोबा व सावंतहि स्वराज्यातील सरदार त्यापक्षी उभयताचे अगत्य सरकारास तेव्हा परस्परात कलह नसावा हे दिलात आणोन इस्तादाकडील मजकूर समजोन घेऊन सावंताकडील बोलणार हुजूर आणऊन जाबसालाचा फडशा करावा उभयताचा खटला तेथे होऊ नये याजकरिता मदारूलमाहाम याणी आपल्यास पत्र लिहिले आहे त्यास आपल्या तर्फेचे जाबसाल काय असतील ते धुमे यास लिहावे समजोन सरकारात विनंती करावयास येईल कैलासवासी नारायणराव धुमे इस्तादाकडोन या सर-

कारात कामकाजास होते त्याणी दोनही सरकारची दोस्ती जाजतीच केली व कामकाजेही दोही सरकारच्या संतोष राखोन करीत गेले याची माहितगारी मोहिबास आहेच तेच दिलात ठेऊन हाली मजकुरात सांगोन मारनिल्हेस येथे पाठविले त्याजवरोन खुषी जाली हमेशा खत पाठऊन खुषी करीत गेले पाहिजे रा छ २६ सफर ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो द्यावी हे किताबत.

लेखांक १२९ तारीख १०-१२-१७९३

नं. १० हु

अजम अकरम फ्रासिस्क दा नुमज ये मिनेज
गोवर्णदोर ये कपिता व जनराल दा
इस्ताद दे ईंदे जंजिरे गोवा बार मसनद
हुकुमत मुतलाकी बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिसेमत दस्तगाहा आंजी राजे खेम सावंत भोसले बहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत असले पाहिजे दरीविला करवीरकर माहाराज याजकडेस किले नरसिंहगड व भरतगड व निवती होती ती ठाणी प्रांतसुधा इजानेबाचे स्वाधीन जाल्याचे वर्तमान आमोहिबास कलमे केल्यावरून मालूम जाहालेच आहे सिदगड राजश्री पंत प्रधान याजकडेस राजश्री गंगाधरपंत सुभेदार प्रांत जंजिरे विजयदुर्ग या निसबतीने होता तो हाली छ ४ जमादिलोवली इज्यानेबाचे ठाणे किलेस पडोन स्वाधीन जाहाला हे संतोषाचे वृत्त आमोहिबास ज्याहिर होणेबाबे कलमें केले असे रा छ ६ माहे जमादिलावल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १३० तारीख २३-१-१७९७

नं. १७ श्री

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री
लिंगस्तात भोगुण कामत स्वामी गोंा

विनंती विशेष इकडील वर्तमान श्रीमन्माहाराजाची फौज गोमंतक प्रांती रवाना होणार त्याकडील सरदार श्रीमंत राजश्री पंत अमात्य व राजश्री प्रीतीराव च्वाण हिमतबहादर याची नेमणुक जाहाली आहे फौजेची तयारी होत आहे फौज स्वार तीन हजार व पायदल दोन तीन हजार रामघाटाने खाली उतरणार किव्हा रांगणा घोटगेच्या घाटाने सावताच्या मुलकातून तिकडे येणार याप्रो बोलवा आहे कोलापुराकडे फौज दाहा हजारपर्यंत जमली आहे इचलकरंजी मिरज कुर्दबाड तीनी जागेत स्वार व पायदल सातआट हजार पर्यंत जमले आहे त्याची दरख खाऊन तूर्त च्यार दिवस तुम्हाकडे येत नाहीत तत्राप आल्यास पाच हजार तुम्हाकडे येईल पाच हजार कोलापुरास राहील इचलकर्जींकराचा वगैरे त्यास भरवसा पुरत नाही असे आहे राज्याकडील मसलत कोणास समजत नाही सांगावे येकीकडे आण जावे येकीकडे असे त्याचे च्यालले आहे विश्वास देऊन अविश्वास करितात नेहमी बातमीस माणसे पा आहे तुम्हाकडे येणार जाहाले म्हणजे लिहून पाठवितो तुम्हाकडील वकील पुण्यात आहेत त्यास लिहून पाठवावे आण कोलापुरास ताकीद आणवावी जे गोमांतक प्रांती फौज जाऊ नये असा बंदोबस्त करावावा आण पारगड भीवगड यास ताकीद आणवावी जे गोमांतकाकडे फौज उतरल्यास तुम्ही कुमक करावी अैसी पत्रे आणवावी तुम्ही घाटाचा वगैरे बंदोबस्त करून फार सावध असावे अवसान न सोडावे तुमच्या बातम्या परभारे असतील परंत अढलले वर्तमान तुम्हास लिहिले असे सविस्तर मेदास सांगता कलेल फौज येथे आम्हास तुम्हाकडील हजार पाचसे जमाव पा द्यावा सविस्तर पाद्री याणी लिहिले आहे कलावे बहुत काय लिहिणे रा छ २४ माहे रजेब सायंकाल हे विनंती.

लेखांक १३१ तारीख २०-६-१७९७

नं. १६६ हू

अजम फ्राखिस्क अंतोन दा वियगा
काब्राल तेनेंत गोवर्णदोर कपितान बं
दर गोवा दाम महबत हू

बसालत व अयालत मर्तबात हशमत व शौकत मजीलत अजी ज्यानीब बालाजी जनार्दन बादज महश्रूद आंकी खेम सांवत भोखले सरदेसाई प्रांत कुडाल व माहालानिहाये याणी आबसालतपन्हासी खलष लाऊन बंदगान जनाब माहाराजे साहेबवाला मकान करवीर यास अर्ज करून त्याजकडील फौज आणून गोवे प्रांतात मोहिम केली अंजी बायस आंअयालत मर्तबतानी मोरो बाबूराव निा वासुदेव गोविंद याजकडे बोलणे लाऊन ये बाबेचा बंदोबस्त सरकारातून व्हावा त्याजवरून मवसूफ याणी सरकारात कलमी केले व सदरहु मजमून वासुदेव गोविंद याणीहि मुफसल इजहार केला त्याजवरून सरकारची व आमर्तबताची दोस्ती व यकज्यहती कदीमुलअयाम चालत आली आहे हे दानिस्त करून दोन तीन मर्तबे माहाराजास इलतीमास कलमी केल्यावरून सांवतानी फौज कुमकेस नेली होती ते वापस आणविली तेव्हां दंगा व्हावयाचा मना जाहलाच असेल त्यास आमर्तबताचे बोलणे मोरो बाबूराव यासी होऊन याचे हमराह आंहशमतपन्हानी बालोजी नाईक भोखले यास पाठविले त्याणी मजकूर समजाविला तो कुल दर्याफ्त जाहाला त्यास फिलहाल देसक आहशमतपन्हाचे मुलकात राहून तो चांदगडे तालुके कलानिधी येथे दंगा करितात बिनाबरा आज्यानीबाकडील बोलण्याचा व तालुक्यातील बंदोबस्ताचे वगैरे मजकूर सांगोन वासुदेव गोविंद व मोरो बाबुराव यास पाठविले आहेत व याचे हमराहा नाईक मजकूर याची रवानगी केली आहे त्यास आंमोहिबाचे बोलणे मोरो बाबूराव याजवल ठरावात आले आहे त्याबमोजीब फडशा कराव आमर्तबताकरिता पोषाग व जवाहीर रकमा अजराह यखलास पाठविल्या आहेत त्याच तपशील फर्द आलाहिदा असे त्याप्रमाणे घेऊन पावलियाचा जबाब पाठवावा हमेषा खत मरकूम करून खैर आफीयत कलमी करीत असावे रा छ २४ जिल्हेज ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक १३२ तारीख २२-६-१७९७

नं. २६९५ हू

अजम फ्रांसिस्क अंतोन दावियगा
काब्राल तेनेत गोवर्णदोर कपितान बंदर
गोवा दाम मोहबत हू

बसालत व अयालत मर्तबात हशमत व शौकत मजीलत मकज दोस्तां बादज शौक मशहूद जमीर मुनीर गर्दानीदः मे आयद दरीबिला खेम सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल माहालानिहाये याणी आंबसालतपन्हासी खलप्र करून बंदगान जनाब महाराजे साहेबवाला मकान करवीर यास अर्ज करून त्याजकडील फौज आणून गोवे प्रांतात मोहिम केली अजी बायस आंअयालत मर्तबतानी मोरो बाबूराव निा वासुदेव गोबिंद याजकडे बोलणे लाऊन येबाबेन्चा बंदोबस्त सरकारातून व्हावा त्याजवरून मवसूफ याणी सरकारांत कलमी केले व सदरहु मजमून बासुदेव गोविंद याणीहि मुफसल इजहार केला त्याजवरून सरकारची व आमर्तबताची दोस्ती व यकज्यहती कदीमुलअयाम चालत आली आहे हे दानीस्त करून दोनतीन मर्तबा माहाराजांस इलतीमास कलमी केल्यावरून सांवतानी फौज कुमकेस नेली होती ते वापस आणविली तेव्हा दंगा व्हावयाचा मना जाहालाच असेल फिलहाल देसक आंहशमतपन्हाचे मुलकात राहून तो चांदगडे तालुके कलानिधी येथे दंगा करितात बिनाबरा अज्यानीबाकडील बोलण्याचा व तालुक्यतील बंदोबस्ताचे वगैरे मजकूर सांगोन बासुदेव गोविंद व मोरो बाबूराव याची रवानगी केली आहे त्यास हरदू मोमिइले कुल मजमून आमोहिबाजवल बोलतील त्याबमोजीब अमलात यावे रा छ २६ जिल्हेज सुा समान तिसैन मया व अलफ ज्यादा काय लिहिणे.

लेखांक १३३ माहे जून इ. स. १७९७

नं. ९९ श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रप
ती स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बालाजी जनार्दन कृतानेक विज्ञापना ताा छ १ सवाल पर्येत स्वामीचे

कृपावलोकने करून वर्तमान येथास्तित असे विशेष गोवेकर फिरंगी याचे व वाडीकर सावत याचे विरूध्ध म्हणोन सांवत याणी स्वामीस विनंती करून कुमकेस फौज मागितली त्याजवरून स्वामीनी राजश्री पंत आमात्य याची रवानगी फौजसुधा केली त्यास फिरंगी गोवेकर याचा व सरकारचा तह आहे त्यापेक्षी स्वामीनी सांवताची कुमक करून फिरंगी याजवर मसलत करावयाची आज्ञा होऊ नये फौजेची रवानगी जाहाली आहे ती माघारी आणावयाची आज्ञा जाहाली पाहिजे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १३४ तारीख २-११-१७९७

नं. १७५५

सियोर यकबालपन्हा आजम मार्चेल काब
जनराल गोवर्णदोर देइस्ताद बंदर गोवा दाम दौल्त हू

अजदिल येकलास वासुदेवराव गोविंद व मोरो बाबूराव सुभेदार तालुके किले कलानिधीगड व ठाणे चांदगड सलाम बाजद सलाम आंकी येथील खैरखुसी जाणोन मोहिबी आपणाकडील कारनेकी मरकुम आज्ञा केली पाहिजे दिगर आम्ही सरकार आज्ञेप्रमाणे छ ११ जमादिलावली डिचोलीचे मुकामी साईकाली दाखल जाहालो सविस्तर राजश्री बालोजी नाईक व बहिरजी नाईक सांगता कलेल ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत छ १२ जावल

लेखांक १३५ तारीख १०-१२-१७९७

नं. १७५०

बज्यानीब जुजे कायेतान + + मुतसदी आ
दालती पुर्तुगाल खलबते व सक्रतार्य इजग्त ईस्ता
दं दाज दी य द र मरामतीन हाये दा महबत हू

अजदिल येकलास वासुदेवराव गोविंद व मोरो बाबूराव सुभेदार तालुके किले कलानिधीगड व ठाणे चांदगड सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणोन आपणाकडील कारनेकी

मोहिबी मरामती केली पाहिजे दिगर तालुके मारी राजमंडळच्या दंगा फौज लगत नेसरीस होती तालुकेतील बंदोबस्ताविसी बरघाटी यावयाच कारण जाणोन राजश्री गोविंद शेशाद्री यास मोहिबाकडे पाठविले मोहिबाचा निरोप जाहाला त्याजवरून छ १४ जमादिलाखरी नारव्याहून निघालो ते छ १६ मिनहूस ठाणे मारी सुखरूप पोंहचलो इकडील वर्तमान राजमंडळची फौज राजश्री राव हिंमतबहादर यांचे चिरंजीव दोन हजारानिसी नेसरीवरच मुकाम करून राहिले आहेत श्रीमंत माहाराज राजश्री छेत्रपतिसाहेब करवीरीच आहेत राजेश्री रत्नाकरपंत आपा पाचसात हाजार फौजेनिसी मुधोळास गेले आहेत आपणास कळावे आम्हाकड कारकून गोबिंदराव अनंत नारव + + + हीबाजवल ठेविले आहेत इकडील कागदापत्राचे जाबसालाविसी वगैरे बोलतील + + उतर होत असावे ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे छ २० जाखर हे किताबत.

लेखांक १३६ तारीख २८-४-१७९८

नं. १८ हू

अजम मेस्तर मिगेल द लीम ये
सोज साहुकार मुकाम पुणा
दाम मोहबत हू

मोहिबानपन्हा मुखलीसान दस्तगाहा सौदागरान जुबादैटट आतीजाद दोस्ता आंजी दिल येखलास नागोजी घाटगे जुंझारराव बाआदज सलाम आंकी येथील खैरखुशी जाणोन आपली शादमानी हमेशा कलमी करून खुशवख्ती हासील होये ते करीत आसावे आमोहिबानी खत फिरिस्ताद केले ते रसीद होऊन कलमी केला मजमून मालूम जाहाला पेशआजी खताची जबाबसिफाई याहमराह फिरिस्ताद करणे बाबे निगारीश केले त्याबमोजीब अजम राघोबा नाईक इजानीबानी जिनसाना खरेदीवास्ते आमोहिबाकडे फिरिस्ताद केले होते ते मुंबईहून येतवख्ती राहादारीत हबसी राजपुरीकर याणे कारकुनासी सिकस्त करून जिनसाना दाहा अकरा हजाराची दस्त करून नेला त्याहमराह आमोहिबाची खतपत्रे गफलत जाहाली हे मालूम व्हावे सबब निगारीष केले असे कलमी केलेला मजमून काय होता तो

इज्यानीबास कांही मालुम जाहाला नाही श्रीमन्माहाराजधीराज माहाराजाची व इंग्रजाची दोस्ती करणेचे अगत्य असल्यास मुंबईस व इज्यानेबास येणेबाबे निगारीष केले अशास माहाराजाची व इंग्रजाची दोस्ती बार करार असावी येबाबे आमोहिबाचा स्नेह इज्यानेबी संपादिला आहे आमोहिबही माहाराजास कुरनिशात बिसयार बिसयार रसीद करणेबाबे कलमी केले बमोजीब आर्ज केला त्यावरून माहाराजाची मर्जी आमोहिबाबर बेष्तर खुषवख्त जाहाली असे यातर्फेचे काजकाम कांही असलेस निगारीष करून पाठवावे इज्यानीबा करून पाठवतील येबाबे खत-पत्री मरकूम केले आमोहीब आजी तागांयेत काजकाम करीत आलाच आहा आणि दरपेशही करून हा खातरजमा आहाच येबाबे जियादे कलमी करणे काय असे गोवेकडील पादरी व फिरंगी याचा मजमून निगारीष केला आशास पेशआजी गोवेकर याची तह खंडणीबाबे सोने सबा खंडी व अंत्रूज मझाल व फोंडे मर्दनगड व किले मुळीक व सोंधेकर पालेगार आदिकरून हुजूर चालत होता तो हाली चालत नाही येबाबे बिसयार राजेतर्फेनच खिलाफ रूयेदाद जाहाला आहे दर्याचे मार्ग वगैरे राखोन त्याचा व हुजूरचा सिलसिला होत चालिला आहे फिलहाल हुजूरची फौज गोवेकराबर फिरास्ताद केली होती आखरीचे आखरीचे दिन नजीक आले बइसबाब फौजा वापस आणविल्या त्यावख्ती पादरी फिरंगी सिकस्त करून आणिलेले बारदेश मोहिम आणिखी होणार पेशअजपासोन हुजूरचा अमल चालत आलेमवाफीक चालावा तो न चाले पेक्षा माहाराजाची मर्जी गोवेकराचे पारपत्य करणेच आहे धणीसाहेबाचे पदरचे पालेगार याबावे इतराकडून साहित्यपत्रे येऊन काही साध्य व्हावयाचे नाही लेकीन आमोहिबाची व इज्यानेबाचा स्नेह ज्यापेक्षा आहे तेव्हा आमोहिबास ज्या बातेची जरूर तेच इजानेबास जाणोन माहाराजाचे खिदमतीत आर्ज केला त्यावरून आमोहिब हुजूर आलेन हरयेकबाबे बोलणे होऊन तहरह ठरून पादरी व फिरंगी आमोहिबाचे भिडेने खलास होतील माहाराजाची मर्जी आमोहिबावर बिसयार खुशवख्त आहे त्याबाबे आमोहिबी हुजूर येऊन रूबरू आर्ज केलेने आमो-हिबाचे खातरमवाफिक सबदा सबाल हासील होतील इजानीबा तमाम बाजब आमोहिबाचे आहो हुजूरचे मर्जीचा अर्थ चितात आणोन मोहिबास कलमी केले असे सारांश आमोहिबाचे येणे जाहालेविना जबाबसवाल फैसलात येणार नाही दिगर तर्फेकडोन आणखी खतपत्रे आगर कोणहि आलेयास काही जबाबसवाल होणार नाही ऐसा अर्थ समजोन घेऊन आमोहिबास कलमी केले असे आजम मुकेल मेजेर हे आमोहिबाचे दोस्तदार याबाबे इजानेबी खत निगारीष केले असे मालूम व्हावे आमो-

हिबाकडील येणेबाबे खतपत्राचा जबाबसवाल येताच हुजूर अर्ज करून मातबर कारकून फिरस्ताद करवितो त्याबमोजिब आमोहिबही जरूर हुजूर यावेयाचे करावे जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबती रवाना छ ११ माहे जिलकाद हे किताबत.

लखांक १३७ तारीख २-१०-१७९९

नं. २१२ श्रीगणपती

अजम करनेल गोवर्णदोर

बंदर गोवे मोहबत हू

अजतर्फ रामचंद्र परशराम दुवा आंकी येथील खैरखुषी जाणोन तुम्ही आपली खैरीयत कलमी करीत जाणे दिगर मुंबईहून इंग्रजी पलटणे बंदर मजकूरचे बाऱ्यास आली आहेत म्हणोन विदित जाहाले यैशीयास आम्ही सरकार आज्ञेप्रो करवीरचे मोहिमसीर आहो सबब इंग्रजी पलटणाचे प्रयोजन असे तरी हली या कामास तुम्हाकडे राजश्री रवलो रामचंद्र यास पाठविले आहेत हे तुम्हासी पलटणाचा मजकूर बोलतील त्याप्रमाणे तुम्ही पलटणाचे सरदारासी बोलणे अमलात आणून रवलो रामचंद्र याचे सांगण्याप्रो पलटणे इकडे कुमकेस जलद येऊन दाखल होत ते करणे रा छ २ जमादिलोवल ज्यादा काय लिहिणे.

लेखांक १३८

नं. २२४३ हू

अजम अकरम गोवेर्नदोर दो इस्ता

द दा ईदी हमेशा खुशवख्त बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा अजी खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाजद सलाम येथील नेकी जाणून कारनेकी कलमे केली पाहिजे दिगर इस्तादाचा व इज्यानेबाचा अंतःकर्ण पुरस्कर खुलासा जाहाला तेव्हा इज्यानेबाची दौलत व मुलुक आहे हा इस्तादाचा यैसे इज्यानेबी चितात आणून इस्तादाचे आवडीकरिता डिचोली साखली पेडणे यैसे इस्तादाकडेस लिहून दिले आण पुढा इस्तादाचेच रजावंदीने श्नेह करून सदरहु माहाल सोडऊन घेणार यैसे

इज्यानेबाचे चिती होते त्यास सांप्रत राजश्री प्रधानपंत याणी मर्दनगड घेतला आण इस्तादामधे व त्यामधे लढाई जाली तेव्हा इस्तादाच्या प्रांतात आवडाव करावी यानिमित्य प्रधानपंताकडून फौजा नेमणूक होऊन मर्दनगडास बरचेबर जमाव येतच आहे दिवसे-दिवस जमाव भारी होऊन संवदेकराचा प्रांत काबींज करून डिचोली साखली पेडणे या माहालानी जमाव येऊन जागजागा ठाणी घालून मुलुक काबीज करून पुढां इस्ता-दासी तोसीस उदंड करावे या मतलबात आहेत तूर्त उसगाबात लोक येऊन बसले आहेत पुढां साखलीस व पेडणेत जमाव भारी येऊन सत्वरच बसणार उपसकर व आणखी चाकरमाणा त्या प्रांतातील त्यास सामील जाहाले आहेत हे वृत्त मोहिबास दखल व्हावे यावास्ते लिहिले आहे तरी इस्तादाने दढोतर खातिरेस आणावे कीं इज्यानेबा आहेत हे दौलतसहित आपले यैसा भरोसा मानून सदरहू तीनही माहाल इज्यानेबा ताबीन करावे तेणे करून मराठे याचा पाया त्या माहालानी इज्यानेबा पडू देणार नाहीत इस्तादाकडेस माहाल असलेने मराठे नाना ते प्रकारे उपद्रव करून इज्यानेबाच्याहि प्रांतात पाया पडेल तेव्हा इस्तादांच्याहि कार्याचे नव्हे यास्तव पहिले प्रो तीनहि माहाल इज्या-नेबाचे स्वाधीन असलेने मराठे बाट काढणार नाहीत लिहिला मजकूर मोहिबी खाति-रेस आणावा इस्तादाचे कार्याचा किंवा गैरकार्याचा यैसा द्रुढोतर चितात आणून इज्यानबास उतर पाठवावे ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दिली पाहिजे हे किताबत छ २० माहे सवाल.

लेखांक १३९ तारीख २०-११-१८०४

नं. ९३५ हू

अजम जुजे कायेतान सक्र
तार्ये दोइस्ताद दे इंदीय जंजिरे गोबा
बाशंद
मोहिबा येखलास असार

अंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालनिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी कारनेकी कलमें करीत जावे दिगर मोहिबी आजम आकरम गोवर्णदोर याचे खत पाठविले त्याजवरून व राजश्री माधवराव खिवराम सबनिवीस याणी सांगितल्यावरून सविस्तर मालूम जाहाले इजानेबाकडील च्यार खासी माणसे आहेत ती येकदिल आसावी

म्हणोन कितेक कलमें केले आशाय च्यार खासे आहेत ती येकदिलच आहो दुसरी कल्पना नाही किले नारायेणगड माहाराजाकडील लोकानी घेतला होता तो फिरोन इजानेबाकडील लोकानी हला करून हस्तगत केला चिरंजीव राजश्री रावसाहेब फौजसुधा वेंगुर्लेस आहेत वरकड फौज आकेरीस व झाराप व माणगाव येथे आहे गलीमाकडील जमाव कुडालीकडे आहे राजश्री रत्नाकरपंत राजाज्ञा फौजसुधा कुडाली आले आसेही बर्तमान आहे इकडून त्याचे परिमार्जन होणे ते करीतच आहो परंतु प्रसंगी सर्व प्रकारे भरोसा इस्तादाचा बख्त पडल्यास हरयेकविसी साहित्य उपराला करणे मोहिबासच प्राप्त आहे आण करितील ही इजानेबाची खातरजमा आहे रा छ १६ शाबान ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक १४०

तारीख २७-११-१८०४

नं. ९३०

हू

अजम अकरम फ्रांसिस्क अंतोन दा वियेग का
ब्राल कोमे दा दोर तैनत जनेराल गोवर्णदोर कपि
तान जनैराल दा इंदीया बार मशनाद

अजि दिल येकलास फोंड सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालनिहाय सलाम बादज सलाम येथील नेकी जाणून कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दिगर मोहिबाकडून बहुत दिवस किताबत येऊन दिल आराम होत नसे हे दोस्तीचे जागा विहित नव्हे यैसेयास मोहिबी हरवक्त किताबत पाठऊन दोस्ती ज्यादा होई ते केले पाहिजे हाली बाडीहून मोहबापासी आम्हावर हुकूम करावी येदर्थी वकील गेला होता त्यास इजानेबाची दोस्ती ध्यानी आणून मोहिबाची दिलखुसी जाहाली + नाही आण वकील माघारे रवाना केला हे यैकोन दिल आराम जाहाला इकडील बर्तमान श्रीमन्माहाराजानी इजानेबाचा अभिमान धरून राजेश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी जमियेत सुधा रवाना केले कुडालचे मुा दाखल जाले मालवणाहून इजानेबाची स्वारीही येथेच जाहाली भेटी जाहाल्या हे बर्तमान मोहिबास ज्याहीर जाहालेच असेल आम्हाविसी पुर्ता अभिमान धरून इज्यानेबाचे मनोरथ सिधीते पावे ते गोष्ट मोहिबी करावी आराबेवर इजानेबाचे कुटुंब आहे त्यास आणावयाकरिता पाठविले आहे मालवणचे

मुाहून येक च्यार वेला खते पाठविली होती परंत येकही उतर आले नाही अशास हाली जमीयेत देऊन जांबोटीवर रवाना करावी हैगै करू नये यास्तों किताबत पाठविली आहे ज्यादा काय लिहिणे प्यार मोंहबत असो दिली पाहिजे तारीख २३ माहे साबान हे किताबत.

लेखांक १४१ तारीख २४-१०-१८०५

नं. १७१७

अजम आकरम फ्रासिस्क आंतोन दा बियेग
काब्राल ग्राव क्रीस्त तेनेत
जनराल फौजानी पुर्तुगाल गोबर्गदोर व
कपितां व जनराल दा ईंदी बाहादर मुस्त-
कीम जगरूस्तमुलमुल्क शहर फुम मा
लिक व दरमकानीहाय बार मसनद
हुकुमत मुतालकी बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सर-देसाई पा कुडाल व माहालांनिहाय येथील नेकी जाणोन मोहिबाकडील कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दरीला श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति यांची फौज खाली येऊन संस्थानच्या आमलात हर्षामर्षे लाविला आहे इस्तादाकडून आशा प्रसंगास साहित्य उपराला होत गेला त्याअन्वये हाली घडावा येदर्थी चिरंजीव राजश्री भाऊ यांच्या खतात आमोहिबास कलमे केले त्या जासुदास जाऊन दाहा बारा दिवस जाहाले आद्यापि जबाब आला नाही यावरून आज्यब दिसोन आले आमोहिबाच्या व इजानेबाच्या दोस्तीत आसा प्रकार जाहाला नाही व पुढाही नसावा चिरंजीवच्या खतात लिहिल्याप्रमाणे दारूची बालब सिसे पाठऊन द्यावे व जमाव येऊन उपराला घडीवा उभयेताची गोलागोली नित्याही चालली आहे व फौजेचीही त्याजकडील भरती बिशेष होती यात दिनाबधी न लागता आमो-हिबाचा उपराला जलद येऊन पोहचे ते जाहाले पाहिजे रा छ ३० माहे रजेब ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १४२

तारीख २६-१०-१८०५

नं. ९३१

हू

अजम आकरम फ्रासिस्क आंतोन दा वियग काब्राल

जनरल फौजानी पुर्तुगाल व गोवर्णदोर कापितां व जनराल दा इंदिय पुर्तुगेश बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा अंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरिविला आमोहिबास इकडून येक च्यार किताबती पाठविल्या परंत येकहि जबाब आला नाही हे दोस्तीचे जागा मुनासब नसे हरवख्त किताबत पाठऊन दोस्ती जियादा होई ती बात करावी यानंतर करवीरवासी माहाराज यातर्फेने संस्थानात उपद्राप होऊन येकदोन किले घेतले आण तूर्त शह प्राप्त आहे आशाख या प्रसंगी इस्तादातर्फेने हरयेकविसी साहित्य उपराला व्हावा येविसीचे व बरकड कितेक सांगोन राजश्री माधवराव खिवराम सबनिवीस यास रवाना केले आहेत आमोहिबासी बोलतील ते दिलात आणून मारनिलेची माघारे रवानगी सत्वर करावी छ २ शाबान ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक १४३

इ. स. १८०५

नं. ८३८

अजम आकरम

विजरई कपितां व जनरल दोइस्तादादा इंदीय बार मसनद हुकुमत मुतलाकी बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा आजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरीविला अमोहिबाकडून खत किताबत येऊन दिल आराम

होत नसे तरी हरवख्त किताबत पाठऊन दोस्ती दिनबदीन ज्यादा होत जावी यानंतर इकडील वर्तमान परस्पर आमोहिबाच्या अैकण्यात येतच्च असेल करवीरवासी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी हे दाहाबारा हजार फौजेनसी हे संस्थान हस्तगत करावयाचे उदेसे पारपोलीच्या घाटमाथा मुकाम आहे किले नारायेणगडास शह देऊन त्याणी घेतला आण आज च्यारपाच दिवस माहादेवगडास मोर्चेबंदी त्याणी केली आहे इकडून झाडून लोक येवधडून गनीमाच्या तोंडावर रवाना करीत आहो त्याणी तंव चहूकडून च्यार मार्गे येऊन येकावीच्च वाडीत यावे योजिले आहे मालवणाहून दोन हजार पर्यंत जमाव मौजे कालसे येथे येऊन आहे तूर्त समई असा प्रसंग प्राप्त आहे यासमई इस्तादा-तर्फेने साहित्य उपराला घडावा जाणोन हे खत आमोहिबास कलमे केले असे तरी आमोहिबी हा प्रसंग दिलात आणोन इस्तादातर्फेने कुमक दारूगोली व काही इब्रतीस जमाव रवाना करून संस्थानचा बचाव घडे ती गोष्ट जाहाली पाहिजे वरकड सविस्तर राजश्री साबाजी

(पुढील बंद गहाळ)

लेखांक १४४ तारीख ७-७-१८०६

नं. १७२६

आजम आकरम फ्रांसिस्क आंतोन दा बियग का
ब्राल कोमे दा दोर क्रिस्त बनाम
व गोवर्णदोर कपिता व जनराल दा ईद बाहादर
मुस्तकीम ज्यगरूस्तमुलमुलुख शहर फुलम
मलिक व दरमकानी हाये बार मसनदहुकुमत मु
तलाकी बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरिविला आमोहिबी बतारीख १६ माहे जुलचे खत पाठविल ते पोहचून कलमे केला मजकूर मालूम जाहाला करवीरकर माहाराज व चिरंजीव राजश्री बाबा याणी आमोहिबास खते पाठविली त्याचां जबाब दिलेचे कलमे केल्यावरून दिल

खुश जाहाला इज्यानेबाचे आमलास आश्रा होणेचे आमोहिब करतील परंत दोस्तामधे व आश्रा घेणारासी सत्य पुढारून निखालस बोलणे हे सजावार याजकरिता इस्ताद व कौम इंग्रज याणी सदरहू आश्रयाबदल राहास्ता किफायती आपापली संपादिली पाहिजे याजकरिता रेडीच्या किला करवीरकर माहाराज याजकडेस आहे तो व पुढील वेंगुर्ले हे उभयेतास चालवावयाचा मतलब रवाज बर हुकूम मनास आणावा म्हणजे इज्यानेबाच्या बाकी प्रांत येणेकरून राखणी + + खोटा पडोसी करवीरकर माहाराज याचे ज्यादा जमियतीच्या + + मना होऊन येईल म्हणोन येविसीचे कलमे केले आशास पेसजी आमोहिबाचे खत ता। १४ माहे मायु सन १८०४ चे आले त्यात सन समान समानीनामधे कोलापूरकर याचे लस्करची फिशाद जाहालेचे वख्ती आमोहिब निभावगीस आले तैसाच प्रसंग हालीचा असे दिलात येऊन हित केलेस आनोपकार बर्तणूक जाहाली त्याचा येकांदर बिचार घेऊन उतम पडोसी आसाच आसे कलमे केले दुसर इजानेबाचे लक्ष इस्तादाकडेस जे हरयेक वख्ती इस्तादापासून साहित्य होणार याप्रमाणे आसता रेडीचा किला व वेंगुर्ले आश्रयास द्यावी आसे कलमे केल्यावरून इज्यानेबास आज्यत्र दिसोन आले जे आमचे जाबसाल आमोहिबाकडून कितेक संपऊन यावे आकत्रीमपणी दोस्ती चालावी हा मनोदय जाणोन राजश्री दादाजी गणेश यास रवाना केले त्यास तूर्त प्रसंग येशवंतगड करवीरकर याजकडेस आहे तो हस्तगत व्हावा या मसलतीत इज्यानेबा आहेत त्याचा साहित्य उपराला इस्तादाकडून व्हावा व मागील जाबसाळ संपवून यावे येणेकरून कैलासवासी जाहाल्यामागे संस्थानच्या अभिमान धरल्याचा लौकीक प्रखिधतेत यावा हेच लक्ष आमोहिबी धरले आहे ते सेवटास न्हेतीलच परंत इजानेबाच्या मनोदय पाहण्याविसी कलमे केले आसे भासते करवीरकर माहाराज याणी हजार बारासे जमाव माळवणानजीक करून खुस्कीने येशवंतगडास पुस्तपन्हा करावा या मतलबात आहेत याजकरिता इस्तादातर्फेने साहित्य उपराला होणे तो सत्वर होऊन इजानेबाचा किला इजानेबाकडेस हस्तगत होये ती गोष्ट जाहाली पाहिजे येविसीचे सविस्तर दादाजी गणेश बोलतील ते दिलात घेऊन खताचा जबाब सत्वर यावा रा। छ २० राखर ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १४५

तारीख १८-७-१८०६

नं. १६२

श्रीनाथप्रा

शाहमत व आवरी मर्तबात व हशमत मजलत
मबाकत दस्तगाह यत ज्यादा दोस्ता फ्रासिस्क
आंतोन दा बियोग काब्राल गोवर्णदोर कपतान
जनराल रूस्तुमुलमुलक सर्फराजूर बंदर गोवा
दाम मोहबत हू

आजज्यानीब दौलतराव सिंदे सलास आंकी येथील खैरखुषी जाणौन तुम्हीं आपली खैर आफियत कल्मी करीत जावी दिगर राज खेम सांवत भोसले बहादर सरदेसाई प्रांत कुडाल व मानिहाय याचा काळ जाला मावे तीर्थस्वरूप मातुश्री लक्ष्मीबाई भोसले याणी संस्थान चालविले असता सोम सांवत याणी पूर्वील चाल सोडून बाईकडील किले घेऊन प्रांतातहि उपद्रव करू लागले पुढे काहीं दिवसानी ते मृत्यू पावले नंतर त्याचे पुत्र फोंड सांवत याणी यशवंतगड घेऊन करवीरकर माहाराजाकडे दिल्हा व त्याजकडील जमियत आणून प्रांतातहि खलष करणार म्हणोन बाईचे पत्र आले यैसियासी या संस्थानाची व आपली पहिलेपासून दोस्ती चालत आहे दरमयान कोणाचा खलष उपस्थित जाल्यास तुम्ही उपराळा करीत आला प्रस्तुत फोंड सांवत याचे समजाविल्याबरून करवीरकर माहाराजानी संस्थानात बखेडा करावयाचा आरंभिला आहे येविसी तुम्ही त्यास पहिले सोईचे वाटेने सांगोन उपद्रव न लागे ते करावे सोइन यैकण्यात न आल्यास बाइची हरयेकविसी कुमक व मदत करून किला त्याणी घेतला आहे तो खाली करून बाईकडे देवावा व मुलकातहि त्याचा बखेडा न होय ते करावे बाई इकडील आप्त आहेत याचे अगत्य जाणोन लिहिले असे व इंग्रजाकडील कर्णेल कलूस सरहेब व मेस्तर वेबसाहेब याणीही तुम्हास चकती व त्याजकडील सरदार गोमंतकास आहे त्यास चकती पाठविली आहे तुम्ही व ते येक विचारे बाईकडील संस्थानचा बंदोबस्त बाई सांगतील तसा करून द्यावा रा। छ १ जावल ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत कीजे हे किताबत-

लेखांक १४६ तारीख १०-१०-१८०६

नं. ८४१

अजम जुजे कायेतान + +
सकतायें दोइस्ताद दे इंदीय जंजिरे गोवा
महफुंज्य बाशंद

मोहिबा येरबलासअखार शजाकत दी साल आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल माहालानिहाये येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत जावे दिगर मोहिबीस येकदोन खते पाठविली परंतु येकहि जबाब आला नाही हे दोस्तीचे जागा मुनासब नसे हरवख्त किताबत पाठऊन दोस्ती जियादा होई ती बात करावी यानंतर करबीरवासी माहाराज याणी संस्थानात बखडा आरंभून किला नरसिंहगड फितुराने घेतला व जागजागा चौक्या बसवून गावगना लुटालुट करितात हे मालूम जाहालेच्च अखेंल अशास मोहिबासारिखे दोस्तदार इज्यानेबाचे आहेत त्यापक्षी इस्तादातर्फेने संस्थानचा उपयोग घडावा रा धोंडो गोविंद फर्जंद अटकात आहे त्यास तूर्त कामकाजाचा प्रसंगसमई येथ असल्यास उपयोगी त्यास मोहिबी इजानेबाचे दोस्तीवर नजर देऊन त्यास रवाना केल्यास इजानेबास बहुत संतोश येविसीचे व बरकड कितेक सांगोन रा धोंड सेट सडबलकर यास मोहिबाकडेस रवाना केला आहे सकलार्थ मालूम करील ते दिलात आणून अजम आकरम गोवर्णदोर कापितां व जनराल यासी बोलून धोंडो गोविंद फर्जंद यास रवाना कराव व बरकडहि जाबसाल इजानेबाचे पसंदलायेक घडून इस्तादाच्या लौकिकास उचित ते करावे खताचा जवाब पाठवावा रवाना छ २७ माहे रजेब ज्यादा काय लिहिणे हे किताबत.

लेखांक १४७ तारीख २३-१०-१८०६

नं. १७२५

अजम आकरम फ्रासिस्क आंतोन दा वियेग काब्रा
ल ग्राव क्रीस्त तेनेत
जनराल फौजानी पुर्तुगाल व गोवर्गदोर व कपितां
व जनराल दा ईंदी बाहादर मुस्तकीम जगरूस्त
मुलमुल्क शर फुम मालिक व दरमकानी हाय
बार मखनद हुकुमत मुतलाकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशामत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन आमोहिबी आपली कारनेकी कलमें करीत असिले पाहिजे दरील आमोहिबी रा धोंडो राम सेट सडवलकर याजबरोबर खत पाठविला तो पोहचून कलमें केला मजकूर मालूम जाहाला मारनिले याणी इजानेबाकडील कितेक अर्थ निखालखीचे जाहिर केले ते दिलात घेऊन इजानेबाच्या उपयोगास सिध जाहालो म्हणोन कलमें केले व सडवलकर याजकडेस सांगून पाठविले त्याजवरून खुशवख्त हासील जाहाला इजानेबाचे मनोदय सिधीस गेले बोलण्याच्या ठरावास येख्तयारी आमोहिबाकडेस गेला पाहिजे त्यास जलदच रवाना करून देवितो जाऊन पोहचेल आमोहिबास मालूम व्हावे आमोहिबाच्या खतात दर्शविल्याप्रो जंगी सामान अजम मनवेल गुंदीन ब्रिगादेर याजकडेस आदमी पाठऊन आणविण्यात येईल करवीरवासी याचा मुकाम मालवणास असून बरकड जमयेत मागा लिहिल्या जाग्यानी आहे राजश्री धोंडो गोविंद फर्जद यास आद्यापि आराम नाही उपाव होतात श्रीकृपेने बरा होईल इजानेबाचे दौलतीची महिमा बाडविणार असे सांगून पाठविले ते खचित दिलात आसून तरतूद जाहालेली पुर्तेपणी व्हावी रा छ १० साबान ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १४८ तारीख ३०-११-१८०६

नं. १४६७ हू

अजम आकरम फ्रासिस्क आंतोन दा वियेग काब्राल

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिंमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दरिविला आमोहिबी खत पाठविले ते छ १२ रमजानी पोहचून निखालसीने कलमें केला मजकूर मालूम होऊन दिलखुश जाहाला त्याचा जबाब तसाच आमोहिबास कलमें करावा त्यास करवीरवासी याजकडेस बोलणे लागले होते ते येक पल्यावर आल्याचे समजोन लिहावे जाणोन दिवसगत जाहाली आद्यापि त्याचे बोलणे सुदारत नाही रा आपाजी भगवंत व कृष्णाजी माहादेव करवीरकर याजकडेस बोलण्यास गेले होते ते आले त्याजकडील मजकूर माहाराज याणी ठाणी व प्रांत राजश्री प्रीतराव चव्हाण हिमतबहादर या स्वाधीन केला आण तीन लक्ष रुपये खंडणी द्यावी ती तपसिले निरबाहा करून निमे येक लक्ष पनरा हजार रूपये द्यावे आण हिमतबहादर याजकडून ठाणी व प्रांत घ्यावा हे बोलणे घेऊन आले याचा विचार करिता रूपया नाही तेव्हा बोलतात बोलणे तोडावे तरी ठीक नाही न तोडावे तर रूपया भरणे कठीण येथून लस्करात माणूस गेल्यास बोलण्याच्या समेटाखाली नी मोकले असावे ते न होता प्रथमच चौकीवर ठेवितात त्यापक्षी चिताच्या संशये तुटत नाही अशा गोष्टी पडल्या तेव्हा अजम जुजाव कायेतान कोर्णेल यासहि आणून यातील विचार केला त्यास बकिलासी तोडून फल नाही तेव्हा वकीलाचे बोलणे पडले जे आपण जातो कलमबंदीची याद ठरऊन घेतो नंतर इजानेबाची व प्रीतराव चव्हाण याची भेट व्हावी म्हणजे सर्व लडे तुटतात ठाणी प्रांत देतात रूपयाचा निशा मात्र करावा तेच बोलणे जमेस धरून उतर केले लस्करात जाताच आधी किले येशवंतगडावर निशाण चडावे हीच बोलण्यास पत नंतर कलमबंदीचे यादीवर करवीरकर याजकडील सेरे बसावे बोलणेचा ठराव व्हावा रूपयाचे बोलणे तूर्त आवबे होत नाही च्यार सालानी निभाव करावा याप्रमाणे ठराव असावा हे निखालस समजले म्हणजे भेटीचा योग व्हावा असे उतर सांगून बकिलास रवाना करून दिला दुसरा मजकूर मारनिले कोर्णेल याचेहि समजातील बकील गेला म्हणून स्वस्थ राहू नये जमेतआपली येकत्र करावी इस्तादाकडील जमेत आकेरीस राहावी इतके केलेस करवीरकर यास हिंमत समजती व आपलाहि

बंदोबस्त जाहाला बोलणारा वकील यासहि काही बल पडते हा विचार करावा असा ठराव केला आहे इकडील जमयेत या बोलणेच्या नादाकरिता व वोडघस्तीमुले हलकावली होती परंतु करवीरकर याचा विस्वास मानिता नये याजकरिता मसलद ठासून धरली पाहिजे आसे पडले निरउपाव आहे घडता घडेल ते प्रमाण क्रुपीस जमाव गेल्याने तर तेथे जसा विच्यार पडेल त्याप्रो आमोहिबास कलमे केले जाईल आमोहिब कडून कलमे करितात ते प्रमाणच आण इजानेबाही इस्तादाशी चालोन आमोहिब आनकुल जाहाल्याप्रमाणे या संस्थानची इब्रत वाढविगार ती श्रीकृपेकरून सिध होईल करवीरवासी याशी इस्तादाकडील फौजेस युध्यप्रसंग व्हावयाचा नाही कां जे इस्तादाशी त्याणी सबब दिली नसे इजानेबाच्या मुकामावर आगेजी केलेबर आश्रये आणभवगार कैबार करणार म्हणोन जाणविले यैसेयास वाडीसुधा संस्थान हे घ्यावे आसा त्याचा बेत असून प्रर्वत होत गेला त्यास आमोहिबाची जमीयेत येऊन वाडीवर त्याचे येणेची मसलद फसली त्यापक्षी इस्तादाचा व त्याचा वाकडेपणा तर आमच हे पुर्त दिलात आणून पाहावे वाडी व गोवे दोन मोजू नयेत असे पेसजीच्या लिहिण्यात इजानेबाचा लेख आहे त्याप्रमाणे इस्तादाची सल्तनत आली त्यासी इजानेबा चालतात हे आमोहिबाच्या समजात कोर्नेल याच्या बखेरीवरून येतच असेल लिहिला मजकूर दिलात वेऊन आमोहिबाच्या विचारास येईल त्या अन्वये खताचा जवाब पाठवावा रा छ १९ माहे रमजान ज्यादा काय लिहिणे महबत असों दीजे किताबत.

लेखांक १४९

तारीख २८-१२-१८०६

नं. १२०६ हू

अजम आकरम फ्रासिस्क आंतोन

आमारत व आयालतपनाह शौकत व हिंशेमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरिबिला आमोहिबी खत पाठविले त्याचा जवाब रवाना जाहाला त्यातील मजकूर दिलात आणोन इस्तादाची सलतनत इजानेबाकडेस आसोन वरकड मसलतीचे आर्थ कलमे करितीलच राजश्री कृष्णाजी माहादेव करवीरकर याजकडेस बोलण्यास गेले होते ते राजश्री आपाजी भगवंत व आणखी कारकून पाटणकर याजकडील

घेऊन आले त्याचे बोलणे दीड लक्ष रुपयेचा सावकारी निशा देऊन च्यारहि किले व प्रांत घ्यावा ती तोड न पडे तर येशवंतगड व निवती दोन ठाणी देऊन भरथगड व नरसींगड याखालील मुलूकसुधा ठेवावा पुढा रूपये द्याल ते समई किले देऊ हेहि न बने तर किले आम्हाकडेस आसावे खालील मुलूक देतो रूपये दीड लक्ष त्याच मुलखातून घेऊन पावत करा नंतर किले देऊ हेहि न घडे तर किले च्यारहि देतो मुलूक आमचे स्वाधीन असावा दीड लक्ष रूपये मुलुक समधी पावले म्हणजे मुलूक मोकला करून देऊ आसी च्यार बोलणी घेऊन आले आहेत मागील प्रथमचे बोलणे येक लक्ष पनरा हजार द्यावे असे होते हे आर्थ आमोहिबाचे समजात यावे जाणोन रा धोंडो राम सेट सडवलकर यास पाठविले आहेत जाहीर करितील दिलात आणोन विचारास येईल तसे कलमें करावे इजानेबाचा मानस जे आमोहिब सीमपडोसी त्यात आभिमान पुरस्कर आनकूल होऊन ममतापूर्वक चालता तेंव्हा काहीच दुजा भाव न घ्यावा हेच सलतनतसुधा आनकुल जाहाला हे प्रसीध आहे करवीरवासी याचा सलूख करणे किव्हा युध्यप्रसंग व्हावा हे मोहिबाचेच विद्यमाने करावे ही आर्त आमोहिबी किमपि दिलात न घेता कलमें केला मजकूर ध्यानी घेऊन जबाब देऊन मारनिले सेट यास रवाना करावे रवाना छ १७ माहे सवाल ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५० तारीख १०-१-१८०७

नं. ८१३ हू

अजम अक्रम फ्रांसिस्क अतोन दावियेग काब्राल
दा काब्रा
तेनेत जनराल फौजानी पुर्तकाल
गोवर्णदोर व कपिता व जनराल दा इंदी
पुर्तकेस बाहादर
बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशमत दस्तगाहा अंजी धोंड सांवत सुभेदार सलाम बाजत सलाम येथील नेकी जाणोन कारनेकी कलमे फर्माविली पाहिजे दिगर छ २२ दिजेब्रचे खत पाठविले पावोन लिहिला अभिप्राय समजाल करवीरकर

याजकडील फौजसुधा म्हाराज माघारे करवीरास निघोन गेले राजश्री रत्नाकर आपा राजाज्ञा हे प्रसीधगडी आहेत बोलणेचा नाद लाविला आहे ज्याहीर व्हावे मोहिबाकडून सर्व साहित्य घडेल परंतु येक गैर अनकूल त्यास ते साहित्य जाहलेस मग खातरीत वरकड मजकूर न्हवते ज्यादा काय लेहावे प्यार मोहबत असो दीजे छ ३० सवाल सन सबा हे कितावत.

लेखांक १५१ तारीख १५-२-१८०७

नं. १४६८ हू

अजम अकरम फ्रासिस्क अंतोन दा वियग काब्राल

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दरिंबिला आमोहिबी खत अखेर नजरेन्चा पाठविला तो पोहचून इजानेबाचे अैस्वर्य ते आमोहिबाचे असे दिलात होऊन इस्तादाची सलतनत इजानेबाचे हुरमतीबदल राहाणेची तकुबी जाहाली व गनीम पराभव होणेचे अर्थे कितेक तपसिले जाणविले त्याजवरून त्यान्च अन्वये सर्व सलतनतीस दिलदिलासा देऊन राजश्री माधवराव सिवराम सबनिवीस व धोंडो गोविंद व वरकड सरदार च्यार हजार पर्यंत जमियेत वरकड जागेन्चा बंदोबस्त करून मालवणचे आलीकडेस गनीमाने नांदोसीवर या च्यार वर्शात नवीन ठाणे बांधले होते ते पैसल करून मालवण किंव्हा भरथगडास शह द्यावा येदर्थी ते गडावर न्चढाई जाहाली त्यास छ ३ जिल्हेजी धोंडो गोविंद यास गोली पोटास लागली नंतर जमाव माघा दोन कोशावर तल देऊन राहिला आण धोंडो गोविंद यास वाडीस आणिता वाटेस मृत्य पावला मनुष्य मर्द निष्ठेने न्चालणार इजानेबाचा समय जाणोन आमोहिबी रवाना केला परंत प्रसंगानरूप तो मृत्य पावोन इजानेबास हाणी जाहाली होणारास इलाज नाही पुन्हा त्यान्च ठाण्यावर न्चढाई करावी असे ठरविले आहे श्रीकृपेकरून घडेल ते आमो-हिबास जाहीर होईल आमोहिबाची ममता किंव्हा आश्रा आहे तो अहिरनिसी न्चालावा हेन्च च्याहात असो किले यशवंतगडास समुद्रातून मालवणचे साहित्य सरंजाम बर्चेवर येऊन पोहचतो त्यास इंग्रजाची रखवाली आहे असे पेसजीच्या खतात आमोहिबी जाणविले होते त्यास निक्षूण ताकीद असून किंव्हा तेरेखोलची रखवाली जाहाल्यास इजानेबाच्या

उपयोगास पडेल आणखी आधिक उणे घडेल तसे मागाहून कलमें केले जाईल रवान ॥ छ ६ माहे जिल्हेज जियादा काय लिहिणे मोहबत असो दिली पाहिजे हे किताबत.

लेखांक १५२ तारीख २५-२-१८०७

नं. ८१४ हू

अजम अकरम फ्रांसिस्क अंतोन
जनराल फौजानी पुर्तुगाल व गोवर्णदोर कपि
तां व जनराल दा इंदी बाहादर
बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा अंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दरिबिला किले येशवंतगड करवीरवासी याजकडेस आहे तेथे अंगेजणी जाहाल्यावर किला हस्तगत होईल असे समजात आल्यावरून च्यार-पाचसे जमाव पाठऊन हालचाल करविली त्यास किलेतील लोकाची हुशारी आहे व समुद्रातूनही मालवणाहून तरांडी येऊन बर्चेवर सामान पोहचते येविसी पेसजी आमोहिबास कलमें केले होते हाली इजानेबाकडील जमाव जाऊन हालचाल जाहाल्यावर दोन तरांडी सामान घेऊन आली त्यासमई इंग्रेजाच्या फतेमाऱ्या तेथे होत्या त्या नांगर उटऊन येकीकडेस जाहाल्या ससुद्रातून तरांडी येतात त्याचा बंदोबस्त इजानेबाचा जमाव किलेनजीक आहे त्यापासून होत नाही ती तरांडी येण्याची बंद जाहाल्यास किला हस्तगत होईल हे आमोहिबाचे जाहिरीत येऊन याचा बुधीवाद समजावा जाणोन खत कलमें केले असे दिलात आणून जबाब पाठवावा रवाना छ १६ जिल्हेज ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५३ तारीख १४-४-१८०७

नं. १९०९ हू

अजम अकरम जुजेकेरेन कोद दे सार
जेद विजरई कापितां ब जनराल दो इस्तादादाइंदी
य जंजिरे गोबा बार मसनद हुकुमत मुतलाकी
बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशामत दस्तगाहा आंजी राजे फोंड सावंत भोसले बहादर सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय सलाम बाजद सलाम यथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमी करीत गेले पाहिजे दरीविला राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलस्कर याची फौज शापूर नजीक तुरूकवाडीवर होती तेथून आजरेस जाऊन मुकाम केला स्वार दोन हजार व पाइदल मिळून पाच हजार जमीयेत आहे आजरे माहालची खंडणी करून नंतर इकडेस शह घावा असे वर्तमान आहे पेसजी संस्थानच्या पुराबेविसीचा मजकूर कलमें केला तो दिलात धरून समर्पक उतर पाठवावे दुसरा मजकूर आणखी कितेक मजकूर आमोहिबांच्या समजात यावे याजकरिता शाहाणा मनुष्य रवाना करणार त्यास सरादीस बोडद पाठवावी म्हणजे जाऊन पोहचेल उतरास दिवसगत नसावी रवाना छ ५ सफर ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५४ तारीख २५-४-१८०७

नं. १२०० हू

अजम आकरम
विजरई ब कपिता ब जनराल
जंजिरे गोबा बाशंद

अवारत व अयालतपन्हा शौकत व हिशामत दस्तगाहा अंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेंकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कल्मे करीत गेले पाहिजे दरिविला करवीरवासी माहाराज याणी संस्थानच्या आमलात घालमेल आरंभून वाडीस शह लागल्यामुळे इजानेबा पेडणेस येऊन पोहोचल्याचे

वृत्त अजम जुबाव कायेतान कोर्णल याणी आमोहिबास जाहीर केल्यावरून आमोहिबी अजम मनवेल गुदिन ब्रिगेदार यास दोस्तीचे आर्थ कितेक खातरजमेन सांगून पाठविले त्याचा जबाब ब्रिगेदार मारनिले याजकडेस सांगून पाठविला ते जाहीर केलेच असेल आशास इजानेबास प्रसंग प्राप्त जाहाला आसता जावयास जागे बहुत होते परंत आजपर्यंत संस्थानास आश्रय येक इस्तादाचा आण पुढाहि भरवसा तोच जाणोन या जागी येऊन पोहचलो आजम आकरम तेनेत जनराल याणी बंधुत्वे ममता बहुत चालविली त्याप्रमाणे आमोहिबाकडून चालत असावी हेच मानस रवाना छ १६ माहे सफर ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५५ तारीख १४-५-१८०७

नं. ११९९ हू

अजम आकरम

विजरई कपिता व जनरल जंजिरे गोवा

बाशंद

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशामत दस्तगाहा अंजी लक्ष्मीबाई सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरीविला निपाणीकर या तर्फेने राजश्री सखाराम घाटगे सर्ज्याराव बाडीत आहेत त्याचा बोलण्याचा अर्थ सुदामत नाही आण संस्थानातही आमल बसबीत चालले त्यापक्षी माहायात्रेस जाणे प्राप्त आमोहिबाची भेट घ्यावी हे मानस होते परंत प्रजन्यकाल समीप आला याजकारिता आमोहिबी पावणीस लोकाची तरतूद करून सांखलीच्या घाटानें आजरेस पोहचू ते करावे इजानेबा इस्तादाचे आश्रयास आली आण माहायात्रा घडली म्हणजे इजानेबाचे हुरमतीस योग्य ते आमोहिबी केले आसे होईल पुन्हा श्रीकृपेकरून इजानेबा संस्थानी आल्यास आमोबाची भेट घडेल मालूम व्हावे रवाना छ ५ माहे रबिलाबल ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५६ तारीख ४-१२-१८०७

नं. ११९८ हू

अजम आकरम

बिजरई कपितां ब जनराल

बाशंद

अमारत अयालतपन्हा शौकत ब हिशामत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल ब माहालानिहाय येथील नेंकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमें करीत गेले पाहिजे दरिबिला आमोहिबाकडून खत येऊन दिल आराम होत नाही तर हरवख्त किताबत पाठवून दोस्ती जियादा होई ती बात करीत जावे यानंतर इजानेबाचे पदरीची माणसे याणी संस्थानच्या अमलात घालमेल आरंभिली आहे त्याच्या पारपत्यास निपाणीहून फौज आणविली होती त्यास राजश्री व्यंकटराव सरदेसाई तो खानापूर फौजसुधा परवाचे दिवशी येऊन पोहचले आणखीही मागाहून येतच आहे अशास पहिल्यापासून संस्थानचे मखलदीख इस्तादातर्फेने पुरावा होत गेला त्याप्रमाणे जंगी सरंजाम दारूची बल १० दाहा ब शिस तितक्यास लागेल ते आमोहिबी बंद्रास पावीत करून द्यावे सदरहू दोनही जिनसाची किमत आमोहिब कलमें करितील त्याप्रमाणे इजानेबा संस्थानातील फिशाद आटोपात येताच पावीत करितील जंगी सरंजाम निपाणीस तयार केला आहे परंत पावयास लांबण पडती संस्थान इस्तादाच्या आश्रयातील जाणोन दोस्तीचे बाब कलमे केले आहे तर दारू ब शिसे जलद बांद्यास पोहचे ते आमोहिबी केले पाहिजे रा छ ४ माहे सवाल ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५७ तारीख १६-१२-१८०७

नं. १२०५ हू

अजम आकरम फ्रांसिस्क आंतोन

अमारत ब अयालतपन्हा शौकत ब हिशमत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल ब माहालानिहाय येथील नेंकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरिबिला आमोहिबी खत पाठविले ते छ १४ सवाली

पोहचले आमोहिब आनकूल होऊन इस्तादाची सलतनत पाठविली असता गनीम पराभव न जाहाला व पुढाहि होणार नाही तेव्हा इस्तादाच्या जामदारखानेस नुकसानी आहे त्याचा जाबसाल आपणाकडेस असे ममतेकरून शब्दास पाक दिला त्याचा उपयोग जाहाला नाही त्यामुले विरसता आहे जेनेर माहेचे आवल तारखेस माघारे फौज आकेरीस आहे ती पेडणेस अजम ब्रिगेदर याचे हुकुमात ती येईल म्हणोन येविसीचे तपसिले कलमे केले आशास गनीम वाडीनजीक च्यार कोशावर तलास असून इजानेबा-कडील जमावाची व त्याची गोलागोली होती तो मजकूर लेहून खत छ १४ तारखेच रवाना जाहाले आहे त्याजवरून जाहीर जाहालेच असेल आमोहिबी इजानेबाचा उपयोग जाहाला नाही असे समजात न आणावे वाडी संस्थान आज दिवसपर्यंत बेवसवसा रक्षण होऊन इजानेबाची जमियेत कावडाव करून गनीमास जरबेत आणीत आहेत हे आमोहिबाच्या पुराव्यापासून होत गनीम पराभव होत नाही असे आमो-हिबाच्या समजात येते त्यास त्याची फौज घोडेस्वार पाईचा जमाव सामोरा चढाई करून जाईल तर यश पावणार नाही रयालाचा सरंजाम असल्यास दम धरून ती फौज हटवील यास्तव रातबिरात आडचणीचे जागे धरून त्यास नतीजा दिला पाहिजे तो विचार होतच आहे आशा समयात इस्तादाची फौज आमोहिबी मागा नेली म्हणजे आश्रय सुटला असे गनिमाचा समज पडून वाडीस शह देईल येणेकरून आमोहिबी आजपर्यंत केले व्यर्थ होऊन इजानेबा पेची येतील यास्तव आमोहिबी भरवसा दिला त्याप्रो संस्थानचा बचाव करून इजानेबाची हुरमत वाडविणार जाहल्यास फौज आहे तसी ठेऊन आणखी प्रसंगोचित लागेल तसा पुरावा करून नक्षा राखावा खर्च वाढतो चिंता नाही आमोहि बाच्या सांगण्याप्रमाणे इजानेबा कबूल आहेत हेच सत्य पुरस्कर दिलात असावे ते न होता फौज मागा काडावी असेच आसल्यास खताचा जबाब पाठवावा म्हणजे इजानेबा वाडीहून निघोन गोव्यास येऊन आमोहिबास भेटून त्याच मार्गे माहायात्रेस जातील कलमी केला मजकूर दिलात आणून बंधुत्वे आमोहिबास पसंद ते कलमे करावे इजानेब मान्य आहेत रवाना छ १६ माहे सवाल ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १५८ तारीख ४-३-१८०८

नं. ८०९

अजम अकरम फ्रांसिस्क आंतोन दा वियग काब्रल गा
व क्रिस्त तेनेत
जनराल फौजानी पुर्तुगाल व गोवर्णदोर कपितां
व जनराल दा इंदी बाहादर मुंस्तकीम जंगरूस्त
मुलमुलुक शहर फुलम मालिक व दरमकानी
हाय बार मअनद हुकुमत मुतलकी बाशंद

अमारत व अयालतपन्हा शौकत व हिशेमत दस्तगाहा अंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाये येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेकी कलमे करीत गेले पाहिजे दरीविला आमोहिबी दोन किताबती पाठविल्या त्या पोहचून करवीरवासी याजकडील बोलणेचा इतबार न धरिता अनुमानी असाब व बरकड कर्तुत्वास युक्त असे मअलसीचे भाव तपसिले कलमे केले ते दिलात येऊन तदनसार बोलणी लाविली आहेत निपाणकर करवीरवासी याचा तह करून किले मुलूक घेऊन देतो असे म्हणतात त्याजकडेस बोलण्यास कारकून जाऊन त्याचा कारकून इजानेबा-कडेस आला आहे अनभवसिध घडून करवीरकर याचा व इकडील सिलसिला बंद असावा असे निपाणकर यातर्फेने जाहाल्यास आमोहिबाचे ज्याहिरीत येईल चिरंजीव श्रीराम सावंत यातर्फेचे नाईकवाडी व आतबिशाई इजानेबाचे आज्ञेत चालत नाहीत आपले सतेने वर्ततात त्यास सिक्षा करून इजानेबाची हुरमत वाडावी ते पुस्तीस इस्तादाची सलतनत लागेल तितकी वाडीत आणोन तो बंदोबस्त करावा यास्तव आमोहिबास कलमें केले त्याप्रमाणे सलतनत वाडी मकानी येऊन पाहिजे तशा पुस्तपन्हा करितील अशा लेख आला त्याबमोजिब अजम जुवाब कायेतान कोर्णोल यास सनिध आणून सदरहु मजकुराचे उभारणीस आले पाहिजे असे सांगितले त्यास ते त्याचा लोभ धरून असे केल्याने घरचे बखेडे मोडणार नाहीत आन येक दोघास हात दाखविल्यास पुन्हा दुसरे बल धरितील यास्तव चिरंजीव श्रीराम सावंत याचा मूल घेतला तो पुढा करून त्याच्या लोकाची कल्पना मोडावी म्हणजे बंदोबस्ता-बर येईल हे येक दुसरे सदरी कलमें केल्या बंदोबस्तास वाडीत राहून पुस्तपन्हा करावा असी आपणास आजम ब्रिगादोर याची आज्ञा आली नाही असे सांगितले त्याजवरून बिगादोर

यास खत कलमें केले त्याणीहि आमोहिबाच्या लेखाप्रमाणे कार्नेल यास लिहून पाठविले उघड दशेत न येता तो बंदोबस्त करितो इजानेबाच्या संकेत मूल घेतला तो दूर करावा असा नाही मूल आज्ञान कोणताही विचार करणे तो इजानेबाचे हुरमतीने घडून लाहानमोठे सर्वं आहेत ते राहारस्ता रवाजाप्रमाणें चालून इजानेबाचे आज्ञेन येक सतेत असावे त्यात कदरनदर करतील त्यास शिक्षा घडून बखेडे तुटावे येविशी पहिलेपासून आमोहिबा कलमें करीत आले त्या समईच ती गोष्ट घडावी परंत करवीरवासी नजिक असून त्या वेदाखाली तकुबी जाहाली त्यामुले आमोहिबी विशादाबरही घेतलेनंतर इजानेबी निखालसपणी कलमे केल्यावरून सर्व गोष्टीस अनकुल जाहाले हे संस्थान तूर्त प्रसंगी इस्तादाचे सर्फराजीवर इजानेबा संभाळून आहेत आमोहिबा व इजानेबा बंधुत्वे निंखालसीने चालतात त्याबमोजीब अक्रत्रीमपणे इजानेबाच्या उपयोगास जुवावे कायेतान कोर्नेल आनकूल असावे इजानेबी आमोहिबास कलमे करून त्यास आज्ञा आली असे न कलविता अंतरंग इजानेबाचे हुरमतीचे अगत्य जाणऊन + + येकखानपणे करीत जाणे म्हणोन लेख यावा दुसरा मजकूर हे संस्थान काईम राहावे इजानेबाची सता चालावी याजकरिता निस्पृयेपणे इस्तादाची सलतनत पेडणेस आमोहिबी ठेविली व इजानेबानजीक पाठविली खर्च भरीत जाहाले त्या कृतोपकारास उपमाच नाही येथील तंव कोलापूरकर किव्हा घरातील सुधता आज दिवसपर्यंत न घडे समयोचित आमोहिबा सलतनत माघारा न्हेतील तर पुन्हा मागणेस जागा नाही यामुले अजुर्दगी आहे परंत आश्रय व पुस्तपन्हा तो बंधुत्वे आमोहिबाचा हे दिलात असावे आण कोणतोहि बुनीबाद सांगणे तसा सांगोन संस्थान काईम राहे हुरमत वाडे ते आमोहिबीच केले पाहिजे आमोहिब ममता धरितात तसा दुसरा जागा इजानेबास नाही जाणोन वारंवार कलमे करितो निपाणकर याचे व इजानेबा याचे पहिले किंचित नाते आहे व चिरंजीव सावित्रीबाई याची मूल चिरंजीव जिबनाबाई यास आपल्या बंधूस द्यावी असे निपाणकर याजकडील बोलणे आहे त्याकरिता किव्हा आपली निखालस्ता समजावी जाणोन थोडक्यानसी इजानेबाचे भेटीस ते येणार असे त्याजकडील कारकून सांगत होता आमोहिबास मालूम व्हावे जाणून कलमें केले असे खताचा जवाब कलमें केला मजकूर दिलांत आणोन पाठविला पाहिजे रा छ ६ माहे मोहरम ज्यादा काय लिहिणे महबत असो दिली पाहिजे हे किताबत.

लेखांक १५९ तारीख २३-३-१८०८

नं. ८३४

अजम आजुदांत जेनराल दे

इस्ताद दाम महबत हू

मोहिबानपनाह मखलीशान दस्तगाहा आंजी रामचेंद्रराव खानबळकर सलाम बाजत सलाम येथील नेकी जाणोन मोंहिबी कारनेकी कलमे करीत जावे दिगर करवीर-वासी माहाराज याणी फौजसुधा कुडाल प्रांतात येऊन आज दोन महिनेपर्यंत दंगा आरंभिला आहे नित्ये उठोन वाडीचे स्वस्थानावर चाल करितो त्याची याची दररोज लढाई होती यास्तव वाडीकर याचा व इस्तादाचा सिमसेजार घरोब्रा येकमेकास लुकसानी जाहाले वक्ती उपराला व्हावा यैसे आजवर चालत आले तशात साहित्ये होगेविशेई शाहामतपन्हा विजरये यास इकडोन येक च्यार पत्रे गेली परंत साहित्ये होगेस दिरंग लागला गेलीयानें निकट केली अशास त्या दरबारी कदीम माणूस मोहिबा आहेत ह्या स्वस्थानाविषी पहिले जोकीवी शेतं आजुदातन्याल कितीयेक अगत्य धरोन घरोबा चालऊन कितीयेक साहित्य करीत आले त्यातील सर्व माहेती मोहिबास आहे तूर्त त्या आखनी मोहिबा असता साहित्ये न घडे हे आश्चिर्ये आता निकटीचा प्रसंग जाणोन मोहिबास हे खत रसीद केले असेत दिल खुलासा करोन येकबालपन्हा बैजकल विजरये साहेब यास कदीम दोस्ती चालोन साहित्य घडत आलेच्या दोन गोष्टी सांगोन त्याकडून जमाव व दारूगोलीचा उपराला होऊन या दोन रोजात इजानबाचे उपयोगी पडे ते मोहिबी केले पाहिजे येणेकरून स्वस्थान बच्यावेचे येश मोहिबा पदरी पडते त्या दरबारी मोहिंबाची भीड सला जाणकारण अगत्येबादे होईल जाणोन लिहिले आहे सर्व भरवसा मोहिबाचा जलदी त्वरा उपरालेची होई ते केले पाहिजे सर्व भरवसा मोहिबाचा ता छ २५ मोहरम सन समान मयातैन व अलफ दोस्तीचे जागा ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

लेखांक १६०

तारीख २६-४-१८०८

नं. १२०२

हू

अजम आकरम बेर नाऊद जुजे केरेन कोद
विजरइ ब कपिता ब जनराल
जंजिरे गोवा

आमारत व आयालतपन्हा शौकत व हिशामत दस्तगाहा आंजी लक्ष्मीबाई भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय येथील नेकी जाणोन मोहिबी आपली कारनेंकी कलमे करीत गेले पाहिजे दरिविला बाडीस यावे म्हणून राजश्री बिस्वासराब घाटगे व जांबोटकर याजकडून बोलणे आले होते त्याचा अद्यापि ठराव जाहाला नाही चिरंजीव राजश्री भाऊ यास येशवंतगडाहून राजश्री रामचंद्रराव खानबलकर याणी बाडीस नेऊन निपाणीकर यास माहादेवगड व वेंगुर्ले ही दोन ठाणी लेखपत्र करून दिली आद्यापि त्याजागी त्याचा आमल बसला नाही इजानेबी संस्थानास जावे तर ती आगर आणखी ठाणी निपाणीकर याजकडेस न गुंतता जावे हे मानस यातील खबीर त्याजकडून ठरून इजानेबाची खातरजमा होईल तेव्हा आमोहिबाचे बुधीवादे जाणे घडणार निपाणकर या तर्फेने मुख्तयार राजश्री सखाराम घाटगे बांद्यास येऊन पोहचले ते बाडीस गेल्याबर यातील बोलणी येतील इजानेबा आमोहिबाचे भेटीस यावे असे अजम आजुदांत बाडद व राजश्री बहुगुण कामत लिंब दोइस्ताद याजकडेस बोलण्यात आले होते त्यास शरीरी ज्बराची विकुती आहे ती निखालस गेली नाही व निपाणकर याजकडूनहि बोलणी येतात याजकरिता तूर्त येथे राहाणे प्राप्त आमोहिबास मालूम व्हावे हरबख्त किताबत पाठवून दोस्ती जियादा होई ते करीत जावे रा छ २९ माहे सफर ज्यादा काय लिहिणे महबत असो दीजे हे किताबत.

को. ब. इ. ८–११

लेखांक १६१ तारीख ३१-७-१८३०

नं. २२ श्री

अजम मेहेरबान सीप्रीयान सिलवेर युरूद्रीग नो नके
बालेर परफेस नावोर्द दे क्रीस्त कोरनेल दाइफातेरी
आल मिस्त्रा दारेदा आलफात दा सीदाद सक्तार
साहेब ये कोसीरदो बस्ताद दे इंदिया गोवे
दामदौलत ज्यादा हू

साहेबाचे खिसमतीस बाबाजी सदासीव गोडबोले इनच्यार्ज सुभा मालबण तालुके जंजिरे सिंधुदुर्ग सलाम बाअदज सलाम आंकी येथील खेर तागायत तारीख ३१ माहे जुलई सन १८३० ता साहेबाचे नेक नजरे करून खैरयत असे बाआदज अर्ज साहेबाचा हुकूम तारीख २२ जुलै सन १८३० चा आला त्यात चीनचे लोक दोन आसामी सापडले त्यास न्हेणेकरिता सिपाई पाठवणे म्हणोन आज्ञा त्याजवरून सदरहू चीनचे दोन आसामी बंदीवान आणावयाकरिता येथून सिपाई पटेवाले ४ व नाईक १ येकूण पाच आसामी रवाना केले आहेत याचे ताबीन सदरहू बंदीवान व्हावयासी आज्ञा जाली म्हणजे बंदोबस्ताने आणतील खिजमतीस रोषन होय हे अर्जदास्त.

बाबाजी सदाशीव गोडबोले

इनचार्ज.

सूची : भाग ८

व्यक्तीपुढील आंकडे लेखांकांचे आहेत.

———

दुरुस्ती : भाग ८

पृ. १८ ओळ ५ ‘ भ्रखंडित ’ च्या ऐवजीं ‘ अखंडित ’ वाचावें.

पृ. २६ ओळ ६ व ७ ‘ गुणाबाई सुबराव ’ च्या ऐवजीं ‘ गुणाबाई व सुबराव ’ वाचावें.

पृ. ३४ ओळ ९ ‘ नजूर ’ च्या ऐवजीं ‘ नजर ’ वाचावें.

पृ. ३५ ओळ १५ ‘ व्यासरूजरूषीदेव ’ च्या ऐवजीं ‘ व्यासराजरूषीदेव ’ वाचावें.

पृ. ३५ ओळ २० ‘ छ ५ ’ च्या ऐवजीं ‘ छ २ ’ वाचावें.

पृ. ३८ ओळ १९ ‘ बावानी ’ च्या ऐवजीं ‘ बावाजी ’ वाचावें.

पृ. ५१ ओळ १९ मध्यें ‘ नं. १४६९ ’ समजावा.

पृ. ५१ ओळ २४ ‘ येणील ’ च्या ऐवजीं ‘ येथील वाचावें.

पृ. ५३ ओळ ५ ‘ उमसर्ग ’ च्या ऐवजीं ‘ उपसर्ग ’ वाचावें.

पृ. ५४ ओळ १० ‘ षहिलेच्च ’ च्या ऐवजीं ‘ पहिलेच ’ वाचावें.

पृ. ५६ ओळ ५ ‘ घगैरे ’ च्या ऐवजीं ‘ वगैरे ’ वाचावें.

पृ. ५७ ओळ १४ ‘ वाहाराजाच्च ’ च्या ऐवजीं ‘ माहाराजाचे ’ वाचावें.

पृ. ५८ ओळ १६ ‘ सर्वदेकर ’ च्या ऐवजीं ‘ संवदेकर ’ वाचावें.

पृ. ६० ओळ १० ‘ सिवाजीयंत ’ च्या ऐवजीं ‘ सिवाजीपंत ’ वाचावें

पृ. ६० ओळ १४ ‘ गुणापवाद ’ च्या ऐवजीं ‘ गुणानवाद ’ वाचावें.

पृ. ६१ ओळ ११ ‘ इस्तादादे ’ च्या ऐवजीं ‘ इस्तादाचे ’ वाचावें.

पृ. ६२ ओळ १० ‘ असाध्य ’ च्या ऐवजीं ‘ असाह्य ’ वाचावें.

पृ. ६४ ओळ १० ‘ घेऊस्र ’ च्या ऐवजीं ‘ घेऊस ’ वाचावें.

पृ. ६७ ओळ १८ ‘ इजानेवाचीहि ’ च्या ऐवजीं ‘ इजानेवाळीहि वाचावें.

पृ. ६९ ओळ २४ ‘ यावेंसे ’ च्या ऐवजीं ‘ यावेसे ’ वाचावें-

पृ. ७० ओळ २३ ‘ मार्गाहून ’ च्या ऐवजीं ‘ मागाहून ’ वाचावें.

पृ. ७१ ओळ १४ व १५ ‘ मुदे – मवे ’ च्या ऐवजीं ‘ मुदे मवे ’ वाचावें.

पृ. ८७ ओळ २२ ‘ गोधे ’ च्या ऐवजीं ‘ गोवे ’ वाचावें.

पृ. ८८ लेखांक ९२ ची तारीख ' तारीख ४-४-१७६७ ' वाचावी.

पृ. ९५ ओळ २५ ' दोरतीचे ' च्या ऐवजीं ' दोस्तीचे ' वाचावें.

पृ. १०० ओळ १६ ' माहे नोव्हेंबर इ. स. १७८१ ' च्या ऐवजीं ' माहे फेब्रुवारी इ. स. १७८२ ' वाचावें.

पृ. १०१ ओळ ९ ' खुबीस ' च्या ऐवजीं ' खुषीस ' वाचावें.

पृ. १०८ ओळ १८ ' अमता ' च्या ऐवजीं ' असतां ' वाचावें.

पृ. ११२ ओळ २२ ' सातडे ' च्या ऐवजीं ' सातर्डेस ' वाचावें.

पृ. १२६ ओळ ११ ' मझाल ' च्या ऐवजीं ' महाल ' वाचावें.

पृ. १२६ ओळ २५ ' बाजब ' च्या ऐवजीं ' बाजेह ' वाचावें.

पृ. १४१ ओळ १७ ' समुद्रातून ' च्या ऐवजीं ' समुद्रातून ' वाचावें.

————

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग आठवा)

गोवा पुराभिलेख संग्रहालयांतून निवडलेले कागद

इ. स. १७१३ ते इ. स. १८३०

संपादक :

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८६ इ. स. १९६५

प्रकाशक :
मा. वि. गुजर
१३२१ कसबा पेठ, पुणें ११.

*

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :
हिस्ट्री ऑफिस, न्यू पॅलेस, कोल्हापूर
किंवा प्रकाशक यांच्याकडे.

*

किंमत

५ रुपये ५० पैसे

*

मुद्रक :
मा. प. तळेकर
श्रीदत्त मुद्रणालय,
३३५ शनवार पेठ, पुणें२.

प्रस्तावना : भाग ८

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा आठवा भाग आहे. यांत गोवा पुराभिलेख संग्रहालय, पणजी (गोवा) येथें असलेल्या ऐतिहासिक मोडी अस्सल कागदपत्रसंग्रहांतून निवडलेल्या कागदांचा समावेश केला आहे. मोडी लिपींत लिहिलेले सुमारें सहा हजार कागद माझ्या अवलोकनांत आले. हीं सर्व पत्रें छत्रपति शाहूमहाराज (इ. स. १७०७–१७४९) व महाराजांच्या नंतरच्या कारकीर्दीतील आहेत. जंजिरे गोवा येथील पोर्तुगीज विजरई अगर गोवर्णदोर अगर सकडतार अगर जनराल अगर कपितान आणि त्या प्रांतांतील मनसुबेबाज शेणवी यांच्याशीं हा पत्रव्यवहार झालेला आढळतो. या पत्रांतील ऐतिहासिक मजकूर सारांशरूपानें दिला तर अभ्यासकांना तेथील मोडी अस्सल कागदपत्रसंग्रहाची साधारण कल्पना येण्यास उपयोग होईल, अशी आशा वाटते. सबब त्या मजकुराचें दिग्दर्शन पुढें केलें आहे.

आंगरे बंधू व पेशवे हें प्रकरण मराठ्यांच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं संस्मरणीय आहे. तुळाजी आंगऱ्याचा नाश करण्याचे कामीं फिरंग्यांचें मन वळविण्यासाठीं नानासाहेब पेशव्यांनीं आपल्या अंमलदाराकडून फिरंगी विजरई बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार, तसेंच पेशव्यांपासून बचाव व्हावा म्हणून खुद्द तुळाजी आंगऱ्यांनीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांच्याकडे कुमक मागितली त्यासंबंधीं केलेला पत्रव्यवहार हे अभ्यसनीय आहेत. जंजिऱ्याचे सिद्दींचा फिरंगी विजरई बंदर गोवा यांच्याशीं झालेला पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं अभ्यासकांस महत्त्वाचा वाटेल.

पंतप्रधानांचा व मोंगल बादशहाचा घरोबा झाला; शिंदे, होळकर या सरदारांनीं उत्तर हिंदुस्थानांत जाऊन कोटींचा मुलूख व मानमरातबा प्राप्त करून घेतला या महत्त्वाच्या घटनेबाबत पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना बातमीपत्रें मिळालीं आहेत. या पत्रांचा काळ सन १७५१ व सन १७५२ हा आहे. महाराणी ताराबाईच्या व नानासाहेब पेशव्यांच्या बिघाडाची शाहूमहाराजानंतरचीं अनेक पत्रें आहेत. मर्दनगड व सदाशिवगड हे किल्ले मराठ्यांच्या अंमलाखालीं असावेत त्याबाबत नानासाहेब पेशवे व थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीतील पत्रव्यवहार येथें आढळतो.

पोर्तुगीज विजरई बंदर गोवा हें मराठी राज्याच्या मर्जीनुरूप चालतात, तेव्हां मराठ्यांच्या आरमारानें फिरंग्यांना लटका बसवास पाडणें उत्तम नव्हे, ही ताकीद थोरले माधवराव पेशवे यांनीं आपल्या आरमारास केली. पुढें मराठे हैदर नाईकांचे पारिपत्यास कर्नाटकांत गेले, त्या प्रसंगीं पोर्तुगीजांनीं आरमाराची मदत करून हैदरास तंबी करावी आणि मराठ्यांचे गड, कोट, किल्ले वगैरे ठाणीं बसवून घ्यावीं, यासंबंधीं पेशव्यांनीं केलेला पत्रव्यवहार येथें उपलब्ध आहे. राक्षसभुवनच्या लढाईची बातमी देणारीं पत्रें, इ. स. १७६७ मध्यें म्हैसूरच्या हैदरअलीवर जी स्वारी केली त्याची माहिती देणारीं पत्रें आणि सोंधे, पंचमहाल या भागांतील मुलुखगिरीसंबंधीं पत्रें अभ्यासकांस महत्त्वाचीं वाटतील.

'माझी पेशवाई कायम राहावी, आणि बारभाई हा जबर शत्रु आहे त्याचा नाश करण्यास कुमक करावी,' हें राघोबादादांचें राजकारण उघडकीस आणणारीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांस लिहिलेलीं पत्रें अनेक आढळतात. पोर्तुगीज सरकारची दोस्ती मराठ्यांशीं येकरंग चालत असतांना टिपूच्या मोहिमेंत मराठ्यांना आरमाराची व फौजेची हालचाल करण्यास फिरंग्यांनीं दिक्कत आणूं नये याबाबत नाना फडणिसानें गोवर्णदोर बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार येथें वाचण्यास मिळतो.

हुबळी, कित्तूर, खानापूर येथील नाडगौडा, देसाई व सरदेसाई, तसेंच कर्नाटकांतील नबाब या सर्वांच्या हालचालींची माहिती शेणवी राजकारणी वकिलांनीं विजरई बंदर गोवा यांस वेळोवेळीं कळविली आहे. राणे सरदेसाई सांखळी सावंतवाडीकर आणि सोंधेकर यांचा गोव्यांतील पोर्तुगीज सरकारशीं विविध घटनांवर प्रकाश पाडणारा जो पत्रव्यवहार झाला तो येथें भरपूर आहे.

दुतर्फा दोस्ती चालत असतांना सावकारी तरांडी धरणें वगैरे गोष्टी बंद व्हाव्या, त्याबाबत केलेला पत्रव्यवहार पुष्कळ आहे. शत्रूचा प्रतिकार करण्यासाठीं पोर्तुगीजांनीं दारूगोळा, फौज व आरमार यांची कुमक त्वरेनें करावी म्हणून मराठ्यांनीं विजरई बंदर गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे. त्यांत राजकारणाचे धागेदोरे मिळतात. रहदारीचें दस्तक मिळविण्याबाबत पत्रव्यवहार, अन्यायानें अटक करून ठेविलेला मनुष्य सोडण्याबाबत पत्रव्यवहार, आजारी इसमास औषधोपचार करण्याकरितां फिरंगी किंवा विलायती तबीब पाठविण्याबाबत पत्रव्यवहार, मराठ्यांच्या राज्यांतील गरती बायका व पोरें व कुणबिनीं फिरंगणांत जागजागा कोणी

आणून विकल्या त्याबाबत शोध घेण्यासाठीं केलेला पत्रव्यवहार, तसाच चोरट्यांचा शोध व बंदोबस्त वगैरे बाबींसंबंधीं पत्रव्यवहार येथें अभ्यासकांस मिळेल.

गोमंतकांतील देवस्थानें जशीं पुरातन तशीं त्यांची खर्चावेचाची व्यवस्था देखील पुरातन होती. परंतु जेव्हां जेव्हां त्या प्रथेस खंड पडला तेव्हां तेव्हां त्या देवस्थानची पुरातनप्रमाणें व्यवस्था चालवावी म्हणून पेशव्यांनीं पोर्तुगीज विजरईशीं पत्रव्यवहार केला आहे. तसेंच वसई प्रांतांतील ख्रिश्चन लोकांस धर्माप्रमाणें धर्मकृत्यें वगैरे करण्यास अडथळा येतो असें समजलें, म्हणून त्या प्रांतांतील मराठ्यांच्या कमाविसदाराकडून नीट चौकशी करून अडथळे होत असल्यास ते दूर करण्याबाबत गोवा बंदरच्या विजरईनें पेशव्यांशीं पत्रव्यवहार केला आहे. श्रीशांतादुर्गा संस्थान कवले येथील व्यवस्था पूर्वीप्रमाणें चालू ठेवण्याबद्दल महादजी शिंदे यांनीं देखील पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यांस पत्रें लिहिलीं आहेत. अशा प्रकारें राजकीय, सामाजिक व धार्मिक व राज्यकारभारविषयक बाबींसंबंधीं भरपूर माहिती देणारीं पत्रें या संग्रहांत आढळतात.

अशी विविध प्रकारची माहिती पुरविणारा हा मोडी लिपींत असलेला उच्च दर्जाचा अस्सल पत्रव्यवहार नीट संग्रह करून सुस्थितींत जतन करून ठेविला आहे. माझा उद्देश केवळ करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासास उपयुक्त असणारीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा असल्यामुळें त्यांतून मीं आरंभीं निर्देश केलेल्या विषयाबाबत माहिती पुरविणारीं अशीं १६१ पत्रें निवडलीं. हीं पत्रें कालक्रमानुसार जुळवून प्रस्तुत पुस्तकांत छापलीं आहेत. या पत्रांतील ऐतिहासिक मजकुराचें वर्णन पुढें केलें आहे.

सिदोजी घोरपड्यांनीं सांबराणी गांव लुटून सोंधे शहराचे बाहेर फौजेचा तळ देऊन तेथील राजास दोन लक्ष धारवाडी होन खंडणी भरण्याबद्दल मागणी केली. ह्याच वृत्ताबरोबर नवाब दिलेरखान कर्नाटकावर चाल करून गेले तेव्हां त्यांच्या झालेल्या फजितीचें वर्णन ले. १ मध्यें दिलें आहे. करवीरचे छत्रपति संभाजीमहाराज यांचा गोव्यावर स्वारी करण्याचा इरादा असल्याबद्दल माहिती ले. २ मध्यें आहे. सुभानराव शिंदे, सेनाखासखेल आणि सुबराव शिंदे साहेबसुभा यांनीं संभाजी नाईक प्रतापराऊ सरदेसाई यांना सामील करून घेऊन छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांनीं योजिलेली मसलत पार पाडण्याचा उद्योग हातीं घेतला. त्याप्रमाणें व्यंकटराव नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर यांना गोवें प्रांतांत मुलुखगिरी करण्यास प्रतिबंध करणें आणि त्यांस त्या प्रांतां-

तील करार केलेल्या खंडणीच्या ऐवजांतून येक कवडी न देणें असें ठरविलें. ही माहिती ले. ४, ५, १७, २५, २८, ३७, ४१, व ४९ या लेखांत आहे. पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यानें करार केल्याप्रमाणें खंडणीचा ऐवज प्रथम द्यावा; नंतर मराठ्यांची फौज गोवा प्रांताचे सरहद्दीबाहेर जाईल ही हकीकत आणि वसईच्या तह व करारमदाराबाबत सुरू असलेल्या वाटाघाटीचें वृत्त छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांचे सरदार दादाजीराव भावे नरगुंदकर यांनीं पोर्तुगीजांना लिहिलेल्या पत्रांत आढळते. (ले. ६, ७, ८) संभाजीमहाराजांनीं आपला एक पुतण्या गुप्तपणें बंदींत ठेविला होता, त्याबाबत हकीकत ले. ९ मध्यें आहे.

छत्रपति संभाजीमहाराजांनीं योजिलेल्या मनसुब्यासंबंधीं माहिती ले. १०, ११ व ३१ हे लेख पुढीलप्रमाणे देतात. 'तुम्ही फिरंगी संस्थानचे (गोव्यांतील पोर्तुगीज राज्याचे) कित्येक कल्याण योजून छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांना विनंतिपत्रें पाठविलीं तो सकल अर्थ आम्हांस महाराजांनीं सांगून पाठविला तेव्हां तो धंदा करणें आम्हांसहि अगत्य आहे. या मनसब्यास आतां दिरंग लागत नाहीं. इतःपर त्या प्रांतांत बाजीराव पेशवे यांची स्वारी होणार नाहीं. याबाबत छत्रपति शाहूमहाराजांकडून सिद्धता करून घेतली आहे. फोंडे प्रांतांतील ठाणीं गतवर्षीं हस्तगत केली होतीं त्यांचा हिशोब येथें तोडण्यांत आला.[१] या माहितीस दुजोरा देणारी पत्रें हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यांनीं बाबूल शेणवी व वेंकटी कामती सावकार यांना पाठविली आहेत, (ले. १२, १३) वर उल्लेखिलेला मनसुबा पार पाडण्यासाठीं झटावें म्हणून नाग सावंत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय यांना उभयतां छत्रपति महाराजांनीं या समयीं आज्ञा केली. त्याप्रमाणे नाग सावंत फौजेची तयारी करून सिद्ध झाले. सदर प्रकरणाबाबत नाग सावंतांनीं सकटतार, जंजिरे गोवा यांच्याशीं केलेला पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. मराठे सरदारांच्या अंतरंगाची ओळख होण्यास हा पत्रव्यवहार उपयुक्त ठरेल. पाहा (ले. १४, १७, २३, ३९, ४२, ४३, ५०, ५१ व ६३).

हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार, व्यासराजरूपीदेव सेनापति जफ्तनमुलुक फतेजंगबहादर यांनीं विठल शेणवी यांस असें कळविलें कीं, 'हल्लीं पोर्तुगीज विजरई व सकडतार व वेंकटी कामती यांना पत्रें लिहिलेलीं आहेत. तरी तुम्ही या प्रसंगीं मातबर आहां. सबब कळेल त्या रीतीनें पोर्तुगीजांस सांगून फौज, तोफा, दारूगोळी वगैरे सामानासह सामील होणे. त्यांत पोर्तुगीजांचें व रयत लोकांचें हित आहे. पुढे वाणी, उदीम व

सावकार लोकांस स्वराज्य झाल्यावर दळणवळण चालू ठेवण्यास काडीमात्र चिंता वाटणार नाहीं.' (ले. ३५ व ३६) त्यापूर्वीं हिंदुराव घोरपडे यांनीं पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना लिहिलेल्या एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आढळतो: 'आमचे दिलांतील बात कीं, कर्नाटक प्रांतांत आम्ही मसलतसीर होतो ते वख्ती व्यंकटराव नारायणराव घोरपडे इचलकरंजीकर व दादाजीराव भावे नरगुंदकर हे फौजेसहित येऊन त्यांनीं गोवे प्रांतांतील मडगांव, कुकली वगैरे जागा नासाडी करून रायचुरास (रायतुरास) वेढा देऊन राहिले. त्या समयीं त्यांनीं आम्हांकडील फोंडे, पंचमहाल, जांबोली, सुपा हे जिल्हे काबीज केले. ही खबर कळल्यावर आम्ही कर्नाटक प्रांताहून मजल दरमजल कूच करून छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांच्या भेटीस गेलो. भेट झाली; त्या वेळीं महाराजांनीं हुकूम केला कीं, आपल्या जिल्ह्याचीं ठाणीं आपल्या येख्तयारींत घेणें.' [पाहा ले. १५.] शिवाय याच संबंधाचे ले. ४५, ६७, ६८ हे लेख पाहावे. वर उल्लेखिलेला मनसुबा पार पाडण्यासाठीं दौलतराव घोरपडे यांना देखील छत्रपति संभाजीमहाराजांनीं आज्ञा केल्लेली आहे, हें ले. ३९, ४२, ४३, ४४ व ५१ या लेखांवरून निदर्शनास येतें.

छत्रपति संभाजीमहाराज यांनीं पोर्तुगीज सरकार बंदर गोवा यांच्याबाबत जें धोरण स्वीकारलें त्याची माहिती ले. १६ मध्यें आहे. पुढें संभाजीमहाराजांनीं बिठल सेणवी धुमे यांस जें आज्ञापत्र पाठविलें त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर आढळतो: 'व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर यांनीं गोवे प्रांतांत नासाडी केली; तेव्हां तो प्रांत स्वबश करून हुजरून रामचंद्र बाबा यांस संपूर्ण अधिकार, सर्व साहित्य व फौज देऊन पाठविले आहेत.' (ले. ३३, ३४)

रंगो नारायण या वकिलाचा मुक्काम कोल्हापूर येथें असतांना त्यांनीं बाबूल सेणवी यांस लिहिलें कीं, 'आम्हीं सर्व वृत्तांत सांगितल्यावरून छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांनीं सर्व सरदार अष्टप्रधानांस बोलावून विचार केला कीं, कृष्णा नदी अलीकडे जिल्हा आमचा व कृष्णा नदीपलीकडे जिल्हा छत्रपति शाहूमहाराजांचा याप्रमाणे आणभाषा होऊन आज दहा बारा वर्षें झालीं. आमच्या जिल्ह्यामध्यें त्यांस संबंध नसतांना आमचे जिल्ह्यांतील ठाणें घ्यावयास संबंध काय? छत्रपति संभाजीमहाराजांनीं थोरले महाराज (छत्रपति शाहूमहाराज सातारा) यांना लिहून पाठविले कीं, तुम्ही होऊन मर्यादा करून चालले; आतां आमच्या जिल्ह्यामध्यें तुमचे सरदार जाऊन आमची ठाणीं घेण्यास संबंध काय? तुमच्या आज्ञेनें राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांनीं आमचीं

स्थळें घेतलीं किंवा पंडित प्रधानांनीं आधींच आपल्या विचारानें केले ? पुढें तुमचा आमचा तह कसा चालवा ? ही गोष्ट खुलासा करून लिहून पाठवावी. तेव्हां थोरले महाराजांनीं लिहून पाठविलें कीं, तुमच्या जिल्ह्यामध्यें आम्हांस अगत्य नाहीं; सहसा तो संदेह तुम्हीं मानूं नये; तुमची आमची भेट व्हावी; तुम्हांपेक्षां आम्हांस काय थोर आहे ? म्हणून कित्येक ममतेच्या गोष्टी सांगून व लिहून पाठविल्या. ' (पाहा ले. २०; शिवाय याच संबंधाचे ले. १९, २२, ४९, ६० व ६५ हे लेख पाहावे.)

या मनसुब्याबाबत रामचंद्र बावाजीनें बाबुल सेगवी यांस कळविलें कीं, ' इकडील वृत्त तर थोरले स्वामी यांनीं बाजीराव पंडित प्रधान यांना बोलावून घेतलें आहे. ते येतांच करवीरकर महाराजांचीं ठाणीं महाराजांना देवितात. तेव्हां बाजीराव पंडित प्रधान यांनीं हें वृत्त ऐकून आपणाकडील कारकून थोरले महाराजांकडे पाठवून विनंति केली कीं, आपण चाकर राजश्री स्वामीचेच आहों. तेवढे जिल्हे आपल्या लेकाचे नांवें करून द्यावें; राजश्री स्वामी जी आज्ञा करतील त्यास आपणापासून सहसा अंतर पडणार नाहीं. परंतु थोरले महाराज बाजीराव पंडित प्रधानांच्या या गोष्टीस अनुमोदन देत नाहींत. '

या प्रसंगीं रामचंद्र बावांनीं पोर्तुगीज सरकडतार बंदर गोवा यांस इकडे लिहिलें कीं, ' पादशहा पुर्तकेश आणि उभयता महाराज यांचा स्नेह चालत असतांना महाराजांचीं स्थळें जोरावारीनें घेऊन कानड्याचे स्वाधीन करावीं आणि मराठ्यांशीं वैर करून रयत गोरगरीब सर्व खराब करावें हे उचित नव्हे. तुम्ही थोर एकवचनी असतांना समय पडल्यास तुमची कुमक करावी या विचारें या उभयतां महाराजांस व शिंदे, सेनाखासखेल यांस व मराठी राज्यांतील बरकड सरदारांस लिहिणें तसें लिहून तुमचें साहित्य करण्यास अंतर केले नाहीं; हिंदुराव घोरपडे, ममलकतमदार थोर मोहरे यांना हें राजकारण सांगून तुम्हांस कागद लिहून पाठविले. तुम्ही पातशाही कारभारी आहां; तेव्हां तुम्ही कानड्या-कडील अभिमान धरून नाहक पोर्तुगीज सोल्जरांना झुंजण्यास भाग पाडावे, मुलूख खराब करावा, रयत मोडावी हें काम योग्य नव्हे; आम्ही सर्व प्रकारें तुमचे आहों; जेव्हां आम्ही तुमचे, तेव्हां दोन्ही महाराजांच्या राज्यांतील दोन लाख फौजहि तुमची आहे; कांहीं पातशाही चाकरी करून दाखवूं; तरी आमचीं स्थळें आम्हांस देऊन उभयतां महाराजांचा स्नेह संपादणें. विचारें पाहतां कानडा दगाबाज आहे; त्यानें युक्तीनें समजावून तुमचें साहाय्य करून घेतलें; ज्यांच्या पदरीं लाख फौज होती त्यांच्या पदरीचीं स्थळें घेतली; तेव्हां

आम्हांस कानड्याच्या पदरींचीं ठाणीं घ्यावयाचें काय अगाध आहे?' (पाहा ले. २१, ५३, ४१, ५४, व ५८) पुढें रामचंद्र बाबा यांनीं पोर्तुगीज गोवर्गदोर बंदर गोवा यांस देखील कळविलें कीं, 'हल्लीं पोर्तुगीज पातशाही सदरेस सारी हकीगत लिहिली आहे. फिरंगाणामध्यें सत्य आहे, फिरंगी लोक विश्वासघात करीत नाहींत असें ऐकिलें होतें; त्याकरितां पातशाही कौल व फिरंगी यांचें बोलणें खरें मानून भेटीस आलों असें असतांना आमचें सर्व घेऊन आठ मास श्रमी केले. महाराजांचीं ठाणीं घेऊन सोंधेकरांच्या हवालीं केली; महाराजांचा पैका बुडविला; त्यामुळें पातशाही कौल लटका झाला; फिरंगी यांच्या वांट्यास विश्वासघात व दगाबाजी आली; फिरंग्यांचे धर्मशास्त्रांत असेंच असलें तर असो; नसलें तर आमचें सर्व वारून द्यावें. महाराजांचीं ठाणीं महराजांच्याकडे द्यावीं म्हणजे भांडण मिटेल; दुतर्फा मुलूख नांदेल; मराठी फौजेचा उपसर्ग फिरंगाणास लागणार नाहीं.' पाहा ले. ५५. याच पत्रलेखकाचे या विषयाबाबत पुढील लेख आढळतात. ले. २९, ३०, ३८, ४६, ४८, ४९, ५२, ५६, ५७, ५९, ६१, ६६, ६७ व ६८.

अशा प्रकारें पोर्तुगीजांना मराठी राज्याचा दरारा दाखवून मराठ्यांचीं ठाणीं परत मिळविण्याचा डाव रामचंद्र बावांनीं योजिला. त्याचप्रमाणें पोर्तुगीजांनीं धर्मशास्त्र व नीति यांचा विचार करून मराठ्यांचें समाधान प्रथम करावें या गोष्टीचा देखील त्यांनीं आग्रह धरिला.

सिवाजीपंत या नांवाचे एक वकील साताऱ्यास गेले. तेथें शाहूमहाराजांच्या दरबारांत प्रसिद्ध असलेले थोर पुरुष नारो राम मंत्री यांना ते भेटले. पुढें त्यांनीं पोर्तुगीजांकडील सविस्तर वर्तमान निवेदन केलें. तें ऐकून शाहूमहाराज बोलले की, 'गोवे बंदर फार उत्तम; नासूं नये; बंदर नासल्यामुळें साहेबास (शाहूमहाराजांस) फायदा आहे असें नाहीं; फिरंगियासच बंदर असल्यामुळें फायदाच आहे; बंदरी चीजवस्तु मिळते.' सातारा महाराजांच्या दरबारांतील हें वृत्त नंतर शिवाजीपंतांनीं पोर्तुगीज सकडतार बंदर गोवा यांस कळविलें. पाहा ले. ६२; शिवाय ले. २७, ३२ व ४६ हे लेख या विषयाबाबत आहेत.

कै. डॉ. गो. स. सरदेसाई, बी. ए., यांनीं आपल्या मराठी रियासतींत —५ पुण्यश्लोक शाहू, ३ पेशवा बाळाजीराव भाग पहिला [१७४० – १७४९]— 'सौजन्याचें सामर्थ्य' या मथळ्याखालीं छत्रपति शाहूमहाराजांसंबंधीं छापलेलें विवेचन वाचकांनीं जरूर वाचावे. प्रस्तुत साधनग्रंथांतील लेखांक ६२ व ले. २० या

मूळ कागदांतील माहितीवरून या विवेचनास संपूर्ण दुजोरा मिळतो. तथापि वाचकांना कल्पना यावी या उद्देशानें त्यांतील केवळ एक परिच्छेद येथें उद्‌धृत करीत आहें :

" मराठी राज्याचें ध्येय व तें साधण्याचे मार्ग शाहूनेंच आपल्या दीर्घ कारकीर्दींत ठरविले. त्यांची छाप अखेरपावेतों महाराष्ट्रावर बसली. हें ध्येय त्यानें स्वयंस्फूर्तिनें व अंतःकरणप्रवृत्तीनें ठरवून एकंदर राष्ट्रास सौजन्याचा धडा घालून दिला. त्याचें हें ध्येय स्वार्थाचें नसून केवळ चित्तशुद्धीचें होतें. विशिष्ट धर्मबंधनांनीं त्याच्या भावना बनलेल्या नसून त्याची वृत्ति सर्व धर्मांना समान आदर दाखविण्याकडे होती. ' महाजनो येन गतः स पन्थाः ' या न्यायानें सर्व राष्ट्राला त्यानें विशिष्ट वळण लावून दुष्ट प्रवृत्तींपासून बहुधा अलिप्त ठेविलें. कांहीं थोडेबहुत युद्धप्रसंग झाले, तरी त्यांना तत्कालीन किंवा आधुनिक युरोपांतील क्रूर हिंसावृत्तीचें स्वरूप कधींच प्राप्त झालें नाहीं. शाहूच्या या अहिंसावृत्तीचीं उदाहरणें बर ठिकठिकाणीं देण्यांत आलीं आहेत. सूड व प्रतिकार या भावना शाहूनें कशा दाबून टाकिल्या त्यांचीं हीं उदाहरणें शाहूच्या वागणुकींत भरपूर व्यक्त झालेलीं आहेत. म्हणूनच राष्ट्रपिता ही पदवी शाहूला कोणीं दिली तर ती योग्यच ठरेल. " [पृ. १९१]

तुळाजी आंगरे हे छत्रपतींचे चाकर आहेत. तेव्हां त्यांनीं मालवणचें आरमार धरून नेलें ही गोष्ट बेइमानीची केली. सबब सर्वांनीं एकत्र होऊन तुळाजीचें पारिपत्य करणें जरूर आहे. ही हकीकत पांडुरंग बिश्राम यानें पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यास कळविली (ले. ७१) अर्जोजी यादव या सरदारास कोणी जहर घातलें. हें जहर काढणारा तबीब या प्रांतांत कोणी नाहीं. तेव्हां विलायती किंवा पुर्तुकाली तबीब पाठवून देण्याबद्दल पोर्तुगीज सकटतार बंदर गोवा यांस छत्रपति संभाजीमहाराजांनीं कळविलें. (ले. ७२) ' नानासाहेब पेशवे यांचे चुलत बंधु सदाशिवरावभाऊ यांनीं स्वतःचे नांवें छत्रपति संभाजीमहाराज यांच्याकडून कृष्णा नदीअलीकडील जिल्हे करून घेतले. नानासाहेब पेशवे व सदाशिवरावभाऊ उभयतां येक लक्ष फौज घेऊन मोहिमेस गेले होते. त्यांनीं दोन कोटी रुपये मिळविले. महाराणी ताराबाई व पेशवे यांच्यामध्यें विपर्यास आला. दसरा झाल्यानंतर पेशवे संभाजीमहाराजांची भेट घेऊन सोंधे, बिदनूर, सावणूर या प्रांतांत मोहिमेस येणार आहेत. ' हें वृत्त भास्करराऊ दादाजी भावे नरगुंदकर यांनीं पोर्तुगीज सकडतार बंदर गोवा यांस कळविलें. (ले. ७४) पोर्तुगीजांनीं कुमक करावी व नेहमीं खबर समाचार घ्यावा, हा मजकूर जिवाजी विश्राम यांनीं सकडतार बंदर गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत आढळतो. (ले. ७८)

जंजिरे सिंधुदुर्ग हा महाराज छत्रपतींचा जागा असून आजपर्यंत टोपीकर व इतर यांनीं कोणीं त्या स्थलाची अमर्यादा केली नाहीं, असें असतांना फिरंगी यांनीं बदराह बर्तणूक करून जंजिरे सिंधुदुर्गावर तोफा मारल्या व पेठ जाळली. त्या प्रसंगीं फिरंगीयांच्या पारिपत्यास अंतर केल्याबद्दल थोरले माधवराव पेशवे यांनीं आनंदराव धुळप, जे आरमाराचे मुख्य त्यांना दोष दिला; आणि यापुढें फिरंग्यांच्या पारपत्याबाबत कोताई केली तर कार्यांवर पडणार नाहीं, अशी ताकीद धुळप यांना दिली. (ले. ७९) सिंधुदुर्गावर फिरंग्यांनीं हल्ला केला तेव्हां करवीरच्या महाराणी जिजाबाई यांनीं येशवंतराव सिंदे सुभेदार यांना तेथें रक्षणासाठीं फौजेसुद्धा रवाना केले. (ले. ८०) थोरल्या माधवराव पेशव्यांचे सरदार भिवराव पानसी, तोफखान्याचे मुख्य व रामचंद्र नाईक यांनीं करवीरच्या महाराणी जिजाबाई यांचा अम्मल चिकोडी तालुक्यांत बसवून दिला. (ले. ८१) पेशव्यांची मसलत तळकोकणांत होणार हें वृत्त पोर्तुगीज विजरई बंदर गोवा यांना भागीरथीबाई भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांनीं कळविलें. (ले. ८२) इंग्रजानीं जंजिरे सिंधुदुर्ग घेतला तो परत मिळावा म्हणून पोर्तुगीज सरकार मध्यस्थी करीत आहे, त्याविषयीं येशवंतराव सिंदे सुभेदार यांनीं सकडतार जंजिरे गोवा यांस एक पत्र लिहून समाधान व्यक्त केलें (ले. ८३). ले. ८५ याच विषयासंबंधीं आहे.

महाराणी जिजाबाई यांनीं सकडतार बंदर गोवा यांना संक्रमणप्रयुक्त तीलशर्करा पाठविली. (ले. ८४) जंजिरे सिंधुदुर्ग इंग्रजांचे कबजांत गेला होता तो सरकारांत दाखल झाला; ही खुषखबर महाराणीनें सकडतार बंदर गोवा यांस कळविली. जंजिऱ्याचा पक्का बंदोबस्त राखण्यासाठीं पोतुर्गीज विजरईनें तोफा, दारूगोळा, गलबतें वगैरेंचा भरपूर पुरवठा करावा, हाहि भाव महाराणीनें सदर पत्रांत प्रकट केला आहे. (ले. ८६) याच विषयाबाबत माहिती ले. ८७, ९५, ९७ मध्यें आहे. ले. ९४ व ९६ हे महाराणी जिजाबाईनें पोर्तुगीज सकडतार बंदर गोवा यांस लिहिलेलीं पत्रें आहेत. जिवाजी विश्राम सबनीस यांनीं बेइमानी करून महाराणी जिजाबाईचा रांगणा किल्ला फितुरीनें घेतला, हा मजकूर खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांनीं फिरंगी सकडतार जंजिरा गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत आहे. (ले. ८९) ले. ८८, ९२, ९३ हे लेख याच विषयासंबंधीं माहिती पुरवितात. रांगणा किल्ला कबजांत ठेवून त्याचे आधारावर पेशवे सरकार अथवा पोर्तुगीज सरकार यांच्याशीं कोणतें राजकारण खेळावें या बाबीची माहिती जिवाजी विश्राम यांनीं गोवर्णदोर बंदर गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत दिली आहे. (ले. ९०) रांगणा किल्ला हे करवीरकरांचे महास्थळ; तें दगा करून

जिवाजी विश्राम यांनीं घेतलें. पुढें किल्ल्यांतील बेइमानांचें पारिपत्य करून हें स्थळ करवीरकरांनीं हस्तगत केलें. तेव्हां त्या बेइमानांना ज्या क्रूर शिक्षा झाल्या त्याची हकीगत यशवंतराव शिंदे सुभेदार यांनीं सक्रडतार बंदर गोवा यांना कळविली आहे. (ले. ९१).

गोवर्गदोर बंदर गोवा यांस पुण्याची जी खबर पाठविली त्यांत सदाशिवराव-भाऊंचा तोतया खोटा ठरला आणि त्यास मेखसूखालीं ठार मारिला हें वृत्त आहे. (ले. ९९) बारभाईच्या पारिपत्यास्तव मदत जलदीनें पाठवावी. त्यासाठीं रघुनाथराव दादासाहेब यांचीं पत्रें बारंवार येतात, हें वृत्त महाराणी दुर्गाबाई, करवीर यांनीं विजरई बंदर गोवा यांना कळविलें. जंजिरे सिंधुदुर्गाचा कौल घेऊन आमदरफ्ती करावी म्हणजे तुमच्या राज्यांतील साहुकारी तरांड्यास मालवणच्या आरमाराकडून तसदी व हरज पोंहच-णार नाहीं ही माहिती आणि हैदरअली व करवीरकर यांच्या परस्पर दोस्तीचें वर्णन या दोन्ही गोष्टी महाराणी दुर्गाबाई यांच्या वर निर्देश केलेल्या पत्रांत आढळतात. (ले. १०१). याच विषयासंबंधीं ले. १०० हा लेख आहे-

महादजी शिंदे यांनीं कोल्हापुरावर स्वारी केली त्याबाबत हकीकत ले. १०२, १०३ मध्यें आढळते. तसेच राघोबादादांच्या हालचालीबाबत बातमी ले. १०३, १०४ हे लेख देतात. कोल्हापूरकरांचें ठाणें शिरोळ घुमट हें परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं मोर्चे लावून घेतलें हें वृत्त गोवर्गदोर बंदर गोवा यांस कळविले आहे (ले. १०५) सावंतवाडीकरांनीं करवीरकरांच्या रांगणा किल्ल्यास वेढा घातला; सबब वाडीकरांचे पारिपत्य करण्यासाठीं कुमक सत्वर करावी म्हणून फिरंगी सक्रडतार बंदर गोवा यांस पत्रें पाठविलीं आहेत. (ले. १०६, १०७, १०९) कोल्हापूर सरकारनें पोर्तुगीज सरकार-कडून दारूगोळा मागविला त्याबाबत एक यादी उपलब्ध आहे. (ले. १०८).

यशवंतराव शिंदे सुभेदार जंजिरे सिंधुदुर्ग यांनीं विजरई बंदर गोवा व सक्रडतार बंदर गोवा यांना जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत पोर्तुगीज अमलाखालील सावकारी तरांड्यांनीं जंजिरे मजकूरचा आमदरफ्तीचा कौल घेतला नाहीं म्हणून त्यांची तरांडी करवीरकरांच्या आरमारांनीं दस्त केली हें नमूद केलें आहे. (ले.११०,१११,११२). ले. ११३, ११४, ११५ व ११६ हे लेख याच विषयासंबंधीं आहेत. सुभेदार नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग यांच्याशीं करावयाच्या करारांचीं कलमें ले. ११७ मध्यें आहेत.

पारगड किल्ल्याचे खर्चासाठीं व्यवस्था तालुके डिचोली व पेडणें यांच्या उत्पन्नां-तून पुरातनपासून आहे. त्याप्रमाणें आतांहि चालवावे म्हणून धोंडो कृष्ण नामजाद

ब कारकून किल्ले पारगड यानीं गोवर्णदोर जंजिरे गोवा यांस पत्र पाठविलें. सदर पत्रांत कोल्हापूरमध्यें फौज तयार होत आहे; परंतु मसलत कोणीकडे आहे तें कळत नाहीं हें देखील वृत्त आहे (ले. १२४).

वाडीचे तिसरे खेम सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांचा विवाह जयाजीराव शिंद्यांची मुलगी लक्ष्मीबाई हिच्याशीं झाला. पुढें लक्ष्मीबाईनें महादजी शिंदे यांच्या विद्यमानें दिल्लीच्या मोंगल पातशहाकडून 'राजेबहाद्दर' हा किताब व मोर्चेल धरण्याचा हक्क नवऱ्याकरितां मिळविला. परंतु छत्रपतीशिवाय इतरास मोर्चेल धारण करण्याचा हक्क नाहीं, यास्तव ही गोष्ट करवीरच्या छत्रपति महाराजांना रुचली नाहीं. पुढें करवीरच्या महाराजांनीं वाडीकर सावंत याचा मुलूख काबीज करण्याचे योजिलें आणि दोघांचें युद्ध जुंपलें. या प्रसंगीं खेम सावंत भोसले यांनीं पोर्तुगीजांकडे सहाय्य मागितलें, त्याप्रमाणें पोर्तुगीजानीं सावंतवाडीकरांची कुमक केली. तथापि खेम सावंत भोसले यांचें या युद्धांत भयंकर नुकसान झालें. त्यांचा मुलूख देखील करवीरकर छत्रपति महाराजांनीं हुजूरच्या अमलाखालीं कित्येक वर्षें ठेविला. शेवटीं तहासाठीं वाटाघाटी अनेक वर्षें चालून हा तह ठरला. या सर्व घटनांची हकीगत पुढें निर्देश केलेल्या लेखांत आलेली आहे. (ले. ११८ ते १२३ आणि ले. १२५ ते १२९).

खेम सावंत भोसले यांनीं करवीरकर महाराजांची फौज मदतीस आणून गोवे प्रांतांत मोहीम केली ही हकीकत ले. १३१, १३२, १३३ या लेखांत आहे. श्रीमन्महाराज करवीर यांची फौज गोमंतक प्रांतांत रवाना होणार असून या मोहिमेवर छत्रपति महाराजांकडून पंत अमात्य व प्रीतीराव चव्हाण हिंमतबहाद्दर या दोन सरदारांची नेमणूक झाली आहे, हें वृत्त ले. १३० मध्यें आढळतें. सुभेदार किल्ले कलानिधीगड व ठाणें चांदगड यांनीं गोवर्णदोर व सकडतार बंदर गोवा यांना छत्रपति महाराज करवीर यांच्या फौजेच्या हालचाली कळविल्या आहेत. (ले. १३५). पेशजी गोवेकर फिरंगी हे खंडणीबाबत करवीर छत्रपति महाराजांना सवा खंडी सोनें देत होते. अंत्रूजमहाल, फोंडे, मर्दनगड हा पोर्तुगीजांकडे असलेला मुलूख हुजूर चालत होता. तसेंच मुळीक व सोंधेकर पाळेगार हे देखील हुजूर चालत होते. ही माहिती ले. १३६ या लेखांत आहे. करवीरकर महाराजांची व इंग्रजांची दोस्ती करार व्हावी ही गोष्ट देखील सदर पत्रांत दिली आहे.

' आम्ही पेशवे सरकारच्या आज्ञेप्रमाणें कोल्हापूरच्या मोहिमेंवर आहों. तेव्हां कुमकेस मागविलेली इंग्रजांचीं पलटणें गोवा बंदरांत उतरलीं आहेत त्यांना इकडे कुमकेस जलद दाखल होत ते करणें; ' असें रामचंद्र परशुराम पटवर्धन यांनीं पोर्तुगीज गोवर्णदोर बंदर गोवा यांस कळविलें. (ले. १३७)-

खेम सावंत भोसले यांचे डिचोली, सांखळी व पेडणे हे महाल पोर्तुगीज सरकाराकडे मागें दिले होते. आतां पोर्तुगीजांनीं ते महाल सावंतवाडीकरास परत करावे ही मागणी खेम सावंतांनीं गोवर्णदोर बंदर गोवा यांस केली. (ले. १३८). खेम सावंताच्या मृत्यूनंतर सावंतवाडी संस्थानांत वारसासाठीं भांडणें सुरू झालीं. त्या यादवींत करवीर छत्रपति महाराजांकडे फोंड सावंत भोसले सरदेसाई पा कुडाळ व माहालानिहाय यांचें राजकारण आलें. महाराजांनीं तें राजकारण स्वीकारून लक्ष्मीबाई व त्यांचे साथीदार यांच्याबरोबर युद्ध सुरू केलें या प्रसंगीं लक्ष्मीबाईनीं पोर्तुगीज सरकार बंदर गोंवा यांची मदत मिळविली, या संपूर्ण प्रकरणाची हकीकत ले. १३९ ते ले. १६० या लेखांत आढळते.

चीनचे दोन असामी सांपडले होते त्यांना आणण्यासाठीं केलेल्या बंदोबस्ताची माहिती ले. १६१ मध्यें आहे.


हें संशोधनाचें कार्य मीं पणजी मुक्कामीं बरेंच दिवस करीत होतों. त्या अवधींत या कामीं डॉक्टर व्ही. टी. गुणे, डायरेक्टर ऑफ आर्काइव्हज्, गोवा पुराभिलेख संग्रहालय, पणजीं (गोवा) यांनीं नानाप्रकारचें सहाय्य मला केलें हें नमूद करण्यांत मला संतोष वाटतो. त्यांनीं केलेल्या ह्या सहाय्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपति, बी. ए., जी. सी. एस्. आय., हिंदुपदपातशहा, महाराज सरकार करवीर यांच्या प्रोत्साहनानें मी ही साहित्यसेवा करीत आहें. याबद्दल मी महाराजांचे मनःपूर्वक आभार मानतों.

वर निर्देश केल्याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकांत छापलेले १६१ कागद मी वाचकांस सादर करीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणें नं. ११
मिति फाल्गुन कृष्ण ९ शके १८८६
ता. २६-३-१९६५

मा. वि. गुजर



समर्पण

मेजर जनरल हिज हायनेस सर श्री शहाजी छत्रपति,

बी. ए., जी. सी. एस. आय.

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ८

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर